आवृत्ती-२

# मतदान केंद्राध्यक्षांसाठी

# निदेशपुस्तक

# २०२३

## भारत निवडणूक आयोग

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१

एकही मतदार मतदानापासून वंचित राहता कामा नये.



# भारत निवडणूक आयोग

# Election Commission of India

निर्वाचन सदन, आशोका रोड, नवी दिल्ली ११०००१

# मतदान केंद्राध्यक्षांसाठी

# निदेशपुस्तक

# २०२३

## भारत निवडणूक आयोग

**निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१**

**" एकही मतदार मतदानापासून वंचित राहता कामा नये "**

**" सर्वसमावेशक, सुलभ, सहभागात्मक, सुरक्षित व प्रलोभनमुक्त निवडणूका बनविणे "**

**हा दस्तऐवज भारत निवडणूक आयोगाच्या *https : //eci.gov.in* या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.**

**दस्तऐवज क्रमांक : ३२४.६ ईपीएस : एचबी : ००९ : २०२३**

## **सुधारणा व शुद्धिपत्रक**

| सुधारणा | | | शुद्धिपत्रक | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | दिनांक | विषय | अ. क्र. | दिनांक | विषय |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## संक्षेपाक्षर व आद्याक्षर संज्ञा (संक्षेप सूची)

| | | |
|---|---|---|
| AC | Assembly Constituency | विधानसभा मतदारसंघ |
| AIS | Additional Information sheet | अतिरिक्त माहिती प्रपत्र |
| AERO | Assistant Electorial Registration Officer | सहायक मतदार नोंदणी अधिकारी |
| ASD | Absentee, Shifted and Dead | अनुपस्थित, स्थलांतरित व मयत |
| BEL | Bharat Electronics Limited | भारत इलेक्ट्रॉनिक लिमिटेड |
| BLO | Booth Level Officer | मतदान केंद्रास्तरीय अधिकारी |
| BU | Ballot Unit | मतदान युनिट |
| ECI | Election Commission of India | भारत निवडणूक आयोग |
| ERO | Electoral Registration Officer | मतदार नोंदणी अधिकारी |
| CAPF | Central Armed Police Force | केंद्रीय सशस्त्र पोलीस दल |
| CSV | Classified Service Voter | वर्गीकृत सेवा मतदार |
| CU | Control Unit | नियंत्रण युनिट |
| DEO | District Election Officer | जिल्हा निवडणूक अधिकारी |
| ECIL | Electronic Corporation of India Limited | इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड |
| EPIC | Elector's Photo Identity | मतदार छायाचित्र ओळखपत्र |
| EVM | Electronic Voting Machine | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र |
| MO | Micro Observer | सूक्ष्म निरीक्षक |
| NOTA | None Of The Above | वरीलपैकी कोणीही नाही |
| PC | Parliamentary Constituency | लोकसभा मतदारसंघ |
| PER | Photo Electoral Roll | छायाचित्र मतदार यादी |
| PO1 | First Polling Officer | पहिला मतदान अधिकारी |
| PO2 | Second Polling Officer | दुसरा मतदान अधिकारी |
| PO3 | Third Polling Officer | तिसरा मतदान अधिकारी |
| PPS | Pink Paper Seal | गुलाबी कागदी मोहोर |
| PrO | Presiding Officer | मतदान केंद्राध्यक्ष |
| PS | Polling Station | मतदान केंद्र |
| PV | Proxy Voter | बदली मतदार |
| RO | Returning Officer | निवडणूक निर्णय अधिकारी |
| SO | Sector Officer | क्षेत्र अधिकारी |
| VAB | Voter Assistant Booth | मतदार सहायता केंद्र |
| VIP list | Very Important Persons List | अति महत्त्वाच्या व्यक्तींची यादी |
| VIS | Voter Information Slip | मतदार माहिती चिठ्ठी |
| VVPAT | Voter Verfiable Paper Audit Trail | मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी स्थिती दर्शक युनिट |

## अनुक्रमणिका

### विभाग—एक प्रकरणे


| **प्रकरण-१** | **प्रारंभिक** | **पृष्ठ क्रमांक** |
|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** |
| १.१ | प्रस्तावना . . . . . . . . | १ |
| १.२ | कायदेशीर तरतुदी . . . . . . . . | १ |
| १.३ | मतदान पथक . . . . . . . . | १ |
| १.४ | मतदानाशी संबंधित प्रशिक्षणे . . . . . . . . | २ |
| १.५ | टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज . . . . . . . . | २ |
| १.६ | मतदान साहित्य . . . . . . . . | २ |
| १.७ | ईव्हीएम व व्हीव्हीपॅटची तपासणी . . . . . . . . | ३ |
| १.८ | मतदान साहित्याची तपासणी . . . . . . . . | ४ |
| १.९ | छायाचित्र मतदान याद्या . . . . . . . . | ५ |
| १.१० | एकेरी निवडणुकीसाठी मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्ये . . . . . . | ६ |
| १.११ | एकत्रित निवडणुकीसाठी मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्ये . . . . . . | ८ |
| १.१२ | मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये . . . . . . . . | ८ |
| १.१३ | मतदान समाप्त करणे . . . . . . . . | ११ |
| १.१४ | क्षेत्र अधिकारी . . . . . . . . | १२ |
| १.१५ | मतदार सहायता केंद्र . . . . . . . . | १२ |
| **प्रकरण-२** | **मतदान केंद्राची रचना आणि सुरक्षा व्यवस्था** | |
| २.१ | मतदान केंद्रावर येणे . . . . . . . . | १३ |
| २.२ | मतदान अधिकाऱ्याची अनुपस्थिती . . . . . . . . | १३ |
| २.३ | एकेरी निवडणुकीसाठी मतदान केंद्राची रचना . . . . . . | १३ |
| २.४ | एकत्रित निवडणुकीसाठी मतदान केंद्राची रचना . . . . . . | १४ |
| २.५ | एकत्रित घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांसाठी मतदान प्रक्रिया . . . . . . | १५ |
| २.६ | इतर सावधगिरी . . . . . . . . | १६ |
| २.७ | नोटीसा लावणे . . . . . . . . | १७ |
| २.८ | मतदान केंद्रात प्रवेश करण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती . . . . . . | १७ |
| २.९ | मतदान प्रतिनिधींची नियुक्ती करणे आणि नियुक्ती रद्द करणे . . . . | १८ |
| २.१० | मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्तीसाठी अर्हता . . . . . . | १८ |
| २.११ | मतदान प्रतिनिधींनी नियुक्तीपत्रे सादर करणे . . . . . . | १९ |
| २.१२ | मतदान प्रतिनिधींची उपस्थिती . . . . . . . . | १९ |
| २.१३ | मतदान प्रतिनिधींसाठी प्रवेशपत्रे (पासेस). . . . . . . . | २० |
| २.१४ | मतदान केंद्रामध्ये मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था . . . . . . | २० |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २.१५ | मतदान केंद्रात धूम्रपान करण्यास मनाई असणे . . . . . . | २० |
| २.१६ | मतदान केंद्रावरील वृत्तपत्र प्रतिनिधी, छायाचित्रकार व व्हिडीओग्राफर यांना द्यावयाच्या सुविधा . . | २१ |
| २.१७ | छायाचित्रीकरण/व्हिडीओ चित्रिकरण . . . . . . . . | २१ |
| २.१८ | मतदान केंद्रात आंतर जालावरून प्रक्षेपण करणे . . . . . . | २२ |
| २.१९ | आयोगाने नेमलेल्या निरीक्षकांना द्यावयाच्या सुविधा . . . . . . | २२ |
| २.२० | सूक्ष्म निरीक्षक . . . . . . . . | २३ |
| २.२१ | मतदान केंद्रामध्ये असताना बिल्ले इत्यादी लावणे . . . . . . | २४ |
| २.२२ | मतदान केंद्रातील सुरक्षा व्यवस्था . . . . . . . . | २४ |
| **प्रकरण-३** | **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट संच मांडणी करणे व तयारी करणे** | |
| ३.१ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांची ओळख . . . . . . | २६ |
| ३.१.१ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इव्हीएम) . . . . . . | २६ |
| ३.१.२ | मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपॅट) . . . . | ३० |
| ३.२ | अभिरूप मतदानापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅटची संच मांडणी करणे आणि अभिरूप मतदान घेणे. . . . . . . . . | ३१ |
| ३.२.१ | अभिरूप मतदानापूर्वी मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट यांची जोडणी करणे . . | ३१ |
| ३.३ | अभिरूप मतदान घेणे . . . . . . . . | ३३ |
| ३.३.४ | अभिरूप मतदान सुरू करण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट ' निःशेष ' असल्याचे प्रात्याक्षिक | ३३ |
| ३.३.५ | अभिरूप मतदान घेण्याकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती . . . . . . | ३५ |
| ३.४ | अभिरूप मतदान समाप्त झाल्यावर आणि प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट मोहोर बंद करणे. . . . . . . . . | ३७ |
| ३.४.१ | नियंत्रण युनिटचा निकाल विभाग हिरवी कागदी मोहोर, विशेष खूणाचिट्ठी आणि पत्ता खूणचिट्ठी यांनी मोहोरबंद करणे. . . . . . . . . | ३७ |
| ३.४.२ | प्रत्यक्ष मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅटची तयार ठेवणे . . . . | ३९ |
| ३.४.३ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बदलून घेतले असेल तर अभिरूप मतदान . . . . | ३९ |
| ३.४.४ | गंभीर चुका . . . . . . . . | ३९ |
| ३.४.५ | कागदी मोहोरांचा हिशोब . . . . . . . . | ४० |
| ३.५ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मतदार पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपॅट) यांची हाताळणी न करणे. . . . . . . . . | ४० |
| ३.६ | मतदान पथकांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांवरील मतदान दिवसांच्या सूचना . . | ४२ |
| ३.७ | प्रत्यक्ष मतदानामध्ये किंवा त्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलणे. . . . | ४४ |
| **प्रकरण-०४** | **मतदानाची कार्यपद्धती** | |
| ४.१ | मतदान केंद्रामध्ये व त्याच्या सभोवताली निवडणुक कायद्याची अंमलबजावणी . . . . | ४५ |
| ४.२ | मतदानास प्रारंभ करणे . . . . . . . . | ४६ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ४.३ | मतदारांची ओळख पटविणे आणि त्यासंबंधात आक्षेप घेण्याच्या बाबतीतील कार्यपद्धती . . | ४८ |
| ४.३.१ | मतदाराची ओळख पटविणे . . . . . . . . | ४८ |
| ४.३.२ | ज्यांना टपाली मतपत्रिका देण्यात आल्या आहेत असे अनुपस्थित मतदार . . . . | ५० |
| ४.३.३ | मयत, अनुपस्थित आणि तोतया मतदारांची यादी . . . . . . | ५१ |
| ४.३.४ | मतदार यादीतील लेखन आणि छपाईच्या चूका दुर्लक्षित करणे . . . . | ५१ |
| ४.३.५ | मतदाराच्या नाव नोंदणीच्या वस्तुस्थितीबाबत प्रश्न उपस्थित न करणे . . . . | ५१ |
| ४.४ | मतदाराला त्याचे/तिचे मत नोंदविण्यासाठी त्याला/तिला परवानगी देण्यापूर्वी पक्क्या शाईची खूण करणे आणि त्याची सही/अंगठ्याचा ठसा घेणे. . . . . . . | ५१ |
| ४.४.१ | मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीची तपासणी करणे व पक्क्या शाईची खूण करणे . . | ५१ |
| ४.४.२ | नवीन मतदानाच्या वेळी शाई लावणे (पुनर्मतदान)/प्रत्यादेशित मतदान . . . . | ५२ |
| ४.४.३ | मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसल्यास पक्की शाई लावण्याची पद्धत . . . . | ५२ |
| ४.४.४ | मतदार नोंदवही मतदार अनुक्रमांकाची नोंद करणे . . . . . . | ५२ |
| ४.४.५ | मतदाराच्या सहीची व्याख्या . . . . . . . . | ५३ |
| ४.४.६ | मतदाराच्या अंगठयाचा ठसा घेणे . . . . . . . . | ५३ |
| ४.४.७ | अंध किंवा विकलांग किंवा कुष्ठरोगी मतदारांची/चा मतदार नोंदीवर सही/अंगठयाचा ठसा . . | ५३ |
| ४.४.८ | मतदाराला मतदार चिठ्ठी देणे . . . . . . . . | ५४ |
| ४.५ | मत नोंदवणे व मतदान प्रक्रिया . . . . . . . . | ५४ |
| ४.५.१ | मत नोंदणी . . . . . . . . | ५४ |
| ४.५.२ | मत नोंदवण्यास मतदाराला परवानगी देणे . . . . . . | ५४ |
| ४.५.३ | मतदान प्रक्रिया . . . . . . . . | ५५ |
| ४.५.४ | मतदान झालेल्या मतांचा ठराविक कालांतरांने मेळ घालणे . . . . . . | ५५ |
| ४.५.५ | मतदान चालू असताना मतदान कक्षात प्रवेश करण्याचा मतदान केंद्राध्याक्षाचा विशेषाधिकार . . | ५६ |
| **४.६** | **मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांची हाताळणी करणे** | |
| ४.६.१ | प्रत्यक्ष मतदानादरम्यान युनिट बदलणे . . . . . . . . | ५६ |
| ४.६.२ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलण्याबाबत तयार करावयाचे अहवाल . . | ५७ |
| ४.६.३ | मतदान केंद्राध्याक्षाच्या अहवालाचे संकलन करणे . . . . . . | ५८ |
| **प्रकरण-५** | **विशेष प्रकरणे** | |
| ५.१ | मतदान कार्यपद्धतीचे पालन करण्यास नकार देणे . . . . . . | ५९ |
| ५.२ | अंध व शारीरिकदृष्ट्या विकलांग मतदारांकडून मतदान . . . . . . | ५९ |
| ५.३ | मतदान न करण्याचे ठरविलेले मतदार . . . . . . | ६० |
| ५.४ | निवडणूक कर्तव्यावरील लोकसेवकांनी मतदान करणे . . . . . . | ६१ |
| ५.४.५ | निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र असलेल्या मतदारांकडून मतदान . . . . | ६१ |
| ५.५ | बदली व्यक्तीद्वारे (प्रॉक्सी) मतदान . . . . . . . . | ६२ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५.६ | प्रदत्त मते . . . . . . . . | ६२ |
| ५.६.४ | प्रदत्त मतपत्रिकेचा हिशेब . . . . . . . . | ६३ |
| ५.६.५ | ज्या मतदारांना प्रदत्त मतपत्रिका दिलेली आहे त्या मतदारांची नोंद . . . . | ६३ |
| ५.७ | आक्षेपित मते . . . . . . . . | ६३ |
| ५.७.२ | मतदाराच्या ओळखीबाबत आक्षेप घेणे . . . . . . . . | ६३ |
| ५.७.३ | आक्षेप शुल्क . . . . . . . . | ६३ |
| ५.७.४ | संक्षिप्त चौकशी . . . . . . . . | ६४ |
| ५.७.५ | आक्षेप शुल्क परत करणे किंवा जप्त करणे . . . . . . | ६४ |
| ५.८ | ज्याचे अर्हताकारी वयापेक्षा कमी वय आहे असे तुम्हाला वाटते अशा व्यक्ती . . . . | ६४ |
| ५.९ | चाचणी मते . . . . . . . . | ६४ |
| **प्रकरण-६ दंगा, मतदान केंद्र ताब्यात घेणे इत्यादींमुळे मतदान तहकूब करणे / थांबविणे** | | |
| ६.१ | दंगा, इत्यादींमुळे मतदान तहकूब करणे . . . . . . . . | ६६ |
| ६.२ | तहकूब केलेले मतदान पूर्ण करणे . . . . . . . . | ६६ |
| ६.३ | इलेट्रॉनिक मतदान यंत्रात बिघाड होणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे, इत्यादींमुळे मतदान थांबविणे . . | ६७ |
| ६.४ | मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या प्रसंगी मतदान यंत्र बंद करणे . . . . . . | ६७ |
| **प्रकरण-७ मतदान समाप्त करणे** | | |
| ७.१ | मतदान समाप्त होण्याच्या वेळेस मतदान केंद्रावर हजर असलेल्या व्यक्तींनी करावयाचे मतदान . . | ६९ |
| ७.२ | मतदान समाप्ती . . . . . . . . | ६९ |
| ७.३ | नोंदवलेल्या मतांचा हिशोब . . . . . . . . | ७० |
| ७.३.१ | नोंदवलेल्या मतांचा हिशोब तयार करणे. . . . . . . . | ७० |
| ७.३.२ | नोंदवलेल्या मतांच्या हिशोबाच्या साक्षांकित प्रती मतदान प्रतिनिधींना देणे . . . . | ७० |
| ७.३.३ | मतदान समाप्त झाल्यावर करावयाचे प्रतिज्ञापत्र . . . . . . | ७१ |
| ७.४ | मतदान समाप्त झाल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट मोहोरबंद करणे . . | ७१ |
| ७.५ | निवडणुकविषयक कागदपत्रे मोहोरबंद करणे . . . . . . | ७२ |
| ७.५.१ | निवडणुकविषयक कागदपत्रे पाकिटात मोहोरबंद करणे . . . . . . | ७२ |
| ७.५.२ | सांविधिक, असांविधिक लिफाफे आणि निवडणूक साहित्याची बांधाबांध . . . . | ७२ |
| ७.५.३ | लिफाफे मोहोरबंद करणे . . . . . . . . | ७५ |
| ७.६ | दैनंदिनी तयार करणे आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, व्हीव्हीपॅट व निवडणुकविषयक कागदपत्रे संकलन केंद्रात जमा करणे . . . . . . . . | ७५ |
| ७.६.१ | दैनंदिनी तयार करणे . . . . . . . . | ७५ |
| ७.६.२ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट आणि निवडणुकविषयक कागदपत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पोहोचविणे . . | ७५ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| **प्रकरण-८** | **भ्रष्टाचारी प्रथा व निवडणुकविषयक अपराध** | |
| ८.१ | प्रचार करण्यास मनाई .. .. .. .. | ७७ |
| ८.२ | मतदारांना मतदान करण्यास प्रतिबंध करणे .. .. .. | ७७ |
| ८.३ | मतदारांना नेण्या-आणण्यासाठी वाहन बेकायदेशीरपणे भाड्याने घेणे .. .. | ७७ |
| ८.४ | मतदान यंत्रे आणि / किंवा इतर मतदान साहित्य मतदान केंद्रातून पळवणे (बाहेर काढणे) हा एक अपराध असणे .. .. .. .. | ७८ |
| ८.५ | गैरवर्तवणूक करणाऱ्या (उपद्रव देणाऱ्या) व्यक्तीला घालवून देणे .. .. | ७८ |
| ८.६ | निवडणूक अधिकाऱ्यांकडून झालेला कार्यालयीन कर्तव्य भंग .. .. | ७८ |
| ८.७ | मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ हत्यारे घेऊन जाण्यास प्रतिबंध .. .. | ७८ |
| ८.८ | तोतयोगिरीचे प्रकरण .. .. .. .. | ७८ |
| ८.९ | मतदान बुथ ताब्यात घेण्याचा अपराध .. .. .. .. | ७८ |
| **प्रकरण-९** | **मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी यांच्यासाठी एका दृष्टिक्षेपात कारवाईयोग्य मुद्दे** | |
| ९. क | सामान्य चुका .. .. .. .. | ८५ |
| ९.ख | काय करावे आणि काय करू नये .. .. .. .. | ८५ |
| ९.ख.१ | व्हीव्हीपॅटच्या वापराबाबत काय करावे आणि काय करू नये .. .. | ८५ |
| ९.ख.२ | व्हीव्हीपॅट व्यतिरिक्त काय करावे आणि काय करू नये .. .. .. | ८६ |

**विभाग - दोन : जोडपत्रे** पृ. क्रमांक


| | | |
|---|---|---|
| जोडपत्र-१ | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यामधील उतारे .. .. .. | ८८ |
| जोडपत्र-२ | निवडणुका घेण्याबाबत नियम, १९६१ यातील उतारे .. .. .. | ९६ |
| जोडपत्र-३ | मतदान केंद्रासाठी मतदान साहित्याची यादी .. .. .. | १०६ |
| जोडपत्र-४ | चिन्हांकित प्रत म्हणून वापरावयाच्या यादीशी संबंधित प्रमाणपत्र .. .. | ११२ |
| जोडपत्र-५ | मतदान केंद्राध्यक्षाचे अहवाल .. .. .. .. | ११३ |
| जोडपत्र-६ | मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन .. .. .. | १२० |
| जोडपत्र-७ | मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी .. .. .. .. | १२७ |
| जोडपत्र-८ | नमुना १७ सी .. .. .. .. | १३१ |
| जोडपत्र-९ | मतदान केंद्राध्यक्षांनी वेगवेगळ्या टप्प्यांवर पार पाडावयाच्या कामांची रुपरेषा .. | १३४ |
| जोडपत्र-१० | मतदान केंद्राध्यक्षांसाठी तपासणी ज्ञापन .. .. .. | १३८ |
| जोडपत्र-११ | मतदान प्रतिनिधी / बदली प्रतिनिधी यांची ये-जा नोंदवही .. .. | १४० |
| जोडपत्र-१२ | प्रवेशपत्राचा नमुना .. .. .. .. | १४१ |
| जोडपत्र-१३ | मतदान प्रतिनिर्धीना दिलेल्या प्रवेशपत्रांचा हिशोब .. .. .. | १४२ |
| जोडपत्र-१४ | अनुपस्थित / स्थलांतरित / मयत मतदारांच्या यादीमध्ये (एएसडी यादी) नाव असलेल्या मतदारांनी करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना .. .. .. .. | १४३ |
| जोडपत्र-१५ | मतदाराकडून त्याच्या वयाबाबत घ्यावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना .. .. | १४४ |
| जोडपत्र-१६ | कमी वयाच्या मतदारांशी संबंधात मतदारांची यादी .. .. .. | १४५ |
| जोडपत्र-१७ | नियम ४९ एमए अन्वये प्रतिज्ञापत्र .. .. .. | १४६ |
| जोडपत्र-१८ | अंध किंवा विकलांग मतदारांच्या सोबत्याचे प्रतिज्ञापत्र .. .. .. | १४७ |
| जोडपत्र-१९ | पावती पुस्तक .. .. .. .. | १४८ |
| जोडपत्र-२० | पोलीस ठाणे अधिकाऱ्यास पाठवावयाचे तक्रारपत्र .. .. .. | १४९ |
| जोडपत्र-२१ | नियंत्रण युनिट-मतदान युनिट-व्हीव्हीपॅट बंद पडल्यास/त्रुटी असल्यास कसे हाताळावे. मतदान अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून मतदान तयारीदरम्यान सदोष हाताळणीमुळे होणाऱ्या त्रुटी - सूचना | १५० |
| जोडपत्र-२२ | नमुना एम २१- मतदानानंतर निवडणुकीचे अभिलेख व साहित्य परत जमा केल्याची पावती .. | १५२ |
| जोडपत्र-२३ | मतदान कक्ष - वेब कॅमेऱ्यासमोर एकाच बाजूवर मतदान युनिटांच्या बाजू आणि जोडण्या .. | १५५ |

## कर्तव्याची संक्षिप्त रूपरेषा

### प्रशिक्षणादरम्यान

भारत निवडणूक आयोगाच्या कायदे, त्यातील तरतुदी आणि अद्ययावत सूचना यांची संपूर्ण माहिती करून घेणे.

ईव्हीएम / व्हीव्हीपॅट कार्यप्रणालीची योग्य माहिती करून घेणे.

आवश्यकता असल्यास, टपाली मतपत्रिका / निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रासाठी अर्ज करा.

विविध वैधानिक आणि गैर-वैधानिक नमुने कसे भरावे याची माहिती करून घेणे.

### संकलन केंद्रावर

यादीनुसार (परिशिष्ट - ३) साहित्य आणि ईव्हीएम/ व्हीव्हीपॅट यंत्राचे संकलन करणे.

या बाबींवर विशेष लक्ष असावे. मतदान केलेल्या मतपत्रिका, ब्रेल लिपितील मतपत्रिका, मतदारांची नोंदवही (नमुना १७ ए), मतदार यादीची चिन्हाकित प्रत, नमुना १७ सी, मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी, खूणचिठ्या, मोहोरा (Seals) अनुपस्थित, स्थलांतरित व मृत मतदारांची यादी (एएसडी), वर्गीकृत सेवेतील मतदारांच्या याद्या (सीएसव्ही), उमेदवारांची नमुना स्वाक्षरी, हिरव्या कागदी मोहरा, गुलाबी कागदी मोहराबंद, काळा लिफाफा, चिकट पट्टी.

टपाली मतपत्रिकेद्वारा तुमच मतदान करा किंवा जर आधी अर्ज केला असल्यास, निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र मिळवा.

### मतदानापूर्वी

मतदान केंद्र उभारणे

ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटवर अभिरूप मतदान करणे

व्हीव्हीपॅटवरील अभिरूप मतदान चिठ्ठ्याशी नियंत्रण युनिटवर प्रदर्शित होणारा निकाल जुळतो का ते पाहणे

नियंत्रण युनिट मधून अभिरुप मतदानाचा निकाल काढून साफ (Clear) करणे आणि व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्समधून अभिरुप मतदान चिठ्ठ्या काढणे

व्हीव्हीपॅट अभिरुप मतपत्रिका मागील बाजूस स्टँपिंग केल्यानंतर गुलाबी कागदाने काळ्या लिफाफ्यात मोहोरबंद करणे

### मतदानादरम्यान

मतांच्या गोपनीयतेबद्दल उमेदवार / मतदान प्रतिनिधींना थोडक्यात माहिती देणे

मतदान सुरू झाल्याची घोषणा मोठ्याने वाचणे आणि उमेदवार / मतदान प्रतिनिधीच्या स्वाक्षऱ्या घेणे

नमुना १७ ए मध्ये नोंदी घेणे ईव्हीएम / व्हीव्हीपॅट यंत्रे योग्य प्रकारे चालत असल्याचे पाहणे

पहिल्या मतदाराने सही करण्यापुर्वी नमुना १७ ए मध्ये मतदान अधिकारी १ आणि मतदान केंद्राध्यक्षाद्वारे त्यात प्रमाणपत्राची नोंद करणे.

नमुना १७ ए शी झालेल्या मतदानाचा नियतकालिक ताळमेळ जुळवणे आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला मतदानाच्या स्थितीबाबत माहिती कळविणे.

मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीमध्ये घटनांची नोंद घेणे.

### मतदान समाप्तीच्या वेळी

मतदान बंद होण्याच्या वेळी रांगेत उभ्या असलेल्या व्यक्तींना क्रमांकित चिठ्ठ्या देणे

रांगेतील सर्व मतदारांनी मतदान केल्यानंतर ‘ क्लोज ’ बटण दाबणे

व्हीव्हीपॅट (ऊर्जा संच) (पॉवर पॅक) काढणे.

ईव्हीएम / व्हीव्हीपॅट मतदान यंत्रे त्यांच्या योग्य वहन पेट्यांध्ये मोहोरबंद करणे.

सांविधिक, गैर-असांविधिक कागदपत्रे मोहोरबंद करणे.

नमुना १७ सीच्या भाग एक मध्ये सर्व मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेणे आणि सर्व मतदान प्रतिनिधींना त्याची प्रमाणित प्रत देणे.

सर्व निवडणूक साहित्य जमा केंद्रावर जमा करण्यासाठी सुरक्षा ताफ्यासह घेऊन जाणे.

**मतदान केंद्राची उभारणी**

मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी यांची आसन व्यवस्था

मतदानाच्या गोपनीयतेचे उल्लघंन होणार नाही आणि मतदान कक्षाच्या आतील भाग कोणालाही दिसत नाही. (याची काळजी घेणे).

**मतदान कक्ष**

मतदान कक्षावर थेट प्रकाश नसावा.

खिडकीतून थेट प्रकाश येत नसावा.

मतदान युनिट नीट दिसण्याची खात्री करण्यासाठी मतदान केंद्राच्या आत पुरेसा प्रकाश असावा.

**ईव्हीएम/व्हीव्हीपॅटची जोडणी करणे**

मतदान युनिट, व्हीव्हीपॅट मतदान कक्षात असावे. व्हीव्हीपॅट पहिल्या मतदान युनिटच्या डाव्या बाजूला ठेवावे.

केबल्स लपवू नयेत परंतु मतदाराच्या पायात त्या अडकणार नाहीत अशा ठेवा.

नियंत्रण युनिट तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे असावे.

कनेक्टर योग्य पिन आणि कलर कोडसह जोडणे.

**अभिरुप मतदान**

नियंत्रण युनिटवर क्लिअर बटण दाबा, ते सर्व उमेदवारांसाठी ० (शून्य) दर्शवेल.

मतदान कक्षात उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्स रिकामा असल्याचे दाखवा.

प्रत्येक अनाच्छादीत (Unmasked) बटणासाठी एक मत अशी कमीत कमी ५० मते टाकली पाहिजेत (मतदान केले पाहिजे).

क्लोज बटण दाबा आणि नंतर रीझल्ट बटण दाबा.

व्हीव्हीपॅटचा कागदी चिठ्ठ्यांचा डब्बा रिकामा करा.

नियंत्रण युनिटचा निकाल आणि व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्यांची तुलना करा.

नियंत्रण युनिट वरील क्लिअर बटण दाबा.

अभिरूप मतदानाच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करा.

**मतदान यंत्रे मोहोरबंद करणे**

नियंत्रण युनिटमधील हिरव्या कागदी मोहोरेवर मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधींच्या सह्या घ्या.

कागदी मोहोरांचा हिशेब ठेवा.

नियंत्रण युनिटच्या आतील आवरणाला विशेष खुणचिठ्ठीने मोहोरबंद करणे.

पत्ता खुणचिठ्ठी  आणि हिरव्या कागदी मोहारेच्या मदतीने निकाल विभागाचे बाह्य आवरण मोहोरबंद करणे.

पत्ता खुणचिठ्ठीच्या मदतीने व्हीव्हीपॅटचा कागदी चिठ्ठ्यांचा ड्रॉप बॉक्स मोहोरबंद करा.

## अभिरूप मतदानाचा क्रम तक्ता

1. नियंत्रण युनिटावर " Clear " बटण दाबा.
2. सर्व उमेदवारांना समोर (शून्य) " 0 " दिसते
3. व्हीव्हीपॅट चा रिकामा ड्रॉप बॉक्स दाखवा
4. सर्व मतदान अधिकारी व सर्व मतदान प्रतिनिधी मतदान कक्षात जाऊन मतदान करतील.
5. कोणताही मतदान प्रतिनिधी आपल्या पसंतीचे बटण दाबेल आणि प्रत्येक निळे बटण किमान एकदा दाबले जावे
6. किमान पन्नास मते दिले जातील मतदान अधिकाऱ्याद्वारे दिलेल्या मतांची लेखी नोंद ठेवली जाईल.
7. नियंत्रण युनिटावरील क्लोझ बटण दाबावे व नंतर निकाल (रिझल्ट) बटण दाबा.
8. व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्समधून अभिरुप मतदानाच्या चिठ्ठ्या काढून टाकाव्या.
9. नियंत्रण युनिटवरील निकाल व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची पडताळणी करा.
10. नियंत्रण युनिट वरील " क्लियर " बटण दाबा
11. व्हीव्हीपॅटमधील मतदान चिठ्ठ्यांच्या मागच्या बाजूस मॉक पोल स्लीपचा रबरी शिक्का मारा.
12. शिक्का मारलेल्या चिठ्ठ्या विशेष काळ्या पाकिटात ठेवा आणि मोहरबंद करा. लिफाफ्यावर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधींच्या सह्या घ्याव्या
13. लिफाफ्यावर अभिरुप मतदानाच्या व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्या असे लिहून त्यावर मतदान केंद्राचा क्रमांक आणि नाव, मतदार संघाचे क्रमांक, व मतदान दिनांक नमूद करावे.
14. ते गुलाबी कागदी मोहोरेने मोहोरबंद करा, गुलाबी पट्टीवर मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधीच्या सह्या घ्याव्यात.
15. अभिरूप मतदान प्रमाणपत्रावर सही करा.
16. नियंत्रण युनिट, व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्स मोहोरबंद करा.

## विशेष परिस्थिती आणि प्रतिसाद

**व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठीवर चुकीचे मुद्रण.** — **मतदान युनिटवरील बटन दाबून बाहेर आलेल्या व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठीवरील चुकीच्या मुद्रणाबद्दल मतदार तक्रार करू शकतात.**

- नियम ४९ एमए अशा प्रकरणांमध्ये प्रतिसादाची तरतूद करतो.
- मतदाराकडून त्याने स्वाक्षरी केलेले लिखित प्रतीज्ञापपत्र घ्या.
- मतदान केंद्राध्यक्ष नमुना १७ए मध्ये त्या मतदाराशी संबंधित दुसरी नोंद करेल.
- मतदाराला मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत चाचणी मत नोंदवण्याची परवानगी द्या आणि कागदी चिठ्ठ्याचे निरीक्षण करा.
- आरोप खरा असल्याचे आढळल्यास, मतदान थांबवा आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्याबाबत कळवा.
- आरोप खोटा असल्यास, उमेदवाराचा अनुक्रमांक आणि नाव ज्याला असे चाचणी मत नोंदवले गेले आहे, ते नमुना १७ए मध्ये नमूद करा.
- नोंदवण्यात आलेल्या शेऱ्यावर मतदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा मिळवा.
- नमुना १७ सी च्या भाग एक मध्ये अशा चाचणी मताची नोंद करा.

**सदोष ईव्हीएम/व्हीव्हीपॅट.** — **नियंत्रण युनिट, मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट नादुरुस्त होणे आणि दुरुस्त करण्यासाठीच्या उपाययोजना.**

- जर नियंत्रण युनिट/मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट योग्यरीतीने काम करत नसेल, तर नियंत्रण युनिट, मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅटचा संपूर्ण संच बदला, नोटा सह प्रत्येक उमेदवारासाठी एक मताचे अभिरुप मतदान करा आणि अभिरूप मतदानाच्या सर्व प्रक्रियेचे अनुसरण करा.

**अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत यादीतील मतदार** — **निवडणूक निर्णय अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारीद्वारे क्षेत्रीय माहितीवरून अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत मतदार यादी तयार केली जाते.**

- मतदार ईपीआयसी किंवा परवानगी दिलेले फोटो दस्तऐवज सादर करेल आणि मतदान केंद्राध्यक्ष स्वतः त्याची पडताळमी करेल.
- मतदार नोंदवही (नमुना १७ ए) मध्ये स्वाक्षरी व्यतिरिक्त अंगठ्याचा ठसा घ्या.
- मतदानाच्या शेवटी अनुपस्थित, स्थलांतरित व मृत (एएसडी) यादीतील मतदारांची मतदान केंद्राध्यक्ष नोंद ठेवेल आणि त्याबाबत एक प्रमाणपत्र देईल.

**अनधिकृत ओळखचिठ्ठीसह येणारे मतदार** — **निवडणूक लढवणारे उमेदवार किंवा मतदान प्रतीनिधी कोणत्याही मतदाराला अनधिकृत ओळखपत्र देऊ शकतात.**

- जर अनौपचारिक ओळख चिठ्ठीमध्ये उमेदवाराचे आणि किंवा पक्षाचे नाव आणि किंवा चिन्ह असल्यास, संबंधित मतदान प्रतिनिधीला असे उल्लंघन थांबवण्याची सूचना द्या.
- निरक्षर मतदाराच्या बाबतीत, प्रथम मतदान अधिकाऱ्याने मतदाराचा अनुक्रमांक वाचून दाखवावा आणि सत्यता पडताळण्यासाठी मतदाराला त्याचे / तिचे नाव सांगण्यास सांगावे.
- तोतयागिरीच्या बाबतीत त्या व्यक्तिला पोलिसांच्या स्वाधीन करावे.
- मोठ्या संख्येने महिला मतदार विशेषतः पडदानशिव (बुरखा घातलेल्या) असल्यास त्या बाबतीत, एक महिला मतदान अधिकारी वरील कर्तव्ये एका वेगळ्या कक्षात पार पाडतील.

**आक्षेपित मत** — **मतदान केंद्राध्यक्षाकडे २ रुपये इतकी अनामतरक्कम जमा करून मतदान प्रतिनिधी कोणत्याही मतदाराच्या ओळखीस आव्हान देऊ शकतात.**

- मतदान केंद्राध्यक्ष आव्हानाची थोडक्यात चौकशी करेल.
- थोडक्यात केलेल्या चौकशीनंतर, आव्हान स्थापित न झाल्यास, मतदाराला मतदान करण्याची परवानगी दिली जाईल.
- आव्हान प्रस्थापित झाल्यास, मतदाराला मतदान करण्यापासून परावृत्त केले जाईल आणि लेखी तक्रारीसह पोलिसांच्या स्वाधीन केले जाईल.

**आपल्या वयासंबधित मतदाराचे प्रतिज्ञापत्र** — **जर मतदान केंद्राध्यक्षाला एखादा मतदार पात्रता वयापेक्षा खूपच कमी आहे असे वाटत असेल**

- मतदाराच्या ओळखीबद्दल स्वतःचे समाधान करा.
- मतदाराकडून मतदार यादीसाठीच्या संदर्भातील वर्षाच्या १ जानेवारी/१ एप्रिल/१ जुलै/१ ऑक्टोबर रोजी त्याच्या/तिच्या वयाबद्दल योग्य नमुन्यातील प्रतिज्ञापत्र प्राप्त करा. त्याला/तिला दंडात्मक तरतुदीबद्दल माहिती द्या.
- कमी वयाच्या मतदारांशी संबंधीत यादीतील परिशिष्टाच्या भाग एक आणि भाग दोन मध्ये ज्या मतदारांकडून तुम्ही असे प्रतिज्ञापत्र प्राप्त केले आहे त्यांची यादी तयार करा.

**मतदारांचा मतदानास नकार** — **नमुना १७ ए मध्ये मतदाराचा तपशील नोंदविल्यानंतर आणि त्याने आपली स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा उमटवल्यानंतर, त्याने/तिने आपले मत न नोंदविण्याचा निर्णय घेतल्यास, त्याला/तिला मत नोंदवण्याचे बंधन किंवा सक्ती केली जाणार नाही.**

- मतदारांच्या नोंदवहीमध्ये, ''मतदान करण्यास नकार दिला'' असा शेरा द्या आणि मतदान केंद्राध्यक्षानें त्या शेऱ्याच्या खाली स्वाक्षरी करावी.
- नमुना १७ सी च्या भाग एक मध्ये, नियम ४९ ओ अंतर्गत स्तंभ ३ मध्ये ''मत न देता निघुन गेला/ली'' किंवा ''मत देण्यास नकार दिला'' असे लिहिले जाईल.
- जर नियंत्रण युनिट वरील मतदानाचे बटन दाबले असेल, तर पुढच्या मतदाराला त्याचे मत देण्यासाठी थेट निर्देशित केले जाईल.

**प्रदत्त मते** — **असे होऊ शकते की, एखादी व्यक्ती मतदान केंद्रावर येते आणि स्वतःला एक विशिष्ट मतदार म्हणून दाखवत मतदान करण्याचा प्रयत्न करते आणि असे आढळून येते की दुसऱ्या व्यक्तीने त्याच्या जागेवर अशी मतदार म्हणून आधीच मतदान केले आहे.**

- संबंधित व्यक्तीची मतदार म्हणून ओळख पटवा.
- समाधान झाल्यास, अशा व्यक्तीला ईव्हीएमद्वारे मतदान न करू देता प्रदत्त मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची परवानगी द्या.
- प्रदत्त मतपत्रिकांचा हिशेब ठेवा.
- अशा मतदारांची १७ बी मध्ये नोंद करा.


आपले मत कसे द्यावे
ईव्हीएम व व्हीव्हीपॅट वापरून
1
मतदान केंद्रात जा
तुम्ही मतदान कक्षात शिरत असताना मतदान केंद्राध्यक्ष बटन दाबून मतदान युनिट मतदानासाठी तयार ठेवेल
2
आपले मत द्यावे
मतदान युनिटावरील आपल्या आवडीच्या उमेदवाराच्या नाव/चिन्हांसमोरील निळे बटण दाबावे
3
दिवा पहा
तुम्ही निवडलेल्या उमेदवाराच्या नाव/चिन्हांच्या समोरील लाल दिवा लागेल
4
मुद्रण पहावे
मुद्रण यंत्र, निवडलेल्या उमेदवाराचे चिन्ह व नाव असलेली मतदान चिठ्ठी मुद्रित करेल
७ सेकंदांनी चिठ्ठी दिसेल
मुद्रीत चिठ्ठी काचेतून पहावी त्याची मुद्रित प्रत आपणास मिळणार नाही
टीप
तुम्हाला मतदान चिठ्ठी दिसली नाही आणि दीर्घ बीच असा आवाज आला तर मतदान केंद्राध्यांर्थीशी संपर्क करा.
भारत निवडणूक आयोग

# भाग- एक

# SECTION - I
# Chapters

## प्रकरणे

# प्रकरण - ०१

## प्राथमिक

### १.१ प्रास्तविक

**एक :** मतदान केंद्राध्यक्ष म्हणून कर्तव्ये शक्य तितक्या चांगल्या पद्धतीने पार पाडण्यासाठी माहिती आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हा या निदेशपुस्तिकेचा उद्देश आहे. तथापि, ही निदेशपुस्तिका कोणत्याही दृष्टीने मतदान घेण्या संबंधित निवडणूक कायद्याचे परिपूर्ण संकलन किंवा त्याच्या विविध तरतुदींचा पर्यायी संदर्भ नाही. म्हणून, तुम्ही, आवश्यक असेल तेथे, परिशिष्ट-१ आणि परिशिष्ट-२ मध्ये पुन्हा मांडलेल्या कायदेशीर तरतुदींचा संदर्भ घ्या.

**दोन :** लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम २६ च्या तरतुदींनुसार तुमची मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, कलम २८अ च्या तरतुदींनुसार, तुम्ही, कोणत्याही निवडणुकीच्या कार्यान्वयनासाठी नियुक्त केलेल्या इतर अधिकाऱ्यांसह, अशी निवडणूक घेण्याबाबतच्या अधिसूचनेच्या तारखेस आणि तेव्हापासून सुरू होण्याऱ्या आणि अशा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याच्या तारखेस संपणाऱ्या कालावधीसाठी निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानले जाईल. त्यानुसार, तुम्ही त्या कालावधीत निवडणूक आयोगाच्या नियंत्रण, देखरेख, आणि निर्देशांच्या अधीन असाल. मतदान केंद्राध्यक्ष म्हणून, तुम्ही मतदान केंद्रावरील सर्वात महत्त्वाचे अधिकारी आहात. तुमच्या अधिकारांतर्गत मतदान केंद्रावरील प्रक्रिया नियंत्रित करण्यासाठी तुम्हाला पूर्ण कायदेशीर अधिकार आहे. त्याच वेळी, मतदान केंद्रावर होणाऱ्या सर्व कामांसाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार आहात. तुमच्या मतदान केंद्रावर मुक्त आणि निष्पक्ष मतदान सुनिश्चित करणे हे तुमचे प्राथमिक कर्तव्य आणि जबाबदारी आहे.

त्यामुळे, तुम्हाला निवडणूक घेण्यासंदर्भातील, कायदा आणि प्रक्रिया आणि यासंदर्भातील आयोगाच्या सूचना आणि निर्देशांची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. मतदान केंद्राध्यक्ष (पीआरओ) यांनी त्यांच्याशी संलग्न असलेल्या मतदान केंद्रात इतर मतदान अधिकारी आणि मतदान प्रतिनिधींशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवून त्यांच्यावर सोपविलेली सर्व कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. तुम्ही कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांचे बदल न करता काटेकोरपणे पालन करावे आणि भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार कार्य करावे. तुम्ही सर्व प्रशिक्षण वर्गांना उपस्थित राहावे, क्षेत्र अधिकारी/क्षेत्रीय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांचे संपर्क क्रमांक मिळवून त्यांच्या संपर्कात राहावे.

**तीन :** इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) आणि मतदान पडताळणी योग्य कागदी परिनिरीक्षण निशाणी (व्हीव्हीपॅट) आता प्रत्येक मतदान केंद्रावर वापरले जातात. मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष या नात्याने तुम्ही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅटद्वारे मतदान घेण्यासाठी विहित केलेले नियम आणि कार्यपद्धती यांच्या अद्ययावत परिस्थितीचा परिचय करून घेतला पाहिजे. मतदान केंद्रावर मतदान घेतानाच्या प्रत्येक टप्प्याची आणि व्हीव्हीपॅट सोबत ईव्हीएम कसे काम करते या प्रक्रियेची तुम्ही पूर्णपणे माहिती करून घेतली पाहिजे. व्हीव्हीपॅट वापरून मत नोंदवण्याची प्रक्रिया तुम्हाला समजली पाहिजे. व्हीव्हीपॅटसोबत ईव्हीएम वापरण्याबाबतचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले पाहिजे. थोडीशी चूक किंवा त्रूटी किंवा कायदा किंवा नियमांचा चुकीचा वापर किंवा व्हीव्हीपॅटसोबत ईव्हीएमच्या विविध कार्यांचे अपुरे ज्ञान यामुळे तुमच्या मतदान केंद्रावरील मतदान रद्द पण होऊ शकते.

### १.२ कायदेशीर तरतुदी

मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तुमच्या कर्तव्यांवर परिणाम करणाऱ्या कायद्यातील तरतुदी परिशिष्ट - १ आणि परिशिष्ट - २ मध्ये पुन्हा मांडलेल्या आहेत.

### १.३ मतदान पथक

सामान्यतः, मतदान पथकात मतदान केंद्राध्यक्ष आणि तीन मतदान अधिकारी असतील. मतदान पथकाची नियुक्ती करताना, जर तुम्ही काही अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्रावर कर्तव्यावर उपस्थित राहू शकत नसाल तर तुमचे जिल्हा निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी एखाद्या मतदान अधिकाऱ्याला मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी अधिकृत करतील. एकाच वेळी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांच्या मतदानासाठी, मतदान पथकात मतदान केंद्राध्यक्ष आणि पाच मतदान अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

## १.४ मतदान संबंधित प्रशिक्षण

**(एक)** जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी, तुमच्यासाठी आणि मतदान अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण वर्गाची व्यवस्था करतील. तुम्ही आणि मतदान अधिकाऱ्यांनी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांच्या कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांबद्दलच्या आपल्या सर्व शंकांचे निरसन करून घ्यावे.

**(दोन)** प्रशिक्षण वर्ग/तालीम वर्गांना कमी महत्त्वाचे समजू नये. जेथे व्हीव्हीपॅटसोबत ईव्हीएम वापरण्यात होते अशा आधीच्या काही निवडणुकीत जरी तुम्ही मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी म्हणून काम केले असेल, तरी, तुम्ही सर्व प्रशिक्षण वर्ग रंगीत तालमींना उपस्थित राहणे आवश्यक आहे, कारण प्रशिक्षण वर्ग / तालमीदरम्यान व्हीव्हीपॅट आणि कायद्याच्या संदर्भातील काही नवीन तथ्य / सूचना / तरतुदीं माहिती होऊ शकतात. निवडणूक कायदा आणि कार्यपद्धती यांमध्ये वेळोवेळी सुधारणा केल्या जात असतात आणि कायद्यातील अद्ययावत तरतुदी, नियम, सूचना इत्यादींबाबत तुम्ही स्वतःला परिचित ठेवणे आवश्यक आहे. शिवाय, कायदा आणि प्रक्रियेत कोणताही बदल नसला तरीही पुन्हा स्मरणात ठेवणे आवश्यक आहे. प्रशिक्षण वर्ग संपेपर्यंत, तुम्हाला व्हीव्हीपॅटसह ईव्हीएम चालवणे, हिरव्या कागदी मोहर, विशेष खूणचिठ्ठी लावणे, सर्व मोहर लावण्याच्या प्रक्रिया आणि मतदान केंद्रावर वापरल्या जाणाऱ्या विविध सांविधिक आणि असांविधिक नमुन्यांबद्दल सखोल माहिती असली पाहिजे.

**टीप :**

- मतदान केंद्राध्यक्षाने प्रशिक्षणाच्या शेवटी चाचणीला उपस्थित राहणे आवश्यक आहे.
- त्याने / तिने सांविधिक, असांविधिक नमुने, साहित्य, लिफाफे, पाकिटे इत्यादींसह विविध प्रकारच्या निवडणूक साहित्यांशी परिचित व्हावे.
- त्याने/तिने अभिरूप मतदान प्रमाणपत्र भरावे.

## १.५ टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज

**(एक)** तुम्ही आणि तुमचे मतदान अधिकारी तुमची कर्तव्यावर नियुक्ती झाली आहे अशा किंवा इतर कोणत्याही मतदार संघातील मतदार असू शकता. जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी तुमची मतदान केंद्राध्यक्ष म्हणून दुबार नियुक्ती करण्याचा आदेश जारी करतील आणि या आदेशासोबत जिल्हा निवडणूक अधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी तुम्हाला १२ आणि १२अ ची पुरेसे नमुने देतील जेणेकरून टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रांसाठी तुम्ही आणि मतदान अधिकारी अर्ज करू शकतील. ज्या मतदारसंघात तुमची निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे, त्याच मतदारसंघातील तुमच्यापैकी कोणीही मतदार असल्यास, संसदीय निवडणुकांच्या बाबतीत, तुम्ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे १२अ मध्ये निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्रासाठी अर्ज करू शकता. जो निवडणूक ड्युटीवर नियुक्त केलेल्या मतदार संघाव्यतिरिक्त इतर मतदारसंघातील मतदार असल्यास अशा अधिकाऱ्याला नमुना १२ मध्ये टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज करावा लागेल. प्रशिक्षण सत्रांमध्ये या संदर्भात व्यवस्था केली जाईल. एकदा तुम्हाला टपाली मतपत्रिका जारी केल्यानंतर, तुम्ही कोणत्याही कारणास्तव निवडणूक कर्तव्यासाठी प्रत्यक्षात तैनात नसलात तरीही, तुम्ही फक्त टपाली मतपत्रिकेद्वारेच मतदान करू शकता याची नोंद घ्यावी.

**(दोन)** प्रशिक्षण वर्गादरम्यान, जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांसाठीच्या प्रत्येक मतदार यादीची एक प्रत जिल्हा निवडणूक अधिकारी, प्रशिक्षण केंद्रावर (केंद्रांवर) पाहण्यासाठी उपलब्ध करून देतील, जेणेकरून तुम्ही तुमच्या मतदार यादीतील क्रमांकाबाबतचा तपशील नोंदवू शकाल, जो तुम्हाला टपाली मतपत्रिकेसाठी तुमच्या अर्जामध्ये सादर करावा लागतो. तुम्ही तुमचा मतदार तपशील राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टल (एमव्हीएसपी) वरून किंवा मतदार सहायता उपयोजक (व्हीएचए) द्वारे देखील मिळवू शकता.

## १.६ मतदान साहित्य

मतदानाच्या आदल्या दिवशी किंवा मतदान केंद्रावर जाण्याच्या दिवशी, तुम्हाला सर्व निवडणूक साहित्य पुरवले जाईल, ज्याची यादी परिशिष्ट - ३ मध्ये दिली आहे. तुमच्या मतदान केंद्रावर जाण्यापूर्वी, याची खात्री करा की तुम्ही सर्व वस्तू प्राप्त झाल्या आहेत.

**१.७ ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटची / तपासणी**

**(एक)** नियंत्रण युनिट (सीयू), मतदान युनिट (बीयु ) आणि व्हीव्हीपॅट हे तुमच्या मतदान केंद्रावर वापरण्यासाठीचेच आहेत हे तपासा कारण प्रत्येक पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे मतदान केंद्राचा क्रमांक आणि नाव सूचित केले जात असल्यामुळे ते नमूद केलेल्या युनिटांशी जोडलेल्या पत्त्याच्या खूणचिठ्ठीच्या संदर्भात पडताळले जातील.

**(दोन)** नियंत्रण युनिटचा 'उमेदवार संच विभाग' योग्यरीत्या मोहोरबंद करण्यात आल्याचे आणि पत्ता खूणचिठ्ठी त्याच्याशी जोडलेली असल्याचे तपासा. तसेच नियंत्रण युनिटवरील गुलाबी कागदी मोहर शाबूत असल्याचेही तपासा.

**(तीन)** नियंत्रण युनिट (सीयु ) मध्ये स्थापित केलेली उर्जा संचयिका पूर्णपणे कार्यरत असल्याचे तपासा. मागील कप्प्यामध्ये दिलेला पॉवर स्विच ' चालू ' स्थितीत स्थापित करून हे तपासले जाऊ शकते. तपासल्यानंतर, पॉवर स्विच 'बंद ' स्थितीवर स्थापित करणे आवश्यक आहे.

**(चार)** मतदान पथकाला कोणत्याही परिस्थितीत वितरनाच्या वेळी आणि मतदान केंद्रावर अभिरूप मतदानपूर्वी **व्हीव्हीपॅटची चाचणी न करण्याची सूचना** देण्यात आली आहे का ? ते तपासा, कारण त्यांना दिलेले व्हीव्हीपॅटची आधीच पाहणी करण्यात आली आहे आणि ते तपासले गेले आहेत.

**(पाच)** तुम्हाला आवश्यक प्रमाणात मतदान युनिटे पुरविले गेले आहेत आणि त्या प्रत्येकामध्ये मतदान पेपर स्क्रीनखाली मतदान पेपर योग्यरीत्या लावण्यात आला आहे हे तपासा. तुम्हाला पुरवल्या जाणाऱ्या मतदान युनिटची संख्या तुमच्या मतदारसंघातील उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून असेल.

**(सहा) एम-३ ईव्हीएमच्या मतदान युनिटामध्ये थंबव्हील स्विच सेटिंग तपासा :** थंबव्हील स्विच विंडो मतदान युनिटच्या वरच्या उजव्या बाजूला आहे, हे लक्षात घ्या की, एम-३ ईव्हीएममध्ये, २४ मतदान युनिटे नियंत्रण युनिटशी जोडली जाऊ शकतात. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या ३ ते १६ ( नोटासह ) दरम्यान असल्यास, फक्त एक मतदान युनिट पुरविला जाईल आणि थंब-व्हील स्विच मतदान युनिटच्या वरच्या उजव्या बाजूला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सेट केलेल्या खिडकीतून पाहता येईल जो '०१' वर निश्चित केलेला असेल. जर उमेदवारांची संख्या नोटासह १६ ते ३२च्या दरम्यान असेल, तर तुम्हाला दोन मतदान युनिट्स दिली जातील. पहिल्या मतदान युनिटवर थंबव्हील '०१' स्थानावर सेट केले जाईल आणि मतपत्रिकेमध्ये निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांच्या यादीतील अनुक्रमांक १ ते १६ पर्यंतच्या उमेदवारांची नावे असतील, १ ते १६ दुसरे मतदान युनिटवर मतपत्रिकेचे दुसरे पत्रक प्रदर्शित केले जाईल ज्यामध्ये १७ पासून (आणि नोटासह ३२ पर्यंत) उमेदवारांची नावे असतील आणि त्या युनिटमधील थंबव्हील्स '०२' स्थानावर स्थापित केले जातील. त्याचप्रमाणे, जर तीन मतदान युनिटे पुरवली गेली असतील तर  निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या नोटासह ३३ ते ४८ च्या दरम्यान असेल. तिसऱ्या मतदान युनिटमध्ये, मतदान पत्रिकेत अनुक्रमांक ३३ नंतरच्या नोटा सह ४८ पर्यंतच्या उमेदवारांची नावे असतील आणि त्याचे थंबव्हील '०३' स्थितीवर सेट केले जातील. उमेदवारांची संख्या ४७ पेक्षा जास्त आणि ६४ पर्यंत (नोटा सह) असल्यास,चार मतदान युनिटे असतील. चौथे मतदान युनिटवर चिकटविलेल्या मतदान पत्रिकेवर अनुक्रमांक ४९ पासून (नोटा सह ६४ पर्यंतच्या) उमेदवारांची नावे प्रदर्शित केली जातील आणि त्याचे थंबव्हील '०४' वर सेट केले जाईल. पाच मतदान युनिटे असल्यास, पाचवे मतदान युनिटवर चिकटविलेल्या मतदान पत्रिकेवर अनुक्रमांक ६५ पासून (नोटा सह ८० पर्यंत) उमेदवारांची नावे प्रदर्शित केली जातील आणि त्याचे थंबव्हील '०५' सेट केले जाईल. अशा प्रकारे, २४ मतदान युनिट वापरताना, चोवीसवा मतदान युनिटवर चिकटविलेल्या मतपत्रिकेवर अनुक्रमांक ३६९ पासून (नोटासह ३८४ पर्यंत) उमेदवारांची नावे प्रदर्शित केली जातील आणि त्याचे थंबव्हील '२४' सेट केले जाईल.

| निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या (नोटासहित) | नियंत्रण युनिटला जोडलेल्या मतदान युनिटची संख्या | थम्ब व्हिलची स्थिती |
|---|---|---|
| ०३-१६ | १ | ०१ |
| १७-३२ | २ | ०२ |
| ३३-४८ | ३ | ०३ |
| ..... | ..... | ..... |
| ३६९-३८४ | २४ | २४ |

**(सात)** थंबव्हील स्विचच्या फिक्सिंगमध्ये काही विसंगती आढळल्यास, ते ताबडतोब क्षेत्रीय दंडाधिकारी / निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणा. परंतु कोणत्याही परिस्थितीत, तुम्ही किंवा तुमच्या मतदान अधिकाऱ्यांनी थंबव्हील स्वीचला हात लावू नये.

**(आठ)** मतदान युनिटावर निश्चित केलेल्या मतपत्रिका योग्यरित्या लावलेल्या आहेत आणि प्रत्येक उमेदवाराचे नाव आणि चिन्ह त्याच्या संबंधित दिवा आणि बटण आणि उमेदवारांच्या पॅनेलला विभाजित करणाऱ्या जाड रेषा यांच्याशी सुसंगत आहे हे देखील सुनिश्चित केले पाहिजे, तसेच मतदान पत्रिका मतदान युनिटवरील संबंधित खोबणीशी सुसंगत आहेत. हे देखील सुनिश्चित केले पाहिजे.

**(नऊ)** उमेदवारांची ' निळी बटणे ' जी अनाच्छादित (unmasked) केली गेली आहेत आणि मतदान युनिटवर दिसत आहेत ती निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येएवढी आहेत आणि उर्वरित बटणे, जर असतील तर, आच्छादित (masked) आहेत का ते तपासा.

**(दहा)** प्रत्येक मतदान युनिट दोन ठिकाणी, म्हणजे उजव्या वरच्या आणि उजव्या खालच्या भागात, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मोहोरेसह, रीतसर मोहोरबंद आणि सुरक्षित आहे आणि पत्ता खूणचिठ्ठी त्याच्याशी घट्टपणे जोडलेले आहेत हे तपासा.

**१. ८ मतदान साहित्य तपासणे**

**(एक)** संचामध्ये ब्रशसह पक्क्या शाईच्या १० घनसेंटीमीटर (सीसी) च्या दोन मोठ्या कुपिका दिल्या आहेत आणि तुम्हाला पुरविलेल्या प्रत्येक दोन कुपिकांमध्ये पुरेशा प्रमाणात शाई आहे हे तपासा, कारण शाई डाव्या हाताच्या पहिल्या बोटावरील नखाच्या टोकापासून बोटाच्या पहिल्या सांध्याच्या तळापर्यंत एका ओळ रेषेत लावावी लागते.

**(दोन)** जे मतदार आपली स्वाक्षरी करू शकत नाहीत त्यांच्या अंगठ्याचा ठसा घेण्यासाठी वापरले जाणारे ठशाचे पॅड शिक्क्याचे पॅड कोरडे नाही याची खात्री करा.

**(तीन)** मतदार यादीच्या संबंधीत भागाच्या सर्व तिन्ही प्रती (एकत्रित मतदानाच्या बाबतीत पाच प्रती) परिपूर्ण आणि सर्व बाबतीत एक सारख्या आहेत आणि विशेषता ज्या भागात मतदान केंद्र उभारण्यात आले आहे. त्या भागाशी संबंधीत असलेल्या मतदार याद्यांचा भाग तुम्हाला देण्यात आला आहे. आणि त्या याद्या सर्व बाबतीत परिपूर्ण आहेत याची तपासणी करा.

**(चार)** मतदार यादीच्या प्रत्येक कार्यप्रतीमधील सर्व पृष्ठांवर १ पासून पुढे अनुक्रमांक घातले आहेत.

**(पाच)** मतदारांच्या मुद्रित अनुक्रमाकांत शाईने किंवा अन्यप्रकारे दुरुस्ती केलेली नाही व त्यात त्याऐवजी नवा क्रमांक घातलेला नाही.

**(सहा)** मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये (ज्यांना मतदान करण्यास परवानगी देण्यात आली आहे अशा मतदारांची नावे चिन्हांकित करण्यासाठी वापरावयाची मतदार यादीची प्रत) त्याला टपाली मतपत्रिका देण्यासाठी वापरलेल्या (जसे, 'पीबी ' 'इडीसी ') शेऱ्याखेरीज इतर कोणत्याही शेऱ्यांचा अंतर्भाव असणार नाही. मतदार यादीस जोडलेल्या कोणत्याही असल्यास, पुरवणी यादीमधील वगळलेली नावे पुनर्मुद्रित केलेल्या मूळ यादीमध्ये संबंधित मतदाराच्या तपशील रकान्यावर, अधिप्रमाणित केलेल्या 'वगळले ' या शब्दासह, तिरपी रेष मारून (पुनरीक्षण कालावधीत वगळण्यात आले असल्यास) किंवा यथास्थिति 'वगळले ' 'वगळले ' असे तिरप्या अक्षरात लिहून (अंतिम प्रसिद्धीनंतरच्या पुढील कालावधीत वगळले असल्यास) ही नोंद वगळण्यात आली आहे, हे ठळकपणे दर्शविण्यात येईल.

**(सात)** मतदार यादी, सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपैकी किमान एका निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने आणि आणखी एका अधिकाऱ्याने यथोचितपणे सही केलेली असेल.

**(आठ)** चिन्हांकित यादी म्हणून वापरण्यात यावयाच्या एका प्रतीवर वरच्या बाजूवर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने/सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सही केलेले प्रमाणपत्र जोडण्यात आले आहे. **(जोडपत्र-४)**

**(नऊ)** मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदान केंद्रातील काम सोयीस्कर व्हावे यासाठी मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीसह कोणत्याही असल्यास, अनुपस्थित, स्थलांतरीत आणि मयत मतदारांची यादी, तुम्हाला देण्यात आली आहे. हे तपासून पहा.

**(दहा)** तुम्हाला पुरविण्यात आलेल्या प्रदत्त मतपत्रिका ह्या तुम्हाला नेमून देण्यात आलेले मतदान केंद्र ज्या मतदारसंघात स्थित आहे, त्याच मतदारसंघाच्या आहेत आणि त्या कोणत्याही बाबतीत सदोष नाहीत हे तपासा. त्यांचे अनुक्रमांक, तुम्हाला पुरविलेल्या तपशीलाशी जुळतात हे देखील तपासून पहा.

**(अकरा)** जर तुम्हाला कोणतेही मतदान यंत्र किंवा कोणतेही मतदान साहित्य कोणत्याही बाबतीत सदोष आढळले तर तुम्ही असा दोष, आवश्यक उपाययोजना करण्यासाठी मतदान यंत्रे/मतदान साहित्य यांचे वितरण करणाऱ्या प्रभारी अधिकाऱ्याच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या त्वरित निदर्शनास आणून दिलाच पाहिजे.

**(बारा)** तसेच निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या व त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींच्या नमुना सह्यांच्या छायाप्रती (फोटोकॉपी) तुम्हाला देण्यात आल्या आहेत. त्याची देखील तपासणी करा, या छायांप्रतीमुळे मतदान केंद्रामधील मतदान प्रतिनीधींच्या नियुक्ती पत्रामधील उमेदवाराची/त्याच्या निवडणूक प्रतिनिधीची सही खरी असल्याचे पडताळून पहाण्यास तुम्हाला मदत होईल.

**(तेरा)** वर नमूद केलेल्या कागदपत्रांशिवाय, मतदान अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून मतदान तयारी दरम्यान सदोष हाताळणीमुळे, मतदानादरम्यान नियंत्रण युनिट मतदान युनिट व्हीव्हीपॅट बंद पडल्यास/त्रुटी असल्यास ते कसे हाताळावे, व बाबतच्या सूचना **(जोडपत्र-२०)** याबाबतच्या समस्या सूचनांच्या दोन प्रती असल्याचे पहावे आणि **जोडपत्र-३** मध्ये दिलेल्या मतदान साहित्याच्या यादीप्रमाणे तुमच्या मतदान बुथसाठी देण्यात आलेले मतदान साहित्य आहे हे तपासण्यात यावे ;

## १.९ छायाचित्र मतदार याद्या

**(एक)** तुमच्या मतदारसंघाच्या नवीनतम छायाचित्र मतदार याद्या उपलब्ध आहेत. या छायाचित्र मतदार याद्यांमध्ये सर्व माहिती बरोबरच मतदारांच्या छायाचित्रांचा अंतर्भाव आहे. त्यामुळे, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदारांच्या ओळख पडताळणी प्रक्रिया सुलभ होते.

**(दोन)** अंतिम प्रसिद्धीच्या दिनांकापासून नामनिर्देशने करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत (जेथे निवडणुका होणार आहेत तेथे) आयोगाच्या विद्यमान अनुदेशांनुसार शेवटच्या प्रारुपात/अंतिम यादीमध्ये, चिन्हांकित केलेल्या सर्व वगळलेल्या फेरबदल केलेल्या नावांसह पुनरीक्षण/सातत्यपूर्ण अद्ययावतीकरणाच्या कालावधीत जादा दाखल करण्यात आलेल्या सर्वांना अंतिम यादीतील शेवटच्या नोंदीच्या अनुक्रमांकाच्या पुढील सलग अनुक्रमांकाने सुरू होणारा अनुक्रमांक देऊन, कालक्रमानुसार ठेवण्यात येते.

**(तीन)** नोंद सुधारणा करण्यात आली आहे आणि बदलण्यात आली आहे हे दर्शवण्यासाठी पुनरीक्षण/सातत्यपूर्ण अद्ययावतीकरणाच्या कालावधी दरम्यान, नमुना ८ च्या आधारे फेरबदल/दुरुस्त करण्यात आलेल्या सर्व नोंदी, या विद्यमान नोंदी बदलून ' # ' या चिन्हाने (संक्षिप्त पुनरीक्षणा दरम्यान दुरुस्ती करण्यात आली असल्यास) किंवा यथास्थिती, # # या चिन्हाने (अंतिम प्रसिद्धीनंतरच्या सातत्यपूर्ण अद्ययावत करण्याच्या कालावधी दरम्यान दुरुस्ती करण्यात आली असल्यास) एकत्रीकृत यादीत दिसून येतील. बनावट (डमी) चिन्हांकित मतदार यादीची प्रतिमा याखाली दाखवली आहे.

| | |
|---|---|
| अनु. क्र. १८ आरजे/१२/०९४/९०९२९७<br>नाव : अ ब<br>वडिलांचे नाव : वगळले<br>घर क्र. : ३/१०<br>वय : ४२ लिंग : पु. | अनु. क्र. १९ आरजे/३२/१९४/२३९२७६<br>नाव : डफ<br>वडिलांचे नाव : कड<br>घर क्र. : ३/११<br>वय : २१ लिंग : स्त्री |
| अनु. क्र. २० युसीडब्ल्यू १०७५६८३<br>नाव : ई व<br>वडिलांचे नाव : जयू<br>घर क्र. : ४/०१<br>वय : १९ लिंग : पु. | अनु. क्र. २१ युसीडब्ल्यू ०३८९६७५<br>नाव : टीवाय<br>वडिलांचे नाव : अब<br>घर क्र. : ३०५<br>वय : ८३ लिंग : पु. |

**(चार)** आयोगाच्या निदेशानुसार मतदारांची मतदान केंद्रावर ओळख पटवण्यासाठी मतदार छायाचित्र ओळखपत्र वापरण्यात येते. तथापि, प्रत्येक निवडणुकीसाठी आयोग विहित करील अशा कोणत्याही पर्यायी कागदपत्राच्याद्वारे ओळख पटविण्याच्या प्रयोजनासाठी एक स्वतंत्र आदेश काढण्यात येईल.

**(पाच)** निवडणूक आयोगाने असा निदेश दिला आहे की, मतदान केंद्रावर मत देण्यासाठी वेळी समुद्रपार मतदाराची ओळख, त्याने सादर केलेल्या त्याच्या निवासी पत्ता असलेला मूळ भारतीय पारपत्राच्या आधारेच पटविण्यात येईल.

संबंधित मतदाराच्या ओळखीची पडताळणी करण्याकरिता मतदार छायाचित्र ओळखपत्र सादर करणे जेथवर संबंधित आहे तेथे हे स्पष्ट करण्यात यावे की, जर एखाद्या मतदाराने असे मतदार छायाचित्र ओळखपत्र सादर केले तर, जरी ते दुसऱ्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून देण्यात आलेले असेले तरी, तो मतदार, मतदान करण्यासाठी ज्या मतदान केंद्रावर जाईल तेथील मतदार यादीमध्ये त्याचे नाव शोधण्याकरिता असे ओळखपत्रही स्विकारण्यात येईल. परंतु अशा प्रकरणात मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण नाही हे पाहण्यासाठी त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीची संपूर्णपणे तपासणी करून त्याने एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदान केलेले नाही याची सुनिश्चिती करून घेण्यात येईल आणि जेव्हा त्याला मतदान करण्यास मुभा देण्यात येईल तेव्हा त्याच्या डाव्या हातावर पक्क्या शाईची खूण योग्य रीतीने लावण्यात येईल.

## १.१०. एकेरी निवडणुकीच्या वेळा मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्ये

### (एक) पहिला मतदान अधिकारी

पहिला मतदान अधिकारी मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचा प्रभारी असेल व मतदाराची ओळख पटविण्याची जबाबदारी त्याची असेल. मतदान केंद्रात प्रवेश केल्यावर मतदार थेट पहिल्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल. तो मतदान अधिकारी, मतदाराच्या ओळखीबाबत स्वतःची खात्री करून घेईल. **प्रत्येक निवडणुकीच्या वेळी, आयोग, मतदारांची ओळख पटविण्याबाबत आदेश जारी करतो, मतदान केंद्राध्यक्षाने आदेशाचे काळजीपूर्वक पालन करावे. मतदाराने मतदार छायाचित्र ओळखपत्र किंवा आयोगाच्या आदेशात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर कोणतेही ओळख दर्शविणारे कागदपत्र सादर करणे आवश्यक असेल.** मतदाराल मतदान करण्याची परवानगी दिल्यावर, छायाचित्र मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीतील त्या मतदाराचे तपशील अंतर्भूत असलेल्या रकान्यात लालशाईने तिरपी रेषेत खूण करण्यात येईल. आणखी, स्त्री व पुरूष मतदारांच्या संख्येची सुलभ पडताळणी व गणना करण्यासाठी, स्त्री मतदारांच्या अनुक्रमांकाला गोल करण्यात येईल आणि तृतीय पंथी मतदारांच्या अनुक्रमांकाजवळ एक चांदणीची (स्टार) खूण करण्यात येईल. याखेरीज, सांख्यिकीय प्रपत्रे भरण्याची जबाबदारी देखील पहिल्या मतदान अधिकाऱ्याची आहे.

### (दोन) दुसरा मतदान अधिकारी

दुसरा मतदान अधिकारी पक्क्या शाईचा प्रभारी असेल. पहिल्या मतदान अधिकाऱ्याने, मतदाराची खात्री पटविल्यानंतर, दुसरा मतदान अधिकारी, मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची कोणतीही खूण किंवा डाग नाही ना हे तपासून पाहील व त्यानंतर तो मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईने खूण करील. पक्की शाई, खालील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे, मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवरील नखाच्या पुढच्या टोकापासून ते डाव्या तर्जनीच्या पहिल्या सांध्यापर्यंत ब्रशच्या (सोबत दिलेल्या) सहाय्याने लावण्यात येईल :–



- दुसरा मतदान अधिकारी नमुना १७-ए मधील मतदाराची नोंदवहीचा प्रभारी असेल. या नोंदवहीमध्ये ज्यांची ओळख पटली आहे व जो मतदान केंद्रावर मतदान करतो त्या मतदारांचा योग्य रीतीने हिशेब ठेवण्याची जबाबदारी त्या मतदान अधिकाऱ्यावर असेल मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये दिलेल्या मतदाराच्या अनुक्रमांकाची (नावाची नाही) मतदार नोंदवहीच्या (नमुना-१७ए) स्तंभ-२ मध्ये नोंद घ्यावी. तो त्या मतदाराला मतदान करण्याची परवानगी देण्यापूर्वी मतदारांच्या नोंदवहीत प्रत्येक मतदाराची सही अथवा अंगठ्याचा ठसा घेईल, तो, प्रकरण ४ मध्ये वर्णन केल्यानुसार मतदारांच्या नोंदवहीतील त्याचा (मतदाराचा) तपशील नोंदवल्यानंतर प्रत्येक मतदाराला मतदाराची चिठ्ठी देईल. यावेळी पक्क्या शाईची खूण केल्यानंतर, थोडा अवधी गेला आहे व मतदाराने मतदान केंद्र सोडण्याच्या वेळेपूर्वी ती खूण केलेली शाई सुकली आहे याची खात्री करून घ्यावी. याकरिता, पक्क्या शाईची खूण केल्यानंतर, मतदाराच्या नोंदवहीत सही/स्वाक्षरी घेता येईल.

- जर एखाद्या मतदाराने मतदार नोंदवहीत त्याची सही करण्यास किंवा अंगठ्याचा ठसा उमठवण्यास नकार दिला तर, त्यास मतदान करण्यास परवानगी देण्यात येणार नाही आणि मतदार नोंदवहीच्या ‘ शेरा ’ या स्तंभात ‘ मतदान करण्याचे नाकारले ’ अशी नोंद करण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्ष अशा नोंदीखाली सही करील. तथापि, जर एखाद्या मतदाराने, त्याचा मतदार क्रमांक नमुना १७ए मधील मतदार नोंदवहीच्या स्तंभ-२ मध्ये रीतसर नोंदवल्यानंतर आणि नियम ४९एल चा उप-नियम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्याने त्यावर त्याची सही केल्यानंतर किंवा अंगठ्याचा ठसा उमटविल्यानंतर, त्याने मतदान न करण्याचे ठरविले असेल तर, “मतदान करण्यास नकार दिला मतदान न करता गेला ” अशा अर्थाचा शेरा तुमच्याद्वारे नमुना १७ ए मधील उक्त नोंदीसाठी लिहण्यात येईल आणि अशा शेऱ्यासाठी त्या मतदाराची सही किंवा त्याच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात येईल. अशा प्रकरणी, मतदार नोंदवहीच्या (नमुना १७ए) स्तंभ १ मधील त्या मतदाराच्या अनुक्रमांकामध्ये किंवा त्या लगतनंतरच्या कोणत्याही मतदाराच्या अनुक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.

**(तीन) तिसरा मतदान अधिकारी**

तिसरा मतदान अधिकारी मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल. तो दुसरा मतदान अधिकारी बसतो त्याच टेबलावर बसलेला असेल. तिसरा मतदान अधिकारी मतदाराला, त्याला दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने दिलेल्या मतदाराच्या चिठ्ठीच्या आधारे व त्या चिठ्ठीवर दर्शविलेल्या अनुक्रमांकानुसारच मतदान कक्षात जाण्यास परवानगी देईल. तो, प्रकरण ४ मध्ये तपशीलवार स्पष्टीकरण दिल्याप्रमाणे नियंत्रण युनिटावरील मतदान (बॅलेट) बटण दाबून मतदान कक्षात ठेवलेले मतदान युनिट (युनिटे) सुरू करेल. मतदाराला मतदान कक्षात जाण्यास परवानगी देण्यापूर्वी तो मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण अजूनपर्यंत स्पष्टपणे उमटली आहे, याची तपासणी व खात्री करून घेईल. (जर पक्क्या शाईची खूण निघाली असल्याचे दिसून आले तर, तर्जनीवर पुन्हा खूण करण्यात येईल.)

- ज्या मतदान केंद्रात मतदारांची संख्या कमी आहे, तेथे तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याची कामे मतदान केंद्राध्यक्ष स्वतः करेल, यामुळे मतदान पथकाच्या रचनेत काटकसर होईल.

**(चार)** कोणत्याही जिल्ह्यात/मतदारसंघात मतदान कर्मचाऱ्यांची कमतरता भासल्यास, अशा ठिकाणी, एक मतदान केंद्राध्यक्ष व तीन मतादान अधिकाऱ्यांऐवजी दोन मतदान अधिकारी यांचा मतदान पथकात समावेश असेल, तशा प्रकरणात, पहिल्या मतदान अधिकाऱ्याच्या कामात, मतदाराची ओळख पटविल्यावर, मतदाराच्या बोटाला पक्की शाई लावण्याचे कामदेखील समाविष्ट करण्यात येईल. दुसरा मतदान अधिकारी (मतदारांची नोंदवही) नमुना १७ एक मध्ये नोंद करण्याच्या, व त्यावर मतदारांची सही/अंगठ्याचा ठसा घेण्याच्या सर्वसाधारण कामांबरोवरच अशा प्रकरणांत नियंत्रण युनिटदेखील सांभाळण्याचे काम करील. अशा प्रकरणी जर केवळ दोन मतदान अधिकारी वापरण्यात येणार असतील तर मतदार चिठ्ठी अनुक्रमांक इत्यादी तयार करण्याची आवश्यकता असणार नाही. त्याऐवजी दुसरा मतदान अधिकारी नियंत्रण युनिट चालू करील आणि त्यानंतर ज्याप्रमाणे मतदार नोंदवहीत (नमुना १७ ए ) सही करून ते ज्या क्रमाने मतदान कक्षात गेले असते अगदी त्याच क्रमाने ते मतदान कक्षात जातील. अशा प्रकरणी मतदान केंद्रात मतदार चिठ्ठी बनविण्याची आवश्यकता असणार नाही. तसेच जर मतदान अधिकाऱ्यांची संख्या दोन करण्यात आली असेल तर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना त्याबाबतीत आगाऊ लेखी माहिती देण्यात यावी. मतदानाची कामे दोन मतदान अधिकारी करणार असल्याबाबतचे उमेदवारांना स्पष्टीकरण देण्यात यावे.

**(पाच)** जर एखाद्या मतदाराने “मतदान करण्यास नकार दिला असेल ” किंवा “ मतदान न करता गेला असेल ” आणि मतदान युनिटवर मतदान करण्यासाठी अगोदरच नियंत्रण युनिट वरील “ मतदान ” (बॅलेट) हे बटण दाबण्यात आलेले असेल तर, मतदान केंद्राध्यक्षाने / तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याने, यांपैकी जो कोणी नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल, पुढील मतदारात सरळपणे त्याचे मतदान करण्यासाठी मतदान कक्षात जावयाचे निदेश द्यावेत.

**(सहा)** दुसऱ्या संभाव्य घटनेत, जर मतदान युनिटवर मदान करण्याकरिता नियंत्रण युनिटवरिल “ मतदान ” (बॅलेट) बटन दाबण्यात आले असेल आणि शेवटच्या मतदाराने मतदान करण्यास नकार दिला असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष/तिसरा मतदान अधिकारी यापैकी जो कोणी नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल तो अधिकारी, नियंत्रण युनिटचा युनिट बंद करण्यासाठी “ पॉवर ” स्वीच बंद करील (ऑफ ठेवील) आणि नियंत्रण युनिटपासून व्हीव्हीपॅट वेगळे करील. नियंत्रण युनिटपासून मतदान युनिट व व्हीव्हीपॅट वेगळे केल्यानंतर पुन्हा “पॉवर” स्वीच ‘ चालू करावा ’. आता ‘ बिझी ’ लॅम्प (दिवा) बंद होईल आणि ‘ बंद ’ बटण मतदान बंद करण्याकरिता कार्यरत होईल.

**१.११** लोकसभच्या व विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी घेतल्या जात असतील त्यावेळी मतदान अधिकाऱ्याची कर्तव्ये.

**(एक) पहिला मतदान अधिकारी**

हा मतदारांची ओळख पटवील आणि मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचा प्रभारी असेल.

**(दोन) दुसरा मतदान अधिकारी**

हा पक्की शाई व मतदारांची नोंदवही यांचा प्रभारी असेल.

**(तीन) तिसरा मतदान अधिकारी**

हा मतदारांच्या चिठ्ठ्यांचा प्रभारी असेल.

**(चार) चौथा मतदान अधिकारी**

हा लोकसभा निवडणुकीसाठी असलेल्या नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल.

**(पाच) पाचवा मतदान अधिकारी**

हा विदानसभा निवडणुकीसाठी असलेल्या निंयत्रण युनिटचा प्रभारी असेल.

**(सहा) ४ थ्या व ५ व्या मतदान अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण कर्तव्ये**

४ थ्या आणि ५ व्या मतदान अदिकाऱ्यांना अंत्यत सोपे काम देण्यात आलेले आहे असे दिसून येईल. उलटपक्षी, एकत्रित निवडणुकीचे यश हे त्यांच्या दक्षतेवर अवलंबून आहे. मतदान यंत्र कार्यरत करण्यासाठी बॅलॉट बटण दाबणे, हेच केवळ त्यांचे काम नाही तर प्रत्येक मतदार हा मतदार चिठ्ठीत दिलेल्या त्याच अनुक्रमांकाच्या क्रमानुसार त्यांच्या/तिच्या पाळीप्रमाणे बरोबर मतदान करीत आहे, याचीही खातरजमा त्यांनी केली पाहिजे. जेव्हा ते कोणत्याही मतदाराला पुढे जाण्यासाठी व मतदान करण्यासाठी निदेश देतील, तेव्हा मतदार हे नेमक्या मतदान कक्षात जाऊन त्यानुसार मतदार करतील याची खातरजामा करण्यासठीदेखील त्यांनी सतत लक्ष ठेवावे लागेल, अज्ञानामुळे किंवा अन्यथा जर कोणत्याही मतदाराला कोठे जायचे व त्याला मत देण्याची परवागी देण्यात आल्यानंतर काय करायचे, याविषयी खात्री वाटत नसेल तर मतदार अचूक पद्धती अनुसरतील याची खातरजमा करणे हे या दोन मतदान अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. विशेषतः मतदानाच्या पहिल्या तासामध्ये जेव्हा बहुधा पुष्कळ गर्दी असते तेव्हा त्यांनी शांत राहून मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे चालली आहे हे पहावे. जेव्हा जेव्हा उसंत असेल तेव्हा तेव्हा आणि मतदानाच्या प्रत्येकी एका तासानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांनी तोपर्यंत मतदान केलेल्या एकूण मतांचा, मतदारांच्या नोंदवहीत दर्शविलेल्या व दोन नियंत्रण युनिटात दाखवलेल्या एकूण मतांशी देखील मेळ घालावा.

**१.१२ मतदान केंद्राध्यक्षांचा कर्तव्याची विस्तृत रुपरेषा**

मतदान केंद्रांध्यक्ष म्हणून, मतदान केद्राचे तुम्ही सर्वदृष्टीने प्रभारी आहात. तुमची कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

**(एक)** कोणतेही प्रशिक्षण वर्ग चूकवू नका.

**(दोन)** आयोगाच्या सर्व संबंधित सूचना स्वतःजवळ ठेवा.

**(तीन)** व्हीव्हीपॅट सह इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यासाठी विहित केलेल्या नवीनतम नियमांचा आणि कार्यपद्धतींचा तुम्ही पूर्णपणे जाणून घ्या.

**(चार)** व्हीव्हीपॅटसह इलेक्ट्रानिक मतदान यंत्राचे कार्य आणि त्यातील पुरविण्यात आलेले विविध बटणे आणि स्विचेस त्यांच्या कार्याची स्वतःला पूर्णपणे माहिती करून घ्या.

**(पाच)** निवडणूक साहित्य गोळा करताना, **परिशिष्ट ३** मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सामग्रीसोबत पुरविण्यात आलेल्या यादीनुसार सर्व बाबी (वस्तू) तुमच्याकडे सुपूर्द केल्या आहेत, याची खात्री करा.

**(सहा)** विनिर्देशानुसार मतदान केंद्र उभारा. मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट संबंधित मतदान कक्षामध्ये ठेवा. विशेषकरून मतदानाची गोपनीयता राखण्यासाठी मतदान केंद्राची उभारणी, मतदारांच्या रांगेचे नियमन, बाह्य हस्तक्षेपापासून मुक्तता मतदान प्रक्रीयेचे संरक्षण इत्यादीसाठी योग्यरीतीने मतदान केंद्र उभारण्यासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत तुम्हाला स्पष्ट कल्पना असायला हवी. वितरण केंद्रावर पोहोचल्यावर, तुम्ही तुमच्या मतदान केंद्रावर केंद्रीय सहाय पोलीस दल किंवा पोलीस बंदोबस्त आहे की नाही हे याचीदेखील सुनिश्चिती केली पाहिजे. मतदान केंद्रावर सूक्ष्म निरीक्षक आणि डिजिटल कॅमेरा /आंतरजालावरून प्रक्षेपण (वेब कास्टींग) सुविधा उपलब्ध आहे का, याची तुम्हाला माहिती असावी.

**(सात)** कोणत्याही परिस्थितीत, मतदान युनिट किंवा नियंत्रण युनिट किंवा व्हीव्हीपॅट जमिनीवर ठेवू नये. ते टेबलावर ठेवले पहिजे ; मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट यांना त्यांच्या संबंधित युनिटांशी जोडा.

**(आठ)** मतदान यंत्रे रिकामी आहेत आणि त्यात कोणतीही मते नोंदवलेली नाहीत हे दाखविण्यासाठी उपस्थित उमेदवारांना/ प्रतिनिधींना प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यासाठी निश्चित केलेल्या तासापूर्वी प्रात्यक्षिक करूण दाखवून द्या.

**(नऊ)** मतदान प्रतिनिधींना व्हीव्हीपॅट सह इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र योग्यरीत्या कार्यरत स्थितीत असल्याची खात्री करण्यासाठी मतदान प्रतिनिधींना प्रत्येक प्रतिस्पर्धी उमेदवारासाठी यादृच्छिकपणे काही मते नोंदवू द्यावीत. नियंत्रण युनिटचा निकाल आणि व्हीव्हीपॅट पेपर चिठ्ठ्यांची मोजून त्यात मेळ घाला. आयोगाच्या नवीनतम नवीन मार्गदर्शक सूचनात असे नमूद केले आहे की अभिरुप मतदानामध्ये किमान ५० मते दिली जातील आणि **नोटासह (वरीलपैकी कोणीही नाही)** प्रत्येक उमेदवारासाठी किमान एक मत दिले जाईल.

**(दहा)** नियंत्रण युनिटमधून अभिरूप मतदान निकाल टाका आणि व्हीव्हीपॅटमधील (ड्रॉप बॉक्स) खाली पडणाऱ्या अभिरूप मतदानाच्या चिठ्ठ्या काढून टाका. अभिरुप मतदानाचे प्रमाणपत्र तयार करा.

**(परिशिष्ट—५ चा भाग -एक).**

**(अकरा)** तुम्ही हे स्पष्ट केले पाहिजे की आयोगाच्या सूचनेनुसार, जर एखाद्या मतदान केंद्रावर अभिरूप मतदान झाले नसेल तर, त्या मतदान केंद्रावर कोणतेही मतदान होणार नाही.

**(बारा)** लक्षात ठेवा की अशा अभिरूप मतादानामध्ये नोंदवलेली मते मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटमधून काढून टाकली पाहिजे. जेणेकरून अभिरूप मतदानाशी संबंधित कोणतीही माहिती यंत्राच्या स्मृतीत राहणार नाही आणि व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्समधून कागदी चिठ्ठ्या काढल्या गेल्या पाहिजे. ज्यामुळे अभिरूप मतदानानंतर व्हीव्हीपॅटचा ड्रॉप बॉक्स रिकामा होईल.

**(तेरा)** प्रपत्र नमुना १७ ए (मतदारांची नोंदवही) मध्ये पहिल्या मतदाराने स्वाक्षरी करण्यापूर्वी, मतदान अधिकारी-एक व मतदान केंद्राध्यक्ष तपासणी करील आणि **" एकूण सर्व नियंत्रण युनिटातील तपासली आणि-ती शून्य असल्याचे आढळले."** अशी प्रपत्र नमुना १७ए मधील शाईने (INK) नोंद करेल.

**(चौदा) लोकसभा निवडणुकीसाठी नियंत्रण युनिटमध्ये** लावलेल्या **हिरव्या कागदी मोहोरेवर** फक्त लोकसभेसाठी निवडणुकीसाठीचे असलेले उमेदवार किंवा त्यावेळी मतदान केंद्रावर उपस्थित असलेले त्यांचे मतदान प्रतिनिधी, त्यांच्या स्वाक्षऱ्या करतील आणि त्याचप्रमाणे, **विधानसभा निवडणुकीसाठी नियंत्रण युनिटमध्ये** लावलेल्या हिरव्या कागदी मोहोरेवर, केवळ विधानसभा निवडणुकीतील उमेदवार किंवा त्यांचे मतदान प्रतिनिधीच त्यांची स्वाक्षरी करतील. याची खात्री करणे.

**(पंधरा)** मतदान प्रतिनिधी आणि इतर व्यक्तींना हे दाखवून द्या की मतदार यादीची निन्हांकित प्रतीमध्ये (मतदार यादीची प्रत ज्यांना मतदान करण्याची परवानगी आहे अशा मतदारांची नावे चिन्हांकीत करण्यासाठी वापरली जाणारी मदार यादीची प्रत )टपाली मतपत्रिका जारी पाठविण्यासाठी वापरण्या व्यतिरिक्त त्यावर इतर कोणत्याही शेऱ्यांचा सामवेश नाही.

**(सोळा)** मतदान कक्षाची निवडणुकीशी संबंधित सूचनांप्रमाणे मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट ठेवलेल्या कक्षावर स्पष्टपणे दर्शविण्यासाठी बाहेर समुचित माहिती फलक चिकटवून योग्यरीत्या व्यवस्था करण्यात आली आहे ते पहा.

**(सतरा)** मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅटना त्यांच्या संबधित नियंत्रण युनिटशी जोडण्यासाठी वायर अशाप्रकारे ठेवावी कि मतदान केंद्रांत येणाऱ्या त्या प्रत्येक मतदाराला दिसू शकेल आणि तसेच मतदारांना मतदान केंद्राच्या आत येता जाताना ती केबल ओलांडून जावे लागणार नाही याची खात्री करावी. आणि मतदान केंद्र आणि जोडणी केबलची संपूर्ण लांबी सर्वांना दिसेल व ती लपविलेली नसावी याची देखील खात्री करा. मतदान कक्षावर खाली केबल सैलपणे लोंबकळणार नाही याची देखील खात्री करा. टेबलच्या पायाजवळ मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅटच्या जोडणाऱ्या तारा अर्धा इंच रुंदीच्या पारदर्शक चिकट पट्टीने अशा प्रकारे चिकटवा की वायर हवेत लोबकळणार नाही. जेणेकरून लोंबकळणाऱ्या वायरच्या भाराचा नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅटच्या स्विचवर परिणाम होणार नाही.

**(अठरा)** मतदान सुरू होण्यापूर्वी मतदान पथकाचे सर्व सदस्यांनी आपापल्या जागी असतील आणि सर्व साहित्य आणि अभिलेख सहज वापरण्यायोग्य ठेवतील आणि ठरवलेल्या वेळी मतदान सरू करण्यासाठी ते तयार आहेत, याची सुनिश्चिती करा.

**(एकोणीस)** मतदान पथकाच्या कोणत्याही सदस्याला किंवा कोणत्याही मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्राच्या आत इकडे तिकडे फिरण्यापासून रोखा आणि त्यांना त्यांच्या नेमून दिलेल्या जागांवर बसवा.

**(वीस)** मतदान सुरू होण्याकरिता निश्चित केलेल्या तासाच्या ठोक्यावर प्रत्यक्ष मतदान सुरू करा. मतदान सुरू करण्यापूर्वी मतदान केंद्रावर उपस्थित असलेले उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी आणि मतदान अधिकारी यांना मतांची गुप्तता राखण्याबाबत संक्षिप्त माहिती दिली पाहिजे. लोकप्रितिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२८ मधील तरतुदी वाचून दाखवा व त्यांच्या निदर्शनास आणून द्याव्या.

**(एकवीस)** मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तींना ऐकू जाईल अशाप्रकारे घोषणा मोठ्याने वाचा आणि घोषणापत्रावर स्वाक्षरी करा आणि उपस्थित असलेल्या व इच्छूक असलेल्या मतदान प्रतिनिधींची त्यावर स्वाक्षरी घ्या. कोणत्याही मतदान प्रतिनिधीने त्याची स्वाक्षरी करण्यास नकार दिल्यास, मतदान केंद्राध्यक्षाने घोषणापत्रावर स्वाक्षरी न केलेल्या मतदार प्रतिनिधींची नावाची नोंद घ्यावी आणि मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक, मतदार यादीची चिन्हांकीत प्रत आणि मतदार नोंदवहीबाबत विहित नमुण्यात घोषणापत्र घ्यावे आणि त्यावर उमेदवारांची किंवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घ्यावी. **[ जोडपत्र-६ ].**

**(बावीस)** मतदान चालू असताना, मतदारांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवा आणि सावध व दक्ष रहा जेणेकरून कोणताही मतदार मतदान केल्याशिवाय बाहेर जाणार नाही आणि संबंधित घटनांची जेव्हा जेव्हा त्या घडतील तेव्हा तेव्हा त्याची नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या दैनंदिनीमध्ये नोंद करत रहा. **[ जोडपत्र-७ ].**

**(तेवीस)** मतदानाच्या पहिल्या तासादरम्यान जेव्हा मतदान सामान्यतः वेगात होत असते, तेव्हा मतदान पथकाचा कोणकाही सदस्य त्याला नेमून दिलेल्या कर्तव्यात कोणताही संथपणा दाखवत नाही याची खात्री करा.

**( चोवीस)** नियंत्रण युनिटकडे वेळोवेळी दिलेली एकूण मते तपासा आणि मतदारांच्या चिठ्ठ्यांवर दिलेल्या त्यांच्या अनुक्रमांकानुसार मतदारांनी मतदान केले आहे याची खात्री करा.

**(पंचवीस)** एकोचवेळी होणाऱ्या निवडणुकीत, संसदीय निवडणुकीसाठी नमुना १७सी **(जोडपत्र-८)** च्या प्रती फक्त संसंदीय मतदारसंघातील उमेदवारांच्या मतदान प्रनिधींना पुरविल्या गेल्या आहेत आणि विधानसभा निवडणुकीसाठी नमुना १७ सी **(जोडपत्र-८)** च्या प्रती फक्त उमेदवाऱ्यांच्या प्रतिनिधींनाच देण्यात आल्या आहेत याची खात्री करा.

**(सव्वीस)** मतदारांनी मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅटमध्ये कोणत्याही प्रकारे छेडछाड केली नाही याची खात्री करण्यासाठी नियमित अंतराने तपासा. तुम्हाला निवडणूक घेण्यासंबंधीचे नियम, १९६१ च्या नियम ४९ क्यू अंतर्गत अशा प्रकरणांमध्ये मतदानाच्या कक्षात प्रवेश करण्याचा आणि मतदान युनिटमध्ये कोणत्याही प्रकारे छेडछाड किंवा बिघाड किंवा हस्तक्षेप केला नाही आणि तुम्हाला आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करण्याचा अधिकार आहे. मतदान सुरळित आणि व्यवस्थितपणे चालू आहे याची खात्री करण्यासाठी तथापि, सावधगिरी बाळगा, जेव्हा तुम्ही मतदानाच्या कक्षात प्रवेश कराल तेव्हा एकट्याने कक्षात प्रवेश करणार नाही याबाबत मतदान केंद्रात तुम्ही तुमच्या सोबत एक किंवा दोन किंवा अधिक मतदान प्रतिनिधींना घेण्याची परवानगी घ्या व त्यांना तुमच्या सोबत न्या.

**(सत्तावीस)** मतदान शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी मतदान केंद्रातील प्रक्रियेचे नियमन करण्याकरिता खूप कौशल्य आवश्यक आहे. परंतू त्याच वेळी तुम्ही खंबीर आणि निःष्पक्ष असले पाहिजे. **जर मतदान केंद्रावर कोणतीही घटना घडली आणि ती तुमच्याद्वारे कळविली गेली नाही परंतु, ती इतर कोणत्याही स्त्रोतामार्फत कळविली गेली तर आयोग याचा गंभीरपणे विचार करेल आणि तुमच्यावर कारवाई करू शकेल.**

**(अठ्ठावीस)** मतदान सुरू होण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला असला तरीही निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेळेसच मतदान बंद करा. तथापि, मतदानाच्या संपण्याच्या शेवटच्या तासात मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या सर्व मतदारांना मतदान करण्यास परवानगी असेल अर्थात त्यामुळे मतदान आणखी काही काळ सुरू राहील. मतदानाच्या शेवटच्या तासानंतर कोणीही मतदारांच्या रांगेत सामील होणार नाही याचीही सुनिश्चिती करावी या प्रयोजनासाठी, तुम्ही रांगेत उभ्या असलेल्या सर्व मतदारांना तुम्ही स्वाक्षरी केलल्या अनुक्रमांक दिलेल्या चिठ्ठ्या वितरित कराव्यात आणि रांगेत उभ्या असलेल्या शेवटच्या व्यक्ती पासून सुरू करून अशा चिठ्ठ्याचे वितरण करा. सर्व मतदारांनी त्यांचे मत दिल्यानंतर आणखी कोणीही मत ध्यायचे राहिले नसेल, त्यानंतर मतदान अधिकाऱ्याने तारीख आणि वेळ लिहून शेवटच्या स्वाक्षरीच्या नोंद केल्यानंतर लाल रेषा आखावी. रांगेतील सर्व मतदारांनी मतदान केल्यानंतर नियंत्रण युनिटचे ‘ बंद ’ (क्लोज) बटण दाबा. **मतदान संपवण्याच्या वेळेच्या १५ मिनिटे आधी तुम्ही मोठ्या आवाजात मतदान संपवण्याच्या वेळेबाबत घोषणा करावी.**

**(एकोणतीस)** मतदान संपल्यावर, तुम्हाला नमुना १७सी **[ जोडपत्र-८ ]**च्या भाग एक मध्ये नोंदवलेल्या “मतांचे हिशोब ” तयार करणे आवश्यक आहे. आणि त्या नमुन्यामध्ये विनिर्दीष्ट केलेल्या उद्देशासाठी असलेल्या रकान्यात मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घेतली आहे. याची खात्री करा. अशा नोंदलेल्या मतांच्या हिशोबाच्या अधिप्रमाणित प्रती मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या प्रत्येक उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधीला देणे आवश्यक आहे. आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात अशा प्रती उमेदवारांच्या प्रतिनिधींना देण्याबाबत घोषणापत्र देणे देखील आवश्यक आहे.

**(तीस)** मतदान संपल्यांनतर, व्हीव्हीपॅट असलेले मतदान यंत्र आणि निवडणूक विषयक सर्व कागदपत्रे निवडणूक आयोगाने विहित केलेल्या पद्धतीने मोहोरबंद केली पीहिजेत आणि सुरक्षित ठेवली पाहिजे. मतदान केद्रांवर उपस्थित असलेल्या उमेदवारांना किंवा त्याच्या प्रतिनिधींना, त्यांना हवे असल्यास, मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट आणि निवडणूक कागदपत्रांवर तुमच्या मोहोरसोबतच त्यांचीही मोहोर लावण्याची परवानगी असेल. तुम्ही मोहोरबंद करण्याबाबतच्या आणि मतदान यंत्रे आणि व्हीव्हीपॅट आणि निवडणूक कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याबाबतच्या संबंधित सूचनांचे काळजीपूर्वक पालन केले पाहिजे जेणेकरून कोणतीही चूक होणार नाही.

**(एकतीस)** सुरक्षित मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट आणि सर्व निवडणूक कागदपत्रे योग्यरित्या मोहोरबंद करून योग्य जमा केल्याची योग्य पावत्या घेऊन, त्यांच्या संकलनासाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांकडे ते सूपूर्द करणे ही तुमची वैयक्तिक जबाबदारी आहे.

**(बत्तीस)** थोडक्यात, विविध टप्प्यांवरील तुमची कर्तव्ये तुमच्या तयार संदर्भसाठी आणि सोयीसाठी **जोडपत्र–९** मध्ये पाच वेगवेगळ्या शीर्षाखाली दिलेली आहेत.

**(तेहतीस)** तपासणी सूची (चेक मेमो) : तुम्ही निवडणुकीच्या संदर्भात विविध सांविधिक आवश्यक गोष्टी पूर्ण केल्या आहेत याची खात्री करण्यासाठी निवडणूक आयोगाने तुमच्यासाठी एक तपासणी ज्ञाप तयार केला आहे. जो **जोडपत्र—१०** मध्ये दिलेला आहे. उक्त तपासणी ज्ञाप तुम्ही योग्यरीत्या भरून ठेवला गेला पाहिजे.

**(चौतीस)** तुम्हाला तुमचा मोबाईल (सायलेंट मोड) आवाज होणार स्थितीत सोबत ठेवण्यास परवानगी आहे.

### १.१३ मतदान समाप्त करणे

**(एक)** मतदान केंद्राध्यक्षाने, विहित मतदान प्रक्रियेनुसार मतदानाचा अंतिम तास संपल्यानंतर मतदान विधिवत बंद होईल याची खात्री करावी. वरील प्रक्रियेनुसार शेवटच्या मतदाराने मतदान केल्यानंतर, त्याने नियंत्रण युनिटवरील ‘ बंद ’ (क्लोज) बटण दाबले पाहिजे. विहित नमुना प्रपत्र काळजीपूर्वक आणि योग्यरीत्या भरल्यानंतर त्याने नियंत्रण युनिट बंद केले पाहिजे, आणि मतदान युनिटामधून आणि नियंत्रण युनिट यामधून व्हीव्हीपॅट जोडणी काढून टाकली पाहिजे आणि त्यांना त्याच्या संबंधित वहनापेटी मध्ये मोहोरबंद करावे. **जोडपत्र–५ च्या भाग तीन** नुसार अहवाल तयार केला जाईल.

**(दोन)** मतदान केंद्राध्यक्ष मतदान संपल्यानंतर मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅट मधून पॉवर पॅक (बॅटरी) काढून टाकतील. केवळ व्हीव्हीपॅट मधून पॉवर पॅक (बॅटरी) काढून टाकल्यानंतरच व्हीव्हीपॅटचा वहन पेटी (कॅरी केस) मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत मोहोरबंद केली जाईल. अशाप्रकारे काढलेला पॉवर पॅक विहित प्रकियेनुसार स्वीकृती केंद्रामध्ये जमा केला जाईल.

(इलेक्ट्रॉनिक मतदान यत्र नियमपुस्तिकेच्या नवीनतम आवृत्तीचा संदर्भ घ्या.)

**(तीन)** एकाचवेळी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीच्या बाबतीत, कागदपत्रे स्वतंत्रपणे तायर आणि मोहोरबंद करावी. एकाचवेळी घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांमध्ये मनतदान केंद्राध्यक्षाने सर्व युनिटच्या वहन पेट्यांवर (कॅरी केस) संबंधित निवडणुकीचे ओळखपत्र बाहेरील बाजूस ठळकपणे चिकटवले आहे याची खात्री करावी. त्याने /तिने, मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅट फक्त त्यांच्या त्यांच्या संबंधित (कॅरी केस मध्ये) वहन पेट्यांमध्येच ठेवल्या आहेत व त्यावर निवडणूक ओळख चिठ्ठी घट्ट चिकटवलेली आहेत याची देखील सुनिश्चिती करावी याशिवाय त्याने संबंधित वहन पेटीवर यथोचितरीत्या माहिती पत्ता खुणचिठ्ठी भरलेली देखील लावली पाहिजे.

**(चार)** मतदान केंद्राध्यक्ष सर्व मोहोरबंद युनिटे आणि निवडणूक अभिलेख स्वीकृती केंद्रावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सूपूर्द करतील.

### १.१४ क्षेत्र अधिकारी

**(एक)** क्षेत्र अधिकारी (एस ओ) हा मतदान केंद्राध्यक्ष (PRO) आणि निवडणूक निर्णय अधिकारी (RO) यांच्यातील दुवा म्हणून कार्य करेल. मतदान केंद्राध्यक्ष, क्षेत्र अधिकाऱ्याकडून आवश्यक असल्यास, कोणतेही अतिरिक्त निवडणूक साहित्य, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट, पॉवर पॅक इत्यादी मिळवू शकतो.

**(दोन)** प्रत्येक दोन तासांचा मतदानाचा अहवाल क्षेत्र अधिकारी (एसओ) यांच्याकडे सादर करणे हे मतदान केंद्राध्यक्षाचे (PRO) कर्तव्य आहे तसेच तो ज्यांच्याबाबत मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीमध्ये खूण केली आहे अशा असुरक्षित वस्त्या/ समुदायातील मतदारांच्या संख्येविषयी माहिती क्षेत्र अधिकाऱ्याकडे (Sector Officer) सादर करील.

**(तीन)** मतदान केंद्राध्यक्षांच्या अहवालाचा भाग-चार आणि भाग-पाच **[ जोडपत्र-५ ]** क्षेत्र अधिकाऱ्यांद्वारे गोळा केला झाईल. क्षेत्र अधिकारी उक्त अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करतील.

### १.१५ मतदार सहायता केंद्र

**(एक)** प्रत्येक मतदान केंद्राच्या जागेसाठी/इमारतीच्या स्थानासाठी मतदान कक्षाची संख्या विचारात न घेता, एक मतदार सहायता केंद्र स्थापन केले जाईल. मतदाराला त्याचा/ तिच्या मतदान केंद्राचा क्रमांक आणि मतदार अनुक्रमांक मतदार यादीत शोधणे सुलभ व्हावे हा या मागचा उद्देश आहे. यासाठी प्रभाग निहाय मतदार यादी वर्णानुक्रमानुसार तयार केली जाते. शिवाय, नावांचा वर्णनुक्रम हा भाग निहाय असतो, विभाग निहाय केलेला नसतो.

**(दोन)** वर्णाक्रनुमाची यादी प्रामुख्याने इंग्रजीमध्ये छापावी. एकल / दुमजली मतदान केंद्रांच्या इमारतीसाठी, स्वतंत्र संघ किंवा मतदार सहायक केंद्राची आवश्यकता नाही. असा प्रकरणांमध्ये मतदान केंद्रावरील मतदारांची सहज ओळख व्हावी यासाठी मतदान केद्रांध्यक्षाला वर्णानुक्रमानुसार स्थान निर्देशाची यादी प्रदान केली जाईल. (चिन्हांकित प्रती व्यतिरिक्त) प्रत्येक मतदार सहायता केंद्रासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे अधिकाऱ्यांचा एक संघ नियुक्त केला जाईल. नियुक्ती फक्त मतदानाच्या दिवसासाठी केली जाईल. मतदान सहायता केंद्रांच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक आसन व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**(तीन)** " मतदार सहायता कक्ष " दर्शविणारा फलक अशाप्रकारे लावावा की मतदार जेव्हा त्या परिसरात / इमारतीजवळ जातील तेव्हा चटकन दिसेल. मतदार सहायता कक्षातील कर्मचारी अशी माहिती जाणून घेणाऱ्या प्रत्येक मतदाराचा केंद्र क्रमांक आणि अनुक्रमांक शोधून देतील.

# प्रकरण-०२

## मतदान केंद्राची उभारणी व सुरक्षा व्यवस्था

### २.१. मतदान केंद्रावर येणे

जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या सूचनेनुसार तुम्ही तुमच्या पथकासह मतदानाच्या दिवसाच्या अगोदरच्या दिवशी मतदान केंद्रावर हजर रहावे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट उघडू नये. आणखी तुम्ही स्थानिक लोकांचे आतिथ्य स्वीकारू नये.

### २.२. मतदान अधिकाऱ्याची अनुपस्थिती

तुमच्या मतदान केंद्रासाठी नेमण्यात आलेला एखादा मतदान अधिकारी काही आकस्मिक परिस्थितीमुळे मतदान केंद्रावर अनुपस्थित असल्यास, किंवा त्याचे/तिचे कर्तव्य पार पाडण्यास समर्थ नसल्यास, मतदान केंद्राध्यक्षास त्याच्या जागी मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस मतदान अधिकारी म्हणून नेमण्याचा व त्याबाबत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास कळवण्याचा अधिकार आहे. परंतु, अशी व्यक्ती निवडणुकीतील उमेदवाराचे किंवा त्याने निवडणुकीबाबतचे काम पाहण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीचे किंवा त्यांच्यासाठी निवडणुकीचे काम करणारी असता कामा नये.

### २.३. एकेरी निवडणुकीसाठी मतदान केंद्राची रचना

मतदान केंद्र ज्या ठिकाणी उभारावयाचे असेल त्या ठिकाणी तुम्ही गेल्यावर, त्या प्रयोजनासाठी नियोजित केलेल्या प्रस्तावित इमारतीची तपासणी करा व आराखडा तयार करा. तेथे मतदान केंद्र आधीच उभारलेले असेल तर त्या केंद्राची तपासणी करा. (एकेरी निवडणुकीसाठी मतदान पथकामध्ये ३ मतदान अधिकाऱ्यांचा समावेश असतो त्या प्रसंगासाठी आदर्श मतदान केंद्राची मांडणी कशी असावी ते दर्शविणारी रेखाकृती खाली देण्यात आलेली आहे) मतदान केंद्राची प्रत्यक्ष उभारणी करताना आवश्यकता वाटल्यास मतदान केंद्राध्यक्ष काही किरकोळ फेरफार करू शकतो, पण तत्पुर्वी पुढील गोष्टी साध्य होतील याची खात्री करावी :-

- मतदान केंद्राबाहेर मतदारांना थांबवण्यासाठी पुरेशी जागा आहे;
- शक्यतोवर स्त्रियांना व पुरुषांना थांबवण्यासाठी वेगवेगळी जागा आहे;
- मतदारांना आत येण्यासाठी व बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्ग आहेत;
- जेथे मतदान केंद्राच्या खोलीला केवळ एकच दरवाजा असेल तर त्या दरवाज्यामध्ये बांबू व दोर यांच्या सहाय्याने दारातून वेगळी आत शिरण्याची व बाहेर पडण्याची सोय करता येईल.

**मतदान दिवस : मतदान केंद्राचा आराखडा**



**(दोन)** मतदान कक्षाच्या वर किंवा पुढे उच्च दाबाचा प्रखर दिवा/ट्युबलाईट येणार नाही (अति प्रकाशात व्हीव्हीपॅट एरर मोडमध्ये जाऊ शकते) याची खात्री करून घ्या. मतदान कक्षाची अशाप्रकारे मांडणी करावी की:

- मतदान कक्षात पुरेसा प्रकाश उपलब्ध असेल.
- मतदान कक्षाच्या वर किंवा पुढे थेट प्रकाश येणार नाही.
- मतदानाच्या गुप्ततेचे उल्लंघन होणार नाही आणि
- मतदान कक्ष खिडकी/दरवाज्याजवळ ठेवले जाणार नाही.

**(तीन)** मतदारांनी मतदान केंद्रात प्रवेश केल्यापासून ते केंद्रातून बाहेर पडेपर्यंत मतदारांचा ओघ व्यवस्थित चालू राहील आणि मतदान केंद्राच्या आत कोणत्याही प्रकारे उलटसुलट अडथळे येणार नाहीत अशा प्रकारे तेथे व्यवस्था केलेली असावी.

**(चार)** सर्व मतदान अधिकाऱ्यांची बसण्याची व्यवस्था अशी असावी की, त्यांना मतदार विशिष्ट बटण दाबून प्रत्यक्ष मत नोंदवताना दिसणार नाही.

**(पाच)** नियंत्रण युनिट ज्या टेबलावर ठेवण्यात आले आहे त्यापासून पुरेशा अंतरावर मतदान कक्ष उभारले जाईल. व्हीव्हीपॅट व नियंत्रण युनिट यांना जोडणारी केबल (Interconnecting Cable) सुमारे पाच मीटर लांबीची असते. म्हणून, मतदान कक्ष यथोचित वाजवी अंतरावर असेल. तसेच, मतदान केंद्रात मतदारांची ये-जा होत असताना त्यांना अडथळा होणार नाही किंवा ती केबल पाय देऊन तुडविली जाऊन बंद पडणार नाही अशा प्रकारे केबल फिरविण्यात यावी, परंतु संपूर्ण लांबीची केबल दिसावी व ती कोणत्याही प्रकारे कपडा किंवा टेबलाखाली लपविली जाऊ नये. मतदान युनिट व व्हीव्हीपॅटला जोडलेल्या केबल टेबलाच्या पायाला अर्धा इंच रुंदीच्या पारदर्शक चिकटपट्टीने अशा पद्धतीने लावावी की केबल हवेत लटकणार नाहीत त्यामुळे लटकलेल्या केबलचा प्रभाव मतदान युनिट व व्हीव्हीपॅटच्या जोडलेल्या बटणावर पडणार नाही . मतदान कक्षात मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट ठेवताना, मतदानाच्या गुप्ततेचा भंग होणार नाही याची न चुकता खात्री करून घ्यावी. पहिल्या मतदान युनिटच्या डाव्या बाजूला व्हीव्हीपॅट ठेवावे.

**(सहा)** अशी खात्री करणे गरजेचे आहे की, मतदान कक्ष पोलादी राखाडी रंगाच्या (जे अपारदर्शी व पुन्हा वापरण्यायोग्य आहे) पन्हाळीदार प्लास्टिक पुठ्ठ्याने (लवचिक बोर्ड) बनविण्यात आलेले आहेत. जर एकच मतदान युनिट वापरलेले असेल तर, मतदान कक्ष तीन घड्यांचे आहेत, आणि प्रत्येक घडीचे आकार २४ × २४ × ३०" (लांबी × रुंदी × उंची) असेल. मतदानासाठी एकापेक्षा अधिक मतदान युनिट वापरले असल्यास, मतदान कक्षाची रुंदी, प्रत्येक अतिरिक्त मतदान युनिटसाठी १२ ने वाढविण्यात येईल. जेथे अतिरिक्त मतदान युनिट वापरले आहे, तेथे, **जोडपत्र -२३** अनुसार व्यवस्था करावी. मतदान कक्षात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र ठेवताना, मतदानाच्या गुप्ततेचा भंग होणार नाही याची खात्री करावी आणि ते मतदान केंद्राच्या खिडकीजवळ किंवा दरवाज्याजवळ नाहीत याची खात्री करावी.

(संदर्भः इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट वरील अद्ययावत नियमपुस्तिका). ते खिडकी / दरवाजापासून दूर ठेवणे आवश्यक आहे.

### २.४ एकत्रित निवडणुकीसाठी मतदान केंद्राची रचना

(एक) एकत्रित मतदानासाठी (म्हणजेच लोकसभेच्या व विधानसभेच्या एकत्रित निवडणुका घेण्यासाठी) जेथे दोन (२) इव्हिएम व व्हीव्हीपॅट दोन संचांचा वापर करावयाचा आहे, तेथील मतदान केंद्राचा आराखडा खाली दिला आहे. या आराखड्यात, मतदारांना प्रवेश करण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी केवळ एकच दरवाजा दर्शविण्यात आला आहे. तथापि, जेथे मतदान केंद्राची रचना करावयाची आहे त्या खोलीला दोन दरवाजे असतील तर, प्रवेश करण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी वेगवेगळ्या दरवाज्यांची व्यवस्था करता येईल.




(दोन) लोकसभेच्या निवडणुकीसाठी एक मतदान युनिट (युनिटे) व व्हीव्हीपॅट ठेवण्यासाठी व विधानसभा निवडणुकीसाठी दुसरे मतदान युनिट (युनिटे) व व्हीव्हीपॅट ठेवण्यासाठी तेथे **दोन स्वतंत्र मतदान कक्ष** असतील. प्रत्येक " मतदान कक्षावर " ठळक अक्षरात **" लोकसभा निवडणूक-मतदान कक्ष " वर्षे व मतदारसंघ** यांसह व **" विधानसभा निवडणूक-मतदान कक्ष "** अशा सूचना (नोटीस) चिकटवण्यात यावी.

(तीन) मतदारांना मतदान गुप्ततेत करता यावे आणि या प्रयोजनासाठी मतदान युनिट व व्हीव्हीपॅट मतदान कक्षात ठेवणे आवश्यक आहे. मतदान कक्षाच्या तीन बाजू बंद (झाकलेल्या) असतील. मतदान युनिट व व्हीव्हीपॅट मतदान कक्षामध्ये टेबलावर अशा प्रकारे ठेवावे की, मतदाराला त्याचे मत नोंदवताना कोणतीही अडचण येणार नाही. नियंत्रण युनिट ज्या टेबलावर ठेवण्यात आले आहे व चालविण्यात येत आहे त्यापासून पुरेशा अंतरावर मतदान कक्ष असेल व मतदान केंद्रात मतदारांची ये-जा होत असताना त्यांना अडथळा होणार नाही किंवा ती पाय देऊन तुडविली जाऊन बंद पडणार नाही अशा प्रकारे केबल फिरविण्यात यावी, परंतु संपूर्ण लांबीची केबल दिसावी व ती कोणत्याही प्रकारे कपडा किंवा टेबलाखाली लपविली जाऊ नये. मतदान युनिटाला कायमस्वरुपी जोडण्यात आलेली जोडणी केबल मतदान कक्षाच्या मागील भागाच्या तळाशी असलेल्या छिद्रातून बाहेर घेतली पाहिजे. **तथापि, मतदान कक्षातील हे छिद्र मतदानाची गुप्तता भंग होईल एवढे मोठे असू नये.** मतदान कक्षात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इव्हीएम) व व्हीव्हीपॅट ठेवताना, मतदानाच्या गुप्ततेचा भंग होणार नाही याची न चुकता खात्री करून घ्यावी. या प्रयोजनाकरीता, मतदान कक्ष मतदान केंद्राच्या खिडकी/दरवाज्याजवळ ठेवला नसल्याची खात्री करावी. पहिल्या मतदान युनिटच्या डाव्या बाजूला व्हीव्हीपॅट ठेवावे. तो खिडकी/दरवाज्यापासून दूरच ठेवण्यात यावा. परंतु मतदारांना मतदान युनिटवरील मतपत्रिका वाचता येईल इतपत पुरेसा प्रकाश असावा. व्हीव्हीपॅट थेट प्रकाशाखाली (दिव्याखाली) येणार नाही याची खात्री करुन घ्यावी.

**२.५. एकत्रित घेतल्या जाणाऱ्या निवडणुकांसाठी मतदान प्रक्रिया**

(एक) जेव्हा मतदार, मतदान केंद्रात प्रवेश करतील तेव्हा ते पहिल्या मतदान अधिकाऱ्याकडे जातील, पहिला मतदान अधिकारी मतदार छायाचित्र ओळखपत्र किंवा निवडणूक आयोगाने विहित केल्याप्रमाणे अन्य कागदपत्रे पडताळून मतदारांची ओळख पटवील.

(दोन) मतदार, नंतर दुसऱ्या अधिकाऱ्याकडे जाईल, तो प्रथम मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्की शाई लावील आणि त्याला मतदार नोंदवहीत सही करण्यास किंवा अंगठ्याचा ठसा उमटवण्यास सांगेल. **मतदाराने आपल्या अंगठ्याचा ठसा उमटवला असेल तर,**

**मतदान अधिकाऱ्याने मतदाराला या प्रयोजनासाठी टेबलावर ठेवलेल्या ओल्या कापडाच्या तुकड्यावर त्याच्या अंगठ्याला राहिलेली ठशाची शाई पुसून टाकण्यास सांगावे.**

(तीन) जेव्हा दुसरा मतदान अधिकारी पक्क्या शाईची खूण करीत असेल व नोंदवहीत मतदारांची सही किंवा त्यांच्या अंगठ्याचा ठसा उमटवून घेत असेल तेव्हा तिसरा मतदान अधिकारी, जो दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याला टेबलावर कामात मदत करीत असेल, तो दोन सारख्या मतदार चिठ्ठ्या एक **पांढरी** व दुसरी **गुलाबी** तयार ठेवील आणि पक्क्या शाईची खूण यथोचितरित्या लावलेली आहे व ती पुसलेली नाही, याची खातरजमा करण्यासाठी मतदाराचे बोट तपासल्यानंतर मतदाराकडे दोन्ही मतदार चिठ्ठ्या सुपूर्द करील.

(चार) **लोकसभेसाठी मतदान :** दोन मतदार चिठ्ठ्या मिळाल्यानंतर मतदार चिठ्ठ्या मतदार त्याला अनुक्रमे लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी मतदान करता यावे म्हणून **लोकसभा निवडणुकीच्या नियंत्रण कक्षाचा प्रभारी** असलेल्या चौथ्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल. मतदार, चौथ्या मतदान अधिकाऱ्याकडे **पांढरी** मतपत्रिका देईल. मत देण्यासाठी त्याच मतदाराची पाळी आहे, याबाबत खातरजमा केल्यानंतर, चौथा मतदान अधिकारी लोकसभा निवडणुकीसाठी त्याच्या टेबलावर ठेवलेल्या नियंत्रण युनिटाचे बॅलट बटन दाबेल. आणि लोकसभा निवडणुकीसाठी मतदान कक्षात जाण्यासाठी मतदाराला निदेश देईल. असे करत असताना, चौथा मतदान अधिकारी मतदाराला लोकसभेचे मतदान केल्यानंतर, त्याने विधानसभा निवडणुकीकरिता मतदान करण्यासाठी पाचव्या मतदान अधिकाऱ्याकडे **गुलाबी** मतपत्रिकेसह जाण्यास सांगेल. यानंतर मतदार लोकसभा निवडणुकीच्या मतदान कक्षात प्रवेश करील आणि आतील बाजूला ठेवलेल्या मतदान युनिटावर त्याच्या पसंतीच्या उमेदवारासमोरील निळे बटन दाबून लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करील.

(पाच) **विधानसभा निवडणुकीसाठी मतदान :** मतदाराने लोकसभा निवडणुकीसाठी मतदान केल्यानंतर मतदार हा विधानसभा निवडणुकीसाठी नियंत्रण युनिटाचा प्रभारी असलेल्या पाचव्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल, याची खात्री करण्यात यावी. मतदाराकडून **गुलाबी** मत चिठ्ठी घेतल्यानंतर आणि आता मत देण्यासाठी त्याची पाळी आहे याबाबत खातरजमा केल्यानंतर पाचवा मतदान अधिकारी, विधानसभा निवडणुकीसाठी असलेल्या नियंत्रण युनिटावरील बॅलेट बटन दाबून यंत्र कार्यरत करील आणि मतदाराला मतदान करण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या मतदान कक्षाच्या आतील बाजूस जाण्याचा निदेश देईल. पाचवा मतदान अधिकारी, पक्क्या शाईची खूण जशीच्या तशी आहे याबाबत खात्री करण्यासाठी पक्क्या शाईच्या खुणेची तपासणी देखील करील.

## २.६ इतर सावधगिरी

(एक) तुमच्या मतदान केंद्रामध्ये "पडदानशीन" (बुरखाधारी) महिला मतदार पुरेशा संख्येने येणार असतील तर त्यांची पडदानशिनता आब आणि औचित्य लक्षात घेऊन त्यांची ओळख पटवून घेण्यासाठी व महिला मतदान अधिकाऱ्याने स्वतंत्र कक्षात त्यांच्या डाव्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण करण्यासाठी तुम्ही खास कक्षाची व्यवस्था केली पाहिजे. अशा खास कक्षासाठी तुम्ही स्थानिकरित्या उपलब्ध होणारी परंतु, अत्यंत स्वस्त साधने वापरली पाहिजेत.

(दोन) एकाच इमारतीमध्ये एकापेक्षा अधिक मतदान केंद्रे ठेवलेली असतील तर वेगवेगळ्या मतदान केंद्रांचे मतदार वेगवेगळे रहावेत आणि प्रत्येक मतदान केंद्रासमोरच्या जागेत त्या त्या मतदारांना कोणताही गोंधळ निर्माण न होता उभे राहता यावे यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली असल्याची खात्री करून घ्या.

(तीन) मतदान केंद्रावर तीन रांगा असाव्यात. एक पुरुष मतदारांची, एक महिला मतदारांसाठी, आणि तिसरी दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी दोन महिला मतदारानंतर एका पुरुष मतदाराला मतदान करण्यासाठी परवानगी द्यावी.

(चार) जर मतदान केंद्र एखाद्या खाजगी इमारतीत असेल तर ती इमारत व तिच्या भोवतीचे शंभर मीटर त्रिज्येच्या परिघातील क्षेत्र तुमच्या नियंत्रणाखाली राहील. मालकांशी संबंधीत असलेली कोणतीही व्यक्ती, सशस्त्र किंवा निःशस्त्र (राखणदार व पहारेकरी वा इतर कोणीही) यांना मतदान केंद्रावर व त्या भोवतालच्या दोनशे मीटर त्रिज्येच्या परिघात राहू देऊ नये. मतदान केंद्र आणि उपरोक्त क्षेत्र यांमधील सुरक्षा व्यवस्थेची संपूर्ण जबाबदारी तुमच्या नियंत्रणाखालील पोलिसांची राहील.

(पाच) राजकीय पक्षांच्या नेत्यांचे फोटो किंवा कोणत्याही राजकीय पक्षांची चिन्हे किंवा निवडणुकीशी संबंधित घोषणा लावता कामा नयेत आणि असे फोटो, चिन्हे वा घोषणा अगोदरपासून जेथे लावलेल्या असतील तर ते सर्व काढून टाकावे आणि मतदान संपेपर्यंत त्यापैकी काहीही तेथे असणार नाही हे पहावे.

(सहा) मतदानाच्या दिवशी दिवसभरात मतदान केंद्रात स्वयंपाकाची किंवा कोणत्याही प्रयोजनार्थ विस्तव पेटवण्याची परवानगी देऊ नये.

**२.७ नोटीस लावणे**

(एक) प्रामुख्याने प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेरच्या बाजूस :-

- मतदान क्षेत्र आणि त्या मतदान केंद्रात मतदान करणाऱ्या मतदारांसंबंधीचा तपशील दर्शविणारी नोटीस आणि
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या "नमुना ७-ए" मधील यादीची एक प्रत लावण्यात यावी.

(दोन) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व नावांचा क्रम ज्या भाषेत व ज्या क्रमाने असेल त्याचप्रमाणे ही नोटीस असावी.

(तीन) प्रत्येक मतदान केंद्रावर, मतदार सुविधा पत्रके प्रवेशद्वाराजवळ बाहेरील भिंतीवर लावावीत.

(चार) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा मुद्रित नमुना (खऱ्या यंत्राच्या आकाराचा) कार्डबोर्ड (पेपरवर) चिकटवावा मतदारांच्या सोयीसाठी दुबार मतपत्रिकेचा वापर करावा.

(पाच) संदेश दर्शविण्यात यावा – **" तुम्ही वेब कॅमेरा/सीसीटीव्ही निरीक्षणातंर्गत आहात."**

**२.८ मतदान केंद्रात प्रवेश करण्याचा हक्क असलेल्या व्यक्ती**

(एक) तुमच्या मतदान केंद्रासाठी ठरवून दिलेल्या मतदारांव्यतिरिक्त केवळ खालील व्यक्तींना मतदान केंद्रात प्रवेश देता येईल :—

- मतदान अधिकारी ;
- प्रत्येक उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी व प्रत्येक उमेदवाराचा यथोचितरीत्या नियुक्त केलेला एका वेळी एकच मतदान प्रतिनिधी ;
- आयोगाने प्राधिकृत केलेल्या प्रसार माध्यमातील व्यक्ती ;
- निवडणुकीच्या संबंधात कामावर असलेले लोकसेवक, आयोगाने नियुक्त केलेले निरीक्षक ;
- महत्त्वाच्या/संवेदनाक्षम मतदान केंद्र असल्यास सूक्ष्म निरीक्षक, व्हिडिओग्राफर्स/छायाचित्रकार/वेबकास्टींग करणारा कर्मचारी वर्ग ;
- मतदाराबरोबर असलेले कडेवरील मूल ;
- अंध किंवा आधाराशिवाय चालू न शकणाऱ्या अपंग मतदाराबरोबर आलेली व्यक्ती ; आणि
- मतदारांची ओळख पटण्यासाठी किंवा मतदान करून घेण्याच्या कामी तुम्हाला अन्य प्रकारे सहाय्य करण्यासाठी तुम्ही वेळोवेळी ज्यांना प्रवेश द्याल अशा व्यक्ती.
- निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना ओळखपत्रे द्यावीत असे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे. जेव्हा, ते मतदान केंद्राला भेट देतील तेव्हा तुम्ही, गरजेनुसार ओळखपत्र सादर करण्यास सांगू शकता. त्याचप्रमाणे निवडणूक प्रतिनिधींना त्यांच्या नेमणूकपत्राची साक्षांकित दुसरी प्रत सादर करण्यास तुम्ही सांगू शकता. हे साक्षांकन निवडणूक अधिकाऱ्याने केलेले असते आणि त्यावर निवडणूक प्रतिनिधीचे छायाचित्रदेखील लावलेले असते.

(दोन) **" निवडणुकासंबंधीच्या कामावरील लोकसेवक "** या संज्ञेमध्ये सामान्यतः पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश होत नाही, ही गोष्ट तुम्ही लक्षात ठेवावी. अशा अधिकाऱ्यांना (मग ते गणवेशात असोत किंवा साध्या वेशात असोत) सर्वसाधारण नियम म्हणून मतदान केंद्रात प्रवेश करण्याची परवानगी देऊ नये. तथापि, जेव्हा जेव्हा गरज भासेल तेव्हा तेव्हा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी किंवा त्यासारख्या प्रयोजनासाठी तुम्ही त्यांना अधूनमधून बोलावू शकता. कोणत्याही अनिवार्य कारणाव्यतिरिक्त मतदान केंद्रात असलेल्या त्यांच्या उपस्थितीमुळे काही प्रसंगी काही उमेदवारांना किंवा पक्षांना त्यांचे निवडणूक प्रतिनिधी बलाच्या अनावश्यक प्रदर्शनामुळे हबकून गेले होते, असा आरोप करण्यास संधी मिळाली आहे.

(तीन) त्याचप्रमाणे मतदार किंवा उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी याच्यासोबत झेड + सुरक्षा असलेले तेही केवळ साध्या सुती वस्त्रातील गुप्त हत्यार असलेल्या एक सुरक्षा कर्मचारी वगळता, कोणालाही सुरक्षा कर्मचारी असल्यास त्याला देखील मतदान केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येऊ नये.

(चार) "निवडणुकीसंबंधीच्या कामावरील लोकसेवक" या वरील संज्ञेमध्ये केंद्र सरकारचे व राज्य शासनाचे मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री यांचादेखील समावेश होत नाही, ही गोष्ट तुम्ही लक्षात घ्यावी. केंद्र सरकारचे व राज्यांचे मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री की ज्यांना राज्याच्या खर्चाने सुरक्षा पुरविण्यात आलेली असेल त्यांना, आयोगाच्या निदेशानुसार, मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी त्यांना मुभा दिली जाणार नाही.

(पाच) स्थायी सूचनांनुसार, निवडणुकांमधील उमेदवार किंवा मतदार या नात्याने मतदान केंद्रात प्रवेश करणाऱ्या मंत्र्यांसोबत किंवा राजकीय कार्यकर्त्यांसोबत असलेल्या सुरक्षा कर्मचारीवर्गाला मतदान केंद्राच्या आत प्रवेश करण्यास मुभा दिली जाणार नाही. सुरक्षा कर्मचारी, मतदान केंद्राच्या दरवाज्यावर उभे राहून वाट पाहू शकतील परंतु मतदान चालू असताना कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करण्याचे काम कोणत्याही परिस्थितीमध्ये करणार नाहीत.

(सहा) वर तपशीलवार दिल्याप्रमाणे लोकांच्या प्रवेशावर काटेकोर नियंत्रण ठेवावे. अन्यथा, मतदानाचे काम सुरळीतपणे व व्यवस्थीतपणे पार पाडण्यात अडथळा निर्माण होईल. तुम्ही, एका वेळी फक्त तीन किंवा चार मतदारांनाच मतदान केंद्रामध्ये प्रवेश करण्यास परवानगी द्यावी.

(सात) जर कोणत्याही व्यक्तीच्या मतदान केंद्रात असलेल्या उपस्थितीसंबंधात तिच्याकडे असलेल्या अधिकारपत्राबाबतच तुम्हाला वाजवी, संशय असेल, तर जरी त्या व्यक्तीकडे मतदान केंद्रात प्रवेश करण्यासाठी अधिकारपत्र असेल तरीही आवश्यक असल्यास, तुम्ही तिची झडती करवून घ्यावी.

(आठ) तुमची कर्तव्ये पार पाडताना तुम्ही फक्त निवडणूक आयोगाच्या अनुदेशांना बांधील आहात.

(नऊ) जर मतदारांची ओळख पटवण्याच्या कामी तुम्हाला मदत करण्यासाठी किंवा मतदान घेण्याच्या कामी तुम्हाला इतर प्रकारे सहाय्य करण्यासाठी तुम्ही एखादा स्थानिक अधिकारी किंवा एखादी महिला नेमली असेल तर त्याची बसण्याची व्यवस्था सर्वसाधारणपणे मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर करावी. एखाद्या विशिष्ट मतदाराची ओळख पटवून घेण्यासाठी किंवा मतदान घेण्याच्या संबंधातील एखाद्या विशिष्ट प्रयोजनासाठी तुम्हाला त्याची/तिची मदत लागेल तेव्हाच फक्त त्याला/तिला मतदान केंद्रात प्रवेश द्यावा. मतदान केंद्रातील कोणाही व्यक्तिला एखाद्या मतदाराने विशिष्ट प्रकारे मतदान करावे यासाठी शब्दांनी किंवा हावभावाद्वारे त्या मतदारावर दडपण आणू नये किंवा दडपण आणण्याचा प्रयत्न करू देऊ नये.

### २.९. मतदान प्रतिनिधींची नियुक्ती व रद्द करणे

(एक) प्रत्येक उमेदवार, प्रत्येक मतदान केंद्रावर एक मतदान प्रतिनिधी व दोन विमोचक मतदान प्रतिनिधींची नियुक्ती करू शकतो. तथापि, मतदान केंद्राच्या आत, एका वेळी एका उमेदवाराच्या केवळ एका मतदान प्रतिनिधीला परवानगी देण्यात येईल.

(दोन) उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी एखाद्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती रद्द देखील करू शकतो.एखाद्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस विहित नमुन्यात रद्द करता येते. (मतदान प्रतिनिधींची नियमपुस्तिकेती नवीनतम आवृत्तीचा संदर्भ घ्यावा.)

(तीन) कोणत्याही मतदान प्रितिनिधीची नियुक्ती रद्द केली असल्यास, किंवा मतदान समाप्तीपूर्वी कोणत्याही मतदान प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, मतदान समाप्तीपर्वी कोणत्याही वेळी दुसऱ्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती करू शकतो. (मतदान प्रतिनिधी नियमपुस्तीकेच्या नवीनतम आवृत्तीचा संदर्भ घ्यावा.)

### २.१०. मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्तीसाठी अर्हता

(एक) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी ज्यांची नियुक्ती केलेली आहे असे मतदान प्रतिनिधी सामान्यतः त्याच मतदान केंद्रातील किंवा किमान एकाच मतदारसंघात येणाऱ्या शेजारच्या मतदान केंद्रातील रहिवासी व मतदार असावा. आयोगाने मानके आणखी

शिथिल केली आहेत आणि आता त्याच मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधी नेमण्यात अडचणी येत असतील तरच त्याच विधानसभा मतदारसंघाचा असलेल्या व्यक्तीमधून कोणत्याही मतदाराची मतदान प्रतिनिधी म्हणून नियक्ती करू शकतो. मतदान प्रतिनिधीकडे मतदान छायाचित्र ओळखपत्र किंवा शासनाने किंवा कोणत्याही शासकीय अभिकरणाने जारी केलेले इतर कोणतेही मान्यताप्राप्त ओळखपत्र, जे त्याची /तिची ओळख दर्शवित, असेल; ते असावे,

(तीन) मतदान प्रतिनिधी म्हणून ग्राम पंचायत प्रधान/ग्राम पंचायत सरपंच/पंचायत सदस्य, परिषद सदस्य किंवा महानगरपालिका किंवा यांची नियुक्ती करण्यावर कोणतेही निर्बंध नाहीत.

(दोन) मतदाराच्या बाबतीत, ज्याची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराद्वारे मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्याचे प्रस्तावित असेल, त्याच्याकडे मतदार छायाचित्र ओळखपत्र नसेल तर निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित निवडणूक लढवणारा उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांच्या लेखी विनंतीवरून अशा मतदाराला मतदार छायाचित्र ओळखपत्र देण्याची आवश्यक ती व्यवस्था करील. सर्व मतदार प्रतिनिधीं सहज व चटकन ओळख पटण्यासाठी मतदानाच्या दिवशी त्या व्यक्ती ठळकपणे मतदार छायाचित्र ओळखपत्र दाखवतील याची तुम्ही खात्री करून घ्यावी.

**२.११. मतदान प्रतिनिधींनी नियुक्ती पत्र सादर करणे**

(एक) उमेदवाराने किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीने नमुना १० अनुसार ज्या नेमणूकपत्राद्वारे मतदान प्रतिनिधीची नेमणूक केली असेल ते नेमणूकपत्र प्रत्येक मतदान प्रतिनिधीने तुमच्या समोर सादर केले पाहिजे. ही नेमणूक तुमच्याच मतदान केंद्राकरिता केली असल्याचे तपासून पहा. त्या मतदान प्रतिनिधीची तुमच्या मतदान केंद्रासाठी नेमणूक करण्यात आली आहे याची खातरजमा केल्यानंतर, मतदान प्रतिनिधीने ते कागदपत्र भरून पूर्ण करावेत व त्यातील प्रतिज्ञापनावर तुमच्या समक्ष सही करावी व त्याला मतदान केंद्रावर दाखल करून घेण्यापूर्वी त्याने ते तुमच्याकडे सुपूर्द करावेत. मतदान संपल्यानंतर ती पत्रे एका लिफाफ्यात घालून इतर कागदपत्रांबरोबर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवावीत.

मतदान केंद्राच्या आत उपस्थित राहण्याच्या दिलेल्या वेळेत एखाद्या विशिष्ट उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी किंवा कार्यमांचक प्रतिनिधी एकापेक्षा अधिक नसतील याची खात्री करून घ्यावी, मतदान केंद्राध्यक्ष प्रत्येक उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधीला प्रवेश पत्र (जोडपत्र-१२) देईल आणि सोबत जोडलेल्या जोडपत्र-१३ च्या विहित नमुन्यात प्रवेश पत्राची नोंद घेईल व ते इतर कागद-पत्रासह जमा केंद्रावर इतर निवडणूक साहित्यासहित जमा करण्यासाठी पाकिटात ठेवील. तुम्हाला सादर करण्यात आलेल्या उक्त नमुना १० मधील कोणत्याही मतदान प्रतिनिधीच्या नियुक्ती पत्राच्या खरेपणाविषयी तुम्हाला कोणताही संशय असेल त्याबाबतीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून तुम्हाला पुरवण्यात आलेल्या नमुना सह्यांवरून तुम्ही उमेदवाराच्या/त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या नमुना सह्यांची पडताळणी केली पाहिजे.

**२.१२. मतदान प्रतिनिधींची उपस्थिती**

(एक) तुमची पूर्वतयारी चालू असताना उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींना हजर रहाता यावे यासाठी त्यांना मतदान सुरू होण्यापूर्वी कमीतकमी एक तास अगोदर मतदान केंद्रावर हजर होण्यास सांगावे. या पूर्वतयारीतील काही भाग अगोदरच झालेला असेल आणि उशिरा आलेल्या कोणत्याही प्रतिनिधीचा तो भाग चुकला असेल तर उशिरा येणाऱ्या कोणाही प्रतिनिधीस तो माहिती व्हावा, यासाठी तो नव्याने (अगदी सुरुवातीपासून) पुन्हा करून दाखवण्याची गरज नाही.

(दोन) मतदान प्रतिनिधींच्या नेमणुकीबाबत कायद्याने कोणतीही कालमर्यादा घालून दिलेली नाही. एखादा मतदान प्रतिनिधी केंद्रावर उशिरा आला, तरीही मतदान केंद्रावरील पुढील कामकाजात सहभागी होण्याची त्याला परवानगी देण्यात यावी.

(तीन) प्रत्येक मतदान केंद्रावर 'मतदान प्रतिनिधी/बदली मतदान प्रतिनिधी यांची हालचाल नोंदवही' ठेवून त्यामध्ये प्रत्येक मतदान प्रतिनिधींनी, तो/ती ज्यावेळी मतदान केंद्रावर आला आणि ज्यावेळी मतदान केंद्र सोडलेली वेळ नमूद करून सही करणे आवश्यक असेल. मतदान केंद्र अध्यक्षांनी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र स्वीकृती केंद्रामध्ये इतर कागदपत्रांसोबत ही नोंदवही सुपूर्द करावी. मध्ये 'मतदान प्रतिनिधी/बदली मतदान प्रतिनिधी यांच्या हालचाल नोंदवहीचा ' नमुना जोडपत्र ११ मध्ये ' उपलब्ध आहे.

(चार) निवडणूक निर्णय अधिकारी/ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी/मुख्य पोलीस अधिकारी/क्षेत्रीय अधिकारी/नियंत्रण कक्ष यांचे दूरध्वनी क्रमांक मतदान केंद्रावरती दर्शवावे जेणेकरून मतदान प्रतिनिधींची काही तक्रार असल्यास, ते तातडीने संपर्क साधू शकतील.

## २.१३. मतदान प्रतिनिधींसाठी प्रवेशपत्रे

मतदान केंद्रामध्ये ज्यांना प्रवेश दिलेला आहे, अशा प्रत्येक मतदान प्रतिनिधीला अधिकाऱ्यांनी दिलेले प्राधिकारपत्र किंवा प्रवेशपत्र द्यावे, या पत्राच्या आधारे त्याला गरजेप्रमाणे मतदान केंद्रातून ये-जा करता येईल. तथापि, मतदान प्रतिनिधी, मतदार यादीची प्रत मतदान केंद्राच्या बाहेर नेत नाही, याची खातरजमा करावी. याशिवाय, मतदान प्रतिनिधींनी नैसर्गिक विधी इत्यादीसाठी मतदान केंद्राबाहेर दुपारी ३-०० नंतर देखील जाण्यास आणि परत मतदान केंद्रामध्ये येण्यास परवानगी असेल.

तथापि, मतदान केंद्रामध्ये त्यावेळी फक्त मतदान प्रतिनिधी किंवा त्याचा बदली मतदान प्रतिनिधी उपस्थित राहतील याची खात्री करून घ्यावी. मतदान केंद्राध्यक्षाने, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे मोहोरबंद करण्याच्या प्रक्रियेची देखरेख करणे. घोषणापत्रावर सही करणे, इत्यादीसाठी मतदान संपेपर्यंत मतदान केंद्रात उपस्थित रहावे याची मतदान प्रतिनिधींना माहिती द्यावी. आयोगाच्या स्थायी सूचनांनुसार, मतदान प्रतिनिधींना, मतदान केंद्रांच्या आतमध्ये मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, बिनतारी संदेश संच इत्यादी घेऊन जाण्यास कोणत्याही परिस्थितीमध्ये मुभा दिली जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत मतदान केलेल्या अथवा न केलेल्या मतदारांचा अनुक्रमांक दर्शविणारी मतदार पावती मतदान केंद्राबाहेर पाठविण्यास मतदान प्रतिनिधींना परवानगी दिली जाणार नाही.

## २.१४. मतदान केंद्रामध्ये मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था

(एक) **मतदान प्रतिनिधी हे मतदान केंद्राच्या आतमध्ये बसलेले असतील.** जेणेकरून त्यांना, जेव्हा मतदार मतदान केंद्रामध्ये प्रवेश करील तेव्हा त्याचा चेहरा दिसेल व आवश्यक तेव्हा मतदाराच्या खरेपणाबाबत आक्षेप घेता येऊ शकेल अशा रीतीने मतदान केंद्राची रचना करण्यात यावी. **मतदान कक्षामधील त्याची/तिची ये-जा व त्याने/तिने मतदान केल्यानंतर त्याचे/तिचे मतदान केंद्रामधून बाहेर पडणे याबरोबर मतदान केंद्राच्या आतील संपूर्ण हालचाली त्यांनादेखील पाहता आल्या पाहिजेत.** परंतु, मतदार, प्रत्यक्षपणे त्याचे/तिचे मतदान करीत असताना, मतदानाच्या गुप्ततेचा भंग होईल अशा रीतीने ते पाहण्याची संधी त्यांना ज्या ठिकाणाहून मिळेल त्या ठिकाणी त्यांना बसू देऊ नये. या प्रयोजनार्थ, जर तुम्ही मतदार यादीची चिन्हांकित प्रत ज्या मतदान अधिकाऱ्याच्या ताब्यात दिलेली असेल त्यांच्याच पाठीमागे मतदान प्रतिनिधींना बसण्यासाठी जागा दिली तर ते योग्य ठरेल. प्रवेशद्वाराच्या विशिष्ट स्थानामुळे अशी व्यवस्था करणे शक्य नसेल तेव्हा त्यांची बसण्याची व्यवस्था मतदान अधिकाऱ्यांसमोरच करावी.

(दोन) जे मतदान केंद्र खूपच लहान असेल व तिथे अपुरी जागा असेल किंवा ज्या ज्या मतदार संघामध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्त असेल तेथे मतदान प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची खात्री असेल अशा बाबतीत, जेथे मतदान प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था करता येऊ शकणार नाही अशा मतदान केंद्राच्या बाबतीत, उचित सल्ला मिळण्यासाठी निरीक्षकाबरोबर (निरीक्षकांबरोबर) विचारविनिमय करण्यात येईल व निरीक्षकाची (निरीक्षकांची) संमती घेण्यात येईल.

(तीन) आयोगाच्या अगदी अलीकडच्या निदेशांच्या अनुसार मतदान केंद्रामध्ये उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींसाठी बसण्याचा क्रम पुढील प्रवर्गाच्या अनुसार असेल :—

- मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षांचे उमेदवार.
- मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार.
- ज्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना मतदारसंघामध्ये त्यांच्या राखीव चिन्हांचा वापर करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे असे उमेदवार.
- नोंदणीकृत परंतु मान्यताप्राप्त नसलेल्या पक्षांचे उमेदवार आणि
- अपक्ष उमेदवार.

## २.१५. मतदान केंद्रात धुम्रपान करण्यास मनाई करणे.

मतदान केंद्रात कोणालाही धुम्रपान करण्याची मुभा दिली जाणार नाही. म्हणून, तुम्ही तुमच्या मतदान केंद्राच्या आत कोणीही धुम्रपान करीत नाही याची खातरजमा करा.

## २.१६. मतदान केंद्रावरील वृत्तपत्र प्रतिनिधींना व छायाचित्रकारांना व्हिडियोग्राफरांना द्यावयाच्या सुविधा

(एक) आयोगाने, निवडणूक प्रक्रियेतील गंभीर घटनांचे आणि तसेच अतिसंवेदनशील व संवेदनशील मतदान केंद्रांचे शक्य असेल तेथवर व्हिडिओ चित्रण करण्याच्या सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेचे पालन करून, आयोगाने आता असा निदेश दिला आहे की, निरीक्षकाच्या सल्ल्यानुसार मतदान केंद्राच्या आतील मतदानाच्या कार्यपद्धतीचे व्हिडिओ चित्रण केले जावे तथापि, व्हिडिओ चित्रण करताना, व्हिडिओ चित्रणामुळे मतदानाच्या गुप्ततेचा भंग होणार नाही याची खातरजमा करण्यासाठी योग्य ती काळजी घेण्यात यावी. म्हणजेच मतदाराच्या मतनोंदणीचे व्हिडिओचित्रण केले जाणार नाही याची खातरजमा करावी. तथापि, सार्वजनिक सुव्यवस्था व मतदानातील गुप्तता राखण्यासाठी मध्यस्थ व्यक्तींना किंवा इतर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तींना मतदान केंद्राच्या आतील छायाचित्रण/व्हिडिओचित्रण करण्यास मुभा दिली जाणार नाही.

(दोन) त्याचप्रमाणे, शांतता व सुव्यवस्था यांना बाध येऊ न देता, कोणत्याही छायाचित्रकाराने, मतदान केंद्राच्या बाहेर रांग लावून उभ्या असलेल्या मतदारांच्या गर्दीची छायाचित्रे घेण्यास कोणतीही हरकत नाही. तथापि, त्याला कोणत्याही परिस्थितीत मतदान केंद्राच्या आतील छायाचित्रे घेण्यास मुभा देऊ नये. त्याचवेळी, कोणत्याही परिस्थितीमध्ये, कोणालाही, मतदार मतदान यंत्राच्या मतदान युनिटावर त्याचे/तिचे मत नोंदवित असतानाचे छायाचित्र घेण्यास मुभा दिली जाणार नाही.

(तीन) जी कोणतीही व्यक्ती मतदार नसेल किंवा मतदान करवून घेण्याच्या कामी तुम्हाला सहाय्य करण्यास जिला फर्मावण्यात आलेले नसेल अशा व्यक्तीला मतदान केंद्रात प्रवेश करण्यास प्राधिकृत करण्याचा अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांपैकी कोणालाही देण्यात आलेला नाही. **राज्य शासनाच्या प्रसिद्धी अधिकाऱ्यांसह अशा कोणाही व्यक्तीला आयोगाच्या प्राधिकारपत्राशिवाय मतदान केंद्रात प्रवेश करण्याची मुभा देऊ नये.**

## २.१७. छायाचित्रण/ व्हिडियोग्राफी

सन्मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेवरून, मतदान केंद्राच्या आत डिजीटल छायाचित्रण/व्हिडिओग्राफीचा वापर सुरु करण्यात आलेला आहे. (दिवाणी अपिल क्र. ९२२८/२००३ जनक सिंह विरुद्ध रामदास राय व इतर या प्रकरणी दिनांक ११ जानेवारी २००५ रोजीचा न्यायनिर्णय.) तसेच आयोगाने आणखी असेही निदेश दिले आहेत की, निवडणुकीच्या संपूर्ण कालावधीतील सर्व गंभीर घटनांचे व्हिडिओचित्रण करण्यात यावे.

(एक) या मतदान प्रक्रियेतील मतदानाच्या गुप्ततेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. हे आयोगाने विनिर्देशपुर्वक निर्देश दिले असतील अशाच मतदान केंद्रावर छायाचित्रण करण्यात येईल.

(दोन) छायाचित्रण करणाऱ्या व्यक्तीला पुढील गोष्टींचे छायाचित्रण करता येईल. अशा मतदान केंद्रामधील, मतदार छायाचित्र ओळखपत्र/भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेले इतर छायाचित्र ओळखपत्र नसलेले मतदान करण्यासाठी आलेले सर्व मतदार, ज्यांनी नमुना १७ए भरलेला आहे. त्यानंतर तातडीने ते ज्या क्रमाने येतील त्याच क्रमाने छायाचित्रण व्हिडिओचित्रण करण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्षाने मतदान कक्षाच्या आतील भागाचे छायाचित्र/व्हिडिओचित्रण होणार नाही याची सुनिश्चिती करावी.

(तीन) छायाचित्रांकीत /व्हिडिओ करावयाच्या अन्य गंभीर घटना

- अभिरूप मतदान घेताना व मतदानास सुरूवात करण्यापूर्वी इव्हीएम व व्हीव्हीपॅट मोहोरबंद करताना
- मतदान कक्ष बसविताना (पार्श्वभूमीसह किमान ३ छायाचित्रे) मतदानास सुरुवात होण्यापूर्वी छायाचित्र घेतील
- मतदान प्रतिनिधींची उपस्थिती दर्शविणारे
- आक्षेपित/प्रदत्त मतदानाच्या बाबतीत मतदारांची/(ए.एस.डी.) स्थलांतरित व दुबार मतदारांच्या यादीनुसार सापडत नसलेल्या मतदारांची छायाचित्रे.
- मतदानाचा कालावधी समाप्त होताना मतदान केंद्राबाहेर उभे असलेले मतदार व रांगेतील शेवटचा मतदार
- क्षेत्रीय अधिकारी, निरीक्षक व अन्य निवडणूक पदाधिकारी यांनी दिलेल्या भेटी.

यांसारख्या महत्त्वाच्या प्रसंगांचे छायाचित्रण करता येईल.

● अभिरूप मतदान व मतदानास प्रारंभ यांसारख्या घटनांची नोंद करण्याबरोबर, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल/पोलीस कर्मचारी वर्गाची उपस्थिती, मतदान केंद्राच्या बोर्ड (फलकासमोर) उभे राहून सुरक्षा कर्मचारी वर्गाचे छायाचित्र (फोटो) काढून त्याची देखील नोंद घेण्यात येईल.

● मतदारांना धमकावण्याचा प्रयत्न, कोणताही असल्यास,

● मतदारांना प्रलोभन/लाच देण्याचा प्रयत्न, असल्यास

● मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या, आत प्रचार करणे.

● मतदान केंद्रावरील आश्वासित किमान सुविधा असल्याची सुनिश्चिती कारणे

● मतदारांना केंद्रावरील कोणत्याही स्वरुपाचा कोणताही विवाद.

● जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने/निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेली कोणतीही इतर प्रक्रिया किंवा घटना.

(चार) मतदान समाप्त होताना तो अशा घोषणापत्रावर सही करेल की, " मी मतदान केंद्र क्रमांक ______________ येथे दिनांक ______________ रोजी ज्या मतदारांनी मतदान केले अशा सर्व मतदारांची छायाचित्रे काढली असून या कॅमेरात असलेल्या छायाचित्रांची एकूण संख्या ______________ आहे ".

**२.१८. मतदान केंद्रावर आंतरजालावरून प्रक्षेपणाचा (वेबकास्टिंग) वापर**

(एक) निवडणुका घेण्यात पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्याकरिता, आयोगाने असे निदेश दिले आहेत की, मतदानाच्या दिवशी संनियंत्रणासाठी आंतरजालावरून प्रक्षेपणाचा (वेबकास्टिंगचा) परिणामकारकपणे वापर करावा.

**वेबकास्टींगची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.**

● भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नियंत्रण कक्षातील अवलोकन गट याद्वारे प्रत्यक्षात मतदान कार्यपद्धतींचे अवलोकन करणे.

● मतदान प्रक्रियेचे परिणामकारकपणे संनियंत्रण करणे आणि त्रास देणाऱ्यांना व खोडसाळपणा करणाऱ्यांना रोखणे मतदारांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे, मतदान प्रक्रियेत पारदर्शकात व निःपक्षता आणणे.

(दोन) मतदान केंद्रातील वेबकास्टिंग दरम्यान, कॅमेरा अशा रीतीने ठेवण्यात यावा की पुढील गोष्टी स्पष्टपणे चित्रित केल्या जातील :-

● रांगेतील मतदार

● मतदान अधिकाऱ्याद्वारे मतदारांची ओळख पटविण्याची प्रक्रिया.

● बोटावर पक्की शाई लावणे

● मतदाराची ओळख समाधानकारकपणे पटल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षाद्वारे नियंत्रण युनिट चालू करणे.

● मतदार मत देण्यासाठी मतदान युनिटजवळ गेल्यास कॅमेरामध्ये मतदान युनिटचा दर्शनी भाग दिसणार नाही त्यामुळे सर्व परिस्थितीत मतदानाची गोपनीयता राखली आहे.

(तीन) सर्व अति संवेदनशील मतदान केंद्रे व असुरक्षित क्षेत्रातील मतदान केंद्रे किंवा सहाय्यकारी मतदान केंद्रांसहित एकूण मतदान केंद्राच्या किमान ५० टक्के, यापैकी जे अधिक असेल तेथे, वेबकास्टिंग करण्यात येईल.

(चार) मतदान केंद्रावर ठळक अक्षरात " तुम्ही वेब कॅमेरा/सीसीटीव्ही निरीक्षणांतर्गत आहात" हा संदेश दर्शविण्यात यावा.

(पाच) तसेच, याची खात्री करून घ्यावी की वरील चौकटीतील कामासाठी वापरण्यात येणाऱ्या आंतरजालावरून होणाऱ्या प्रक्षेपणाच्या कोणत्याही प्रकारच्या जाहिराती दाखविण्यात येणार नाहीत.

**२.१९. आयोगाने नेमलेल्या निरीक्षकांना द्यावयाच्या सुविधा**

(एक) निवडणुकांच्या संनियंत्रणासाठी आयोग निरीक्षकांची नेमणूक करीत असते. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम २० ब अन्वये ते आयोगाकडून नियुक्त करण्यात आलेले सांविधिक प्राधिकारी आहेत.

(दोन) मतदानाच्या दिवशी निरीक्षक तुमच्या मतदान केंद्राला भेट देईल. मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी तुम्ही मतदानासाठी पूर्वतयारी करत असताना ते तुमच्या मतदान केंद्राला भेट देण्याबरोबर मतदारसंघामध्ये फेरी मारण्यास सुरुवात करण्याची व तेथे उपस्थित राहण्याचीही शक्यता आहे. ते तुमच्या मतदान केंद्राला भेट देतील तेव्हा तुम्ही त्यांना योग्य ते सौजन्य व आदरभाव दाखवणे अपेक्षित आहे आणि आयोगाला त्यांचा अहवाल पाठवण्याच्या प्रयोजनासाठी त्यांना आवश्यक असेल ती माहिती तुम्ही त्यांना सादर केली पाहिजे. तसेच, तुम्ही तुमच्याजवळ असलेल्या नेहमीच्या माहितीपेक्षा अतिरिक्त असलेली माहिती निरीक्षकाला द्यावी. तुम्ही, मतदान केंद्रातील अनुपस्थित, स्थलांतरित व दुबार मतदारांची यादी (ASD यादी) निरीक्षकाला/सूक्ष्म निरीक्षकाला उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. तुमच्या मतदान केंद्रात घेण्यात येत असलेल्या मतदानाचे ते केवळ निरीक्षण करतील, परंतु तुम्हाला कोणताही निदेश देणार नाहीत. याबाबत निरीक्षकांना आगाऊ माहिती व निदेश देण्यात आले आहेत. तथापि, मतदारांना अधिक सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने किंवा तुमच्या मतदान केंद्रावर मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे चालण्याच्या दृष्टीने त्यांनी तुम्हाला कोणतीही सूचना केली तर तुम्ही त्यांची सूचना विचारात घेतली पाहिजे. त्याचवेळी तुमच्या मतदान केंद्रावर तुम्हाला एखाद्या विशिष्ट समस्येला तोंड द्यावे लागत असेल किंवा कोणतीही अडचण भासत असेल त्याबाबतीत तुम्हाला ती बाब त्यांच्या निदर्शनास आणता येईल, जेणेकरून आवश्यक ती सुधारात्मक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने ती समस्या सोडविण्यासाठी किंवा अडचण दूर करण्यासाठी ते ती बाब निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून तुम्हाला मदत करू शकतील.

(तीन) आयोगाने, त्याच्या नावाने दिलेले बिल्ले निरीक्षक लावतील आणि आयोगाने दिलेले नियुक्तीपत्र व प्राधिकारपत्र देखील आपल्याजवळ बाळगतील. तुम्हाला, मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीबरोबर जी ‘ भेट नोंदवही ’ देण्यात येईल त्या ‘भेट नोंदवही’मध्ये सही करण्यासाठी निरीक्षकांना विनंती करावी.

**२.२०. सुक्ष्म निरीक्षक**

(एक) सूक्ष्म निरीक्षकाची केंद्रीय सशस्त्र पोलीस दला व्यतिरिक्त उपाययोजनांपैकी एक म्हणून नियुक्ती केली आहे आणि मतदानाच्या दिवशी अतिसंवेदनशील (संवेदनशील) मतदान केंद्रांसाठी नियुक्ती करता येऊ शकते. सूक्ष्म निरीक्षक थेट महानिरीक्षकाच्या नियंत्रण व पर्यवेक्षण अंतर्गत काम करतील. मतदारसंघाचा महानिरीक्षकाने नेमून दिलेल्या मतदान केंद्रातील सभोवताली फिरून मतदान प्रक्रियेतील विचलनाचा अहवाल देण्याची जबाबदारी व काम सूक्ष्म निरीक्षकाला दिलेले असते. सूक्ष्म निरीक्षकाने मतदान सुरु होण्यापूर्वी ९० मिनिटे अगोदर मतदान केंद्रावर पोचणे आणि दिवसभर त्या मतदान केंद्रावर उपस्थित राहणे अपेक्षित आहे. त्याने मतदानाच्या तयारीचे व मतदानाच्या दरम्यानचे अंदाज घेतला पाहिजे, त्याने नियमितपणे पूर्व-मुद्रित प्रपत्रावरील महत्त्वाच्या मुद्द्यांची नोंद ठेवावी, परंतु कोणत्याही परिस्थितीत, सूक्ष्म निरीक्षक मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी यांसारखी कृती करणार नाही किंवा त्यांना कोणतेही निदेश देणार नाही. त्याचे काम निवडणूक प्रक्रियेचे निरीक्षण करण्याचे आहे. त्याने ते, मुक्त व निःपक्ष आणि तेथे कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही अशा पद्धतीने करावे.

(दोन) मतदान केंद्राच्या ठिकाणी एकापेक्षा अधिक अतिसंवेदनशील मतदान केंद्र असल्यास, सर्व चिंताजनक मतदान केंद्रांच्या ठिकाणाकरिता सूक्ष्म निरीक्षक जबाबदार असेल. सूक्ष्म निरीक्षक त्याचा वेळ मतदान केंद्रामध्ये विभागून देईल आणि सर्व मतदान केंद्रांना थोड्या थोड्या वेळाने त्याच ठिकाणी भेट देईल. तो प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान प्रतिनिधींना याबाबत माहिती देईल की त्याच्या निदर्शनास काही आणायचे असल्यास त्याकरिता तो उपलब्ध आहे.

(तीन) मतदानाच्या दिवशी निरीक्षण प्रक्रियेत, सूक्ष्म निरीक्षकाने विशेष लक्ष द्यावे :–

- अभिरुप मतदान प्रक्रिया व अभिरुप मतदान प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करून मतदान केंद्राध्यक्ष अहवाल भाग-एक अभिरुप मतदान प्रमाणपत्र
- मतदान प्रतिनिधींची उपस्थिती आणि भारत निवडणूक आयोगाच्या संबंधित सुचनांचे पालन
- प्रवेश पत्र (पास) पद्धतीचे पालन व मतदान केंद्रात प्रवेश करणे

- भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शकतत्त्वांनुसार मतदारांची योग्य ती ओळख पटविणे.
- अनुपस्थित, स्थलांतरीत व मृत मतदार यांच्या बाबतीत अनुसरावयाची पद्धती.
- पक्की शाई लावणे
- मतदार नोंदवही १७-ए मध्ये मतदारांचा तपशील नोंदविणे
- मतदानाची गुप्तता राखणे
- प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापूर्वी आणि मतदान समाप्त झाल्यानंतर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मोहोरबंद करणे
- मतदान प्रतिनिधी नेमणे, त्याच्या तक्रारी, असल्यास, इत्यादी.

(चार) मतदानादरम्यान, जर सूक्ष्म निरीक्षकाला कोणत्याही कारणाने मतदान निष्फळ ठरणार आहे असे वाटले तर, तो तातडीने संदेशवहनाच्या कोणत्याही साधनाने जे उपलब्ध असेल, उदाहरणार्थ, दूरध्वनी/भ्रमणध्वनी किंवा बिनतारी संदेश किंवा अन्य कोणत्याही साधनाने ही बाब महानिरीक्षकाच्या ताबडतोब निदर्शनास आणून देईल. व्हिडिओ कॅमेरा/डिजिटल कॅमेरा लावला नसल्यास, मतदान केंद्राध्यक्ष किंव सूक्ष्म निरीक्षक भ्रमणध्वनीचा वापर करु शकतात (त्यात कॅमेरा असल्यास) आणि सुरक्षा व्यवस्थेचे छायाचित्र काढून त्याची प्रतिमा नियंत्रण कक्षाला पाठवू शकतात किंवा संबंधित केंद्रावर ईव्हीएम जमा करताना प्रतिमा हवाली करू शकतात.

(पाच) मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, सूक्ष्म-निरीक्षण संकलन केंद्रावर निरीक्षकाकडे अहवाल देईल आणि त्या दिवशी वैयक्तिकरित्या निरीक्षण केले असल्याचा अहवाल समाविष्ट असलेले पाकिट त्याच्या हवाली करील आणि त्या दिवशी तेथे महत्त्वाचे काय घडले याबाबतची त्याला/तिला माहिती सांगेल. निरीक्षकाकडे अहवाल गेल्यानंतर आणि कोणत्याही पुढील स्पष्टीकरणासाठी सूक्ष्म-निरीक्षकाला बोलावणे आवश्यक असेल तर, त्याने दिलेल्या वस्तुस्थितीची सुनिश्चिती करण्यासाठी त्याला बोलावता येईल. मतदार नोंदवही १७-ए च्या पडताळणी अहवालासहित हा अहवाल, पुन्हा मतदान घेण्याच्या निर्णयासाठी किंवा कोणत्याही अपचारी मतदान कर्मचारी वर्गाविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासाठी विचारार्थ घेण्यात येईल.

(सहा) सूक्ष्म निरीक्षकाला भ्रमणध्वनी (मोबाईल फोन) ध्वनिविरहित (सायलेंट मोड) ठेवून बाळगण्यास परवानगी असेल त्यामुळे कोणतीही गरज असल्यास तो/ती निरीक्षकाशी संपर्क साधू शकेल.

### २.२१. मतदान केंद्रामध्ये असताना बिल्ले इत्यादी लावणे

(एक) जणू काही निवडणूक लढविणाऱ्याचा प्रचार होण्याची शक्यता आहे असे गृहीत धरून, उमेदवारांची किंवा राजकीय नेत्यांची नावे आणि / किंवा त्यांची चिन्हे व चित्रे असलेले बिल्ले, चिन्हे लावलेल्या कोणत्याही व्यक्तीला मतदान केंद्रामध्ये किंवा त्या सभोवतालच्या १०० मीटर्सच्या परिसरात येण्यास मुभा देऊ नये.

(दोन) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामध्ये राजकीय पक्षांचे नाव, चिन्ह किंवा घोषवाक्य असलेल्या वापरण्यायोग्य टोप्या, शाल, इत्यादी बाळगता येणार नाहीत.

(तीन) तथापि, मतदान प्रतिनिधींना, त्यांची ताबडतोब ओळख पटावी म्हणून, ते ज्या उमेदवाराचे प्रतिनिधित्व करत असतील त्याचे नाव दर्शविणारा बिल्ला लावता येईल.

### २.२२. मतदान केंद्रातील सुरक्षा व्यवस्था

(एक) निवडणूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आयोग निवडणुकीच्या कालावधीत केंद्रीय पोलीस दले तैनात करतो. निवडणुकीच्या वेळी स्थानिक राज्य पोलीस (त्यांच्या सर्व रुपभेदासह) आणि केंद्रीय निमलष्करी दले भारतीय निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येतात आणि ती दले, सर्व प्रयोजनांसाठी आयोगाच्या अधीक्षण व नियंत्रणाखाली असतात. निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आयोग, या सर्व दलांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा घेते.

(दोन) आयोगाच्या निदेशानुसार ज्या ठिकाणी केंद्रीय निमलष्करी दलांच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असेल त्या मतदान केंद्राच्या बाहेर त्याची एका जागी स्थिर असणाऱ्या दलाप्रमाणे तैनात करण्यात येईल.

(तीन) पुढील विनिर्दिष्ट बाबींबर लक्ष ठेवील :–

● मतदानाच्या दरम्यान कोणत्याही वेळी मतदान केंद्राच्या आत कोणतीही अनधिकृत व्यक्ती उपस्थित राहणार नाही.

● जेव्हा मतदान कक्षाच्या आत कोणताही मतदार उपस्थित नसेल तेव्हा मतदान कर्मचारी किंवा मतदान प्रतिनिधी कोणतेही मत किंवा मते देणार नाही किंवा देण्याचा प्रयत्न करणार नाही.

● मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी हे कोणत्याही मतदाराच्या बरोबर मतदान कक्षात जाणार नाही.

● कोणताही मतदान प्रतिनिधी किंवा मतदान अधिकारी हा, कोणत्याही मतदाराला धमकी देणार नाही किंवा त्याला धमकी देण्याची कोणतीही सूचक कृती करणार नाही.

● मतदान केंद्राच्या आत कोणतेही शस्त्र आणले जाणार नाही.

● मतदान प्रक्रियेमध्ये कोणताही अडथळा येणार नाही.

(चार) मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर पदस्थापित केलेल्या केंद्रीय निमलष्करी दलाच्या जवानाला जरी वर नमूद केलेल्याप्रमाणे मतदान प्रक्रियेत भंग होत असल्याचे आढळून आले किंवा मतदान केंद्राच्या आतल्या बाजूस नेहमीपेक्षा निराळे असे काही घडत असल्याचे दिसून आले तर, तो मतदान प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप करणार नाही. परंतु, मतदान केंद्रावरील केंद्रीय निमलष्करी दलाच्या पथकाच्या प्रभारी अधिकाऱ्याला किंवा निरीक्षकाला ही बाब कळवील केंद्रीय निमलष्करी दलाच्या पथकाच्या प्रभारी अधिकारी तात्काळ, पुढील आवश्यक ती कारवाई करण्यासाठी लेखी स्वरुपात ही बाब निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या आणि निरीक्षकाच्याही निदर्शनास आणून देईल.

(पाच) एकापेक्षा अधिक मतदान केंद्रे आहेत अशा इमारतींमध्ये आणि जेथे केंद्रीय निमलष्करी दलाच्या कर्मचाऱ्यांची केवळ निम्मीच तुकडी तैनात केली असेल तर, मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर कामासाठी निवड केलेल्या केंद्रीय निमलष्करी दलाच्या जवानाला, एका मतदान केंद्रापासून दुसऱ्या मतदान केंद्रापर्यंत फिरत राहण्यास आणि त्या मतदान केंद्राच्या आत काय चालले आहे याकडे लक्ष देण्यास आणि जर त्याला कोणतीही नियमबाह्य गोष्टी घडत असल्याचे दिसून आले तर, त्याबाबतीत केंद्रीय निमलष्करी दलाच्या त्या भागाच्या प्रभारी अधिकाऱ्याला आणि निरीक्षकाला कळविण्याबाबत सांगण्यात येईल.

(सहा) निवडणूक निर्णय अधिकारी, निरीक्षक हे केंद्रीय निमलष्करी दलाच्या पथकाकडून जेथून प्रतिकूल अहवाल मिळाले आहेत अशा प्रकरणांबाबत पुढील सूचनांसाठी प्रकरणांचा अहवाल आयोगास देतील.

(सात) आणखी असेही स्पष्ट करण्यात आले आहे की, मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर नियुक्त केलेला केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाचा जवान मतदान केंद्रांमध्ये मतदान करण्यास येणाऱ्या मतदारांची ओळख पटविणार नाही. कारण अशी ओळख पटविणे हे मतदान कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे.

(आठ) आयोगाच्या सूचनांनुसार, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या जवानांना मतदान केंद्राच्या आत ठेवण्यात येणार नाही.

(नऊ) मतदान केंद्रामध्ये शांतताभंग/अडथळा असल्यास, मतदान केंद्राध्यक्ष, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करील आणि मुक्त व निःपक्ष मतदान प्रक्रियेवर परिणाम करणारी कोणतीही अनिष्ट घटना घडल्यास, उपस्थित केंद्रीय सशस्त्र पोलीस दल/ राज्य पोलीस यांची मदत घ्यावी. याबाबत, मतदान केंद्रावर नियुक्त केलेले मतदान केंद्राध्यक्ष व केंद्रीय सशस्त्र पोलीस दल/राज्य पोलीस दल एकमेंकांत योग्य समन्वय होणे आवश्यक असेल. मतदान केंद्राध्यक्ष व केंद्रीय सशस्त्र पोलीस दल/राज्य पोलीस यांनी मतदान प्रक्रियेदरम्यान एकमेकांशी परस्पर समन्वय साधण्यासाठी योग्य प्रकारे माहिती द्यावी. जिल्हा निवडणूक अधिकारी आणि पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक या तरतुदींबाबत केंद्रीय सशस्त्र पोलीस दल यांना माहिती देईल.

(दहा) मतदान पूर्ण झाल्यानंतर, मतदानाची नोंद झालेले इव्हीएम, व्हीव्हीपॅट व मतदान केंद्राध्यक्ष यांना, संकलन केंद्रापर्यंत केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाची तुकडी संरक्षण देईल, या संबंधातील तपशील, अगोदरच निरीक्षकाशी विचारविनिमय करून, जिल्हा निवडणूक अधिकारी व पोलीस अधीक्षक तयार करतील.

# प्रकरण - ०३

## इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांची जोडणी आणि सज्जता

### ३.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांची ओळख



नियंत्रण युनिट → व्हीव्हीपॅट → मतदान युनिट

**३.१.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र :** इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रामुख्याने नियंत्रण युनिट व मतदान युनिट या दोन युनिटचे बनलेले असते.

**(एक) मतदान युनिट (बीयू) :** मतदान युनिटमध्ये निवडणुकीचे तपशील, अनुक्रमांक आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे नावे व छायाचित्र तसेच त्यांना वाटप करण्यात आलेली निवडणूक चिन्हे यांचा समावेश असलेली मतपत्रिका प्रदर्शित करण्याची तरतूद आहे. प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर निळे बटण असते. हे निळे बटण दाबून (pressing) मतदार आपल्या/स्वतःच्या पसंतीच्या उमेदवाराला मत देऊ शकतो. या बटणासोबत प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर एक दिवा देखील आहे. मतदान केल्यावर हा लाल रंगाचा दिवा चमकू (glow) लागेल.

त्याचबरोबर बीप (beep) असा आवाज देखील ऐकू येईल. एक मतदान युनिट सोळा बटनाचे असते. नोटासह (वरीलपैकी कोणीही नाही) अधिकतर ३८४ उमेदवारांना सामावून घेण्यासाठी जास्तीत जास्त चोवीस मतदान युनिटची जोडणी (cascaded) केली जायू शकते. चारपेक्षा अधिक मतदान युनिट वापरायचे असल्यास ५व्या, ९व्या, १३व्या, १७व्या आणि २१व्या मतदान युनिटमध्ये पॉवर पॅक (power pack) टाकणे (inserted) आवश्यक आहे. प्रत्येक मतदान युनिटच्या मागील बाजूस कॅस्केडिंगसाठी (cascading) अतिरिक्त मतदान युनिटची जोडणी करण्यासाठी पॉवर पॅक व जोडणी कक्ष (connector compartment) समावेश करण्याची तरतूद आहे. मतदान युनिटचे ०१ ते २४ पर्यंतचे क्रमांक घट्ट बसविण्यासाठी (set) मतदान युनिटच्या वरच्या उजव्या बाजूला दोन थंबव्हील (Thumbwheels) आहेत.

दृष्टिहीन (अंध) व्यक्तींच्या सोयीसाठी मतदान युनिटच्या वरच्या कोपऱ्यात, प्रत्येक निळ्या बटणाच्या उजव्या बाजूला ब्रेल लिपीतील अंक (Braille numbers) दिलेले आहेत. मतदान युनिटसोबत जोडलेली ५ मीटर लांबीची केबल व्हीव्हीपॅट किंवा नियंत्रण युनिट किंवा इतर मतदान युनिटशी जोडण्यासाठी वापरली जाते.

**(दोन) नियंत्रण युनिट (सीयु) :** एक नियंत्रण युनिट नोटा (Nota) (वरीलपैकी कोणीही नाही) यासह जास्तीत जास्त ३८४ उमेदवारांसाठी देण्यात आलेल्या मतांची नोंद करू शकते. या प्रयोजनासाठी, एकत्र जोडलेले चोवीस मतदान युनिट एका नियंत्रण युनिटशी जोडले जातात. नियंत्रण युनिटच्या सर्वात वरच्या भागावर, तारीख, वेळ, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या, मतदान झालेल्या एकूण मतांची संख्या, प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते, निरनिराळ्या त्रुटीशी संबंधित संदेश इत्यादीसारख्या यंत्रात नोंद केलेली माहिती आणि आकडेवारी (डेटा) प्रदर्शित करण्यासाठी तरतूद आहे.

या भागाला नियंत्रण युनिटचा दर्शक विभाग (डिस्प्ले सेक्शन) (Display section) असे म्हणतात. डिस्प्ले सेक्शनच्या खालील बाजूस बॅटरी बसवण्यासाठी एक कक्ष (कंपार्टमेंट) आहे, जो यंत्राला सुरू करते. **या कक्षाच्या उजव्या बाजूला आणखी एक कक्ष आहे ज्यामध्ये त्या यंत्रामध्ये विशिष्ट निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या दर्शविण्यासाठीचे एक बटण आहे. या बटणाला 'कँड सेट' (cand. set) बटण म्हणतात, तर दोन कप्पे असलेल्या नियंत्रण युनिटच्या संपूर्ण विभागाला 'कॅन्डिडेट सेट सेक्शन' (candidate set section) असे म्हणतात.** कॅन्डिडेट सेट सेक्शनच्या खाली, नियंत्रण युनिटचा 'निकाल विभाग' (रिझल्ट सेक्शन) असतो. या विभागामध्ये (एक) डाव्या बाजूला मतदान बंद करण्याचे क्लोज (बंद) बटण, (दोन) मध्यभागी- 'निकाल' (रिझल्ट) आणि 'प्रिंट बटण' आहे. यातील निकाल बटण (रिझल्ट) निकाल निश्चित करण्यासाठी तर प्रिंट बटण तपशीलवार निकालाच्या छापील प्रती (प्रिंटआऊट) काढण्यासाठी आणि (तीन) मतदान यंत्रात नोंदवण्यात आलेली माहिती (data) आवश्यक नसेल तेव्हा ती पुसून/काढून टाकण्यासाठी उजव्या बाजूस 'क्लिअर' बटण आहे. नियंत्रण युनिटच्या तळ भागात दोन बटणे आहेत, त्यातील एक 'बॅलेट' तर दुसरे 'टोटल' असे दोन बटणे आहेत. बॅलेट बटण दाबल्यावर मतदान युनिट मत नोंदविण्यासाठी तयार होते. तर 'टोटल' असे लिहिलेले बटण दाबल्यावर त्या टप्प्यापर्यंत नोंदविण्यात आलेल्या मतांची एकूण संख्या (परंतु मतदार निहाय विभागणीशिवाय) निश्चित करता येऊ शकते. या विभागाला नियंत्रण युनिटाचा 'मतदान विभाग' (बॅलेट सेक्शन) असे म्हणतात.

**(तीन) यंत्राच्या दर्शनी पटलावर (displays) दिसणाऱ्या सुचनांचे अर्थ :** नियंत्रण युनिटच्या दर्शनी पटलावर दिसणाऱ्या विविध सुचनांचे प्रकार आणि त्यांचे अर्थ खाली दिल्याप्रमाणे आहेत :—

| नियंत्रण युनिट दर्शनी पटलावरील सूचना | दर्शनी पटलावरील सूचनांचा अर्थ |
|---|---|
| Power on LED not ok | नियंत्रण युनिटवरील एलईडी पॉवर ठीक नाही. |
| Buzzer not ok | नियंत्रण युनिटचे बझर (BUZZER) ठीक नाही. |
| Busy LED not ok | नियंत्रण युनिटची बिझी (Busy) एलईडी ठीक नाही. |
| DIGIT 02 not ok | नियंत्रण युनिटचा डिस्प्ले ठीक नाही. |
| CHANGE BATTERY | नियंत्रण युनिट थ्रेसोल्ड (threshold) स्वरूपात नाही. |
| BU 01 KEY 06 NOT OK | मतदान युनिट १ उमेदवाराची की (key) ६ ही ठीक नाही. |
| BU 01 READY LED NOT OK | मतदान युनिट १ची रेडी (Ready) एलईडी ठीक नाही. |
| BU 05 WITHOUT BATTERY | मतदान युनिट ०५ मध्ये बॅटरी नाही. जर ५व्या, ९व्या, १३व्या, १७व्या, २१ वे मतदान युनिट बॅटरीशिवाय असतील तर, मतदान युनिटच्या डिस्प्ले पॅनलवर वरील सूचना दिसेल. |
| BU05 CHANGE BATTERY | मतदान युनिट ०५ ची बॅटरी ठीक नाही. |
| SELF CHECK IN PROGRESS | नियंत्रण युनिटची स्वयं-तपासणीबाबतची स्थिती/दर्जा. तो स्व-निदान करण्यापूर्वी आणि स्व-निदान पूर्ण झाल्यानंतर दर्शनी पटलावर प्रदर्शित होईल. |
| DTE 16-07-18 TME 09-10-25 | चालू दिनांक DD-MM-YY आणि वेळ HH-MM-SS या स्वरूपात असेल. |
| SL NUM BLU ए ए 00001 | नियंत्रण युनिटच्या मागील बाजूवर नमूद केलेला नियंत्रण युनिटचा आतील अनुक्रमांक. |
| CANDIDATES 10 | यंत्र (machine) १० उमेदवारांसाठी तयार आहे. उमेदवार ०३ ते ३८४ पर्यंत कमी अधिक होऊ शकतात. (नोटा सह) |
| BATTERY HIGH 95 PERCENT | बॅटरीची 'हाय' (HIGH) अशी स्थिती बॅटरीच्या वापरावर अवलंबून आहे. |
| BATTERY MEDIUM 73 PERCENT | बॅटरीची स्थिती 'मध्यम' (MEDIUM) आहे. |

| नियंत्रण युनिट दर्शनी पटलावरील सूचना | दर्शनी पटलावरील सूचनांचा अर्थ |
|---|---|
| BATTERY LOW 45 PERCENT | बॅटरीची स्थिती 'कमी' (LOW) आहे. |
| BATTERY MARG 26 PERCENT | बॅटरीची स्थिती 'अत्यल्प (अगदीच कमी)' (MARGINAL) आहे. |
| CHANGE BATTERY | बॅटरीची स्थिती 'अत्यल्प (अगदीच कमी)' (MARGINAL) पेक्षा खाली आहे. (कधीही बंद होण्याच्या स्थितीत) |
| DISCOVERING UNITS | जोडलेले युनिट शोधून (discovering) काढत आहे. |
| DISCOVERED BU 01 | शोधून काढलेल्या युनिटांनंतर, जर एक मतदान युनिट जोडलेले असेल तर, दर्शनी पटलावर उक्त सूचना (display) दिसतील. |
| DISCOVERED BU 01 BU 02 | शोधून काढलेल्या युनिट नंतर, जर दोन मतदान युनिट जोडलेली असतील तर, दर्शनी पटलावर उक्त सूचना (display) दिसेल. |
| BU 01 GN1 TESTING | नियंत्रण युनिट मतदान युनिटशी अधिप्रमाणित (authenticating) केले आहे. |
| BU 01 GN1 OK | नियंत्रण युनिट मतदान युनिट अधिप्रमाणित केले आहे. |
| BU 01 GN1 NOT OK | बिघाड झालेले मतदान युनिट अधिप्रमाणित करणे (नियंत्रण युनिटची कोणतेही की (key) दाबल्यावर BLINK असा संदेश). |
| BU 01 NOT RESPONDING | जेव्हा मतदान युनिटचा वापर (communication) करताना मतदान युनिट वापरण्यासाठी दिलेली वेळ संपते, ते प्रतिसाद देत नाही किंवा मतदान युनिटची स्थिती (थम्बव्हिल स्वीच (thumbwheel switch)) योग्यरीत्या मांडणी केलेली नाही. |
| BU NOT CONNECTED | जेव्हा नियंत्रण युनिट 'क्लिअर' स्थितीत किंवा 'मतदान' (BALLOT) स्थितीत असते, तेव्हा नियंत्रण युनिटशी मतदान युनिटवर यंत्राकडून अपेक्षित कृती होत नाही, होताना दिसत नाही. |
| NO UNITS CONNECTED | कोणतेही युनिट नियंत्रण युनिटशी जोडलेले नाहीत. |
| "INCORRECT NUMBER OF BU" and "PRESS BALLOT KEY" | जेव्हा नियंत्रण युनिट क्लिअर स्थितीत किंवा मतदान (BALLOT) स्थितीमध्ये असते, जर जोडलेल्या मतदान युनिटची संख्या सेट केलेल्या उमेदवारांच्या संख्येशी जुळत नसते. |
| EVM IS READY | जेव्हा वापरकर्ता बॅलेट /BALLOT की दाबेल किंवा जेव्हा मतदान युनिट योग्य क्रमाने जोडलेली असतील तेव्हा. |
| PRESSED ERROR BU 01 | मतदान युनिटची की (KEY) अडकली आहे. |
| DISCONNECT BU 02 | जर मांडणी केलेल्या उमेदवारांची संख्या पाच असेल आणि जोडलेल्या मतदान युनिटची संख्या दोन असेल. |
| BU 02 NOT CONNECTED | जर मांडणी/रचनाबद्ध केलेल्या उमेदवारांची संख्या २६ (२ मतदान युनिटसाठी) असेल आणि जोडलेल्या मतदान युनिटची संख्या १ असेल. |
| INVALID | नियंत्रण युनिटवरील एक बटण क्रमशः दाबले गेले आहे. |
| FULL | ज्यासाठी यंत्राची रचना केली आहे, अशा जास्तीत जास्त मतांची (२०००) नोंद झालेली आहे. |

| नियंत्रण युनिट दर्शनी पटलावरील सूचना | दर्शनी पटलावरील सूचनांचा अर्थ |
|---|---|
| CLOCK ERROR | आर टी सी (RTC) वेळ व दिनांक ठीक नाही. |
| INOPERATIVE | नियंत्रण युनिट आणखी पुढे वापरले जाऊ शकत नाही. |
| ELECTION EXCEEDED | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये नोंदविण्यात आलेल्या पहिल्या मतापासून तारीख बदलली आहे (जेव्हा वेळ मध्यरात्री १२ वाजून गेल्यावर). |
| TOTAL POLLED VOTES 50 | मतदान झालेल्या मतांची एकूण संख्या ५० इतकी आहे. |
| CANDIDATE 05 VOTES 512 | ०५ क्रमांकाच्या उमेदवाराला ५१२ मते मिळाली आहेत. |
| COMPUTING RESULT | निकालाची गणना होत आहे. |
| PST 07-13-59 PET 18-30-52 | मतदान सुरू होण्याची वेळ आणि मतदान समाप्त होण्याची वेळ |
| POLL RESULT PDT 16-06-18 | मतदानाचा निकाल व दिनांक |
| DELETING POLLED VOTES | नियंत्रण युनिटमधून झालेले मतदान काढून टाकले जात आहे. |

(एक) जेव्हा नियंत्रण युनिटचे बटण (Switch) चालू (ON) स्थितीत वरच्या दिशेने ढकलला जातो, तेव्हा तो बीप असा आवाज देईल आणि नियंत्रण युनिटच्या डिस्प्ले विभागावरील चालू (ON) दिवा हिरवा रंगात चमकेल आणि पुढीलप्रमाणे डिस्प्ले पॅनलवर एकामागून एक अशा सूचना (display) दिसतील.

| |
|---|
| EVM IS ON ECI |
| SELF CHECK IN PROGRESS |
| DTE 16-06-18<br>TME 08-10-25 |
| SL NUM<br>BCUAA00001 |
| CANDIDATES<br>10 |
| BATTERY HIGH 95<br>PERCENT |
| DISCOVERING UNITS |
| DISCOVERED BU 01 |
| BU 01 GN 1<br>TESTING |
| BU 01 GN1 OK |
| EVM IS<br>REDAY |

(दोन) जेव्हा टोटल (TOTAL) बटण दाबले जाते तेव्हा तासाला/ठराविक काळाने एकूण मतदान झालेली मते मिळवली जातात, तसेच डिस्प्ले पॅनलवर पुढील सूचना (displays) दिसतील.

| |
|---|
| BATTERY HIGH 95 PERCENT |
| DTE 16-06-18<br>TME 11-00-25 |
| CANDIDATES 10 |
| TOTAL POLLED VOTES 115 |

(तीन) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बंद करण्यासाठी क्लोज (CLOSE) बटण दाबल्यावर, मतदान बंद होण्यासाठी निश्चित केलेल्या तासानंतर आणि शेवटच्या मतदाराने त्याचे/तिचे मत नोंदवल्यानंतर, दर्शनी पटलावर खालील सूचना (display) दिसतील :

| |
|---|
| CLOSING |
| DTE 16-06-18<br>TME 18-10-25 |
| SL NUM<br>BCUAA00001 |
| CANDIDATES 10 |
| TOTAL POLLED<br>VOTES 1150 |
| PULL CLOSED |

### ३.१.२ मतदार पडताळणीयोग्य कागदी परिनिरिक्षण निशाणी (व्हीव्हीपॅट)

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत जोडलेली ही एक स्वतंत्र मुद्रित प्रणाली आहे, ज्यात मतदारांना त्याच्या इच्छेनुसार टाकल्या गेलेल्या त्यांच्या मते तशीच , याबाबतची पडताळणी करता येते. जेव्हा मतदान युनिटवरील बटण दाबून मत दिले जाते तेव्हा व्हीव्हीपॅट प्रिंटरद्वारे उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव आणि चिन्ह असलेली कागदी चिठ्ठी छापली जाते आणि सुमारे ७ सेकंदांपर्यंत पारदर्शक खिडकीतून दिसून येते. त्यानंतर, ही मुद्रित कागदी चिठ्ठी आपोआप कापली जाते आणि व्हीव्हीपॅटच्या मोहोरबंद ड्रॉप बॉक्समध्ये पडते.

वाहक पेटीसह (carrying case) व्हीव्हीपॅट प्रणालीमध्ये खालील वस्तुंची यादी असते.

- जोडणी करावयाच्या केबलसह व्हीव्हीपॅट
- बॅटरी पॅक (निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे बॅटरी आधीच व्हीव्हीपॅट युनिटमधील बॅटरीच्या कक्षामध्ये (compartment) बसविली जाते.
- कागदी गुंडाळी (Paper Roll) (कागदी गुंडाळी आधीच व्हीव्हीपॅट युनिटमधील कागदी गुंडाळीच्या कक्षामध्ये (compartment) भरली/टाकली जाते आणि पत्ता खुण चिठ्ठीद्वारे ती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे मोहोरबंद केली जाते.)

**मतदान संपल्यानंतर निघण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षाने करावयाची कार्यवाही**

१. संबंधित वाहक पेटीतून (carrying case) मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅट इत्यादी काळजीपूर्वक काढणे.

२. **मतदान युनिट**

**तपासावे**

- मतदान युनिटच्या वरच्या आणि खालच्या कोपऱ्यांवरील पत्ता खूण चिठ्ठ्या योग्य आहेत आणि योग्यरीत्या मोहोरबंद केलेल्या आहेत.
- मतदान युनिटच्या पत्ता खूण चिठ्ठ्या ह्या तुम्हाला नेमून दिलेल्या मतदान केंद्राशी संबंधित असल्याची खात्री करणे.
- पत्ता खूणचिठ्ठीवर लिहिलेल्या युनिटच्या ओळखक्रमांकाची, युनिटच्या मागील बाजूवर असलेली धातूची पट्टी/बारकोड यांसोबत पडताळणी करा.

- मतदान युनिटची गुलाबी कागदी मोहोर शाबूत आहे.
- मतपत्रिका योग्य रीतीने बसवलेली आहे.
- नोटा या बटणापर्यंत उमेदवारांची बटने उघडी आहेत आणि उर्वरित बटणे झाकलेली आहेत.
- पहिल्या मतदान युनिटसाठी थंबव्हीलची स्थिती ०१ आहे (जर एकापेक्षा अधिक मतदान युनिट वापरण्यात येत असल्यास, थंबव्हीलची स्थिती दुसऱ्या मतदान युनिटसाठी ०२, तिसऱ्यासाठी ०३ आणि पुढे त्याप्रमाणे राहील.)

**३. नियंत्रण युनिट**

**तपासा :**

- तुम्हाला नेमून दिलेल्या मतदान केंद्राशी संबंधित नियंत्रण युनिट आहे याची खात्री करण्यासाठी नियंत्रण युनिटची पत्ता खूणचिठ्ठी.
- पत्ता खूणचिठ्ठीवर लिहिलेल्या युनिटच्या ओळखक्रमांक, युनिटच्या मागील बाजूवर असलेली धातूची पट्टी/बारकोड यांसोबत पडताळून पहा.
- पॉवर संच आणि उमेदवार संच विभाग पत्ता खूणचिठ्ठीने व्यवस्थित मोहोरबंद केलेले आहेत.
- नियंत्रण युनिटची गुलाबी कागदी मोहोर शाबूत आहे.
- बॅटरीची स्थिती आणि निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची संख्या तपासण्यासाठी नियंत्रण युनिट चालू करा (मतदान युनिट आणि/किंवा व्हीव्हीपॅट यांच्याशी जोडणी न करता).
- त्यानंतर, नियंत्रण युनिट बंद करा.

**४. व्हीव्हीपॅट**

**तपासा :**

- तुम्हाला नेमून दिलेल्या मतदान केंद्राचा व्हीव्हीपॅट दिलेला आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी व्हीव्हीपॅटची पत्ता खूणचिठ्ठी.
- पत्ता खूणचिठ्ठीवर लिहिलेल्या युनिटच्या ओळखक्रमांक, युनिटच्या मागील बाजूवरील धातूपट्टी/बारकोड यांसोबत पडताळून पहा.
- कागदी गुंडाळी विभाग व्यवस्थितपणे मोहोरबंद केला आहे.
- पॉवर संच (बॅटरी) बसवलेला आहे.
- व्हीव्हीपॅट नॉब आडव्या स्थितीत आहे (म्हणजे, वाहतुकीच्या स्थितीमध्ये).
- मतदान युनिट आणि/किंवा नियंत्रण युनिट यांसोबत व्हीव्हीपॅटची जोडणी करू नका.

## ३.२ अभिरूप मतदानापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांची मांडणी करणे आणि अभिरूप मतदान घेणे

### ३.२.१ अभिरूप मतदानापूर्वी मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅट यांची जोडणी करणे

(एक) मतदानास प्रारंभ करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या ९० मिनिटे आधी अभिरूप मतदान सुरू करण्यात यावे.

(दोन) अभिरूप मतदानाला सुरुवात करण्यापूर्वी, **मतदान कक्षात मतदान युनिट (युनिटे) व व्हीव्हीपॅट ठेवा आणि नियंत्रण युनिट, नियंत्रण युनिटचा प्रभारी यांच्या/मतदान केंद्राध्यक्षाच्या टेबलावर ठेवा.** व्हीव्हीपॅट पहिल्या मतदान युनिटच्या डाव्या बाजूस ठेवण्यात यावे.

(तीन)  मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट यांची जोडणी करण्यापूर्वी, नियंत्रण युनिटचे चालू/बंद स्वीच हे बंद स्थितीत आहे याची खात्री करून घ्या.

(चार)  व्हीव्हीपीएटची आंतरवर्धी केबल नियंत्रण युनिटच्या मागील विभागात, त्यासाठी दिलेल्या खोबणीत (सॉकेटमध्ये) बसवा.

(पाच)  पहिल्या मतदान युनिटची आंतरवर्धी केबल व्हीव्हीपॅटच्या मागील भागात त्यासाठी दिलेल्या खोबणीत (सॉकेटमध्ये) बसवा.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या जेव्हा १६ पेक्षा अधिक नोटा (नोटा सह) असेल तेथे एकापेक्षा अधिक मतदान युनिटे वापरली जातील. ही संख्या प्रत्यक्ष निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून असेल. मतदान केंद्रात वापरावयाची अशी सर्व मतदान युनिटे परस्परांना जोडली जातील आणि त्यापैकी फक्त एकमेव मतदान युनिट खालील आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे व्हीव्हीपॅट युनिटाला जोडण्यात येईल.




एक मतदान यंत्र दुसऱ्या मतदान यंत्राला जोडण्याकरिता मतदान युनिटाच्या मागील बाजूच्या कक्षातील भागात खोबणीची तरतूद करण्यात आलेली आहे. दुसऱ्या मतदान युनिटाच्या आंतरवर्धी केबलचा कनेक्टर पहिल्या मतदान यंत्राच्या वर नमूद केलेल्या खोबणीमध्ये बसविण्यात येईल. याप्रमाणेच तिसऱ्या मतदान युनिटाच्या आंतरवर्धी केबलचा कनेक्टर दुसऱ्या युनिटाला आणि त्याचप्रमाणे चौथ्या युनिटाचा तिसऱ्या युनिटाला जोडण्यात येईल आणि त्यापुढे, वापरण्यात येणाऱ्या मतदान युनिटांच्या संख्येवर तो अवलंबून असेल.

वर नमूद केल्याप्रमाणे केवळ पहिले मतदान युनिट व्हीव्हीपॅट युनिटाला जोडले जाईल. मतदान युनिटाची आंतरवर्धी केबल व्हीव्हीपॅट युनिटाला जोडण्याकरिता व्हीव्हीपॅट युनिटाच्या मागील बाजूच्या वरील भागावरील कक्षात खोबणीची सोय असेल.

(सहा)  मतदान युनिट/व्हीव्हीपॅटच्या आंतरवर्धी केबलचा मार्ग हा असा असेल की, त्यामुळे मतदान केंद्राच्या आत मतदारांच्या येण्या-जाण्याला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, आणि त्यावर त्यांचा पाय पडणार नाही किंवा अडखळणार नाही, परंतु संपूर्ण केबल दिसली पाहिजे. आणि ते कोणत्याही परिस्थितीत टेबलखाली किंवा कपड्यांखाली लपवलेल्या स्थितीत नसेल.

(सात)  मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट यांची जोडणी करणारे वायर्स, अर्धा इंच रूंदीच्या "पारदर्शक चिकटपट्टीने" टेबलच्या पायाला अशा रीतीने बांधा की त्या हवेत लोंबकळत राहणार नाहीत. त्यामुळे लोंबकळणाऱ्या वायर्सच्या वजनाचा प्रभार मतदान युनिटच्या व व्हीव्हीपॅटच्या जोडणी स्वीचवर पडणार नाही.

(आठ)  नियंत्रण युनिट चालू करण्यापूर्वी व्हीव्हीपॅटचा कागद गुंडाळी नॉब उभ्या स्थितीत (अनलॉक) करा.



**टीप :—**

• ज्याचे एक टोक मतदान युनिटाला जोडलेले असते. त्या आंतरवर्धी केबलचा कनेक्टर हा मल्टीपीन कनेक्टर आहे. हा कनेक्टर इतर मतदान युनिटच्या सॉकेटमध्ये किंवा व्हीव्हीपॅट युनिटच्या सॉकेटमध्ये फक्त एकाच मार्गाने जातो. जो " पीन " ची दिशा पाहून सहज शोधता येतो. कनेक्टरच्या पिन्स अत्यंत नाजूक असतात आणि म्हणून सॉकेटमध्ये कनेक्टर लावताना त्यास पिन्सला हानी पोहचेल किंवा त्या वाकतील अशाप्रकारे लावू नयेत. जेव्हा ही जोडणी योग्य प्रकारे करण्यात आली असेल तेव्हाच यंत्र योग्य प्रकारे कार्यरत होईल. योग्य पीन आणि रंग संकेताने कनेक्टरची जोडणी करा.

• कनेक्टरच्या वरच्या भागाच्या दोन्ही बाजूवरील स्प्रिंगसारखी क्लीप काढूनच व्हीव्हीपॅट युनिटापासून किंवा इतर मतदान युनिटांपासून आंतरवर्धी केबलचे कनेक्टरची जोडणी वेगळी करता येईल. ही स्प्रिंगसारखी क्लीप जेव्हा आतल्या बाजूस एकसमयावच्छेद करून दाब दिल्यानंतर अलग होईल आणि त्यानंतर कनेक्टर स्प्रिंगसारखी क्लीप तशीच दाबून ठेवल्यानंतर कनेक्टर बाहेर ओढा.

• मतदान युनिट व व्हीव्हीपॅट युनिटाची जोडणी करणे किंवा त्यांची जोडणी अलग करण्यासाठी थोड्या सरावाची आवश्यकता आहे. ज्यामुळे कोणतीही हानी टाळता येईल. ही गोष्ट तुम्ही पक्की लक्षात ठेवून तुम्ही स्वतःच मतदान युनिट व नियंत्रण युनिट व्हीव्हीपॅटला जोडावे.

**३.३ अभिरूप मतदान घेणे**

**३.३.१** मतदान सुरू होण्याच्या नियोजित वेळेच्या ९० मिनिटे आधी, अभिरूप मतदान सुरू करण्यात येईल. अभिरूप मतदानाच्या वेळी किमान दोन उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी उपस्थित असावेत.

**३.३.२** तथापि, जर किमान दोन उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी उपस्थित नसतील तर, मतदान केंद्राध्यक्ष, अभिरूप मतदान सुरू करण्यापूर्वी आणखी १५ मिनिटे वाट पाहील, आणि तरीही प्रतिनिधी आले नसतील तर, मतदान केंद्राध्यक्ष पुढाकार घेईल व अभिरूप मतदान सुरू करील. आणखी असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, १५ मिनिटे वाट बघितल्यानंतर, केवळ एकच मतदान प्रतिनिधी उपस्थित असेल अशीही संभाव्यता असेल त्यावेळी, अशा परिस्थितीतदेखील मतदान केंद्राध्यक्षाने पुढाकार घेऊन अभिरूप मतदान सुरू करावे. अशा प्रकरणी, ही बाब, **मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल-भाग एक (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) [जोडपत्र-५] यामध्ये विशेषकरून नमूद करावी.**

**३.३.३ नियंत्रण युनिटचे स्वीच चालू करण्यापूर्वी कागद गुंडाळी व्हीव्हीपॅटचा कागद गुंडाळी नॉब (उभ्या स्थितीत) अनलॉक आहे, याची खात्री करा.**

**३.३.४ अभिरूप मतदान सुरू करण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट ' निःशेष ' असल्याचे प्रात्यक्षिक :** अभिरूप मतदान सुरू होण्यापूर्वी, तुम्ही इव्हीएम व व्हीव्हीपॅट हे चांगल्या रीतीने काम करीत आहे आणि त्यामध्ये अगोदरपासून कोणतेही मत नोंदवलेले नाही याबाबत तुम्ही स्वतःची व तेथे उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

(एक) अशी खात्री करून घेण्यासाठी, सर्वप्रथम क्लिअर बटण दाबून सगळ्या संख्या " शून्य " आहेत, हे सर्व उपस्थित मतदान प्रतिनिधींना दाखवा. नियंत्रण युनिटच्या निकाल विभागातील कक्षात हे ' क्लिअर बटण ' आहे. हा कक्ष आतील दरवाजा आणि बाहेरील आच्छादन यांनी झाकलेला आहे. आतील दरवाजाने ' क्लिअर बटण ', ' निकाल ' बटण व ' मुद्रण ' बटण आणि आतील दरवाजाच्या वर बाहेरील आच्छादन देण्यात आले आहे आणि क्लोज बटणाचा अंतर्भाव असलेला कक्षसुद्धा झाकण्यात आला आहे. " क्लिअर " बटणापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वप्रथम डाव्या बाजूला देण्यात आलेली लॅच आतल्या बाजूला किंचित दाबून बाहेरील आच्छादन उघडा. त्यानंतर ' निकाल ' व ' मुद्रण ' बटण ह्या बटणांच्या वरील दोन छिद्रांमधून अंगठा व बोट घालून आत असलेली लॅचेस हळूहळू आतल्या बाजूला दाबावी. कोणत्याही परिस्थितीत हे आतील दार वर वर्णन केल्याप्रमाणे लॅचेस हळू दाबल्याशिवाय जोर देऊन उघडण्याचा प्रयत्न करू नये. अन्यथा यंत्राचा महत्त्वपूर्ण भाग निकामी होईल.

(दोन) जेव्हा तुम्ही " क्लिअर " बटण दाबाल तेव्हा नियंत्रण युनिटावरील " डिस्प्ले पॅनल " दर्शक भागावर पुढील माहिती अनुक्रमाने दिसेल :—

| |
|---|
| नोंदविलेली मते<br>काढून टाकणे |

| |
|---|
| उमेदवार<br>१० |

| |
|---|
| एकूण नोंदविलेली<br>मते १० |

| |
|---|
| उमेदवार-०१<br>मते ० |

| |
|---|
| उमेदवार-०२<br>मते ० |

- - - - - - -

- - - - - - -

| |
|---|
| उमेदवार-१०<br>मते ० |

| |
|---|
| समाप्त |

**टीप :—**

(क) जर " क्लिअर " बटण दाबल्यावर (डिस्प्ले पॅनलवर) दर्शक भागावर अवैध (Invalid) दिसले म्हणजेच यंत्रातील माहिती निःशेष करण्यासाठी आवश्यक असलेल्या काही कृती केलेल्या नाहीत. यंत्र " क्लिअर " करण्यासाठी मतदान युनिट व्हीव्हीपॅट आणि नियंत्रण युनिट परस्परांना योग्यप्रकारे जोडले आहेत याची खात्री करून घ्या. " क्लोज " बटण दाबा आणि त्यानंतर " निकाल " बटण दाबा. आता " क्लिअर " बटण दाबा. वर दर्शविल्याप्रमाणे दर्शक विभाग (डिस्प्ले पॅनल) वरीलप्रमाणे माहिती प्रदर्शित करण्यास सुरुवात करेल.

(ख) दर्शक भागावर (डिस्प्ले पॅनलवर) प्रदर्शित झालेल्या वरील माहितीवरून, या यंत्रात अगोदरच कोणतीही मते नोंदवलेली नाहीत याबाबत मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींची खात्री होईल.

(ग) मतदान प्रतिनिधींना व्हीव्हीपॅट युनिटचा ड्रॉप बॉक्स रिकामा असल्याची पडताळणी करण्याची परवानगी देखील देण्यात येईल.

### ३.३.५ अभिरूप मतदान घेण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती :

(एक) मतदान युनिट व व्हीव्हीपॅटद्वारे मुद्रित होणाऱ्या मतदान चिठ्ठ्यांचे कार्य पाहण्यासाठी एक मतदान अधिकाऱ्याने, मतदान प्रतिनिधीसह मतदान कक्षात उपस्थित राहावे व मतदान अधिकारी, मतदान केलेल्या मतांची नोंद ठेवील.

(दोन) अभिरूप मतदान, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारासाठी यादृच्छिक मतदान करणाऱ्या मतदान प्रतिनिधींसह करावे. अभिरूप मतदानामध्ये एकूण किमान ५० मतांचे मतदान घेण्यात यावे. कोणत्याही उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी उपस्थित नसेल तर, अशा उमेदवारांसाठी एखादा मतदान अधिकारी किंवा इतर मतदान प्रतिनिधी मते नोंदवू शकतात. मतदान कक्षात उपस्थित असलेल्या मतदान अधिकाऱ्याने खात्री करावी की, नोटासह निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारासाठी मते नोंदवलेली आहेत. अभिरूप मतदानानंतर, मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधीच्या उपस्थितीत हाताने केलेल्या नोंदी आणि व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्यांची गणना करून, नियंत्रण युनिटमधील निकालाची खात्री करील आणि प्रत्येक उमेदवाराचा निकाल जुळत असल्याची पुष्टी करील.

**(तीन) अभिरूप मतदान करण्यासाठी पुढील कृती करा :—**

- नियंत्रण युनिटाच्या ' बॅलॉट ' विभागावरील ' बॅलॉट ' बटण दाबा. ' बॅलॉट ' बटण दाबल्यावर, दर्शनी भागात ' बिझी ' दिवा लाल रंगात पेटेल. त्याचबरोबर मतदान युनिटावरील ' रेडी ' दिवा हिरव्या रंगात पेटेल.

- कोणत्याही मतदान प्रतिनिधीला त्याच्या आवडीनुसार मतदान युनिटवरील **उमेदवाराच्या नावासमोरील निळे बटण** दाबण्यास सांगा. प्रत्येक निळे बटण (Unmasked) किमान एकदा तरी दाबले आहे की, ज्यामुळे प्रत्येक अनमास्कड बटणाची चाचणी केली आहे आणि हे यंत्र योग्यरितीने कार्य करीत आहे याची **खात्री करून घ्या.**

- अशारीतीने उमेदवारासाठीचे बटण दाबल्यावर, मतदान युनिटावरील ' रेडी ' (Ready) हा दिवा विझेल व बटणाजवळच्या उमेदवाराचा लाल दिवा पेटेल. व्हीव्हीपॅटमध्ये मतदान केलेल्या उमेदवाराचे चिन्ह (निशाणी), नाव व अनुक्रमांकासहित एक लहान कागदी स्लिप मुद्रित होईल जी व्हीव्हीपॅट खिडकीमध्ये सात सेकंदासाठी दृश्य स्वरूपात असेल. त्यानंतर, कागदी स्लिप आपोआप कट होईल आणि व्हीव्हीपॅटच्या ड्रॉप बॉक्स (चिठ्ठी टाकण्याच्या पेटीत) मध्ये पडेल. त्यावेळी नियंत्रण युनिटातील ' बीप ' असा आवाज ऐकू येईल. काही क्षणानंतर मतदान युनिटवरील उमेदवाराचा लाल दिवा नियंत्रण युनिटवरच्या ' बिझी ' (Busy) हा लाल दिवा आणि ' बीप ' हा आवाज बंद होईल. यावरून असे दिसून येईल की, ज्याचे बटण दाबले त्या उमेदवारांचे मत नियंत्रण युनिटामध्ये नोंदवले गेले आहे आणि आता यंत्र पुढील मत स्वीकारण्यास तयार आहे.

- उर्वरित उमेदवारांपैकी प्रत्येक उमेदवारासाठी एक किंवा अधिक मते नोंदवण्यासाठी वरील परिच्छेदामध्ये स्पष्टीकरण दिल्याप्रमाणे तीच कृती पुन्हा करा, प्रत्येक उमेदवाराच्या बाबतीत अशा रीतीने नोंदवलेल्या मतांचा हिशेब काळजीपूर्वक ठेवा.

- अशाप्रकारे मतांची नोंदणी होत असताना यंत्रामध्ये नोंदवलेल्या एकूण मतांचा, त्यावेळेपर्यंत झालेल्या मतदानातील मतांच्या संख्येशी मेळ बसतो किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी नियंत्रण युनिटाच्या मतदान विभागातील ' एकूण ' (Total) बटण दाबा.

**टीप :** कोणत्याही उमेदवारासाठी मताची नोंद झाल्यानंतर व दर्शनी भागावरील (डिस्प्ले सेक्शन) बिझी (Busy) दिवा विझल्यानंतरच एकूण (Total) बटण दाबा.

- अभिरूप मतदानाच्या अखेरीस निकाल (Result) विभागातील ' बंद ' (Close) बटण दाबा.

**टीप :** जर पुरेसा वेळ असेल तर आणखी अभिरूप मतदानाच्या वेळी आणखी मते नोंदविण्यासाठी परवानगी देण्यास हरकत नाही. प्रत्येक उमेदवाराला समान संख्येत मतदान करणेही आवश्यक नाही. परंतु, प्रत्येक अनमास्कड (Unmasked) बटनासाठी एक मत यासह किमान ५० मते देण्यात आली पाहिजेत.

- आता निकाल विभागातील ' निकाल ' हे बटण दाबा. ते बटण दाबताच दर्शक पॅनेलवर (डिस्प्ले पॅनेलवर) निकाल दिसणे सुरू होईल.

- अभिरूप मतदानानंतर, मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये नियंत्रण युनिटमधील निकालाची खात्री करा आणि त्याचा हाताने केलेल्या नोंदीशी हिशोब जुळवा. व्हीव्हीपॅटच्या ड्रॉप बॉक्समधून अभिरूप मतदानाच्या सर्व चिठ्ठ्या बाहेर काढा आणि त्या नियंत्रण युनिटमधील निकालासोबत जुळवा आणि त्या निकालाचा प्रत्येक उमेदवाराला मतदान केलेल्या मतांशी हिशोब जुळतो आहे, याची खात्री करा.

व्हीव्हीपॅटच्या ड्रॉप बॉक्समधून काढलेल्या अभिरूप मतदान चिठ्ठ्यांचा स्वयं-चाचणी अहवालाच्या चिठ्ठ्यांमध्ये देखील समावश होईल, त्या सहज ओळखण्यायोग्य आहेत, त्या चाचणी अहवालातील चिठ्ठ्या असल्याने, त्यांना कोणत्याही उमेदवाराचे नाव किंवा चिन्ह असणार नाही. अभिलेखाचा भाग म्हणून, ह्या स्वयं-चाचणी अहवाल चिठ्ठ्या व्हीव्हीपॅटच्या अभिरूप मतदान चिठ्ठ्यांसोबत परिरक्षित करण्यात याव्यात, परंतु त्यांची मोजणी करण्यात येऊ नये.

- त्यानंतर, अभिरूप मतदानाच्या वेळी नोंदवलेल्या मतांचा हिशोब नष्ट करण्यासाठी नियंत्रण युनिटचे क्लिअर बटण दाबणे. क्लिअर बटण दाबल्यावर, दर्शनी पटलावर सर्व संख्या शून्य दर्शवील. तसेच व्हीव्हीपॅट मधील कागदी चिठ्ठ्या ड्रॉप बॉक्समधून काढून टाकाव्यात आणि ड्रॉप बॉक्स पत्ता टॅगने मोहोरबंद करावा.

- **मतदान केंद्राध्यक्ष प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी न विसरता, नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाची सर्व माहिती पुसून टाकली आहे आणि व्हीव्हीपॅटच्या ड्रॉप बॉक्समधून अभिरूप मतदान चिठ्ठ्या काढून टाकलेल्या आहेत, अशी खात्री करील. ही अत्यंत महत्त्वाची पायरी आहे.**

- **मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-एक (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) तयार करा. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-एक (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) (जोडपत्र-५)** यावर मतदान प्रतिनिधींचे व उमेदवारांचे (आणि त्यांच्या संलग्न पक्षाचे), ज्यांचे प्रतिनिधित्व करतात त्यांचे नावे नमूद करील आणि अभिरूप मतदान पूर्ण झाल्यावर त्याच्या प्रमाणपत्रावर त्यांच्या सह्या देखील घेईल. इतर मतदान अधिकारी अभिरूप मतदान प्रक्रियेचे साक्षीदार असतील आणि ते, मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-एक (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) यामध्ये, प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी, अभिरूप मतदानाची मते नियंत्रण युनिटमधून खोडलेली आहेत आणि व्हीव्हीपॅटमधून अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपॅट चिठ्ठ्या काढल्या आहेत, असे देखील प्रमाणित करतील.

- **मतदान सुरू झाल्याचा आणि मतदान समाप्त झाल्याचा दिनांक व वेळेची नोंद घेणे :** मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रातील अभिरूप मतदानाच्या समाप्तीच्या वेळी, न चुकता, नियंत्रण युनिटच्या दर्शक पट्टीवर दिसणारा दिनांक व वेळ तपासून पाहील आणि त्याची आणि तसेच, त्यावेळी असलेला प्रत्यक्ष दिनांक व वेळ, तसेच त्या दोन्हीमध्ये कोणतीही विसंगती असल्यास त्याची देखील, मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल भाग-एक (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) (जोडपत्र-५) मध्ये आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीमध्ये देखील **(जोडपत्र-७)** नोंद घेईल.

**(चार) अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपॅट चिठ्ठ्या ठेवण्याची कार्यपद्धती**

- अभिरूप मतदान व्हीव्हीपॅट चिठ्ठ्या (स्लिपावर) त्यांच्या मागील बाजूवर “अभिरूप मतदान चिठ्ठ्या” अशी अक्षरे असलेल्या रबरी शिक्क्याने ठसा उमटवून मुद्रांकित कराव्यात. त्यानंतर अशा अभिरूप मतदान व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्या जाड काळ्या पेपर पासून बनवलेल्या लिफाफ्यात ठेवण्यात येतील, आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या मोहोरेने मोहोरबंद केल्या जातील.

व्हीव्हीपॅटच्या मुद्रित कागदी चिठ्ठ्या मोहोरबंद करणे आणि त्यांची साठवणूक करणे



- मतदान केंद्राध्यक्षाने व मतदान प्रतिनिधींनी लिफाफ्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या केल्या पाहिजेत. लिफाफ्यावर मतदान केंद्राचे नाव व क्रमांक, विधानसभा मतदार संघाचे नाव व क्रमांक, मतदानाचा दिनांक आणि “अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्या” हा मजकूर लिहिलेला पाहिजे.

**टीप :** प्रत्यक्ष मतदाना दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-व्हीव्हीपॅट संचांच्या पुनर्स्थापनेनंतर केलेल्या अभिरूप मतदानाच्या बाबतीत, “ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-व्हीव्हीपॅटचा संपूर्ण संच बदलून नवीन संच स्थापित केल्याच्या प्रसंगी अभिरूप मतदान घेतल्यानंतर त्या संबंधातील व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांचा आकडा ” पाकिटावर लिहिण्यात येईल.

- मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधींनी गुलाबी कागदी मोहोरेवर आपल्या स्वाक्षऱ्या कराव्यात आणि निवडणुकीशी संबंधित इतर कागदपत्रे काळ्या लिफाफ्यात ठेवावीत.

**३.४ अभिरूप मतदान पूर्ण झाल्यानंतर आणि प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅट (मतदान पोचपावती यंत्र) मोहोरबंद करणे :**

नियंत्रण युनिटचा निकाल विभाग बंद करण्यासाठी अभिरूप मतदानानंतर आणि अभिरूप मतदान माहितीसाठा नष्ट (निरंक) केल्यानंतर नियंत्रण युनिट बंद करावे.

३.४.१ हिरव्या कागदी मोहोरेने, विशेष खूणचिठ्ठीने आणि निर्देश खूणचिठ्ठीने नियंत्रण युनिटचा निकाल विभाग मोहोरबंद करणे :

**(अ) हिरवी कागदी मोहोर**

नवीन हिरवी कागदी मोहोर आता दोन्ही टोकांच्या पांढऱ्या बाजूवर स्व-चिकटपट्टीसह पुरविली जाते आणि "A" व "B" असा चिन्हांकित केली जाते. नवीन हिरवी कागदी मोहोर स्व-चिकटक्षम असल्यामुळे, नियंत्रण युनिट मोहोरबंद करण्यासाठी बाह्य कागदीपट्टी मोहोर वापरण्याची आवश्यकता नाही.




- नियंत्रण युनिटाच्या निकाल विभागाच्या आतील कप्प्याच्या दरवाज्याच्या आतील बाजूवर कागदी मोहोर लावण्यासाठी एक चौकोनी साचा असून यासाठीच्या साच्यामध्ये हिरवी कागदी मोहोर लावण्यापूर्वी, कागदी मोहोरेच्या अनुक्रमांकाच्या अगदी खाली तुमची स्वाक्षरी करावी. तसेच, उपस्थित असणाऱ्या व स्वाक्षरी करण्यास इच्छुक असणाऱ्या अशा उमेदवारांच्या किंवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींच्या सुद्धा स्वाक्षऱ्या घेण्यात याव्यात. केंद्राध्यक्षाने, मतदान प्रतिनिधींनी कागदी मोहोरेवर केलेल्या स्वाक्षऱ्या, त्यांच्या नियुक्तीपत्रावरील स्वाक्षऱ्यांशी जुळत असल्याची पडताळणी करावी.







- निकाल विभागाच्या द्वारपट्टीच्या आतील भागावर लावण्यासाठी असलेल्या चौकोनी साच्यामध्ये हिरवी कागदी मोहोर अशा प्रकारे बसवा की, जेणेकरून, मोहोरेच्या पांढऱ्या बाजूवरील हिरव्या रंगाचे चिन्ह निकाल बटणाच्या वरती येईल आणि लाल रंगाचे चिन्ह प्रिंट बटणाच्या वरती येईल अशा पद्धतीने बसवावे. त्यानंतर, ती द्वारपट्टी अशा पद्धतीने बंद करा की, कागदी मोहोरेची दोन्ही टोके ही आतील कप्प्याच्या बाहेरील बाजुला येतील.

- हिरवी कागदी मोहोर आत घातल्यानंतर, निकाल बटनावरील आतील द्वारपट्टी बंद करण्यात यावी. आतील द्वारपट्टी बंद केल्यानंतर तिच्या चौकोनी छिद्रांतून हिरवा व लाल हे दोन्ही रंग दिसायला हवेत.

- मग, निकाल विभागाची आतील द्वारपट्टी विशेष खूणचिठ्ठीने मोहोरबंद करण्यात यावी.

**(ब) विशेष खूणचिठ्ठी :** जाड कागदाची बनवलेली विशेष खूणचिठ्ठी ही, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटाच्या निकाल विभागाचा आतला कप्पा मोहोरबंद करण्यासाठी वापरण्यात येते.



Front Side


Back Side

- विशेष खूणचिठ्ठी मोहोरबंद करण्याच्या प्रयोजनासाठी तिच्या वरच्या उजव्या टोकास धातूचे गोलाकार छिद्र असून त्यातून दोऱ्याची सुलभपणे काढ-घाल करता येते. निकाल विभागाच्या कप्प्यामध्ये एकदा खूणचिठ्ठी बसविली की मग, “CLOSE” बटन दिसण्यासाठी आणि वापरण्यासाठी विशेष खूणचिठ्ठीच्या मध्यभागी मोठे छिद्र असेल.

- विशेष खूणचिठ्ठी मोहोरबंद करण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यापूर्वी तिच्यावरील नियंत्रण युनिटच्या अनुक्रमांकाची अनिवार्यपणे नोंद घेण्यात यावी.

- विशेष खूणचिठ्ठी **पुढील** बाजूवर **नियंत्रण युनिटाचा** अनुक्रमांक नोंदवून घेतल्यानंतर तिच्या **मागील** बाजूवर अनिवार्यपणे स्वाक्षरी करावी. तुम्ही मतदान केंद्रामध्ये उपस्थित असणाऱ्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना/मतदान प्रतिनिधींना, त्यांना तसे वाटल्यास, विशेष खूणचिठ्ठीच्या मागील बाजूवर स्वाक्षरी करण्याचा सल्ला अनिवार्यपणे द्यावा. तुम्ही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना/मतदान प्रतिनिधींना विशेष खूणचिठ्ठीवरील पूर्वमुद्रीत अनुक्रमांक, वाचून दाखवावेत आणि त्यांच्या पुढील संदर्भासाठी नोंदवून घेणे या दोन्ही बाबी निश्चितपणे कराव्यात.

- निकाल विभागाचे आतली द्वारपट्टी विशेष खूणचिठ्ठीने मोहोरबंद करण्यात यावी. हे काम व्यवस्थितपणे होण्यासाठी अधिक चांगल्या दर्जाचे दोरे (निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पुरविलेले) विशेष खूणचिठ्ठीला असलेल्या धातूच्या छिद्रातून आणि आतील द्वारपट्टीच्या छिद्रातून ओवून घेणे अनिवार्य आहे.

- कोणत्याही परिस्थितीत, खराब झालेली किंवा फाटलेली विशेष खूणचिठ्ठी वापरण्यात येऊ नये. अशा वेळी दुसरी विशेष खूणचिठ्ठी वापरावी. अतिरिक्त “हिरव्या कागदी मोहोरांप्रमाणेच” २ किंवा ३ अतिरिक्त विशेष खूणचिठ्ठ्या पुरविलेल्या असतात.

- उपरोक्त प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, तुम्ही दोऱ्याची गाठ अनिवार्यपणे बांधावी, आणि त्यानंतर, मोहोरबंद डिंक वापरून विशेष खूणचिठ्ठीवर दोरा चिकटवून टाकावा. त्यानंतर, मोहोरबंद निघणार नाही याची काळजी घ्यावी. “CLOSE” बटनाच्या कप्प्यामध्ये विशेष खूणचिठ्ठी अशा पद्धतीने बसवावी की, विशेष खूणचिठ्ठीच्या मध्यभागातील छिद्राद्वारे ते कार्य करील.

- विशेष खूणचिठ्ठी चिकटवल्यानंतर, निकाल विभागाची बाहेरील द्वारपट्टी बंद करा ज्यामुळे, बंद केलेल्या द्वारपट्टीच्या दोन्ही बाजूंनी हिरव्या कागदी मोहोरेची ढिल्ली टोके बाहेर आली असल्याची खात्री होईल.

- नवीन हिरव्या कागदी मोहोरेची “A” बाजूची चिकटपट्टी काढून टाकण्यात येईल आणि निकाल विभागाच्या बाह्य द्वारपट्टीवर चिकटविण्यात येईल.

- नवीन हिरव्या कागदी मोहोरेची “B” भागाची चिकटपट्टी (वॅक्स पेपर) काढून टाकण्यात येईल आणि “B” भाग नवीन हिरव्या कागदी मोहोरेच्या “A” बाजूच्या खालोखाल वरच्या बाजुला अशा पद्धतीने चिकटवावा की, जेणेकरून मोहोरेचा अनुक्रमांक वर दिसेल.





**(क) दोऱ्याच्या सहाय्याने निर्देश खूणचिठ्ठी वापरून व्हीव्हीपॅटचे ड्रॉप बॉक्स मोहोरबंद करणे**

व्हीव्हीपॅट युनिटाचा खालचा भाग, म्हणजेच ड्रॉप बॉक्स, जो प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी दोऱ्याच्या सहाय्याने निर्देश खूणचिठ्ठी वापरून मोहोरबंद केला आहे. ड्रॉप बॉक्स मोहोरबंद करण्यापूर्वी, अभिरूप मतदानाच्या सर्व चिठ्ठ्या काढून टाकल्याची खात्री करावी.



**३.४.२. प्रत्यक्ष मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट तयार ठेवणे :** आता, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट संयुक्तपणे सर्वोतोपरी प्रत्यक्ष मतदानासाठी वापरण्यात येईल.

**३.४.३. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बदली केल्यानंतर अभिरूप मतदान घेणे :**

- अभिरूप मतदानादरम्यान, नियंत्रण युनिट किंवा मतदान यंत्र किंवा व्हीव्हीपॅट योग्य पद्धतीने चालत नसल्यास, केवळ तीच युनिटे (यंत्रे) बदलावीत.

- प्रत्यक्ष मतदानादरम्यान, नियंत्रण युनिट किंवा मतदान यंत्र योग्य पद्धतीने चालत नसल्यास, नियंत्रण युनिट, मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट हा संपूर्ण संच बदलण्यात यावा. अभिरूप मतदानाच्या बाबतीत नोटासह (NOTA) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास केवळ एकेक मत द्यावे आणि वरील परिच्छेद ३.३.५. मध्ये नमूद केलेल्या सूचनांचे पालन करावे.

- प्रत्यक्ष मतदानादरम्यान, व्हीव्हीपॅट योग्यरित्या चालत नसल्यास, केवळ व्हीव्हीपॅट बदली करा. केवळ व्हीव्हीपॅट बदलून नवीन बसवल्यास अभिरूप मतदान घेण्याची आवश्यकता नसेल.

**३.४.४. गंभीर चुका**

- अभिरूप मतदानानंतर नियंत्रण युनिटाचे CLOSE बटण दाबण्यात येऊ नये.
- अभिरूप मतदानानंतर नियंत्रण युनिटावर दिसणारा निकाल व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांशी न जुळणे.

- अभिरूप मतदानाच्या चिठ्ठ्या व्हीव्हीपॅट यंत्रातून काढून न टाकणे.
- नियंत्रण युनिटामधून अभिरूप मतदानाची आकडेवारी निरंक न करणे.
- थेट प्रकाशझोताच्या खाली व्हीव्हीपॅट यंत्र ठेवणे.
- खुल्या खिडकीजवळ व्हीव्हीपॅट यंत्र ठेवणे.

**टीप :**

- मतदान केंद्राध्यक्षाने, अभिरूप मतदान घेत असताना तेथे उपस्थित असणाऱ्या प्रतिनिधींना यंत्रांचे क्रमांक दाखवावेत.
- मतदान केंद्राध्यक्षाने, मतदान केंद्रात वापरात आणलेल्या नियंत्रण युनिट, मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यंत्राचे अनुक्रमांक व क्रमांक आपल्या नोंदवहीत लिहून घ्यावेत.

### ३.४.५. कागदी मोहोरांचा हिशेब

- मतदान केंद्रात वापरण्यासाठी पुरविण्यात आलेल्या हिरव्या कागदी मोहोरांचा आणि नियंत्रण युनिट मोहोरबंद व सुरक्षित करण्यासाठी तुम्ही प्रत्यक्षात वापरलेल्या हिरव्या कागदी मोहोरांचा अचूक हिशेब ठेवावा. असा हिशेब निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ जोडलेल्या नमुना १७सी च्या **(जोडपत्र-८)** भाग-एक मधील बाब १० च्या प्रयोजनाकरिता विनिर्दिष्टपणे विहित केलेल्या नमुन्यामध्ये जतन करण्यात येईल.
- पुरविण्यात आलेल्या आणि प्रत्यक्षात वापरलेल्या हिरव्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक लिहून घेण्यास तुम्ही उमेदवारांना किंवा त्यांच्या उपस्थित मतदान प्रतिनिधींना परवागनी द्यावी.

### ३.५. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट हाताळताना काय करू नये.

(मतदान केंद्राध्यक्ष व पथकाच्या संबंधात)

**मतदान केंद्रांकडे रवाना होताना**

१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे/व्हीव्हीपॅट ज्या विशिष्ट मतदान केंद्रांसाठी वाटण्यात आलेली आहेत तीच आहे याची खात्री करण्याचे विसरू नये.

२. कोणत्याही अनधिकृत ठिकाणी जसे की, राहते घर, इत्यादी ठिकाणी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट घेऊन जाऊ नये.

३. मतदानाच्या दिवशी बॅटरी तसेच कागदाची गुंडाळी (पेपर रोल) कमी होऊन अडचण येऊ नये म्हणून व्हीव्हीपॅट वारंवार चालू व बंद करू नये.

४. केबल वापरून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र युनिटे आणि व्हीव्हीपॅट जोडताना किंवा विलग करताना नियंत्रण युनिट बंद करण्याचे विसरू नका.

५. नियंत्रण युनिटला मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅटशी विजोड करताना केबल ओढू नका.

७. रवाना होतेवेळी व्हीव्हीपॅट चालू करू नका.

८. रवाना होण्याच्या वेळी मतदान यंत्र, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट यांची जोडणी करू नका.

९. वाहतूक करताना व्हीव्हीपॅट चालू स्थितीत ठेवू नका.

१०. नेमलेल्या जागेव्यतिरिक्त इतर कोठेही मुक्काम करू नका.

११. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅट यांवरील कोणतीही मोहोर काढून टाकू नका.

१२. मतदान केंद्रावर जाण्याकरिता उपलब्ध करून दिलेल्या वाहनाशिवाय इतर कोणतेही वाहन वापरू नका.

**अभिरूप मतदानादरम्यान**

१. जर कोणीही किंवा एकच निवडणूक प्रतिनिधी उपस्थित असेल तर अभिरूप मतदान सुरू करू नका. १५ मिनिटे वाट पहा.

२. कमीत कमी ५० मते नोंदवल्याशिवाय अभिरूप मतदान थांबवू नका.

३. अभिरूप मतदानासाठी मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट हे एकाच टेबलवर ठेवू नका. (मतदान युनिट व व्हीव्हीपॅट हे मतदान कक्षात ठेवा).

४. अभिरूप मतदानादरम्यान नोटासह प्रत्येक उमेदवारास कमीत कमी एकतरी मत देण्यास विसरू नका.

५. मतदानाच्या दिवशी अभिरूप मतदान संपल्यानंतर व्हीव्हीपॅट चिठ्ठ्या असलेल्या कक्षामध्ये कोणतीही अभिरूप मतदान चिठ्ठी शिल्लक ठेवू नका.

६. प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाची संपूर्ण माहिती निःशेष करण्यास (पुसून टाकण्यास) विसरू नका.

७. काळ्या लिफाफ्यात शिक्का न मारलेल्या अभिरूप मतदान व्हीव्हीपॅट चिठ्ठ्या ठेवू नका.

८. अभिरूप मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील मोजणीचा व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांच्या मोजणीशी मेळ बसवण्यास विसरू नका.

९. अभिरूप मतदान प्रमाणपत्र भरण्यास विसरू नका (मतदान केंद्राध्यक्ष अहवालाचा भाग-एक)

१०. नियंत्रण युनिटचा निकाल विभाग आणि व्हीव्हीपॅटचा ड्रॉप बॉक्स मोहोरबंद केल्याशिवाय आणि मतदान प्रतिनिधींच्या सह्या घेतल्याशिवाय प्रत्यक्ष मतदान सुरू करू नका.

## मतदानादरम्यान

१. मतदान समाप्त होईपर्यंत कागदी गुंडाळीची मूठ (नॉब) वापरू नका.

२. मतदान संपल्यानंतर नियंत्रण युनिटचे क्लोज बटण दाबण्यास विसरू नका.

३. प्रत्यक्ष मतदानादरम्यान केवळ व्हीव्हीपॅट यंत्र बदलल्यास अभिरूप मतदान घेऊ नका.

४. मतदान कक्षात व्हीव्हीपॅटच्या वर उच्च प्रकाशमान असलेला कोणताही विजेचा दिवा (बल्ब) लावू नका.

५. मतदान युनिट, नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅटची जोडणी करताना आणि जोडणी काढताना नियंत्रण युनिट सुरू (ऑन) करू नका.

६. व्हीव्हीपॅट कागदी गुंडाळी मूठ (नॉब) टाळेबंद स्थितीत असताना (आडव्या/क्षितिज समांतर स्थितीत) नियंत्रण युनिट सुरू (ऑन) करू नका.

७. मतदान युनिट/व्हीव्हीपॅटची आंतर जोडणी केबल ही टेबलाच्या पायाशी 'पारदर्शक' चिकटपट्टीने चिकटवण्यास विसरू नका.

८. केबलची जोडणी काढताना कनेक्टरच्या दोन्ही बाजूस असलेली पोटकुलुपे (लॅचेस) दाबण्यास विसरू नका.

९. अभिरूप मतदान प्रक्रियेदरम्यान नियंत्रण युनिटमधील अभिरूप मतदानाची आकडेवारी निःशेष करण्यास आणि व्हीव्हीपॅटमधून व्हीव्हीपॅट अभिरूप मतदात चिठ्ठ्या काढून टाकण्यास विसरू नका.

१०. निरक्षर मतदारांना मतदान कसे करावे हे शिकवण्यासाठी मतदान कक्षात प्रवेश करू नका. या प्रयोजनाकरिता पुठ्ठ्याचे बॅलट युनिट (डमी) वापरा.

११. मतदान प्रक्रियेदरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रचे स्वीच बंद/चालू करू नका.

१२. मतदान संपल्यानंतर व्हीव्हीपॅट यंत्र त्याच्या वहन पेटीमध्ये मोहोरबंद करण्यापूर्वी व्हीव्हीपॅटपासून व्हीव्हीपॅट पॉवर पॅक (बॅटरी) काढून टाकण्यास विसरू नका.

**३.६ मतदान पथकांना मतदानाच्या दिवशी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅटबाबत द्यावयाच्या सूचना**

**१.** मतदान युनिट, नियंत्रण युनिट, व्हीव्हीपॅट एम ३ यांची जोडणी करणे.



**२. अभिरूप मतदान घेणे आणि पडताळणी**

- उमेदवारांच्या/प्रतिनिधींच्या उपस्थितीत अभिरूप मतदानादरम्यान कमीतकमी ५० मते नोंदवावीत.
- अभिरूप मतदान पूर्ण झाल्यानंतर, नियंत्रण युनिट वरील क्लोज (CLOSE) बटण दाबावे.
- नियंत्रण युनिटवरील निकाल/रिझल्ट (RESULT) हे बटण दाबा आणि नियंत्रण युनिटवर प्रदर्शित आकडेवारी हाताने नोंदवून ठेवा.
- नियंत्रण युनिटवरील 'क्लिअर' (निःशेष) बटण दाबा आणि नियंत्रण युनिटमध्ये 'टोटल' (एकूण) शून्य असल्याचे निरीक्षण करा. नियंत्रण युनिट बंद करा.
- व्हीव्हीपॅटचा मतपत्रिका कक्षाचा दरवाजा उघडा आणि व्हीव्हीपॅट मतदान चिठ्ठ्या गोळा करा.
- पक्ष चिन्हांनुसार या मतदान चिठ्ठ्या वेगळ्या करा आणि मोजणी केलेल्या चिठ्ठ्यांचा निकाल नोंदवा. पोस्ट (पीओएसटी) चिठ्ठ्या बाजूला ठेवा.
- नियंत्रण युनिटच्या निकालाच्या आकडेवारीची व्हीव्हीपॅट निकाल आकडेवारीशी तुलना करा. उमेदवारनिहाय दोन्हींचा मेळ बसला पाहिजे.
- अभिरूप मतदान प्रमाणपत्र काळजीपूर्वक व अचूकतेने भरा.

**३. अभिरूप मतदानानंतर नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅटचा मतदानचिठ्ठ्यांचा कक्ष मोहोरबंद करणे.**

- अभिरूप मतदानानंतर, व्हीव्हीपॅट मतदान चिठ्ठ्या काढून घ्याव्यात आणि त्यांच्या मागील बाजूस रबरी शिक्क्याने "अभिरूप मतदान चिठ्ठी" असा शिक्का उमटवावा, त्यानंतर या अभिरूप मतदान व्हीव्हीपॅट मतदान चिठ्ठ्या काळ्या जाड कागदाने बनविलेल्या लिफाफ्यात ठेवाव्यात आणि हा लिफाफा मोहोरबंद करावा.
- हा लिफाफा गुलाबी कागदी मोहोर लावून अशा रीतीने मोहोरबंद करण्यात यावा की लिफाफा उघडताना त्याची मोहोर तोडणे भाग पडेल.
- नियंत्रण युनिटच्या आतील निकाल विभागात हिरवी कागदी मोहोर लावा, नियंत्रण युनिटवरील क्लोज बटणात विशेष खुणचिठ्ठी लावा.
- प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी व्हीव्हीपॅटचा मतदान कक्ष रिकामा असल्याची खात्री करा आणि प्रत्यक्ष मतदान सुरू होण्याआधी मतदान चिठ्ठ्यांचा कक्ष दोरा व पत्त्याच्या खुणचिठ्ठ्यांद्वारे मोहोरबंद केल्याची खात्री करा.

**४. तयारी ते अभिरूप मतदानापर्यंत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलणे**

- ▶ मतदान युनिट व्यवस्थितपणे काम करत नसल्यास राखीव मतदान युनिटांमधून **केवळ मतदान युनिट** बदलावे.
- ▶ नियंत्रण युनिट व्यवस्थितपणे काम करत नसल्यास, राखीव नियंत्रण युनिटांमधून **केवळ नियंत्रण युनिट** बदलावे.
- ▶ व्हीव्हीपॅट व्यवस्थितपणे काम करत नसल्यास, राखीव व्हीव्हीपीएटींमधून **केवळ व्हीव्हीपॅट** बदलावे.

**५. प्रत्यक्ष मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र–व्हीव्हीपॅट बदलणे**

- ▶ नियंत्रण युनिट किंवा मतदान युनिट व्यवस्थितपणे काम करत नसल्यास मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅटच्या संपूर्ण संच बदलावा. **अशा प्रकरणात अभिरूप मतदानात नोटासह निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारास केवळ एक मत देण्यात यावे आणि कार्यपद्धती अनुसरावी.**
- जर नियंत्रण युनिटवर, व्हीव्हीपॅट बदला असे दर्शवत असेल तर केवळ व्हीव्हीपॅट बदलावे. त्या परिस्थितीत अभिरूप मतदान घेण्याची आवश्यकता नाही.
- जर नियंत्रण युनिटवर, नियंत्रण युनिटचा किंवा व्हीव्हीपॅटचा पॉवर पॅक बदला असे दर्शवत असेल तर नियंत्रण युनिट किंवा व्हीव्हीपॅटचा केवळ पॉवर पॅक बदलावा.

## ३.७ प्रत्यक्ष मतदानापूर्वी किंवा प्रत्यक्ष मतदाना दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलणे

### इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र-व्हीव्हीपॅट बदलणे

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष मतदाना दरम्यान | सदोष मतदान युनिट<br>सदोष नियंत्रण युनिट | मतदान युनिट, नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅटचा संपूर्ण संच बदला | ➢ प्रत्येक आवरण नसलेल्या बटणास एक मत येऊन अभिरूप मतदान.<br>➢ व्हीव्हीपॅट बॅटरी काढून टाका, वहन पेट्यांमध्ये सदोष युनिटे मोहोरबंद करा.<br>➢ भाग-एक व भाग-पाच मतदान केंद्राध्यक्ष अहवाल तयार करा. |
| | सदोष नियंत्रण युनिट बॅटरी | केवळ नियंत्रण युनिटची बॅटरी बदला | ➢ अभिरूप मतदान नाही.<br>➢ भाग-दोन मतदान केंद्राध्यक्ष अहवाल तयार करा. |
| | सदोष व्हीव्हीपॅट | केवळ व्हीव्हीपॅट बदला | ➢ अभिरूप मतदान नाही.<br>➢ व्हीव्हीपॅटची बॅटरी काढून टाका. वहन पेट्यांमध्ये सदोष व्हीव्हीपॅट मोहोरबंद करा.<br>➢ भाग-पाच केंद्राध्यक्ष अहवाल तयार करा. |
| | सदोष व्हीव्हीपॅट बॅटरी | केवळ व्हीव्हीपॅट बॅटरी बदला | ➢ अभिरूप मतदान नाही. |
| प्रत्यक्ष मतदानापूर्वी | इतर दोष | केवळ सदोष युनिट/ युनिटे बदला | ➢ नवीन युनिटांसह अभिरूप मतदान सुरू ठेवा.<br>➢ भाग-एक व भाग-चार मतदान केंद्राध्यक्ष अहवाल तयार करा.<br>➢ क्षेत्र अधिकाऱ्याकडे सदोष युनिट (युनिटे) परत पाठवा. |



- ★ कोणत्याही परिस्थितीत मोहोरबंद व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्स **उघडू नका.**
- ★ कोणतीही जोडणी करताना किंवा काढताना नियंत्रण युनिट नेहमी बंद ठेवा.
- ★ नेहमी लाल-काळा रंग संकेतांक जुळवूनच जोडणी करा.
- ★ नियंत्रण युनिट सुरू करताना व्हीव्हीपॅटचे बटण अनलॉक स्थितीत ठेवा.






इव्हीएम-व्हीव्हीपॅट जोडण्या



# प्रकरण–०४

## मतदान कार्यपद्धती

### ४.१. मतदान केंद्रामध्ये व त्याच्या सभोवताली निवडणूक कायद्याची अंमलबजावणी

#### (एक) निःपक्षपातीपणा व औचित्यपालन

तुम्ही सर्व राजकीय पक्ष आणि निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना (अपक्ष उमेदवारांसह) समानतेने वागवले पाहिजे. तुम्ही वादाच्या कोणत्याही मुद्याबाबत निःपक्षपातीपणे व न्याय्य रीतीने निर्णय घेतला पाहिजे. सर्वच बाबतीत तुमचा निःपक्षपातीपणा, खंबीरपणा आणि चातुर्य तुम्हांला उपयुक्त ठरेल आणि तुमच्या मतदान केंद्रावर मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणूक पार पाडण्यात योगदान देईल. तुम्ही निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवार, मतदान प्रतिनिधी, नामांकित व्यक्ती, अति महत्त्वाच्या व्यक्ती किंवा मतदार [मतदान अधिकारी (पीओ) १, (पीओ) २, मतदान अधिकारी (पीओ) ३ ला सुद्धा लागू] यांच्याशी कोणतीही जवळीक दाखवू नये; तरीही नेहमीचे सौजन्य दाखवावे. प्रत्येक मतदाराशी सौजन्यपूर्वक व्यवहार करणे हा तुमच्या कर्तव्याचाच भाग आहे.

#### (दोन) प्रचारास बंदी

मतदान केंद्राच्या १०० मीटर (शंभर मीटर) अंतराच्या आत प्रचार करणे हा एक निवडणूकविषयक गुन्हा आहे. अशा कृतीत सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला अधिपत्राशिवाय (वॉरंटशिवाय) अटक करता येईल आणि त्या व्यक्तीवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १३० अन्वये खटला भरण्यात येईल. (जोडपत्र-एक)

#### (तीन) उमेदवार निवडणूक बूथ (मंडप)

निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना त्यांचे निवडणूक बूथ मतदान केंद्रापासून २०० मीटरच्या पलीकडे एक टेबल व दोन खुर्च्या आणि ऊन/पावसापासून संरक्षण म्हणून त्यांच्या डोक्यावर एक छत्री किंवा ताडपत्री यांसह उभारण्याची परवानगी आहे. अशा निवडणूक बूथवर गर्दी होऊ देऊ नये. तुम्ही पूर्वोल्लेखित कोणत्याही प्रकरणाच्या उल्लंघनाबाबत तात्काळ तुमच्या क्षेत्र अधिकाऱ्यास (किंवा तुमच्या मतदान केंद्रावर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदार कोणताही इतर कर्मचाऱ्याला/अधिकाऱ्यास) बोलवून लक्षात आणून द्यावे. शांततापूर्ण रीतीने मतदान पार पडण्याच्या उद्देशाने आवश्यक सुधारात्मक कार्यवाही वेळेवर केल्याची खात्री करण्यासाठी वरील बाबी करणे अनिवार्य आहे.

#### (चार) मतदान केंद्रामध्ये किंवा त्याच्या आसपास गैरशिस्त वर्तन

जर एखादी व्यक्ती मतदान केंद्र परिसरात (मतदान केंद्राच्या आत किंवा आसपास) गैरशिस्तीचे वर्तन (ध्वनीवर्धकाचा वापर, जसे, ध्वनीक्षेपक, मेगाफोन इ.च्या उपयोगासह) करताना आढळल्यास तुम्ही त्यास त्याचवेळेस पोलिसांकरवी अटक करू शकता आणि त्यानंतर **(लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १३१-जोडपत्र एक)** खटलासुद्धा दाखल करू शकता. मन वळवण्याचा प्रयत्न करूनही आणि सक्त ताकीद देऊनही काही परिणाम झाल्याचे दिसून आले नाही तरच या अधिकाराचा अंतिम उपाय म्हणून वापर करावा.

#### (पाच) गैरवर्तणूक करणाऱ्या (उपद्रव देणाऱ्या) व्यक्तींना घालवून देणे

मतदान चालू असताना गैरवर्तन करणाऱ्या किंवा तुमच्या सूचनांचे (प्रचलित कायदा विचारात घेता) पालन न करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांच्या मदतीने किंवा या प्रयोजनासाठी तुम्ही प्राधिकृत केलेल्या व्यक्तींद्वारे मतदान केंद्रातून घालवून देता येईल. **(लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १३२-जोडपत्र एक).**

#### (सहा) मतदारांना नेण्या-आणण्यासाठी वाहने भाड्याने घेणे बेकायदेशीर

मतदारांना त्यांच्या घरापासून मतदान केंद्रापर्यंत नेण्या-आणण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या एखाद्या उमेदवाराकडून वाहतुकीच्या साधनांचा वापर होत असल्याबाबत एखाद्या तक्रारदाराकडून जर तुम्हाला कळविण्यात आले तर ही तक्रार तुम्ही क्षेत्रीय/क्षेत्र दंडाधिकाऱ्यामार्फत संबंधित उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे पाठवावी.

### (सात) मतदान केंद्रातून मतदान यंत्र आणि/किंवा इतर मतदान साहित्य बाहेर नेणे हा गुन्हा आहे

• कोणत्याही निवडणुकीच्या वेळी एखाद्या व्यक्तीने मतदान केंद्रामधून मतदान यंत्र लबाडीने किंवा अनधिकृतपणे बाहेर नेले अथवा तसा प्रयत्न केला किंवा अशा कृत्यास जाणूनबुजून साह्य केले किंवा त्यासाठी उद्युक्त केले तर, ती व्यक्ती एका वर्षाच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंतच्या दंडास किंवा दोन्हीही शिक्षेस पात्र ठरेल या संबंधात लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ६१-अ च्या स्पष्टीकरणासह उक्त अधिनियमाचे कलम १३५ पहावे.

• इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वगळता इतर मतदान साहित्य बाहेर काढणे किंवा बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याची कृती लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १३५-क अन्वये एक अपराध आहे.

• वरील परिस्थितीत किंवा घटनेत तुम्ही संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारींना लेखी माहितीसह त्याला /तिला मतदान केंद्राचे कार्यक्षेत्र असलेल्या स्थानिक पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करावे.

### (आठ) निवडणूक अधिकाऱ्यांकडून झालेला पदीय कर्तव्याचा भंग

आपले लक्ष लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १३४ कडेदेखील वेधण्यात येत आहे, या कलमात अशी तरतूद केली आहे की, जेव्हा एखादा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी वाजवी कारणाशिवाय केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा कोणत्याही अकृतीमुळे दोषी ठरत असेल व त्याच्या हातून सरकारी कर्तव्याचा भंग होत असेल तर, तो त्याच्याकडून घडणारा दखलपात्र अपराध असेल.

### (नऊ) मतदान केंद्रात किंवा मतदानकेंद्राजवळ हत्यारे घेऊन जाण्यास प्रतिबंध

लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३४-ख च्या तरतुदीनुसार कोणतीही व्यक्ती, (निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, कोणताही पोलीस अधिकारी आणि मतदान केंद्रावर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी नियुक्त केलेली, त्या मतदान केंद्रावर कर्तव्यावर आहे अशी अन्य कोणतीही व्यक्ती अशा व्यक्तींव्यतिरिक्त) शस्त्र अधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात शस्त्रांसह जाऊ शकणार नाही. जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे उल्लंघन केले तर, ती व्यक्ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या किंवा दंडास किंवा या दोन्हीही शिक्षांसाठी पात्र असेल. हा अपराध दखलपात्र आहे.

### (दहा) सेल्युलर फोन, कॉर्डलेस फोन, वायरलेस संच इत्यादीच्या वापरास प्रतिबंध

सेलफोन, स्मार्ट घड्याळ, कॉर्डलेस फोन, वायरलेस संच इत्यादी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिमितीसह (भारत निवडणूक आयोगाने "मतदान केंद्राच्या शेजारचा प्रदेश" म्हणून व्याख्या केलेल्या) मतदान केंद्रामध्ये नेण्यास कोणत्याही बाबतीत परवानगी दिली जाणार नाही. मतदान केंद्राध्यक्षास त्याचा/तिचा भ्रमणध्वनी फोन ध्वनिविरहीत अवस्थेत (सांयलेंट मोड) मतदान केंद्रात येण्यास परवानगी आहे आणि एखाद्या मतदान केंद्रात सूक्ष्म निरीक्षक जर नेमला असेल तर त्यालाही त्याचा /तिचा भ्रमणध्वनी फोन मतदान केंद्रामध्ये ध्वनिविरहीत अवस्थेत (सायलेंट मोड) बाळगण्यास परवानगी आहे.

नेटवर्क उपलब्ध नसलेल्या छाया प्रदेशाच्या बाबतीत, वायरलेस संच किंवा सॅटेलाईट फोन वापरण्यास मतदान केंद्राध्यक्षांना परवानगी असेल.

## ४.२ मतदानास प्रारंभ

### (एक) निर्धारित वेळेस मतदानास प्रारंभ

मतदानास नियोजित वेळेस प्रारंभ झाला पाहिजे (अचूक तास व मिनिटे) याबाबत स्वतंत्रपणे कळवावे. नेमून दिलेली प्रत्येक तयारी ही मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी पूर्ण झाली पाहिजे (मतदान केंद्राध्यक्षाची पडताळा सूची पहा). नियोजित वेळेनुसार मतदानास प्रारंभ न झाल्यास विलंबासाठीची कारणे तुम्ही मतदान केंद्राध्यक्षाच्या नोंदवहीत नोंदवावीत **(जोडपत्र-७)**. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातून अभिरूप मतदानाचा निकाल नि:शेष केल्याची (पुसून टाकल्याची) खात्री करा. व्हीव्हीपॅट ड्रॉप बॉक्समधून अभिरूप मतदानासाठीच्या कागदी चिठ्ठ्या काढून घेतल्याची खात्री करा, मतदानास प्रारंभ केलेल्याबाबत क्षेत्र अधिकाऱ्यामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास तात्काळ कळवा.

**(दोन) मतदानाची गुप्तता राखण्याबाबत पूर्वताकीद देणे**

निवडणूक लढवणारे उमेदवार/मतदान प्रतिनिधींना (मतदान केंद्रावर उपस्थित असणारे) मतदानाची गुप्तता राखण्याच्या त्यांच्या कायदेशीर कर्तव्य बद्धतेसंबंधी आणि त्यांचा भंग केल्यास दंडात्मक तरतुदी [लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२८ (जोडपत्र-एक) अनुसार] स्पष्ट करून सांगणे आवश्यक आहे.

**(तीन) मतदान केंद्राध्यक्षांनी करावयाचे प्रतिज्ञापने**

मतदानास प्रारंभ करण्यापूर्वी **(जोडपत्र-६ च्या भाग एकमध्ये** विहित केल्याप्रमाणे) 'मतदान केंद्राध्यक्षाचे प्रतिज्ञापन' तुम्ही वाचायलाच हवे. तुम्ही हे प्रतिज्ञापन मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या व्यक्तींना मोठ्याने वाचून दाखवावे; प्रतिज्ञापनावर स्वतःची सही करावी; आणि त्यावर उपस्थित असलेले निवडणूक लढविणारे उमेदवार/मतदार प्रतिनिधी यांच्या सह्या घ्याव्यात. प्रतिज्ञापनावर सही करण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही मतदार प्रतिनिधीचे नाव त्यावर नमूद करून ठेवावे. इलेक्ट्रानिक मतदान यंत्र व्हीव्हीपॅटच्या प्रात्यक्षिका बाबतच्या सूचनांचे पालन केल्याची, मतदार यादीची चिन्हांकित प्रत, मतदार नोंदवही, आणि हिरव्या कागदी मोहोरेवर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधींच्या सह्या घेतल्याची आणि या मोहोरांवरील अनुक्रमांक नमूद करण्याची (लिहिण्यास) त्यांना परवानगी देण्याची खात्री करावी. मुक्त व निःपक्षपाती निवडणुकीची खात्री करण्यासाठीचे हे आवश्यक सुरक्षा उपाय आहेत. मतदानाची गुप्तता राखण्यासंबंधी लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२८ मधील तरतुदी वाचल्यानंतर तात्काळ हे करणे आवश्यक आहे.

**(चार) पक्क्या शाईसंबंधीची सावधगिरी**

मतदानादरम्यान तुम्ही पीओ२ ला (पक्क्या शाईचा प्रभारी असलेला मतदान अधिकारी) पक्क्या शाईची बाटली ठेवण्यासाठी देण्यात आलेल्या कपात/भांड्यात व्यवस्थितपणे म्हणजेच कप/भांडे कलंडून शाई सांडणार नाही अशा रितीने ठेवण्यात आली की नाही याची खात्री करण्यासाठी पुरेशी सावधगिरी घेण्याबाबत सल्ला देणे आवश्यक आहे. कपाच्या किंवा भांड्याच्या आतल्या रिकाम्या (सपाट पृष्ठभाग असलेले टिनचे भांडे) भागात बाटली भोवती सुटी (मोकळी) माती अशा रीतीने टाकावी जेणेकरून बाटली भांड्याच्या मधोमध तीन चतर्थांश (७५%) इतकी उभ्या अवस्थेत व्यवस्थित राहील. बाटलीच्या बूच-झाकण्यातून बाहेर आलेला, शाईसोबत देण्यात आलेला ब्रश (पक्की शाई लावण्यासाठी देण्यात आलेला) मतदाराच्या तर्जनीवर खूण करण्याच्या प्रयोजनासाठी बाहेर काढण्याव्यतिरिक्त नेहमी बाटलीच्या तोंडापासून खाली उभ्या स्थितीत बाटलीत बुडवून ठेवण्यात यावा.

**(पाच) मतदार यादीची चिन्हांकित प्रत (मतदानाच्या प्रयोजनासाठीची 'चिन्हांकित मतदार यादी' किंवा मतदार यादी)**

प्रत्यक्ष मतदान सुरू करण्यापूर्वी तुम्ही मतदान केंद्रामध्ये उपस्थित निवडणूक लढवणाऱ्या उमेदवार /मतदान प्रतिनिधींना ज्यामध्ये अनुपस्थित मतदार प्रवर्ग आणि निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र (डीसी) सहित टपाली मतपत्रिका निर्गमित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अभिप्रायांशिवाय कोणताही इतर अभिप्राय समाविष्ट नाही अशी चिन्हांकित मतदार यादी (म्हणजेच, मतदानाच्या प्रयोजनासाठी मतदारांची नावे चिन्हित करण्यासाठी वापरण्यात येणारी) दाखविलीच पाहिजे.

प्रकाशनाच्या अंतिम दिनांकास विद्यमान असलेली मतदार यादी आणि नामनिर्देशनाच्या अंतिम दिनांकापर्यंत टाकण्यात आलेल्या भर (काही असल्यास) यासह ती एक एकात्मिक स्वरूपाची यादी बनते जिचा उपयोग प्रत्यक्ष मतदान घेण्यासाठी केला जाऊ शकतो. संक्षिप्त पुनरीक्षणादरम्यान मतदार यादीत केलेली भर कालक्रमानुसारी क्रमाने अगोदरच्या शेवटच्या अनुक्रमांकाच्या (म्हणजे अंतिम यादीतील मतदाराची शेवटची नोंद) अनुषंगाने नव्याने जोडलेल्या मतदाराचा अनुक्रमांकांचे वाटप करून प्रतिबिंबित झाली पाहिजे. भर करणे, वगळणे आणि सुधारणा (फेरबदल) करण्यासाठी कोणतीही स्वतंत्र यादी छापली जाणार नाही. (याबाबतीतील नवीनतम अनुदेशांच्या संदर्भाचे पालन करण्यासाठी) पुनरीक्षण/सातत्यपूर्ण अद्ययावती करण्याच्या कालावधीत नमुना-८ च्या आधारे सुधारित/दुरुस्त करण्यात आलेल्या सर्व नोंदी #(संक्षिप्त पुनरीक्षणादरम्यान करण्यात आलेल्या दुरुस्त्यांबाबत) किंवा ## (सातत्यपूर्ण अद्ययावतीकरण कालखंडादरम्यान करण्यात आलेल्या दुरुस्त्यांबाबत) यथास्थिती, सुधारित व बदलल्या गेल्या आहेत हे दर्शविण्यासाठी सध्याच्या नोंदींऐवजी एकात्मिक यादीमध्येच #किंवा## या चिन्हांसह प्रतिबिंबित होतील.

## मतदार यादीची कल्पीत (डमी) चिन्हांकित प्रत

| | |
|---|---|
| अनुक्रमांक १८ RJ/12/094/909297<br>DELETED<br>नाव : अ ब<br>वडिलांचे नाव : एक्स वाय<br>घर क्रमांक : ३/१०<br>वय : ४२ लिंग : पु.  | अनुक्रमांक १९ RJ/32/194/239276<br>नाव : डी एफ<br>वडिलांचे नाव : आर टी<br>घर क्रमांक : ३/११<br>वय : २१ लिंग : स्त्री  |
| अनुक्रमांक २० UCW1075683<br>नाव : इडब्ल्यू<br>वडिलांचे नाव : जे यु<br>घर क्रमांक : ४/०१<br>वय : १९ लिंग : पु.  | अनुक्रमांक २१ UCW0389675<br>नाव : टीवाय<br>वडिलांचे नाव : एचएफ<br>घर क्रमांक : ३०५<br>वय : ८३ लिंग : पु.  |

मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना/मतदार प्रतिनिधींना 'मतदार नोंदवही (नमुना १७ ए)' (मतदारांच्या संदर्भात नोंदी करण्यासाठी) दाखवणे (प्रदर्शित करणे) आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना खात्री करता येईल की त्यामध्ये आधीच कोणत्याही मतदारांच्या संदर्भात कोणतीही नोंद अंतर्भूत नाही.

### (सहा) मतदान केंद्रावर मतदारांच्या प्रवेशाचे विनियमन

तुम्ही दिव्यांग/वरिष्ठ नागरिक, पुरुष आणि स्त्री मतदारांसाठी तीन स्वंतत्र रांगा असल्याची खात्री करावी. तुम्ही रांगांचे प्रशासन करणाऱ्या अधिकाऱ्यांना (पोलीस हवालदार/गृहरक्षक/कोणताही प्राधिकृत निवडणूक अधिकारी) एकावेळी तीन ते चार मतदारांना मतदान केंद्राच्या आत जाण्यास परवानगी देण्याचा निदेश दिला पाहिजे. उर्वरित मतदार बाहेर रांगेत त्यांची पाळी येण्याची वाट पाहतील. एका पुरुष मतदराच्या प्रवेशानंतर, दोन महिला मतदारांना मतदान केंद्रात प्रवेश दिला जाऊ शकतो. कोणत्याही परिस्थितीत तुम्ही पुरुष आणि महिला मतदारांसाठी प्रत्येक एकापेक्षा जास्त रांगांना परवानगी देऊ नये. दिव्यांग मतदार, शारीरिकदृष्ट्या दुर्बल मतदार, गरोदर महिला मतदार, हातात/कडेवर बाळ असणाऱ्या महिला मतदार आणि ज्येष्ठ नागरिक यांना रांगेतील इतर मतदारांच्या पुढे मतदान करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. त्यांना इतर मतदारांसह रांगेत थांबायला लावू नये. त्यांना मतदान केंद्रावर भारत निवडणूक आयोगाने विहित केलेल्या सर्व सुविधा (स्वतंत्रपणे निर्गमित अनुदेश) उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

आवश्यक असल्यास, अशा व्यक्तींसाठी स्वतंत्र रांग तयार केली जाऊ शकते. असे मतदार मतदान केंद्राच्या आत त्यांची चाकांची खुर्ची घेऊन जातील याची तुम्ही खात्री केली पाहिजे. तुमच्या मतदान केंद्रामध्ये कायमस्वरूपी उताराचा (रॅम्पची) अभाव असल्यास लाकडापासून बनवलेल्या तात्पुरत्या रॅम्पची व्यवस्था केली जाऊ शकते. वाचा आणि श्रवणदोषाने ग्रस्त असलेल्या दिव्यांग मतदारांची तुम्ही विशेष काळजी घेतली पाहिजे.

## ४.३ मतदारांची ओळख पटविणे आणि त्यासंबंधात आक्षेप घेण्याच्या बाबतीतील कार्यपद्धती

### ४.३.१ मतदाराची ओळख पटविणे

● आयोगाने आता मतदाराची कागदोपत्री ओळख अनिवार्य केलेली आहे. मतदारांनी आपली ओळख पटविण्याकरिता मतदार छायाचित्र, ओळखपत्र किंवा आयोगाने परवानगी दिलेल्या ओळख पटवण्याच्या पर्यायी कागदपत्रांपैकी एखादे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. आयोग प्रत्येक निवडणुकीच्या वेळी यासंबंधात आदेश निर्गमित करील. आपण आयोगाने निर्गमित केलेले आदेश पाहिले पाहिजेत आणि अनुपालन करून ते अंमलात आणले पाहिजेत. ओळख पटविणाऱ्या मतदान अधिकाऱ्याने, मतदान छायाचित्र, अथवा यथास्थिती पर्यायी कागदपत्रे यांची तपासणी केल्यानंतर मतदाराच्या ओळखीविषयी स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे आणि याबाबतीत कोणतीही शंका असेल तर मतदाराच्या ओळखीविषयी त्याची स्वतःची खात्री पटण्याकरिता आणखी जो काही पुरावा लागेल तो पुरावा मतदाराला आणण्यास सांगेल. ती व्यक्ती तोतया मतदार असल्याचे सिद्ध झाले तर तुम्ही लेखी तक्रार करून त्या व्यक्तीस पोलिसांच्या हवाली करावे.

● मतदानाच्या वेळी तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, आयोगाने, पुढील कार्यपद्धती अनुसरण्याचे निदेश दिले आहेत.—

**(क) अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत (एएसडी) मतदारांसाठी—**

● प्रत्येक मतदान केंद्रनिहाय अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत (एसएसडी लिस्ट) मतदारांची यादी तयार करण्यात यावी आणि प्रत्येक मतदान केंद्राध्यक्षाला अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत मतदारांची स्वतंत्र यादी पुढील नमुन्यात उपलब्ध करून देण्यात आल्याची खात्री करण्यात यावी.

## जोडपत्र—१३ए

### अनुपस्थित, स्थलांतरित व मयत (एएसडी) मतदारांच्या यादीचा नमुना

**विधानसभा मतदारसंघ क्रमांक व भाग :**

**मतदान केंद्र भाग व नाव :—**

| अनु. क्रमांक (१) | मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक (२) | मतदाराचे नाव (३) | वडील/पती/आईचे नाव (४) | वय (५) | अनुपस्थित, स्थलांतरित किंवा मयत म्हणजे ए, एस किंवा डी पैकी जे लागू असेल ते लिहा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याची सही

संपूर्ण नाव

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही

शिक्का

- मतदानाच्या दिवशी अशा यादीतील मतदाराला मतदान करायचे असल्यास, आयोगाने मंजुरी दिल्यास, मतदाराला ओळखीचा पुरावा म्हणून मतदार छायाचित्र ओळखपत्र किंवा इतर पर्यायी ओळखपत्र सादर करावे लागेल. मतदान केंद्राध्यक्ष स्वत: व्यक्तीशः त्या दस्तऐवजांची तपासणी करेल आणि नमुना १७-ए मधील मतदार नोंदवहीत तपशील, संबंधित मतदान अधिकाऱ्याद्वारे योग्य रीतीने नोंदविला जात आहे ना हेसुद्धा पाहील.
- पहिला मतदान अधिकारी, मतदानासाठी आलेल्या अनुपस्थित, स्थलांतरित व मयत मतदाराचे नाव मोठ्याने वाचून मतदान प्रतिनिधींना याची माहिती करून देईल. मतदार नोंदवहीच्या (नमुना १७ए) “ सही/अंगठ्याचा ठसा ” या रकान्याच्या समोर सहीबरोबर अशा मतदाराच्या अंगठ्याचा ठसादेखील घेण्यात येईल. जो मतदार सुशिक्षित असेल व तो सही करू शकत असेल तरीदेखील त्याच्या सही व्यतिरिक्त त्याच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात येईल.
- **जोडपत्र १४** च्या नमुन्यात अनुपस्थित, स्थलांतरित व मयत यादीतील मतदारांकडून प्रतिज्ञापत्रदेखील घेता येईल.
- मतदान केंद्राध्यक्ष याचा अभिलेख ठेवील आणि मतदानाच्या अखेरीस, अनुपस्थित स्थलांतरित व मयत मतदारांच्या यादीत असलेल्या मतदारांची योग्यरितीने पडताळणी केल्यावर अशा अनेक मतदारांना मतदान करण्यास परवानगी दिल्याचे प्रमाणपत्र देईल. (ते पडताळणीकरिता नमुना १७-ए बरोबर ठेवण्यात येईल.)
- मतदान केन्द्रात व्हिडिओ चित्रीकरण/छायाचित्रीकरण करण्यात येत असेल तर, अशा मतदारांचे छायाचित्रीकरण/ व्हिडिओ चित्रिकरण करून ते अभिलेखात ठेवण्यात येईल.

- मतदान केंद्राध्यक्षाने या अनुदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. सूक्ष्म निरीक्षक, जिथे नियुक्त असतील, त्यांनीही निरीक्षण करावे आणि त्यांच्या अहवालात याबाबत उल्लेख करावा.
- मतदान केंद्राध्यक्ष, ज्या मतदारांचे नाव अनुपस्थित, स्थलांतरित व मयत मतदारांच्या यादीत असेल त्या मतदारांना मतदान केंद्रांमध्ये अनुसरण्यात येत असलेल्या या प्रक्रियेविषयी विनिर्देशपूर्वक थोडक्यात माहिती देईल.

**(ख) समुद्रपार मतदारांसाठी :**

- निवडणूक आयोगाने, मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी येणाऱ्या समुद्रपार मतदारांची ओळख केवळ त्यांनी सादर केलेल्या मूळ पारपत्राच्या आधारेच पटविण्यात येईल.
- याआधी प्रकरण-२ मध्ये स्पष्ट केल्यानुसार, मतदाराने मतदान केंद्रात प्रवेश केल्यावर तो थेट पहिल्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल. या मतदान अधिकाऱ्याकडे मतदान यादीची चिन्हांकित प्रत राहील व तो मतदाराची ओळख पटवून घेण्याबद्दल जबाबदार असेल. या मतदान अधिकाऱ्याने मतदान यादीतील नोंदीच्या संदर्भात मतदारांची ओळख वर स्पष्ट केल्याप्रमाणे योग्यरित्या पडताळून पहावी. या ठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की, अशी अनौपचारिक ओळखपत्रिका आणणे म्हणजे, त्या मतदाराची ओळख खात्रीने पटली असे नव्हे. त्याचप्रमाणे तेवढ्याने मतदान अधिकाऱ्यांची अशा मतदाराची ओळख पटविण्याच्या कामातून अथवा मतदाराच्या ओळखीबाबत त्याची स्वतःची खात्री करून घेण्याच्या जबाबदारीतून मुक्तता झाली असेही होत नाही.
- यानंतर, जरी एखादी व्यक्ती मतदार छायाचित्र ओळखपत्रासह आली तरी देखील जर त्याचे/तिचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट नसेल तर तो/ती मतदान करू शकत नाही.
- राजकीय पक्षांनी/उमेदवारांनी देखील मतदारांना अनौपचारिक ओळख चिठ्ठ्या दिलेल्या असू शकतात. आयोगाच्या निदेशांनुसार, अशा चिठ्ठ्या कोऱ्या पांढऱ्या कागदावर असाव्यात आणि त्यात मतदाराचे नाव मतदार यादीतील त्याचा अनुक्रमांक मतदारयादीतील भाग क्रमांक आणि तो ज्या ठिकाणी मतदान करणार आहे त्या मतदान केंद्राचा क्रमांक व नाव यांचा समावेश असावा. या चिठ्ठीत, निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचे नाव आणि/किंवा त्याचा पक्षाचे नाव आणि/किंवा त्याला देण्यात आलेल्या चिन्हाची प्रतिकृति/चित्र नसावे (तसे असल्यास तो निवडणूक प्रचाराचा भाग समजला जाईल). आयोगाच्या या निदेशांचे उल्लंघन करून जर निवडणूक लढवणाऱ्या कोणत्याही उमेदवाराने किंवा त्याच्या पक्षाने अशी कोणतीही चिठ्ठी दिलेली असल्याचे आणि एखादा मतदार ती मतदान केंद्रात घेऊन आला असल्याचे तुम्हाला आढळून आल्यास, अशा प्रकारचे उल्लंघन ताबडतोब थांबविण्यासाठी तुम्ही ही बाब संबंधित उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधीच्या निदर्शनास आणून द्यावी. उमेदवाराकडून/राजकीय पक्षाकडून पुरविण्यात आलेली चिठ्ठी ही, मतदाराची ओळख पटविण्याचा मान्यताप्राप्त दस्तऐवज नाही याची नोंद घ्या.
- महिला मतदारांची विशेषतः "पडदानशीन" (बुरखाधारी) महिलांची संख्या जास्त असल्यास, परिच्छेद २.६ (एक) मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे खास स्वतंत्र कक्षामध्ये अशा महिला मतदारांची ओळख पटविण्यासाठी महिला मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

**४.३.२ ज्यांना टपाली मतपत्रिका देण्यात आल्या आहेत असे अनुपस्थित मतदार**

ज्या अन्यत्रवासी मतदारांना टपाली मतपत्रिका देण्यात आलेल्या आहेत, त्यांना चिन्हांकित मतदार यादीमध्ये अनुपस्थित मतदार अत्यावश्यक सेवा (एव्हीइएस), अनुपस्थित मतदार वरिष्ठ नागरिक (एव्हीएससी), अनुपस्थित दिव्यांग मतदार (एव्हीपीडी), कोविड मतदार म्हणून चिन्हांकित केले असेल तर मतदान केंद्रात मतदान करण्यास परवानगी देण्यात येणार नाही. जरी मतदाराने विनंती केली की त्याला/तिला टपाली मतपत्रिका देण्यात आली आहे आणि त्याला/तिला मतदान करता आले नाही आणि म्हणून मतदान केंद्रावर मतदान करण्यास परवानगी देण्याबाबतची विनंती स्वीकारण्यात येणार नाही आणि त्यांना मतदान केंद्रात मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

### ४.३.३ मयत, अनुपस्थित आणि अभिकथित तोतया मतदारांची यादी

मतदार प्रतिनिधी त्यांच्यासोबत मयत, अनुपस्थित आणि अभिकथित तोतया मतदारांची यादी आणतील. त्याचप्रमाणे अन्य मतदान साहित्यामधून निवडणूक निर्णय अधिकारी अनुपस्थित, स्थलांतरित व मयत मतदारांची यादी तुम्हांला पुरवील. कोणतीही व्यक्ती मतदार असल्याचा दावा करत असल्यास, वरील परिच्छेद ४.३.१ मध्ये नमूद केलेल्या एएसडी मतदार ओळख पटविण्याच्या उपाययोजनांचे पालन करावे.

### ४.३.४. मतदारांच्या यादीतील लिपिकीय आणि छपाईच्या चुका दुर्लक्षित करणे.

कधी कधी मतदारांच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेला मतदारासंबंधीचा तपशील चुकीचा छापलेला असतो किंवा मतदारांचे नेमके वय वगैरेबाबतचा तपशील अद्ययावत नसतो. मतदारांच्या यादीत नाव असलेला मतदार तोच आहे असा दावा करणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीविषयी मतदारांच्या यादीत नोंदलेल्या इतर तपशीलावरून तुमची खात्री झाल्यास मतदारांच्या यादीत मतदारांच्या नावाच्या नोंदीसंबंधी झालेल्या केवळ लिपिकीयदोषांकडे किंवा छपाईच्या चुकांकडे तुम्ही दुर्लक्ष करावे, जेव्हा एकाहून अधिक भाषांत मतदारांची यादी तयार केलेली असते आणि चिन्हांकित मतदार यादीत जर त्या व्यक्तीचे नाव नसेल परंतु त्या नाव दुसऱ्या भाषेतील त्याच विभागाच्या मतदार यादीत असेल तर त्या व्यक्तीला तुम्ही मतदान करण्यास परवानगी द्यावी. तुम्ही अशा प्रकारच्या प्रत्येक मतदारासंबंधी नोंद मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीवर शाईने करावी.

### ४.३.५. मतदाराच्या नावनोंदणीच्या वस्तुस्थितीबाबत प्रश्न उपस्थित न करणे.

मतदारांची ओळख पटल्याबद्दल तुमचे समाधान झाले असेल तर, त्याला मतदान करण्याचा अधिकार आहे. अशी व्यक्ती मतदार म्हणून पात्र आहे की नाही याबाबतचा प्रश्न मतदान केंद्रामध्ये उपस्थित केला जाऊ शकत नाही. उदा.—त्या मतदाराचे वय १८ वर्षांपेक्षा जास्त आहे की नाही किंवा सामान्यतः तो त्याच मतदारसंघात राहतो की नाही याबाबतची चौकशी तुम्हास करता येणार नाही. परंतु, ज्या व्यक्तीच्या बाबतीत त्याचे वय अर्हकारी वयापेक्षा खूप कमी आहे असे तुम्हांस वाटल्यास तुम्ही **प्रकरण-५** मध्ये नमूद उपाययोजनांचे पालन करावे.

## ४.४. मतदाराला मतदान करू देण्यापूर्वी पक्क्या शाईची खूण करणे आणि त्याची सही/अंगठ्याचा ठसा घेणे

### ४.४.१ मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीची तपासणी करणे आणि पक्क्या शाईची खूण करणे

(एक) पहिल्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराची ओळख पटल्यावर आणि जर मतदाराच्या ओळखीबाबत कोणताही आक्षेप उपस्थित केलेला नसेल तर त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर एखादी पक्क्या शाईची खूण तर नाहीना याची खात्री करून घेण्याकरिता दुसरा मतदान अधिकारी त्या मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीची तपासणी करील. बोटावर कोणतीही खूण नसेल तर, त्याच्या बोटावर स्पष्ट दिसेल अशा रीतीने **प्रकरण १ मधील परिच्छेद १.१०** मध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार दुसरा मतदान अधिकारी त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण करील. जर एखाद्या मतदाराने स्वतःच्या डाव्या हाताची तर्जनी तपासून घेण्यास किंवा सूचनेप्रमाणे तिच्यावर खूण करून घेण्यास नकार दिला किंवा त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर आधीच अशी खूण असेल किंवा त्यात शाई पुसण्याच्या उद्देशाने कोणतेही कृत्य केले तर त्याला मतदान करण्यास परवानगी देऊ नये.



(दोन) जर एखाद्या मतदाराने बोटावर करावयाच्या खुणेच्या पक्क्या शाईचा डाग टिकू नये म्हणून आपल्या बोटाला एखादा तेलकट किंवा मेणचट पदार्थ लावला असल्याचे आढळून आले तर मतदान अधिकाऱ्याने त्या मतदाराच्या बोटावर पक्क्या शाईची खूण करण्यापूर्वी एखाद्या फडक्याने किंवा चिंधीने तो तेलकट किंवा मेणचट पदार्थ पुसून टाकावा. मतदान केंद्राध्यक्षाच्या साहित्याबरोबर (किटबरोबर) कपड्याचा तुकडा किंवा चिंधी (पुरविली) दिली जाईल.

(तीन) नमुना १७-ए मधील मतदार नोंदवहीमध्ये मतदाराची सही/अंगठा घेण्याआधी पक्क्या शाईची खूण करणे आवश्यक आहे. त्यामुळे मतदार त्याचे मत देऊन मतदान केंद्र जेव्हा सोडील, तेव्हा डाव्या हाताच्या तर्जनीवरील पक्की शाई वाळण्यास आणि तिची स्पष्ट खूण उमटवण्यास पुरेसा वेळ राहील.

### ४.४.२ नवीन मतदानाच्या (पुनर्मतदान)/प्रत्यादेशित मतदानच्या वेळी शाई लावणे

(एक) असे स्पष्ट करण्यात येते की, नवीन मतदानाच्या पुनर्मतदानाच्या/प्रत्यादेशित मतदानाच्या वेळी, मूळ मतदानाच्या वेळी पक्क्या शाईने करण्यात आलेल्या खुणेकडे दुर्लक्ष करण्यात यावे आणि **मतदाराच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटावर पक्क्या/शाईने** एक स्पष्ट खूण उमटेल. अशा रीतीने नव्याने खूण करावी.

(दोन) निवडणुका घेणे नियम, १९६१ च्या नियम ४९ के अन्वये प्रत्येक मतदार ज्याची ओळखीच्या बाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिति मतदान अधिकारी, कोणत्याही बाबतीत, समाधानी असेल त्याची डाव्या हाताची तर्जनी मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकाऱ्याद्वारे निरीक्षण करण्याची परवानगी देईल आणि त्यावर पक्क्या शाईची खूण लावून घ्यावी लागेल. काही राज्ये/संघ राज्यक्षेत्रांनी ज्यांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मागील निवडणुकांवेळी पक्की शाई आधीपासूनच असेल आणि मतदानाच्या दिवशी शाईची खूण अजूनही दिसत असेल अशा मतदारांवर पक्की शाई लावल्यावर वेळोवेळी स्पष्टीकरण मागितले आहे. याबाबत सांगितले जाते की, बोटावर शाई लावल्यानंतर त्वचेच्या भागावर खूण ५-७ दिवसांपर्यंत राहते. परंतु नखांवरील खूण नख मोठे होईपर्यंत दिसत राहते आयोगाने ही बाब लक्षात घेऊन निदेशित केले की,—

- जर वर्तमान निवडणुकीच्या मतदानाच्या दिनांकापूर्वी दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल असे कोणतेही मतदान घेण्यात आले असल्यास, अशा प्रकरणांमध्ये डाव्या हाताच्या तर्जनीऐवजी मधल्या बोटावर पक्क्या शाईची खूण करण्यात येईल. तर्जनी तसेच मधल्या बोटावर आधीच शाई लावली गेली असेल तर ती शाई अनामिका वगैरेंवर लावली.

- बोटे नसल्याच्या परीस्थितीत निवडणुका घेणे नियम, १९६१ चा नियम ४९ के लागू राहील.

### ४.४.३ मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसल्यास पक्की शाई लावण्याची पद्धत

असे स्पष्ट करण्यात येते की, जेव्हा मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल तेव्हा त्याच्या डाव्या हाताच्या कोणत्याही बोटावर पक्की शाई लावावी, शिवाय जर त्याच्या डाव्या हाताला एकही बोट नसेल तर त्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीला शाई लावावी आणि जर त्याला उजव्या हाताची तर्जनी नसेल तर, शाई उजव्या तर्जनीपासून उजव्या हातावर असलेल्या अन्य कोणत्याही बोटाला लावावी, जर त्याच्या दोन्ही हातांना बोटे नसतील तर त्याला असलेल्या डाव्या किंवा उजव्या हाताचे जे टोक असेल त्यावर शाई लावावी.

### ४.४.४ मतदार नोंदवहीत मतदारांच्या अनुक्रमांकाची नोंद करणे

(एक) दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने, मागील परिच्छेदात स्पष्ट केलेल्या रीतीने मतदाराच्या डाव्या तर्जनीवर पहिल्यांदा पक्क्या शाईची खूण केल्यानंतर त्याने मतदारांच्या नोंदवहीत (नमुना १७-अ) अशा मतदाराची नोंद करावी आणि त्या नोंदवहीत मतदाराची सही/अंगठ्याचा ठसा घ्यावा.

(दोन) दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदार नोंदवहीत ही नोंद पुढील पद्धतीने करावी :—

(क) दूसरा मतदान अधिकारी मतदार नोंदवहीच्या पहिल्या रकान्यात अनुक्रमांक १ ने सुरुवात करून लागोपाठच्या क्रमाने मतदाराचे अनुक्रमांक लिहील. (सर्वसाधारणपणे मतदारांचे अनुक्रमांक नोंदवहीमध्ये लागोपाठाच्या क्रमाने अगोदर छापण्यात आले आहेत). नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठावर १० अनुक्रमांक आहेत. स्तंभ (१) मध्ये याआधी अनुक्रमांक छापण्यात आले नसतील तर मतदानाच्या प्रारंभी ती काही पृष्ठांवर आगाऊ असे अनुक्रमांक हाताने लिहू शकेल.

(ख) उक्त नोंदवहीच्या रकाना (२) मध्ये दूसरा मतदान अधिकारी मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीत नोंद केल्याप्रमाणे मतदाराच्या यादीतील क्रमांक म्हणजेच अनुक्रमांक लिहील उदाहरणार्थ मतदानासाठी मतदान केंद्रात प्रथम आलेल्या मतदाराचा चिन्हांकित मतदार यादीतील अनुक्रमांक ७५६ असेल तर दुसरा मतदान अधिकारी मतदार नोंदवहीत पहिल्या रकान्यात (१) अनुक्रमांक लिहील आणि

दुसऱ्या रकान्यात ७५६ हा अनुक्रमांक लिहील. त्याचप्रमाणे दुसऱ्या मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक १३८ असेल तर दुसरा मतदान अधिकारी मतदार नोंदवहीत पहिल्या रकान्यात २ क्रमांक लिहील आणि दुसऱ्या रकान्यात १३८ हा मतदार यादीचा अनुक्रमांक लिहील. त्याचप्रकारे पुढील मतदारांची नोंद करीत जावे.

(ग) नमुना १७अ (मतदार नोंदवही) च्या रकाना (३) मध्ये, ओळख दस्तऐवजांचे शेवटचे चार अंक नमूद करण्यात यावेत. मतदार छायाचित्र ओळखपत्राच्या आधारे मतदान करणाऱ्या मतदारांच्या बाबतीत अनुक्रमे, "इपी" [ (EPIC) मतदार छायाचित्र ओळखपत्र दर्शवणारे ] यांची संबंधित स्तंभांत नोंद करणे पुरेसे आहे, आणि मतदार छायाचित्र ओळखपत्राचा क्रमांक लिहिण्याची आवश्यकता नाही. तथापि जे कोणत्याही पर्यायी दस्तऐवजांच्या आधारे मतदान करतात अशा मतदारांच्या बाबतीत दस्तऐवजांचे शेवटचे चार अंक नोंद करून घेण्याचे अनुदेश नियमितपणे लागू असतील. सादर केलेल्या दस्तऐवजाचा प्रकार देखील यात नमूद करावा.

(घ) दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने वर वर्णन केलेल्या रीतीने, नोंदवहीतील मतदाराच्या संबंधातील रकाने (१) आणि (२) आणि (३) भरल्यानंतर, त्या नोंदवहीच्या रकाना क्रमांक (४) मध्ये मतदाराची सही/अंगठ्याचा ठसा घ्यावा.

### ४.४.५. मतदाराची सही

एखाद्या कागदपत्रावर तो कागद खरा मानून एखाद्या व्यक्तीने त्यावर आपले नाव लिहिणे म्हणजे ती त्याची सही असे म्हणता येईल. साक्षर व्यक्ती मतदार नोंदवहीत सही करताना, तिचे नाव, म्हणजेच तिचे नाव किंवा नावे आणि पूर्ण आडनाव किंवा काही प्रकरणात तिचे पूर्ण आडनाव किंवा नावे ही पूर्णाक्षरांत किंवा त्या नावाची किंवा नावाची आद्यक्षरे लिहावी लागतील. जर एखाद्या साक्षर व्यक्तीने नुसतीच एखादी खूण केली आणि आपण साक्षर म्हणवत असतानाही ती खूण म्हणजेच माझी सही मानावी असा हेका धरला तर, ती खूण त्याची सही मानता येणार नाही. कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणे साक्षर व्यक्तीच्याबाबतीत एखादा कागद खरा मानून त्या व्यक्तीने स्वतः त्या कागदावर लिहिलेले आपले नाव म्हणजे सही अशी सहीची व्याख्या आहे. अशा बाबतीत जर वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यात पूर्ण नावाने सही करण्याचे नाकारले तर, त्याच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा. त्याने आपल्या अंगठ्याचा ठसा देण्याचेही नाकारले तर त्याला मागील परिच्छेद ४ अन्वये मत देण्यास परवानगी देऊ नये.

### ४.४.६ मतदाराच्या अंगठ्याचा ठसा घेणे

(एक) मतदार आपल्या नावाची सही करू शकत नसेल तर मतदार नोंदवहीत त्याच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा. नोंदवहीतील असा अंगठ्याचा ठसा तुम्ही किंवा कोणत्याही मतदान अधिकाऱ्याने साक्षांकित करण्याची आवश्यकता नाही याची नोंद घ्यावी.

(दोन) निवडणूक घेण्याबाबत नियम १९६१ यामधील पक्की शाई लावण्यासंबंधिच्या नियम ३७ (४) प्रमाणे, जर मतदाराला डावा अंगठा नसेल तरच उजव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा. जर दोन्ही हाताचे अंगठे नसतील तर डाव्या हाताच्या तर्जनीपासून सुरूवात करून कोणत्याही एका बोटाचा ठसा घेण्यात यावा. जर त्याच्या डाव्या हाताला बोटेच नसतील तर उजव्या हाताच्या बोटांचा ठसा घ्यावा. जर त्याला बोटेच नसतील तर मतदाराला आपले स्वतःचे मत नोंदविणे साहजिकरीत्या शक्य नसल्यामुळे उक्त नियमावलीतील नियम ४९-ढ अन्वये त्याला सोबत्याची मदत घ्यावी लागेल. अशा वेळी मतदाराच्या नोंदवहीत रकाना (५) मध्ये सोबत्याची सही किंवा त्याच्या अंगठ्याचा ठसा घेण्यास यावा. मतदार नोंदवहीच्या रकाना (५) मध्ये तसा शेरा लिहावा.

(तीन) मतदाराच्या नोंदवहीत अंगठ्याचा ठसा हा सुस्पष्ट असणे आवश्यक आहे. मतदाराच्या अंगठ्याला स्टँपच्या पॅडची शाई इतकी कमी लागता कामा नये की, त्यामुळे अंगठ्याचा ठसा केवळ पुसट किंवा अस्पष्ट उठेल. तसेच अंगठ्याला शाई इतकी बरबटलेलीही नसावी की, त्यामुळे नोंदवहीत अंगठ्याचा सुस्पष्ट ठसा उठण्याऐवजी शाईचा मोठा डागच उठेल.

### ४.४.७. अंध किंवा दिव्यांग मतदारांद्वारे मतदार नोंदवही वर सही/अंगठ्याचा ठसा

मतदार नोंदवहीत अंध किंवा दिव्यांग मतदार किंवा कुष्ठरोगी मतदार, जे निरक्षर असून त्यांच्या हाताचा वापर करू शकतात अशा मतदारांच्या अंगठ्याचा ठसा घेण्यात यावा. जर असा एखादा मतदार साक्षर असेल तर त्याला अंगठ्याच्या ठशाऐवजी सही करण्याची मुभा

द्यावी. जर एखाद्या दिव्यांग मतदाराला आपल्या एकाही हाताचा वापर करणे शक्य नसेल तर त्याचा सोबती नोंदवहीत आपली सही किंवा अंगठ्याचा ठसा देईल. नोंदवहीत अशा नोंदीसमोर त्या सोबत्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा असल्याची नोंद घेण्यात येईल. अंगठ्याचा ठसा घेतल्यानंतर, मतदाराच्या अंगठ्यावरील शाई ओल्या कपड्याने पुसून टाकण्यात येईल.

**४.४.८. मतदाराला मतदार चिठ्ठी देणे**

(एक) मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण केल्यानंतर, त्याच्याशी संबंधित नोंद मतदार नोंदवहीत घेतल्यानंतर आणि त्या नोंदवहीत त्याची सही/अंगठ्याचा ठसा घेतल्यानंतर दुसरा मतदान अधिकारी त्या मतदारासाठी पुढील नमुन्यात मतदार चिठ्ठी तयार करील :–

**मतदार चिठ्ठी**

" मतदार नोंदवहीच्या रकाना (१) नुसार मतदाराचा अनुक्रमांक ............................... मतदार यादीत नोंद केल्याप्रमाणे मतदाराचा अनुक्रमांक .................................. मतदान अधिकाऱ्याची संक्षिप्त सही ....................................."

(दोन) पोस्ट कार्डच्या अर्ध्या आकाराएवढ्या मतदार चिठ्ठ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून छापून घेण्यात येतील आणि तुमच्या मतदान केंद्रात नेमून दिलेल्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येकी शंभर चिठ्ठ्यांची आणि/किंवा पन्नास चिठ्ठ्यांची एकत्रित बंडले, मतदान सामग्रीपैकी एक बाब म्हणून तुम्हाला दिल्या जातील.

(तीन) दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने प्रत्येक मतदाराच्या बाबतीत वर नमूद केल्याप्रमाणे तयार केलेल्या मतदारांच्या चिठ्ठ्या त्याच्याकडून त्या मतदाराला दिल्या जातील आणि त्या मतदाराला मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटाचा प्रभारी असणाऱ्या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्यांकडे पुढील प्रक्रियेसाठी जाण्याचे निदेश देईल.

(चार) मतदारांकडून गोळा केलेल्या या मतदार चिठ्ठ्या अनुक्रमांकानुसार लावण्यात येतील आणि मतदान संपल्यावर त्या ठेवण्यासाठी देण्यात आलेल्या एका स्वतंत्र पाकिटामध्ये त्या ठेवल्या जातील.

**४.५. मत नोंदविणे आणि मतदान प्रक्रिया**

**४.५.१ मत नोंदविणे.**

(एक) दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराला मतदारचिठ्ठी दिल्यानंतर मतदार मतदारचिठ्ठीसह, मतदान यंत्रांच्या नियंत्रण युनिटाचा प्रभारी असलेल्या मतदान अधिकाऱ्याकडे येईल. मतदारास केवळ अशा मतदारचिठ्ठीच्या आधारेच मतदान करण्यास मुभा देता येईल.

(दोन) मतदार नोंदवहीत मतदारांची नोंद ज्या क्रमाने केलेली असेल, बरोबर त्याच क्रमाने मतदारांना त्यांची मते नोंदविण्यासाठी मतदान कक्षात जाणे हे सर्वथा अत्यावश्यक आहे. म्हणून, तुम्ही किंवा नियंत्रण युनिटाच्या प्रभारी असलेल्या मतदान अधिकाऱ्याने, मतदारचिठ्ठीमध्ये नमूद केलेल्या अनुक्रमांकानुसार काटेकोरपणे मतदारांना मतदान कक्षात जाऊ दिले पाहिजे.

(तीन) जर काही अपरिहार्य कारणामुळे अथवा अकल्पित किंवा न टाळता येण्याजोग्या कारणामुळे एखाद्या मतदाराच्याबाबतीत असा तंतोतंत अनुक्रम पाळणे शक्य झाले नाही तर, मतदार नोंदवहीतील शेऱ्याच्या स्तंभामध्ये संबंधित व्यक्तीच्या नावासमोर ज्या अनुक्रमांकावर त्याने मतदान केले आहे तो तंतोतंत अनुक्रमांक दर्शविणारी योग्य ती नोंद करा. त्यामुळे ज्यांचा अनुक्रम बिघडला, त्या लगतनंतरच्या मतदारांच्याबाबतीत देखील तशाच प्रकारची नोंद करा.

**४.५.२. मत नोंदविण्यास मतदारांना परवानगी देणे**

(एक) जेव्हा मतदार मतदारचिठ्ठी घेऊन, नियंत्रण युनिटाचा प्रभारी असलेल्या मतदान अधिकाऱ्याकडे येईल तेव्हा त्याच्याकडून मतदारचिठ्ठी घ्या आणि त्याला मतदान करण्याची परवानगी द्या.

(दोन) मतदारांकडून गोळा केलेल्या सर्व मतदारचिठ्ठ्या काळजीपूर्वक जतन करा आणि मतदान समाप्त झाल्यावर एका स्वतंत्र लिफाफ्यात ठेवा. या प्रयोजनार्थ, निवडणूक निर्णय अधिकारी एक विशेष लिफाफा पुरवील, सदर लिफाफा **प्रकरण-७** मध्ये निदेशित केलेल्या रीतीने मोहोरबंद करून सुरक्षित करण्यात येईल.

(तीन) मतदाराकडून मतदारचिठ्ठी गोळा केल्यानंतर, लगेच तुम्ही/नियंत्रण युनिटाचा प्रभारी असलेल्या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याने त्याच्या डाव्या हाताची तर्जनी तपासली पाहिजे. जर त्यावर केलेली पक्की शाईची खूण अस्पष्ट असेल किंवा पुसण्यात आलेली असेल, तर त्यावर एक स्पष्ट पक्की पुन्हा शाईची खूण करा.

(चार) त्यानंतर मतदारास त्याचे मत नोंदविण्यासाठी मतदान कक्षात जाण्याचा निदेश द्या.

### ४.५.३. मतदान प्रक्रिया

(एक) मतदारास आपले मत नोंदविणे शक्य व्हावे म्हणून मतदान कक्षात ठेवलेले मतदान युनिट (युनिटे) मत नोंदविण्यासाठी तयार ठेवावे. या प्रयोजनासाठी तुम्ही/नियंत्रण युनिटाचा प्रभारी असलेल्या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याने नियंत्रण युनिटावरील मतदान (बॅलॉट) बटन दाबल्यावर, नियंत्रण युनिटामधील "बिझी (Busy)" हा लाल रंगाचा दिवा पेटेल आणि त्याचवेळी मतदान कक्षातील प्रत्येक मतदान युनिटाचा "रेडी (Ready)" हा हिरव्या रंगाचा दिवा देखील पेटेल. यामुळे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे मतदान युनिट, आता मतदाराच्या पसंतीनुसार मत नोंदविण्यास तयार असल्याचे दर्शविले जाईल.

(दोन) मतदार, मतदान कक्षातील मतदान युनिटावरील पुरविण्यात आलेल्या त्यांच्या पसंतीच्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचे नाव, छायाचित्र व चिन्हासमोर असलेले "निळ्या रंगाचे बटण" दाबून आपले मत नोंदविल. जेव्हा तो ते बटण दाबेल तेव्हा त्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचे नाव, छायाचित्र व चिन्हासमोर असलेला मतदान युनिटावरील लाल रंगाचा दिवा पेटेल आणि मतदान युनिटावरील हिरव्या रंगाचा दिवा बंद होईल. व्हिव्हिपीएटी यंत्रावर मत दिलेल्या उमेदवाराचे नाव, छायाचित्र व अनुक्रमांक असलेली कागदाची एक लहान चिठ्ठी (स्लिप) मुद्रित होईल व तो तपशील व्हिव्हिपीएटी यंत्राच्या खिडकीत सात सेकंद दिसू शकेल. त्यानंतर मुद्रित कागदी चिठ्ठी (स्लिप) आपोआप कापली जाईल व ती व्हिव्हिपीएटी यंत्राच्या चिठ्ठ्या टाकण्याच्या मोहोरबंद पेटीत पडेल तसेच, नियंत्रण युनिटामधून "बीप (Beep)" असा आवाज ऐकू येईल. काही क्षणानंतर, "बीप" आवाज आणि मतदान युनिटावरील उमेदवाराचा लाल दिवा आणि नियंत्रण युनिटावरील "बिझी" हा लाल रंगाचा दिवा देखील बंद होईल.

(तीन) मतदानाच्या वेळी मतदान युनिटमधील उमेदवारासाठीच्या दिव्याच्यासंबंधात तक्रार असल्यास, व्हिव्हिपीएटी सह असे इव्हीएम यंत्र तात्काळ बदलण्यात येईल आणि ही बाब आयोगाला कळविण्यात येईल.

(चार) हा दृक् व श्राव्य संकेत, मतदान कक्षातील मतदाराने आपले मत नोंदविले आहे या वस्तुस्थितीचे निदर्शक आहे. त्यानंतर तात्काळ, मतदाराने मतदान कक्षातून बाहेर आले पाहिजे आणि मतदान केंद्र सोडले पाहिजे.

(पाच) सर्व मतदारांच्या बाबतीत उपरोक्त प्रक्रियेची पुनरावृत्ती होईल. एकावेळी केवळ एकच मतदार मतदान करण्यासाठी मतदान कक्षात जाईल याची खबरदारी घ्या. याचीदेखील खबरदारी घ्या की, जेव्हा अगोदरचा मतदार त्याचे/तिचे मत नोंदवून मतदान कक्षातून बाहेर पडेल तेव्हाच पुढील मतदारास मतदान करता यावे म्हणून नियंत्रण युनिटावरील "मतदान बटन" दाबले जाईल.

(सहा) ज्याठिकाणी विशिष्ट कागदी पावत्यांसाठीचा प्रिंटर वापरण्यात येत असेल त्याठिकाणी जर मतदाराने त्याचे मत नोंदविल्यावर व्हिव्हिपीएटी मधून बाहेर पडणाऱ्या विशिष्ट कागदी चिठ्ठीमध्ये ज्या उमेदवारास त्याने मत दिले त्यापेक्षा वेगळ्या उमेदवाराचे नाव व निवडणूक चिन्ह दर्शवित असल्याचे, त्याने अभिकथन केल्यास, मतदान केंद्राध्यक्ष, प्रकरण-५ च्या ५.९ मध्ये नमूद केलेल्या उपाययोजनांचे पालन करील.

### ४.५.४. मतदान झालेल्या मतांचा ठराविक कालांतराने मेळ घालणे

(एक) कोणत्याही वेळी, त्या वेळेपर्यंत मतदान झालेल्या एकूण मतांची संख्या आजमावयाची असेल तर, नियंत्रण युनिटावरील "एकूण (Total)" बटन दाबावे त्यानंतर नियंत्रण युनिटावरील दर्शनी पटलावर (Display Panel) त्यावेळी मतदान झालेल्या मतांची एकूण संख्या दर्शविण्यात येईल. हे केवळ ठराविक कालांतरानेच करावे आणि मतदार नोंदवहीमध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे त्या वेळेपर्यंत मतदान करण्यास मुभा दिलेल्या मतदार संख्येशी त्याचा मेळ घाला.

(दोन) अन्य कोणत्याही प्रसंगी तुम्ही प्रत्येकी दोन तासांच्या कालांतरामध्ये मतदान झालेल्या मतांची संख्या आजमावली पाहिजे व तिचा मेळ घातला पाहिजे आणि मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीमधील संबंधित रकान्यामध्ये मतदान झालेल्या मतांची संख्या नोंदवली पाहिजे. जेव्हा "बिझी" दिवा चालू (ON) नसेल तेव्हाच केवळ, म्हणजेच जेव्हा मतदारास मतदान करण्याची मुभा दिल्यावर त्याने आपले मत

नोंदविल्यानंतर आणि मतदान बटन दाबून पुढच्या मतदारास मतदान करण्याची मुभा देण्यापूर्वी "एकूण (Total)" बटन दाबले पाहिजे, अन्यथा मतदान झालेल्या एकूण मतांची संख्या दर्शविणारी आकडेवारी डिस्प्ले पॅनेलवर त्यावेळी दिसणार नाही.

**४.५.५. मतदान चालू असताना मतदान कक्षात प्रवेश करण्याचा मतदान केंद्राध्यक्षाचा विशेषाधिकार**

(एक) काहीवेळा असे घडू शकेल की, (एक) (तुम्हास पडदा लावलेल्या मतदान कक्षात ठेवलेलें) मतदान युनिट व्यवस्थितपणे चालू नाही (दोन) किंवा मतदान कक्षात प्रवेश केलेला मतदार, मतदान युनिटमध्ये गैरफेरफार करीत आहे किंवा अन्यथा त्यामध्ये व्यत्यय आणीत आहे (तीन) किंवा एखादा कागद, चिकटपट्टी इत्यादी मतदान युनिटवरील चिन्ह/नावे/मतदान बटन यांवर चिकटवून एखादी खोडसाळ गोष्ट करीत असेल (चार) किंवा मतदान कक्षात अवाजवी विलंब लावीत आहे असा संशय आल्यास किंवा संशय घेण्यास पुरेशे कारण असल्यास, तुम्हाला अशा प्रकरणी मतदार युनिटची तपासणी करण्याकरिता मतदान कक्षात प्रवेश करण्याचा आणि मतदान युनिटामध्ये कोणताही गैरफेरफार झालेला नाही किंवा त्यात व्यत्यय आलेला नाही किंवा कोणताही अडथळान येता मतदान युनिटचे कार्य सुरळीतपणे व्यवस्थित चालू आहे आणि मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व व्यवस्थित चालू आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी तुम्हाला आवश्यक वाटतील अशा उपाययोजना करण्याचा विशेषाधिकार असेल. परंतु, तुमचा विशेषाधिकार कक्षात न घेता मतदान प्रतिनिधींच्या केवळ उपस्थितीतच तुम्ही मतदान कक्षात प्रवेश कराल याबाबत तुम्हाला दक्ष रहावे लागेल (निवडणुका घेणे नियम, १९६१ चा नियम ४९ क्यू).

(दोन) तथापि, निरक्षर मतदारांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर कसा करावा हे सांगण्यासाठी मतदानाच्या वेळी तुम्ही मतदान कक्षामध्ये प्रवेश करता कामा नये. सर्व मतदान केंद्राध्यक्षांना मतदान साहित्य पाठविण्याच्या वेळी इतर मतदान साहित्याबरोबर (योग्य आकाराच्या) पुठ्ठ्यावर चिकटवलेला इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मतदान युनिटचा छापील नमुना पुरविण्याचा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना अनुदेश देण्यात आला आहे, अशा मतदान युनिटचा नमुना छापताना वापरात नसलेले केवळ बनावट (डमी) नाव व डमी चिन्हेच राहतील आणि कोणतीही वास्तविक नावे किंवा चिन्हे असणार नाहीत याबाबत खात्री करण्याची तो काळजी घेईल "निळे बटन", "हिरवा दिवा" व "लाल दिवा" इत्यादी स्पष्टपणे दिसावेत म्हणून हा नमुना रंगीत छापण्यात येईल. जेव्हा जेव्हा एखादा मतदार मदत मागेल किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करून मतदान करण्यास असमर्थता व्यक्त करील तेव्हा तेव्हा, मतदाराला समजू शकेल अशा पध्दतीने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मतदान युनिटचा पुठ्ठ्यावरील छापील नमुन्यामध्ये वापरलेल्या पध्दतीने मतदान करावे असे तुम्ही सांगू शकाल. ही प्रक्रिया फक्त मतदान कक्षाच्या बाहेर मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्येच केली जाईल आणि ती मतदान कक्षात कदापि केली जाणार नाही. तक्रार करण्यास वाव मिळू नये म्हणून तुम्ही किंवा तुमच्या अन्य मतदान कर्मचारी वर्गाने मतदान कक्षामध्ये वारंवार जावू नये.

**४.६. मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट यांची हाताळणी**

**४.६.१ प्रत्यक्ष मतदानादरम्यान युनिटे बदलणे**

**(कोणत्याही प्रकारची यंत्रे बदलण्यापूर्वी नियंत्रण युनिट बंद करा)**

(एक) मतदानादरम्यान, अशी तातडीची परिस्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे नवीन (उपलब्ध यंत्रांऐवजी) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इव्हीएम) आणि व्हीव्हीपॅट यंत्रांचा उपयोग करणे आवश्यक होऊन बसते. अशा परिस्थितीत, तुम्ही **जोडपत्र-६** च्या भाग दोनमध्ये (मागाहून आणलेल्या मतदान यंत्राच्या वापराच्या वेळी मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन) विहित केलेले प्रतिज्ञापन वाचणे आवश्यक आहे.

(दोन) प्रत्यक्ष मतदानादरम्यान मतदान युनिट किंवा नियंत्रण युनिट योग्यप्रकारे कार्य करत नसल्यास संपूर्ण इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इव्हीएम) चे संयोजन (नियंत्रण युनिट, मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट यांसह म्हणजेच तिन्ही) बदलणे अपरिहार्य होऊन बसते. अशा परिस्थितीत, प्रकरण ३ च्या परिच्छेद ३.३ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे अभिरूप मतदान घेण्यात येईल, काही उपाययोजनांमधील फरक पुढीलप्रमाणे देण्यात आला आहे :—

(क) निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला केवळ एक मत देणे (नोटा पर्यायासह).

(ख) तुम्ही व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्या अंतर्भूत असलेल्या लिफाफ्यावर "संपूर्ण इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट संच बदलल्यास घेण्यात आलेल्या अभिरूप मतदानाशी संबंधित व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्या" असे लिहिणे आवश्यक आहे.

(ग) तुम्ही **जोडपत्र-५ च्या मतदान केंद्राध्यक्षाच्या भाग-एक अहवालावर** (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) पुन्हा स्वाक्षरी करणे आवश्यक आहे आणि जोडपत्र-५ च्या भाग-पाच मध्ये मतदान केंद्राध्यक्षाचा अहवालही सादर करणे आवश्यक आहे.

(तीन) प्रत्यक्ष मतदानादरम्यान केवळ व्हीव्हीपॅट यंत्र बदलले असल्यास, अभिरूप मतदान घेण्याची आवश्यकता नाही.

(चार) अभिरूप मतदानादरम्यान किंवा प्रत्यक्ष मतदानादरम्यान किंवा मतदान संपल्यानंतर नियंत्रण युनिटचा पॉवर पॅक बदलावयाचा असल्यास, मतदान केंद्राध्यक्ष क्षेत्र अधिकाऱ्याला कळवील, मतदार प्रतिनिधी व क्षेत्र अधिकाऱ्यासमक्ष पॉवर पॅक बदलील आणि नियंत्रण युनिटचा बॅटरी कक्ष पत्ता खुणचिठ्ठीद्वारे पुन्हा मोहोरबंद करून त्यावर त्यांच्या सह्या घेईल. **मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल (जोडपत्र-५) भाग-दोन मध्ये** सादर करील.

(पाच) नियंत्रण युनिटचा दर्शनी पटलावर "लिंक एरर" असे दर्शवत असल्यास, (एक) प्रत्यक्ष निरीक्षण करून केबल जोडण्या व्यवस्थित असल्याचे तपासा (जोडण्या काढू नका आणि पुन्हा जोडू नका)

(सहा) जर "लिंक एरर" असे अजूनतरीही दिसतच असेल तर, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅटचा संपूर्ण संच बदला.

(सात) जर नियंत्रण युनिट व्हीव्हीपॅटसाठी "लो बॅटरी" दाखवत असेल तर, व्हीव्हीपॅटचा पॉवर पॅक बदला. पुन्हा अभिरूप मतदान घेण्याची आवश्यकता नाही.

(आठ) जर व्हीव्हीपॅट नीट काम करत नसेल तर व्हीव्हीपॅट बदला अशा प्रकरणी पुन्हा अभिरूप मतदान घेण्याची आवश्यकता नाही.

(नऊ) जर व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठी छापत नसेल किंवा छापलेली कागदी चिठ्ठी कापली जात नसेल तर,—

(क) कागदी गुंडाळीमधून लोंबणारी चिठ्ठी काढण्याचा/कापण्याचा प्रयत्न करू नका, ड्रॉप बॉक्समध्ये ती चिठ्ठी पडण्यासाठी कोणताही प्रयत्न करू नये. ती लोंबत्या स्थितीतच राहू द्यावी कारण याचा अर्थ नियंत्रण युनिटमध्ये मत नोंदवले गेले नाही आणि छापील कागदी चिठ्ठ्यांच्या मोजणीच्या वेळी हे मोजले जाणार नाही. अशा घटनांचा तपशील मतदान केंद्राध्यक्षांच्या नोंदवहीत पुढील प्रपत्रात स्पष्टपणे नोंदवण्यात आला पाहिजे :

- घटनेचा दिनांक व वेळ
- मतदार यादीतील भागामध्ये मतदाराचे नाव व त्याचा अनुक्रमांक, ज्याला व्हीव्हीपॅट बदलल्यानंतर मतदान करण्याची परवानगी होती.
- व्हीव्हीपॅट बदलल्यानंतर मतदाराने मतदान केले किंवा मतदान न करता निघून गेला.
- घटना घडण्यापूर्वी एकूण मतांची संख्या

(ख) व्हीव्हीपॅट बदलल्यानंतर शेवटच्या मतदाराला मतदान करण्याची परवानगी आहे.

(दहा) मतदान केंद्राध्यक्षांनी **मतदान केंद्राध्यक्षाचा अहवालाचा भाग-चार** तयार करताना योग्य त्रुटी संकेतांक नीट भरला (लिहला) **सावधगिरी बाळगली** पाहिजे, जसे २.६ कटर त्रुटी/२.७ पडण्याची त्रुटी (फॉल एरर) आणि बीप आवाज ऐकू येत आहे की नाही, नियंत्रण युनिटचा व्यस्त (Busy) दिवा उजळत आहे की नाही इ. चा उल्लेख केला पाहिजे. याचे पालन न केल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

**४.६.२ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलण्यासाठी तयार करावयाचे अहवाल मतदानाच्या दिवशी प्राप्त करण्यात येणारा मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल :– (जोडपत्र ५)**

(एक) भाग-एक (अभिरूप मतदान प्रमाणपत्र). मतदानाच्या दिवशी प्रत्येक अभिरूप मतदान पूर्ण झाल्यानंतर भरण्यात यावे.

(दोन) भाग-दोन (नियंत्रण युनिटचा पॉवर पॅक बदलणे) जेव्हा जेव्हा नियंत्रण युनिटचा पॉवर पॅक बदलण्यात आले असेल तेव्हा तेव्हा भरावा.

(तीन) भाग-तीन क्लोज बटण दाबून (मतदान पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र) : मतदान पूर्ण झाल्यानंतर भरावे.

(चार) भाग-चार (अभिरूप मतदाना दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलल्यास, ते बदलल्याबाबतचा अहवाल). जर एखादे मतदान (बॅलट) युनिट/नियंत्रण युनिट/व्हीव्हीपॅट बदलले असेल तर अभिरूप मतदानादरम्यान भरावे.

(पाच) भाग-पाच (प्रत्यक्ष मतदानादरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट बदलल्यास, ते बदलल्याबाबतचा अहवाल) जर एखादे मतदान युनिट/नियंत्रण युनिट/व्हीव्हीपॅट बदलले असेल तर, प्रत्यक्ष मतदानादरम्यान भरावे.

**४.६.३. मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचे संकलन**

(एक) **मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-एक, भाग-दोन व भाग-तीन** एका लिफाफ्यात ठेवण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्ष हा लिफाफा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट आणि इतर निवडणूक साहित्यासह संकलन केंद्रावर जमा करील.

(दोन) क्षेत्र अधिकाऱ्याकडून जेव्हा जेव्हा कोणतेही यंत्र बदलण्यात येईल तेव्हा **मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-चार व भाग-पाच** संकलित करण्यात येईल. क्षेत्र अधिकारी हे अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला सादर करतील.

# प्रकरण ५

## विशेष प्रकरणे

मतदान प्रक्रियेदरम्यान मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षाला काही विशेष परिस्थितींचा सामना करावा लागू शकतो, ज्या हाताळण्यासाठी वेगवेगळ्या कार्यपद्धतीची आवश्यकता असते. यापैकी काही विशेष प्रकरणे पुढीलप्रमाणे :—

(एक) मतदान प्रक्रियेचे पालन करण्यास नकार देणे ;

(दोन) अंध व विकलांग मतदारांकडून मतदान ;

(तीन) मतदान न करण्याचे ठरविलेले मतदार ;

(चार) निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करून लोकसेवकांनी मतदान करणे ;

(पाच) बदली व्यक्तीद्वारे (प्रॉक्सी) मतदान ;

(सहा) प्रदत्त मत ;

(सात) आक्षेपित मते ;

(आठ) एखाद्या व्यक्तीचे वय अर्हताकारी वयापेक्षा खूप कमी आहे असे तुम्हास वाटते ;

(नऊ) चाचणी मत.

### ५.१. मतदान प्रक्रियेचे पालन करण्यास नकार देणे :

५.१.१ मतदान करण्याची परवानगी असलेला मतदार मतदान केंद्राच्या आत मतदानाची पूर्ण गोपनीयता राखील याची मतदान केंद्राध्यक्षाने खात्री करावी. तो मतदान प्रक्रियेचे काटेकोरपणे पालन करेल (सी.एफ. प्रकरण ४.५.३).

५.१.२ जर एखाद्या मतदाराने तुम्ही मतदान प्रक्रियेचे पालन करण्याची ताकीद देऊन देखील त्याचे पालन करण्यास नकार दिला असेल तर (निवडणुका घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम ४९ड अन्वये) तुम्ही अशा मतदारास मतदान करू देऊ नये. जर अशा मतदारास अगोदरच मतदान चिठ्ठी दिली असेल तर, त्याच्याकडून अशी मतदार चिठ्ठी परत घ्यावी आणि ती रद्द करावी.

५.१.३ एखाद्या मतदाराकडून मतदान प्रक्रियेचा वर नमूद केल्याप्रमाणे भंग झाल्यास त्याची पुढीलप्रमाणे नोंद घ्यावी :—

" मतदान करण्यास परवानगी दिली नाही—मतदान प्रक्रियेचा भंग केला " — असे तुम्ही मतदारनोंदवहीमध्ये (नमुना १७ए) त्या मतदाराच्या संबंधातील नोंदीसमोरील शेऱ्याच्या स्तंभामध्ये लिहावे. तथापि, मतदार नोंदवहीच्या स्तंभ (१) मधील त्या मतदाराच्या (किंवा त्यानंतरच्या कोणत्याही मतदाराच्या) अनुक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.

### ५.२. अंध व अपंग मतदारांकडून मतदान :

५.२.१ एखादा अंध मतदार मतदान युनिटवरील मतपत्रिकेवरील निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या चिन्हांना ओळखू शकत नाही किंवा शारीरिकदृष्ट्या अक्षम मतदार त्यावरील योग्य बटण दाबून त्याचे मत नोंदवू शकत नाही, याबाबत तुमची खात्री पटली असेल तर, तुम्ही त्या मतदारास त्याच्या पसंतीनुसार आणि त्याच्या वतीने मतदान करण्यासाठी, त्याच्या सोबत १८ वर्षांपेक्षा वयाने कमी नसेल अशा एखाद्या सोबत्याला (पण, मतदार छायाचित्र ओळखपत्र / कोणतेही पर्यायी अधिकृत ओळखपत्र बाळगून) मतदान कक्षात नेण्यास परवानगी द्यावी.

५.२.२ शारीरिकदृष्ट्या अक्षम मतदार जे सहजपणे त्यांच्या पसंतीच्या निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराच्या बाजूचे मतदान युनिटवरील बटण दाबून मतदान करू शकतात, त्यांना प्राधिकृत सोबत्याला मतदान कक्षापर्यंत, परंतु मतदान कक्षाच्या आत नाही अशा प्रकारे सोबत नेण्याची परवानगी दिली पाहिजे.

५.२.३ कोणत्याही व्यक्तीला त्याच दिवशी कोणत्याही मतदान केंद्रावर एका मतदारापेक्षा अधिक मतदारांचा सोबती म्हणून काम करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

५.२.४ मतदानाच्या दिवशी पक्की शाई लावण्याबाबतच्या नियमानुसार प्राधिकृत सोबत्यालाही अंतर्भूत केलेले आहे. प्राधिकृत सोबत्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीवर पक्की शाई लावण्यात येईल. प्राधिकृत सोबत्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीची त्यावर आधीपासूनच पक्की शाई लावलेली आहे की नाही हे पाहण्यासाठी आधी तपासणी करण्यात यावी. जर उजव्या हाताच्या तर्जनीवर आधीपासूनच पक्की शाई लावलेली असेल तर, अशा व्यक्तीला संबंधित मतदाराकरिता प्राधिकृत सोबती म्हणून काम करण्याची परवानगी दिली जाणार नाही (नियम ४९ एन–निवडणूक नियमांची नोंदणी, १९६०).

५.२.५ अंध किंवा शारीरिकदृष्ट्या अक्षम मतदाराच्या प्राधिकृत सहकारी म्हणून काम करण्याची परवानगी देण्यापूर्वी, अशा व्यक्तीने संबंधित मतदाराने कोणाच्या बाजूने आपले मत दिले आहे हे तो जाहीर करणार नाही असे लेखी जाहीर करणे आवश्यक आहे. तो लिखित स्वरूपातही घोषित करेल की, त्यादिवशी त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर इतर कोणत्या ही मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही (जोडपत्र–१८). (ज्या नमुन्यात प्रतिज्ञापन करायचे आहे त्याकरिता)

५.२.६ तुम्ही प्राधिकृत सोबत्याच्या मदतीने (नमुना १४ए) [ सीएफ नियम ४९ एल चा उप-नियम (२) ] मतदान केलेल्या मतदारांची नोंद ठेवणे आवश्यक आहे. अशी प्रकरणे जेथे एक प्राधिकृत सोबती केवळ मतदान कक्षापर्यंत नेला गेला आहे (परंतु आत प्रवेश केला नाही) नमुना १४ए मध्ये समाविष्ट केले जाणार नाही.

५.२.७ तुम्ही अशा सर्व प्रकरणांची नमुना १४ए मध्ये नोंद ठेवणे आवश्यक आहे. हा भरलेला नमुना १४ए एका लिफाफ्यात ठेवण्यात येईल, ज्यावर “ स्क्रुटिनी कव्हर ” (पांढरा रंग) असे लिहिण्यात येईल आणि मतदान संपल्यानंतर संकलन केंद्रात जमा करण्यात येईल.

५.२.८ कोणत्याही परिस्थितीत, तुमच्या मतदान कर्मचाऱ्यांमधील कोणताही सदस्य एखादा अंध मतदाराच्या वतीने मतदान करण्यासाठी त्याचा सोबती म्हणून काम करणार नाही.

५.२.९ प्राधिकृत मतदान सोबती मतदाराची मदत केल्यानंतर तात्काळ मतदान केंद्र सोडेल याची तुम्ही खात्री करावी.

५.२.१० अशा मतदारांसाठी तुम्ही ब्रेल चिन्हे (ब्रेल साइन्ज) असल्याची खात्री करावी.

## ५.३. मतदान न करण्याचे ठरविलेले मतदार :

५.३.१ जर एखाद्या मतदाराने, मतदान नोंदवहीमध्ये (नमुना १७ए) त्याच्या मतदार यादीतील नोंदणी क्रमांकाची रीतसर नोंद करण्यात आल्यानंतर आणि त्या नोंदवहीमध्ये त्याने आपली स्वाक्षरी केल्यानंतर/अंगठ्याचा ठसा उमटविल्यानंतर, त्याने मतदान न करण्याचे ठरविले तर, त्याला त्याचे मतदान करण्यासाठी बळजबरी करू नका किंवा भाग पाडू नका.

५.३.२ तुम्ही मतदार नोंदवहीतील, त्यांच्या संबंधातील नोंदीसमोरील शेऱ्याच्या स्तंभामध्ये त्याने मतदान न करण्याचे ठरविले–“ मतदान करण्यास नकार दिला ” अशा अर्थाचा शेरा मारा, त्या शेऱ्याच्या खाली तुम्ही तुमची संपूर्ण स्वाक्षरी करा. जे मतदार नमुना १७ए मध्ये स्वाक्षरी केल्यानंतर मतदान न करता जाऊ इच्छितात त्यांच्याकरिता **मतदान न करता गेला किंवा मतदान करण्यास नकार दिला** असा शेरा नमुना १७ सी च्या भाग एकमधील, नियम ४९-प च्या खाली बाब ३ मध्ये समाविष्ट करावा.

५.३.३ अशा शेऱ्यासमोर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा देखील घेतला पाहिजे.

५.३.४ तथापि, मतदार नोंदवहीच्या स्तंभ (१) मधील त्या मतदाराच्या अनुक्रमांकामध्ये किंवा त्या लगतनंतरच्या कोणत्याही मतदाराच्या अनुक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.

५.३.५ मतदाराने मत नोंदविण्यासाठी मतदान युनिट तयार करण्याकरिता नियंत्रण युनिटावरील “ मतदान ” बटन दाबण्यात आले असेल परंतु त्याने मतदान करण्यास नकार दिला असेल तर, तुम्ही/तिसरा मतदान अधिकारी, यापैकी जो कोणी नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल त्याने वरील **परिच्छेद ५.३.२** अनुसार १७ ए मध्ये आवश्यक शेरा नोंदवल्यावर सरळपणे प्रत्यक्ष दुसऱ्या मतदारास त्याचे मतदान करण्याकरिता मतदान कक्षामध्ये जावयास सांगावे.

५.३.६ जर शेवटच्या मतदाराकरिता मतदान युनिटावर मतदान करण्याकरिता नियंत्रण युनिटवरील “ मतदान ” बटन दाबण्यात आले असेल परंतु त्याने मतदान करण्यास नकार दिला असेल तर, अशा बाबतीत, पहिली उपाययोजना म्हणून तुम्ही/तिसरा मतदान अधिकारी,

यापैकी जो कोणी नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल तो अधिकारी नियंत्रण युनिटचा युनिट बंद करण्याकरिता वीजपुरवठा बंद करील आणि नियंत्रण युनिटापासून व्हिव्हिपीएटी युनिट वेगळे करील. दुसऱ्या टप्प्यात, नियंत्रण युनिटापासून व्हिव्हिपीएटी युनिट (युनिटे) वेगळे केल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा ‘ चालू करावा ’. आता बिझी लॅम्प (दिवा) बंद होईल आणि ‘ बंद ’ बटन मतदानाचे काम बंद करण्याकरिता कार्यरत होईल. अशा प्रकरणी ही संपूर्ण प्रक्रिया अनुसरण्यात आली नसेल तर, **“ बंद ”** बटन काम करणार नाही, आणि नियंत्रण युनिट बंद करणार नाही तोपर्यंत ते निकाल देणार नाही, कारण “ बंद ” हे बटन दाबल्यानंतरच “ निकाल ” बटनदेखील कार्यरत होत असते.

## ५.४. निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करून लोकसेवकांनी मतदान करणे :

५.४.१ सर्वसाधारणपणे ज्या विधानसभा मतदार संघामध्ये जिची नियुक्ती आहे अशा कोणत्याही व्यक्तीला त्या विधानसभा मतदार संघामध्ये मतदानाच्या कामाकरिता नेमण्यात येत नाही. निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेल्या सर्व इतर लोकसेवकांना त्याचे मतदान टपाली मतदान पद्धतीने करण्याचा विकल्प आहे. या विकल्पाचा/सुविधेचा लाभ घेण्यासाठी, त्यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे नमुना-१२ मध्ये अर्ज करावा लागेल.

५.४.२ जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी तुमची मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नियुक्ती केल्याचा आदेश दोन प्रतीमध्ये पाठवील, आणि या आदेशासोबत निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी तुम्हाला तसेच मतदान अधिकाऱ्यांना (पीओ-१, पीओ-२, पीओ-३.........) टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज करता येणे शक्य व्हावे म्हणून/ही सुविधा मिळावी म्हणून नमुना-१२ पुरेशा संख्येने पाठवील.

५.४.३ तुम्हाला नियुक्तीच्या आदेशाच्या प्रतीसोबत भरलेले आवेदनपत्र (नमुना १२) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवून तात्काळ सादर करावे लागेल. मतदान कर्मचाऱ्यांसाठीच्या प्रशिक्षण वर्गामध्येदेखील नमुना १२ सादर करता येईल. मतदान कर्मचारी वर्गाला टपाली मतपत्रिका निर्गमित केल्यानंतर तुम्हाला पोस्टऑफीसमध्ये (डाकघरामध्ये) जाण्याची आवश्यकता पडू नये याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी त्यांचे मतदान सुकर करण्याची व मतपत्रिका आणि संबंधित कागदपत्रे जमा करण्याची प्रशिक्षण केंद्रावर व्यवस्था करील. तथापि, काही मतदान कर्मचाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या मतदार संघामध्ये (विधानसभा किंवा लोकसभा) (म्हणजे जेथे मतदार म्हणून त्यांचे नाव नोंदण्यात आले आहे) नियुक्ती देण्यात आल्याची काही थोडी प्रकरणे असू शकतील. त्यांनी नमुना-१२ मध्ये अर्ज केल्यानंतर त्यांना नि.क.प्र. (ईडीसी) (निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र) देण्यात आले असेल, त्यांना अशा प्रकरणांमध्ये निवडणुकीच्या कामावर/राखीव म्हणून कामावर असलेल्या मतदाराला त्यांना नेमण्यात येईल त्या मतदान केंद्रावर ते इव्हीम/व्हीव्हीपीटएटी द्वारे मतदान करतील. निवडणुकीच्या कामावर/राखीव म्हणून कामावर असलेल्या व्यक्तीच्या नावासमोर मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीत निवडणूक कार्य प्रमाणपत्र दिल्याची नोंद केल्यानंतर त्या व्यक्तीची नेमणूक रद्द करण्यात आली असली किंवा अशी नेमणूक करण्यात आली नसली तरीही त्याचा मतदान करण्याचा हक्क हिरावून घेऊ नये मग ती, अशा व्यक्तीला निवडणूक अधिकारी असो किंवा ज्याला "निवडणूक कार्य प्रमाणपत्र" दिले आहे अशा निवडणुकीच्या कामावर असलेला इतर कोणताही लोकसेवक असो. अशा केंद्रामध्ये निवडणूक कार्याकरिता मुळात ज्या मतदान केंद्रावर तिला नेमण्यात आले असेल त्या मतदान केंद्रासह परंतु, असे निवडणूक कार्य प्रमाणपत्र त्याला दिले गेले असते तर ती ज्या मतदान केंद्रात मत देण्यास हक्कदार असती, अशा मतदान केंद्राखेरीज कोणत्याही मतदान केंद्रात आपले मत देण्याची मुभा द्यावी.

५.४.४ तुमच्या विधानसभा/लोकसभा मतदार संघातील मतदानाच्या दिवसाच्या किमान ०७ दिवसांपूर्वी (सात दिवस किंवा एक आठवडा) टपाली मतपत्रिकेसाठी, नमुना १२ मार्फत तुम्ही (पीओ १, पीओ २, पीओ ३ यांनी देखील) अर्ज करणे आवश्यक आहे.

५.४.५ निवडणूक कार्य प्रमाणपत्राद्वारे मतदान करणारा मतदार (निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणे)–

(अ) अशा मतदाराचे नाव "चिन्हांकित" मतदार यादीतील नोंदविलेल्या शेवटच्या नियमित मतदाराच्या नावानंतर दाखल करण्यात येईल.

(ब) या नोंदीनंतर, संबंधित अधिकारी, या मतदार यादीतील मतदार घेईल. आता तो यादीतील इतर मतदारांप्रमाणे मतदान करील.

(क) मतदार, पहिल्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल तो अधिकारी मतदान प्रतिनिधींना त्या मतदाराबाबत समजावून सांगेल.

(ड) दुसरा मतदान अधिकारी, मतदारांची नोंदवहीत मतदाराचा तपशील पुढीलप्रमाणे नोंदविला उदा. मतदाराचे नाव मुकेश आहे. त्याचा मतदार यादीतील भाग क्रमांक ३२ आणि अनुक्रमांक ६२५ आहे. मतदारांची नोंदवही नमुना १७ए याच्या दुसऱ्या रकान्यात नोंद पुढीलप्रमाणे असेल :—

६२५/३२/विधानसभा प्रभाग क्रमांक

## ५.५. बदली व्यक्तीद्वारे (प्रॉक्सी) मतदान :

५.५.१ अशा विवक्षित सेवेतील मतदारांना बदली व्यक्तीमार्फत मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. अशा सेनादलातील मतदारांना "वर्गीकृत मतदार" (व से म) म्हणून प्रवर्गीकृत करण्यात आले आहे. आपल्या मतदान केंद्राकरिता जर कोणतीही असल्यास, वर्गीकृत सेनादलातील मतदारांची यादी असेल तर निवडणूक निर्णय अधिकारी ती यादी आपणास पुरवील ही वर्गीकृत सेनादलातील मतदारांची यादी, आपल्या मतदान केंद्राच्या मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीचा भाग म्हणून समजण्यात येईल. म्हणून, या बदली व्यक्तीस तुम्ही प्रत्यक्ष मतदारच तुमच्या समोर उभा आहे, असे समजून वागणूक द्यावी.

५.५.२ बदली (Proxy) मतदारांच्या बाबतीत मतदारांच्या नोंदवहीच्या दुसऱ्या स्तंभात (नमुना १७-ए) नोंदवयाचा आपल्या मतदान केंद्रासाठी सेनादलातील वर्गीकृत मतदारांच्या पोट यादीत दिल्याप्रमाणे बदली (Proxy) मतदारांशी संबंधित अनुक्रमांक असेल, तथापि, मतदार यादीच्या मुख्य चिन्हांकित प्रतीतील मतदारांच्या अनुक्रमांमधून बदली मतदाराचा अनुक्रमांक विभिन्न आहे असे दाखविण्यासाठी "बम" (पीव्ही) (बदली मतदाराकरिता) अशी अक्षरे कंसात जोडण्यात यावीत. उदा. बदली (Proxy) मतदाराला सेनादलातील वर्गीकृत मतदारांच्या पोट यादीच्या अनुक्रमांक १ समोर दाखविण्यात आले असेल तर, नमुना १७-ए च्या स्तंभ २ मध्ये नोंद करावयाचा अनुक्रमांक १ (पीव्ही) असा असेल, तर सेनादलातील वर्गीकृत मतदारांच्या पोट यादीच्या अनुक्रमांक ५ मधील बदली मतदारासाठी ५ (बम) (पीव्ही) हा अनुक्रमांक असेल आणि पुढील मतदारांसाठी याप्रमाणे अनुक्रमांक असतील.

## ५.६. प्रदत्त मते :

**प्रदत्त मत**

५.६.१ जिचे नाव चिन्हांकित मतदार यादीतील तो खराखुरा मतदार असू शकतो ; कधी चूक किंवा दोष घेऊन किंवा एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत तोतया असू शकतो अशी एखादी विशिष्ट मतदार म्हणून एखादी व्यक्ती अगोदरच मतदान करून गेली असेल आणि आणखी एखादी व्यक्ती आपणच तो अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे मतदान केंद्रात येऊन सांगू लागली व मतदान करू देण्याची मागणी करू लागेल असे घडू शकेल. अशा प्रकरणामध्ये चिन्हांकित मतदार यादीवर खूण करणारा पी-१ (चिन्हांकित यादीचा प्रभारी) संबंधित मतदार असणाऱ्या व्यक्तीची ओळख पटण्याच्या संबंधात खात्री करून घेईल, आणि त्याने त्याच्या ओळखीसंबंधीची कागदपत्रे सादर केली असतील तर तुम्ही त्याच्या ओळखीबाबत त्याला उलट तपासणीसाठी विचारलेल्या प्रश्नांची त्याने समाधानकारक उत्तरे दिल्यावरून त्याच्या ओळखीबाबत तुमची पूर्ण खात्री पटली पाहिजे. आधी नमूद केल्याप्रमणे, कार्यपद्धती अनुसरल्यावर, जर ती व्यक्ती खरच तो मतदार आहे, याबाबत तुमची खात्री पटल्यासच, तुम्ही संबंधित मतदारास प्रदत्त मतपत्रिकेच्या साधनाने, कोणत्याही परिस्थितीत मतदान यंत्रामार्फत नव्हे, मतदान करू द्या. अशा मतास 'प्रदत्त मत' असे म्हणतात.

५.६.२ प्रदत्त मतपत्रिकेचा आराखडा जसा मतदान केंद्रावरील मतदान यंत्राच्या मतदान युनिटावर प्रदर्शित करण्यासाठी वापरलेला असेल त्याच प्रकारच्या असेल. त्यासाठी प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापर करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी मतदान केंद्रावर २० जादा मतपत्रिका पाठवील. जर कुठल्याही मतदान केंद्रावर वरील प्रयोजनासाठी (उदा. प्रदत्त मतांची संख्या २० पेक्षा अधिक असेल तर) जर अतिरिक्त मतपत्रिका पुरविण्याची आवश्यकता भासली असेल तर, संबंधित मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाने मागणी केल्यावर त्याला त्या मतदान केंद्राचा प्रभारी असलेल्या क्षेत्रीय अधिकाऱ्यामार्फत, क्षेत्रीय दंडाधिकाऱ्यामार्फत अशा अतिरिक्त मतपत्रिका पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

५.६.३ मतदान केंद्रावर तो मतदार स्वतः उपस्थित झाला आहे अशा मतदारास प्रदत्त मतपत्रिका सुपूर्द करण्यापूर्वी तुम्ही मतपत्रिकेच्या मागील बाजूस जर या अगोदर मतपत्रिकेवर "प्रदत्त मतपत्रिका" सदर शब्दांचा शिक्का मारलेला नसेल तर तुमच्या स्वतःच्या हस्ताक्षराने "प्रदत्त मतपत्रिका" असे स्पष्ट अक्षरांनी लिहायला हवे आणि प्रदत्त मतपत्रिकांची आवश्यकता भासली तरच वापर करायला हवा.

५.६.४ प्रदत्त मतपत्रिकांचा हिशेब—

(एक) प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापरण्यासाठी मिळालेल्या,

(दोन) त्या मतदारांना देण्यात आलेल्या आणि,

(तीन) न वापरता परत केलेल्या

अशा सर्व मतपत्रिकांचा बिनचूक हिशेब फॉर्म १७-सी च्या भाग एकच्या बाब क्रमांक ९ मध्ये तुम्ही ठेवायला हवा.

५.६.५ प्रदत्त मतपत्रिका देण्यात आलेल्या मतदारांची नोंद—

(एक) ज्यांना प्रदत्त मतपत्रिका देण्यात आलेल्या आहेत त्या मतदारांची संपूर्ण नोंद तुम्ही फॉर्म १७-बी मध्ये ठेवायला हवी. तुम्ही मतदारांना प्रदत्त मतपत्रिका देण्याआधी त्या फॉर्मच्या स्तंभ (५) मध्ये मतदाराची सही अथवा अंगठ्याचा ठसा घ्यावा.

(दोन) मतदारास प्रदत्त मतपत्रिका देतेवेळी त्याला शाई लावलेला बाणाकृती क्रॉस असलेला रबरी स्टॅम्प द्या. सदर स्टॅम्प म्हणजे मतपत्रिका आणि मतदानासाठी वापरावयाच्या मतपेट्यांच्या पारंपरिक पद्धतीने वापर केला होता, त्या मतपत्रिकांवर खूण करण्यासाठी ज्याचा वापर केला जातो आणि मतदान केंद्रावर वापर करण्यासाठी मतदान साहित्यांतील एक घटक म्हणून ज्याचा पुरवठा केला जातो तो निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेला तो स्टॅम्प होय.

(तीन) प्रदत्त मतपत्रिका मिळाल्यानंतर संबंधित मतदार स्वतंत्र मतदान कक्षात (खास त्याकरिता बनवलेला) मतदान कक्षात जाऊन त्याला ज्या निवडणूक लढवणाऱ्या त्याच्या पसंतीच्या उमेदवारास मतदान करावयाचे आहे. त्या उमेदवाराच्या निशाणीवर किंवा निशाणीजवळ त्या रबरी स्टॅम्पने बाणाकृती क्रॉसची खूण करील.

(चार) त्यानंतर मतदार त्याने दिलेले मत आजूबाजूला दिसणार नाही अशा रीतीने त्या प्रदत्त मतपत्रिकेची घडी करील आणि मतदान खोलीतून बाहेर आल्यानंतर ती तुमच्या स्वाधीन करील.

(पाच) तुम्ही सर्व प्रदत्त मतपत्रिका आणि तयार केलेली अशा प्रदत्त मतपत्रिकांची (यादी फॉर्म १७-बी खास करून याच प्रयोजनाने देण्यात) आलेल्या पाकिटात घाला आणि मतदान बंद झाल्यावर पाकीट सीलबंद करा.

(सहा) अंधपणामुळे अथवा शारीरिक विकलतेमुळे एखादा मतदार आपले मत कोणाच्या तरी मदतीशिवाय नोंदवू शकत नसेल तर या प्रकरणात आधी नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याला त्याच्या बरोबर एका सोबत्याला नेण्याची परवानगी द्यावी.

(सात) **तुम्ही मतदारांची नोंदवही १७ए मध्ये प्रदत्त मतांच्या संदर्भात कोणतीही नोंद करावयाची नाही.**

## ५.७. आक्षेपित मते

५.७.१ विशिष्ट मतदार असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीबाबत, मतदान प्रतिनिधी आक्षेपासाठी रोख रुपये २ (दोन रुपये) जमा करून आक्षेप घेऊ शकतात. तुम्ही संक्षिप्त चौकशीद्वारे आक्षेप निश्चित केला पाहिजे. जर आक्षेप सिद्ध झाला नाही, तर तुम्ही आक्षेपित व्यक्तीला त्याचे मत देण्यास परवानगी दिली पाहिजे. जर आक्षेप सिद्ध झाला तर, तुम्ही केवळ त्याला मतदान करण्यास नकार देऊ नका, तर लेखी तक्रारीसह पोलिसांच्या हवाली करा.

५.७.२ मतदारांच्या ओळखीबाबत आक्षेप घेणे :

जोपर्यंत मतदार बोगस असल्याचे सबळपणे सिद्ध होत नाही तोपर्यंत तो खरा मतदार असल्याचे समजले जाईल. आपण संक्षिप्त चौकशीद्वारे अशा कोणत्याही प्रकरणाची खात्री करणे आवश्यक आहे.

५.७.३ आक्षेप शुल्क :

कोणत्याही परिस्थितीत, संबंधित मतदान प्रतिनिधीने रु. २/- (दोन रुपये) रोख जमा केल्याशिवाय, तुम्ही मतदारांच्या ओळखीबाबत आक्षेप स्वीकारू नये. म्हणून तुम्ही विहित नमुना (जोडपत्र-१९) मध्ये आक्षेप घेणाऱ्या नावाने पावती दिली पाहिजे.—

(एक) तुम्ही आक्षेप घेतलेल्या संशयित मतदाराला तोतयागिरीसाठीच्या दंडनीय परिणामांबद्दल इशारा दिला पाहिजे.

(दोन) त्यानंतर तुम्ही 'चिन्हांकित' मतदार यादीमध्ये दावा केल्या जाणाऱ्या मतदाराशी संबंधित रकान्यातील प्रत्येक नोंद वाचून दाखवली पाहिजे, आणि तोतया म्हणून संशयित असलेल्या मतदारास त्या नोंदीमध्ये असलेली व्यक्ती, तीच आहे किंवा नाही हे सिद्ध करण्याचे आव्हान देईल.

(तीन) सरते शेवटी आक्षेपित मतांच्या यादीमध्ये (उदा. नमुना १४) त्याचे नाव आणि पत्ता नोंदवून त्यावर स्वाक्षरी करण्यास किंवा अंगठ्याचा ठसा घेईल. जर त्याने असे करण्यास नकार दिला तर, त्याला मतदान करण्याची परवानगी देणार नाही.

**५.७.४ संक्षिप्त चौकशी :**

तुम्ही आक्षेपकर्त्याला, आक्षेप घेतलेला व्यक्ती हा दावा करत असलेला मतदार नसल्याबाबतचा पुरावा सादर करण्यास सांगावे. आक्षेपकर्ता आपली बाजू मांडण्यास अयशस्वी झाल्यास, त्याचा आक्षेप अग्राह्य ठरवून, मतदारास मतदान करण्यास परवानगी दिली पाहिजे. आक्षेपकर्त्याने त्याची बाजू मांडल्यास त्या व्यक्तीस आक्षेपाचे खंडन करण्यास सांगावे. म्हणजे आक्षेपित व्यक्तीस त्याची ओळख सिद्ध करण्यासाठी पुरावा देण्यास भाग पाडावे. जर त्या आक्षेपित व्यक्तीने नोंद असलेली व्यक्ती ती स्वतःच आहे हे सिद्ध केले तर तुम्ही त्याला त्याचे मत देण्यास परवानगी दिली पाहिजे व तसे करणे त्या व्यक्तीला शक्य झाले नाही तर, आक्षेप खरा ठरला असे समजावे. तुम्ही त्या भागातील जबाबदार अधिकाऱ्याचे, आक्षेपकाच्या शेजारी राहाणारी व्यक्ती (तुमच्या निदर्शनास आणून देणारे) किंवा या प्रकरणावर अधिक माहिती सांगणारे व्यक्ती अशा कोणत्याही व्यक्तीचे त्याच्या बद्दलचे मत घेवू शकतात. आक्षेप शाबीत झाल्यास तुमचे मतदान केंद्र ज्या पोलीस ठाण्याच्या अधिकार क्षेत्रात येत असेल, त्या पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याच्या नावा **(जोडपत्र-२०)** अनुसार तुमची तक्रार नोंदवून त्या व्यक्तीस कामावर असलेल्या पोलिसाच्या ताब्यात द्यावे.

**५.७.५ आक्षेप शुल्क परत करणे किंवा जप्त करणे :**

संक्षिप्त चौकशीमध्ये आक्षेप खरा असल्याचे आढळल्यास आक्षेप शुल्क रु. २/- जप्त केले जाईल ; तर नमुना-१४ च्या स्तंभ १० मध्ये संबंधित पावती पुस्तकाच्या स्थळप्रतीवर ‘ जप्त ’ या शब्दाची (ठेवीदाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा घेऊ नये) नोंद केली जाईल. याव्यतिरिक्त दुसऱ्या प्रकरणात आक्षेप तसेच राहिल्याचे आढळून आल्यास, नमुना-१४ च्या स्तंभ-१० मध्ये रु. २/- ची पावती त्याच्या स्वाक्षरीनंतर आक्षेपकर्त्याला रु. २/- चे आक्षेप शुल्क परत करावे लागेल. तसेच पावती पुस्तकातील संबंधित पावतीच्या स्थळप्रतीवर “ आक्षेपित मतांची यादी ” असे लिहा.

## ५.८. अर्हताकारी वयापेक्षा कमी वय आहे, असे तुम्हाला वाटलेल्या कोणत्याही व्यक्तीबाबत :

५.८.१ एखाद्या व्यक्तीच्या वयाच्या बाबतीत, त्याचे वय अर्हकारी वयापेक्षा कमी असल्याचे तुम्हाला वाटत असेल अशा प्रकरणात मतदार यादीतील **त्याच्या संदर्भातील नोंदी घेण्याबद्दल** तुमची पूर्ण खात्री असली पाहिजे.

५.८.२ जर, तुम्हाला मतदाराची ओळख सकृत दर्शनी पटली असेल आणि मतदार यादीत त्याच्या नावाचा अंतर्भाव असल्याबद्दल तुमचे समाधान झाले असेल, परंतु त्याचे वय मतदाराच्या किमान वयापेक्षा कमी आहे असे तुम्हाला वाटत असेल तर **जोडपत्र-१५** प्रमाणे त्या मतदाराकडून ज्या मतदार संघाची विद्यमान मतदार यादी ज्या वर्षी तयार केली/सुधारित केली त्यानुसार १ जानेवारी/एप्रिल/जुलै/ऑक्टोबर रोजी त्याचे/तिचे वय किती होते याचे प्रतिज्ञापत्र घेतले पाहिजे. अशा मतदाराकडून प्रतिज्ञापत्र घेण्यापूर्वी, खोटे प्रतिज्ञापत्र लिहून दिल्यास लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ अनुसार त्यासाठी कोणत्या शिक्षेची तरतुद आहे त्याची त्याला माहिती दिली पाहिजे.

५.८.३ तुम्ही ज्याच्याकडून अशी प्रतिज्ञापत्रे घेतली असतील, त्या मतदारांच्या नावांची यादी सुद्धा तुम्ही **जोडपत्र-१६ च्या भाग-एक** अनुसार तयार केली पाहिजे. ज्या मतदारांनी उपरोक्त प्रतिज्ञापत्र देण्याचे नाकारले असून, मतदान न करता जे परत गेले असतील, त्यांच्या नावांची यादी उक्त **जोडपत्र-१६ च्या भाग-दोन** प्रमाणे केली पाहिजे. मतदान संपल्यानंतर, वरील यादी आणि प्रतिज्ञापत्रे एका स्वतंत्र लिफाफ्यात एकत्रित ठेवावीत.

## ५.९ चाचणी मतदान

५.९.१ ज्याठिकाणी विशिष्ट कागदी पावत्यांसाठीचा प्रिंटर वापरण्यात येत असेल, त्याठिकाणी जर मतदाराने नियम ४९एम-क अन्वये त्याचे मत नोंदविल्यावर व्हीव्हीपीएटी मधून बाहेर पडणाऱ्या विशिष्ट कागदी पावतीमधून ज्या उमेदवारास त्याने मत दिले त्यापेक्षा वेगळ्या उमेदवाराचे नाव व निवडणूक चिन्ह दर्शवित असल्याचे, त्याने अभिकथन केल्यास, मतदान केंद्राध्यक्ष, मतदाराकडून खालील दिलेल्या मुद्यांचे अनुसरण करेल.

५.९.२ त्याला लेखी प्रतिज्ञापत्र (जोडपत्र १७) दिल्यास होणाऱ्या परिणामांबाबत इशारा दिल्यावर मतदाराकडून त्याने केलेल्या अभिकथनावरील प्रतिज्ञापत्र लिहून घेईल पोट-नियम (१) अनुसार जर उमेदवाराने लेखी प्रतिज्ञापत्र दिले तर, मतदान केंद्राध्यक्ष नमुना १७- सी मध्ये मतदाराच्या संबंधात दुसऱ्यांदा नोंद करील आणि मतदारास त्याच्या व मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या उमेदवार किंवा मतदान प्रतिनिधी यांच्या समक्ष मतदान यंत्रात एक चाचणी मत देण्यास सांगेल आणि व्हीव्हीपॅट मधून बाहेर पडणाऱ्या विशिष्ट पावतीचे निरीक्षण करील, जर त्याने केलेले अभिकथन खरे असल्याचे निदर्शनास आले तर, मतदान केंद्राध्यक्ष निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास तात्काळ वस्तुस्थितीची माहिती देईल आणि मतदान यंत्रात मत नोंदविणे थांबवील आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निदेशानुसार कृती करील.

५.९.३ तथापि, पोट-नियम (१) अन्वये जर अभिकथन खोटे असल्याचे आढळून येईल आणि पोट-नियम (२) अन्वये मतदाराने नोंदविलेल्या चाचणी मताशी विशिष्ट कागदी पावती जुळत असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष त्या मतदाराच्या संबंधात दुसऱ्यांदा नमुना १७ सी मध्ये केलेल्या नोंदीसमोर ज्या उमेदवारासाठी चाचणी मतदान घेण्यात आले असेल, त्याचे नाव व अनुक्रमांक नमूद करून तशा आशयाचा शेरा लिहील आणि अशा शेऱ्यासमोर मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा घेईल, आणि अशा चाचणी मतासंबंधात नमुना १७ सी च्या भाग १ मधील बाब ५ (जोडपत्र-८) मध्ये आवश्यक त्या नोंदी करील.

## प्रकरण ६

## दंगा, मतदान केंद्रे ताब्यात घेणे, इत्यादींमुळे मतदान तहकूब करणे/थांबवणे

### ६.१ दंगा, इत्यादींमुळे मतदान तहकूब करणे

६.१.१ लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ५७ (१) अन्वये मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाला, पुढील कारणांस्तव मतदान तहकूब करण्याचा अधिकार आहे :—

(एक) पूर, प्रचंड हिमवर्षाव, प्रचंड वादळ आणि तत्सम नैसर्गिक आपत्ती ; किंवा

(दोन) मतदान यंत्र, मतदार यादीची अधिकृत प्रत आणि तत्सम आवश्यक मतदान सामग्री न मिळणे अथवा ती गहाळ होणे वा त्यांना नुकसान पोहोचणे; किंवा

(तीन) मतदान केंद्रावर मतदान घेणे अशक्य होईल अशाप्रकारे शांतताभंग होणे ; किंवा

(चार) मतदान केंद्राकडे यावयाच्या मार्गावर अडथळा निर्माण झाल्यामुळे किंवा अन्य कोणतीही गंभीर अडचण उद्‌भवल्यामुळे मतदानपथक केंद्रावर पोहोचू न शकणे ; किंवा

(पाच) अन्य कोणतेही वाजवी कारण ;

६.१.२ मतदान केंद्राच्या ठिकाणी दंगा किंवा उघड उघड हिंसाचाराचा प्रयत्न झाला तर, तो आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांची मदत घ्यावी, तथापि, त्यांचे नियंत्रण करणे आणि मतदान चालू ठेवणे अशक्य झाल्यास, तुम्ही मतदान तहकूब करावे. वर नमूद केल्याप्रमाणे एखादी नैसर्गिक आपत्ती किंवा इतर वाजवी कारण यामुळे मतदान घेणे अशक्य झाले तरीसुद्धा मतदान तहकूब करावे. पावसाची एखादी सर किंवा सोसाट्याचा वारा आल्यास ही गोष्ट सामान्यतः मतदान तहकूब करण्यास पुरेसे कारण होणार नाही. मतदान तहकुबीबाबत तुम्हाला दिलेल्या विवेकाधिकाराचा वापर तुम्ही क्वचित प्रसंगीच आणि मतदान घेणे अगदी अशक्य झाले असेल अशा परिस्थितीतच केवळ केला पाहिजे. तथापि, मतदान सुरू करण्याच्या वेळेच्या दोन तासात मतदान सुरू होऊ शकणार नाही, अशा सर्व मतदान केंद्रामधील मतदान तहकूब करण्यात येईल असा आयोगाने निर्णय घेतला आहे.

६.१.३ मतदान तहकूब केल्याच्या प्रत्येक बाबतीत, तुम्ही त्याबद्दलची संपूर्ण वस्तुस्थिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला तात्काळ कळवली पाहिजे. ज्या ज्या वेळी मतदान तहकूब केले जाईल त्या त्या वेळी जे मतदान केंद्रावर हजर असतील त्या सर्वांना मागाहून अधिसूचित केले जाईल अशा दिवशी मतदान घेण्यात येईल असे औपचारिकपणे जाहीर करावे.

६.१.४ नेहमीप्रमाणे मतदान संपले आहे असे समजून मतदान प्रतिनिधींच्या समक्ष मतदान यंत्राची दोन्ही युनिटे व्हीव्हीपॅट यंत्र आणि सर्व निवडणूकविषयक कागदपत्रे मोहोरबंद करून सुरक्षित करावीत.

### ६.२ तहकूब केलेले मतदान पूर्ण करणे :

६.२.१ जेव्हा एखाद्या मतदान केंद्रावर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ५७ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये मतदान तहकूब करण्यात आले असेल, तेव्हा ते तहकूब केलेले मतदान, निवडणूक आयोग निश्चित करील अशा दिनांकास व वेळी, तहकूब करण्याच्या लगतपूर्वी ते ज्या टप्प्यावर होते त्या टप्प्यापासून पुन्हा सुरू करण्यात येईल, म्हणजेच ज्या मतदारांनी मतदान 'तहकूब होण्यापूर्वी' मतदान केले नसेल त्यांनाच केवळ या तहकुबीनंतर पुन्हा सुरू झालेल्या मतदानाच्या वेळी मतदान करण्याची परवानगी देण्यात येईल. निवडणूक निर्णय अधिकारी, ज्या मतदान केंद्रावर असे तहकुबीनंतरचे मतदान घेण्यात येईल त्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाला, मतदारयादीची चिन्हांकित प्रत व त्या मतदान केंद्रावर यापूर्वी वापरण्यात आलेली नमुना १७ (सी) मधील मतदारांची नोंदवही अंतर्भूत असलेली मोहोरबंद पाकिटे आणि नवीन मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट यंत्र उपलब्ध करून देईल.

६.२.२ तहकूब केलेले मतदान पुन्हा सुरू करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष, मतदारयादीची चिन्हांकित प्रत व मतदारांची नोंदवही अंतर्भूत असलेले मोहोरबंद पाकीट मतदान केंद्राच्या ठिकाणी उपस्थित निवडणूक लढवणारा उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष पुन्हा उघडील, आणि मतदारयादीची तीच चिन्हांकित प्रत व मतदारांची नोंदवही तहकुबीनंतरच्या मतदानासाठी वापरण्यात येईल.

६.२.३ नियम २८ व ४९-क ते ४९-फ च्या तरतुदी, मतदान तहकूब होण्यापूर्वी त्या मतदानाला ज्याप्रमाणे लागू होत्या त्याचप्रमाणे या तहकुबीनंतर सुरू करण्यात आलेले मतदान घेण्याबाबत देखील त्या लागू होतील.

६.२.४ मतदान पथक न आल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे जेथे मतदान सुरू होऊ शकले नसेल त्याबाबतीत, उपरोक्त नियमांच्या तरतुदी त्या मूळ मतदानाला ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे अशा प्रत्येक तहकूब केलेल्या मतदानाला लागू होतील.

## ६.३ मतदान यंत्रात बिघाड होणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे, इत्यादींमुळे मतदान थांबवणे :

६.३.१ निवडणूक आयोगाला, लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ५८, ५८-क अन्वये त्या मतदान केंद्रावरील मतदान रद्दबातल केल्याचे घोषित करण्याचा आणि नवीन निवडणूक घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे.—

(क) कोणत्याही अनधिकृत व्यक्तीने कोणतेही मतदान यंत्र बेकायदेशीरपणे पळवून नेले असेल तर ; किंवा

(ख) कोणतेही मतदान यंत्र आकस्मिकरीत्या किंवा उद्देशपूर्वक नष्ट झाले/करण्यात आले किंवा गहाळ झाले/करण्यात आले किंवा त्याचे नुकसान झाले/करण्यात आले किंवा त्यात अनधिकृत फेरफार झाले/करण्यात आले असतील तर; आणि त्या कारणास्तव त्या मतदान केंद्राचा निकाल घोषित करणे शक्य होणार नसेल तर; किंवा

(ग) मतदान करण्याच्या ओघात, कोणत्याही मतदान यंत्रात यांत्रिक बिघाड झाला असेल तर, किंवा

(घ) ज्यामुळे मतदान निष्फळ होण्याची शक्यता आहे, अशी चूक वा नियमबाह्य गोष्ट प्रक्रियेमध्ये झाली असेल तर, किंवा

(ङ) मतदानकेंद्र ताब्यात घेण्यात आले असेल तर (उक्त अधिनियमाच्या कलम १३५-क मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे)

६.३.२ तुमच्या मतदानकेंद्रावर असा कोणताही प्रसंग घडल्यास तुम्ही ताबडतोब ती वस्तुस्थिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवा, तो त्याबाबतीत आयोगाचे निदेश घेण्याकरिता ती बाब निवडणूक आयोगाला कळविल.

६.३.३ सर्व महत्त्वाची परिस्थिती विचारात घेतल्यानंतर, जर आयोगाने त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्याचे निदेश दिले तर मूळ मतदान ज्या पद्धतीने घेतले जाते त्याच पद्धतीने हे नवीन मतदान घेण्यात येईल. निवडणूक निर्णय अधिकारी यासंबंधातील निदेश देईल.

६.३.४ प्रस्तुत मतदान केंद्रामध्ये मतदान करण्यास हक्कदार असलेले सर्व मतदार या नवीन मतदानाच्या वेळी पुन्हा मतदान करण्यास हक्कदार असतील. मूळ मतदानाच्यावेळी केलेल्या पक्क्या शाईच्या खुणा या नवीन मतदानाच्या वेळी विचारात घेऊ नका. आयोगाने असा निदेश दिला आहे की, नवीन मतदानाच्या वेळी करावयाच्या पक्क्या शाईच्या खुणा मूळ मतदानाच्या वेळी केलेल्या खुणांपेक्षा वेगळ्या कळाव्यात म्हणून नवीन मतदानाच्या वेळी मतदाराच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटावर नवीन मतदानाच्या बाबतीत पक्क्या शाईची खूण करावी.

## ६.४ मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या प्रसंगी मतदान यंत्र बंद करणे :

६.४.१ निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम ४९-य मध्ये अशी तरतूद केली आहे की, जेव्हा एखाद्या मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाचे असे मत होईल की, त्या मतदान केंद्रावर मतदान केंद्र ताब्यात घेतले जात आहे त्याबाबतीत, तो मतदान यंत्रात आणखी कोणतेही मत नोंदविता येऊ शकणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी तात्काळ मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट बंद करील आणि मतदान युनिट नियंत्रण युनिटापासून वेगळे करील.

६.४.२ जेव्हा तुमची पक्की खात्री झाली असेल की, मतदान केंद्र ताब्यात घेतले जात आहे तेव्हाच तुम्ही वर नमूद केल्याप्रमाणे मतदान यंत्र बंद करण्याचा उपाय योजला पाहिजे. मात्र मतदान केंद्र ताब्यात घेतले जाण्याच्या संभाव्यतेबद्दल केवळ धास्ती किंवा शंका वाटत असेल तर मतदान यंत्र बंद करण्याचा उपाय योजू नये. याचे कारण असे की, एकदा का क्लोज बटण दाबून नियंत्रण युनिट बंद करण्यात येईल तेव्हा मतदान यंत्र पुढील कोणत्याही मतांची नोंद करणार नाही आणि त्या मतदान केंद्रावर पुढील मतदान घेण्यासाठी तुम्हाला नवीन मतदान यंत्र पुरविण्यात येईपर्यंत एकतर एका दिवसासाठी किंवा काही कालावधीसाठी मतदान स्थगित करणे अनिवार्य आहे.

६.४.३ तुम्ही निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम ४९-य अन्वये मतदान यंत्र बंद केल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, तुम्ही संपूर्ण वस्तुस्थितीसह ही बाब निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास तात्काळ कळविली पाहिजे. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, उपलब्ध असलेल्या संदेश वाहणाऱ्या जलदगती साधनाद्वारे या प्रकरणाची संपूर्ण वस्तुस्थिती निवडणूक आयोगास कळवील.

६.४.४ निवडणूक आयोग, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर आणि सर्व महत्त्वपूर्ण परिस्थिती विचारात घेतल्यानंतर—

(क) ते मतदान त्या टप्प्यापर्यंत निष्फळ झालेले नव्हते अशी त्याची खात्री पटली असेल तर, एकतर नवीन मतदान यंत्र पुरवून त्याद्वारे ज्या टप्प्यानंतर मतदान तहकूब करण्यात आले होते त्या टप्प्यापासून स्थगित केलेले मतदान पूर्ण करण्याचा निर्णय घेऊ शकेल ; किंवा

(ख) ते मतदान निष्फळ झाले होते अशी त्याची खात्री पटली असेल तर, त्या मतदान केंद्रावरील मतदान रद्दबातल केल्याचे घोषित करू शकेल आणि त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्याचा निदेश देऊ शकेल.

६.४.५ जेव्हा उपरोक्त परिच्छेद ६.४.१ नुसार मतदान यंत्र बंद झाल्याने त्या दिवसासाठी मतदान तहकूब केले असेल त्याबाबतीत, मतदान यंत्र व सर्व निवडणूकविषयक कागदपत्रे, मतदान समाप्त केल्यावर ज्या रीतीने मोहोरबंद करून सुरक्षित करण्यात येते त्याच रीतीने मोहोरबंद करून सुरक्षित करण्यात येईल.

६.४.६ उपरोक्त या आधीच नमूद केल्यानुसार आयोगाने निदेश दिल्याप्रमाणे तहकूब केलेले मतदान पूर्ण करण्याची किंवा यथास्थिति, नव्याने मतदान घेण्याची पुढील उपाययोजना करील.

# प्रकरण ७

## मतदान समाप्त करणे

### ७.१ मतदान समाप्त होण्याच्या वेळेस मतदान केंद्रावर हजर असलेल्या व्यक्तींनी करावयाचे मतदान

७.१.१ मतदान सुरू करण्यासाठी नेमून दिलेली वेळ होऊन गेली, तरीही काही अनिवार्य कारणास्तव मतदान उशीरा सुरू करण्यात आले असले तरीही मतदान, त्या प्रयोजनार्थ नेमून दिलेल्या वेळीच संपले पाहिजे. तथापि मतदान समाप्त करण्यासाठी नेमून दिलेल्या वेळेनंतर मतदाराला मतदान करू दिले जाणार नाही असा याचा अर्थ होणार नाही. मतदान समाप्त करण्यासाठी नेमून दिलेल्या वेळी मतदान केंद्रावर जे मतदार उपस्थित आहेत अशा सर्व मतदारांना नेमून दिलेली मतदान समाप्तीची वेळ होऊन गेल्यानंतर काही वेळ मतदान चालू ठेवावे लागले तरीही, मतदान करू दिले पाहिजे तुम्हाला हे लक्षात घ्यावे लागेल.

७.१.२ मतदानासाठी नेमून दिलेली अखेरची वेळ संपण्यास काही मिनिटाचा अवधी असताना, मतदान केंद्राच्या कक्षेत असलेल्या व मतदान करण्यासाठी थांबलेल्या सर्व व्यक्तींना, रांगेतील त्यांच्या क्रमांकानुसार मतदान करण्यास परवानगी देण्यात येईल असे घोषित करावे. अशा सर्व मतदारांना तुमची पूर्ण सही असलेल्या चिठ्ठ्या वाटा. या चिठ्ठ्यांना अनुक्रमांक १ पासून त्यावेळी रांगेत उभ्या असलेल्या मतदारांच्या संख्येइतके अनुक्रमांक असावेत. रांगेतील शेवटच्या मतदारास क्रमांक १ आणि त्याच्या/तिच्या अगोदर असलेल्या मतदारास क्रमांक २ असे आणि त्याप्रमाणे पुढील क्रमांक असे पुढे वाटत यावेत. या सर्व मतदारांचे मतदान पूर्ण होईपर्यंत मतदानासाठी नेमून दिलेली वेळ संपल्यावरदेखील हे मतदान चालू ठेवा. मतदानासाठी नेमून दिलेली वेळ संपल्यानंतर या रांगेत अन्य कोणतीही व्यक्ती घुसू नये म्हणून लक्ष ठेवण्यासाठी पोलीस किंवा अन्य कर्मचारी यांची नेमणूक करा. रांगेत उभ्या असलेल्या अशा सर्व मतदारांना, रांगेतील उभ्या असलेल्या शेवटच्या मतदारापासून चिठ्ठ्या देण्यास प्रारंभ करून उलट दिशेने रांगेतील पहिल्या व्यक्तीपर्यंत चिठ्ठ्या वाटत आल्यास, हे काम सुरळीत होईल.

### ७.२ मतदान समाप्ती

७.२.१ आधीच्या परिच्छेदात तरतूद केल्याप्रमाणे, मतदानासाठी नेमून दिलेल्या अखेरच्या वेळेस मतदान केंद्रावर जे मतदार हजर असतील अशा सर्व मतदारांनी मतदान केल्यानंतर तुम्ही मतदान समाप्त झाल्याचे अधिकृतरित्या जाहीर करा व त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीला मतदान करण्याची परवानगी देऊ नका.

७.२.२ **सर्व मतदान केंद्राध्यक्षांनी, मतदान समाप्तीच्या वेळी उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या समोर " बंद बटन " दाबून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र बंद करावे.** " बंद बटन " दाबल्यावर, नियंत्रण युनिटच्या दर्शनी पटावर मतदान समाप्त झाल्यावर, मतदान यंत्रात नोंदविण्यात आलेल्या मताची एकूण संख्या (उमेदवारनिहाय तालिका नव्हे) दिसेल. तुम्ही नमुना १७-ग च्या (जोडपत्र-८) भाग एकच्या बाब क्र. ६ मध्ये मतदान यंत्रात नोंद झालेल्या एकूण मतांची संख्या तात्काळ नोंदवा. निकाल विभागातील एका कक्षांमध्ये त्याच्या डाव्याबाजूच्या बाह्य आवरणावरील निळ्या रंगाच्या रबरी टोपी खाली ''क्लोज'' बटनाची तरतूद केलेली असून रबरी टोपी सहजगत्या ओढल्यानंतर त्यांच्यांपर्यंत पोहोचता येते. ''क्लोज'' बटन दाबल्यानंतर व मतदान समाप्त झाल्यानंतर " रबरी टोपी " पुन्हा त्या जागी लावावी.

७.२.३ एकदा का ''क्लोज'' बटन बंद केले की, मतदान यंत्र आणखी कोणतीही मते स्वीकारणार नाही. म्हणून तुम्ही ''क्लोज'' बटन दाबण्यापूर्वी, अत्यंत जागृत रहा व पूर्णपणे खात्री करा की मतदान समाप्ती करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी उपस्थित असलेला कोणीही मतदार मतदान करण्याचा राहणार नाही.

७.२.४ जेव्हा नियंत्रण युनिटवरील ''बीझी'' दिवा " ON " (चालू) नसतो तेव्हाच केवळ ''क्लोज'' बटन कार्य करील याची देखील नोंद घ्या, म्हणजेच मतदान करण्यास परवानगी दिलेला शेवटचा मतदारच (मतदान युनिटवरील निळे बटन दाबून) केवळ त्याचे मत नोंदविल. जर शेवटच्या मतदाराने त्याचे मत नोंदविल्यानंतर शेवटच्या मतदारासाठी मतदान बटन दाबल्यानंतर नजरचुकीने ''मतदान'' बटन दाबले गेल्यामुळे किंवा अशा शेवटच्या मतदाराने त्याचे मत नोंदविण्यास नकार दिल्यामुळे ''बीझी'' दिवा चालू (ON) राहिला असेल तर. नियंत्रण युनिटच्या पश्र्च कक्षामधील पॉवर स्वीच (बटन) बंद (Off) करून आणि नियंत्रण युनिटापासून व्हीव्हीपॅट युनिट अलग करून ''बीझी'' दिवा बंद करता येऊ शकेल, नियंत्रण युनिटापासून व्हीव्हीपॅट युनिट अलग केल्यानंतर ''पॉवर'' (वीज पुरवठा) पुन्हा चालू (ON) स्थितीत ठेवा. आता ''बीझी'' दिवा बंद होईल आणि ''क्लोज'' बटन कार्यरत होईल.

७.२.५ मतदान बंद झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी नियंत्रण युनिटवर दिसणारा मतदान संपल्याचा दिनांक व वेळ याची मतदान केंद्राध्यक्षांच्या दैनंदिनीमध्ये नोंद करावी.

७.२.६ मतदान बंद झाल्यानंतर, मतदान केंद्राध्यक्षांनी अहवालाचा (जोडपत्र-५) चा भाग-३ तयार करावा.



७.२.७ मतदान समाप्तीनंतर मतदान केंद्राध्यक्षांनी नमुना १७ अ मधील शेवटच्या नोंदीनंतर एक रेघ ओढावी आणि त्याखाली " नमुना १७ **अ** मधील शेवटच्या नोंदीचा अनुक्रमांक ...... असा आहे अशी नोंद करून स्वाक्षरी करावी " आणि या नोंदीखाली उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी घ्यावी.

७.२.८ मतदान केंद्राध्यक्षांनी, मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅट मधून पॉवर पॅक (बॅटरी) काढून टाकावी. पॉवर पॅक बॅटरी (व्हीव्हीपॅट) काढून टाकल्यानंतर, मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅटच्या वहन पेटीत मोहोरबंद करावे.

## ७.३ नोंदविलेल्या मतांचा हिशेब

### ७.३.१ नोंदलेल्या मतांचा हिशेब तयार करणे

(एक) मतदान समाप्त झाल्यानंतर, तुम्ही निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम ४९-प अनुसार मतदान यंत्रामध्ये नोंदविलेल्या मतांचा हिशेब द्विप्रतीत तयार केला पाहिजे. असा हिशेब तुम्ही नमुना १७-सी च्या भाग एक मध्ये तयार केला पाहिजे.

(दोन) परिच्छेद ७.२.२ मध्ये यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे, मतदान संपल्यावर मतदान यंत्रात नोंदवल्या गेलेल्या मतांची एकूण संख्या "क्लोज" बटन दाबून निश्चित करता येईल. आवश्यक असेल तर आवश्यक ती माहिती मिळण्यासाठी ते बटन पुन्हा दाबता येऊ शकेल.

(तीन) **मतदान यंत्रात नोंदविलेल्या मतांची एकूण संख्या ही मतदारांच्या नोंदवहीच्या नमुना १७-ए च्या स्तंभ (एक) मध्ये नोंदविलेल्या एकूण मतदारांची संख्या वजा ज्या मतदारांनी मतदान करायचे नाही असे ठरविले आहे त्या मतदारांची संख्या (त्या नोंदवहीच्या शेऱ्याच्या स्तंभानुसार) आणि तसेच वजा मतदानाच्या गुप्ततेचा/मतदान प्रक्रियेचा भंग केल्यामुळे (उक्त नोंदवहीच्या शेऱ्याच्या स्तंभानुसार) तुम्ही मतदान करण्यास परवानगी न दिलेल्या मतदारांची संख्या यांच्या इतकी असली पाहिजे, हे तुम्ही विसरता कामा नये. ज्या मतदान केंद्रामध्ये VVPAT चा वापर केला असेल, त्या बाबतीत नियम ४९ एमए(२) अनुसार नोंद केलेल्या चाचणी मतांचा हिशेब नमुना १७-सी च्या भाग एक च्या अ.क्र. ५ येथे नमूद करणे आवश्यक आहे.**

(चार) तुमच्या माहितीसाठी नमुना १७-सी च्या जोडपत्र ८ मध्ये दिलेला आहे.

(पाच) नमुना १७-सी मध्ये नोंदविलेल्या मतांचा हिशेब सही करून " नोंदविलेल्या मतांचा हिशेब " असा मजकूर लिहिलेल्या स्वतंत्र लिफाफ्यात तुम्ही ठेवला पाहिजे.

### ७.३.२ नोंदलेल्या मतांच्या हिशेबाच्या प्रमाणित प्रती मतदान प्रतिनिधींना देणे

(एक) उक्त नियम ४९-प अन्वये, नमुना १७-सी मध्ये तुम्ही तयार केल्याप्रमाणे नोंदलेल्या मतांच्या हिशेबाची एक सत्य प्रमाणित प्रत मतदान समाप्त होण्याच्या वेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक मतदान प्रतिनिधीस त्या मतदान प्रतिनिधींकडून पोचपावती घेतल्यानंतर देणे आवश्यक आहे. मतदान प्रतिनिधींनी हिशेबाच्या प्रतीची मागणी केली नाही तरी देखील प्रत्येक मतदान प्रतिनिधीस हिशेबाची प्रत दिली पाहिजे.

मतदान यंत्रासह मूळ नमुना १७-सी मतदान साहित्य संकलन केंद्रावर (मतदान केलेले इलेकट्रॉनिक मतदान यंत्र सुरक्षित कक्षात) जमा करावी लागेल. नमुना १७-सी ची दुसरी प्रत देखील मतदान साहित्य संकलन केंद्रावर जमा करण्यात येईल.

(दोन) नमुना १७ मध्ये नोंदलेल्या मतांच्या हिशेबाच्या आवश्यक तितक्या प्रती तयार करणे तुम्हाला शक्य व्हावे म्हणून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येइतक्या व अधिक मूळ हिशेबासाठी जादा एक किंवा दोन इतक्या छापील नमुन्याच्या (नुमना १७-सी) प्रती तुम्हाला पुरविण्यात येतील. शक्य असल्यास, तुम्ही मूळ हिशेबाची नोंद करीत असतानाच कार्बन पेपरच्या सहाय्याने आवश्यक तितक्या जादा प्रती तयार करा म्हणजे मतदान प्रतिनिधींना पुरविलेल्या अशा सर्व प्रती आणि मूळ हिशेब यांवरील नोंदी प्रत्येक बाबतीत सारख्याच राहतील.

(तीन) संसद (लोकसभा) व राज्य विधानसभा यांच्या एकत्रित निवडणुकांमध्ये नमुना १७-सी मध्ये नोंदलेल्या मतांचा हिशेब संसद (लोकसभा) व विधानसभा निवडणुकींसाठी स्वतंत्रपणे तयार केला पाहिजे ही बाब लक्षात ठेवा. विधानसभा निवडणुकीसाठी नमुना १७-सी च्या प्रती विधानसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या प्रतिनिधींना द्या आणि संसदीय निवडणुकीसाठी नमुना १७-सी च्या प्रती, संसदीय निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या प्रतिनिधींना द्या.

### ७.३.३ मतदान समाप्त झाल्यावर करावयाचे प्रतिज्ञापत्र

नोंदलेल्या मतांच्या हिशेबाच्या प्रती सादर करण्यासंबंधातील नियम ४९-प च्या उपरोल्लिखित आवश्यकतांची तुम्ही मतदान प्रतिनिधींना पूर्तता केली आहे याची सुनिश्चिती करण्यासाठी, आयोगाने एका प्रतिज्ञापत्राची **भाग-तीन (जोडपत्र ६)** योजना केली असून ते मतदान संपल्यावर तुम्ही करावयाचे व पूर्ण करावयाचे आहे.

### ७.४ मतदान समाप्त झाल्यानंतर ईव्हीएम मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट मोहोरबंद करणे

७.४.१ मतदान समाप्त झाल्यानंतर आणि मतदान यंत्रात नोंदवल्या गेलेल्या मतांचा हिशेब नमुना १७-क मध्ये लिहून ठेवल्यानंतर आणि त्याच्या प्रती उपस्थित मतदान प्रतिनिधींना सादर केल्यानंतर ती मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट यंत्रे मतदान मतमोजणी संकलन केंद्राकडे पाठविण्यासाठी मोहोरबंद व सुरक्षित करावी.

७.४.२ मतदान यंत्रे व व्हीव्हीपॅट मोहोरबंद आणि सुरक्षित करण्यासाठी नियंत्रण युनिटामधील " पॉवर स्वीच " " ऑफ " (बंद) करावा आणि मतदान युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट व व्हिव्हिपीएटी प्रिंटर अलग करावे. व्हीव्हीपॅटच्या ड्रॉप बॉक्सला असलेली कागदीपट्टी (पेपर स्लीप) जशीच्या तशी असल्याची खात्री करावी. मतदान संपल्यानंतर (व्हीव्हीपॅट) मधून पॉवर पॅक (बॅटरी) काढून मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅट मोहोरबंद करून वहन पेटीत टाकावी. आता मतदान युनिट (युनिटे), नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅट अनुक्रमे त्या त्या वहन पेट्यामध्ये ठेवावीत.

७.४.३ त्यानंतर प्रत्येक वहन पेटी, वहन पेट्यांच्या दोन्ही बाजूस मोहोरबंद करण्यासाठी तरतूद केलेल्या दोन छिद्रांमधून धागा ओवून मोहोरबंद करा आणि मोहोरबंद केलेल्या धाग्यास मतदान केंद्राध्यक्षाची मोहोर व निवडणूक मतदान केंद्र आणि त्यात अंतर्भूत असलेली युनिटे यांचा तपशील दर्शविणारा पत्ता खूणचिठ्ठी (Address Tag) लावून आणि दिनांकासह मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी घेऊन ते मोहोरबंद करा.



७.४.४ नियंत्रण युनिट, मतदान युनिट व व्हिव्हिपीएटी यावरील पत्ता खूणचिठ्ठीवरील तपशील प्रकरण तीनच्या परिच्छेद ७.२.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. मतदान केंद्रावर उपस्थित असलेले निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना या वहन पेट्यांवरील खूणचिठ्ठीवर मोहोर लावण्याची इच्छा असल्यास त्यांना त्यासाठी परवानगी दिली जावी.

७.४.५ ज्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी/मतदान प्रतिनिधींनी नियंत्रण युनिट, मतदान युनिट (युनिटे) व व्हिव्हिपीएटी यांच्या वहन पेट्यांवरील खूणचिठ्ठीवर आपली मोहोर लावली आहे. त्यांची नावे तुम्ही मतदान समाप्तीच्या वेळी करावयाच्या प्रतिज्ञापनामध्ये नोंदवावी. जोडपत्र ६ चा भाग-चार पहा.

## ७.५ निवडणुकविषयक कागदपत्रे मोहोरबंद करणे

### ७.१. निवडणुकविषयक कागदपत्रे पाकिटात मोहोरबंद करणे :—

(एक) मतदान समाप्त झाल्यानंतर, मतदानाशी संबंधित असलेली सर्व निवडणुकविषयक कागदपत्रे निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ याच्या नियम ४९-यू अनुसार आवश्यक त्याप्रमाणे स्वतंत्र लिफाफ्यात घालून मोहोरबंद करावीत (जोडपत्र २).

(दोन) परिच्छेद ७.५.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अशाप्रकारे सीलबंद केलेले सर्व लिफाफे संकलन केंद्रावर नेले जातील आणि संकलन केंद्र-नि-सुरक्षित कक्षामधील निवडणूक निर्णय अधिकारी किंवा प्रभारी अधिकारी यांच्या सूपूर्द केले जातील.

(तीन) "इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कागद" यावर लिहिलेल्या मोठ्या **पांढऱ्या रंगाच्या** ज्यामधे (एक) नोंदवलेल्या मतांचा हिशेब असलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा (नमुना-१७सी) (दोन) मतदान केंद्राध्यक्षांचा अहवाल १ (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) दोन व तीन लिफाफ्यामध्ये मोहोरबंद न करता टाकणे आणि (तीन) अभिरूप मतदानाच्या छापील व्हीव्हीपॅटच्या कागदी चिठ्ठ्या असलेला मोहोरबंद काळा लिफाफा मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) सुरक्षित कक्षामध्ये मतदान केलेल्या इव्हीएमसह ठेवले जातील.

(चार) तुम्ही मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या प्रत्येक निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस अथवा त्याच्या मतदान प्रतिनिधीस खालील कागदपत्रे अंतर्भूत असलेले लिफाफे आणि पाकिटे यांवर आपआपल्या मोहोरा लावण्यास अनुमती द्यावी,—

(अ) मतदार यादीची चिन्हांकित प्रत.

(ब) मतदार नोंदवही.

(क) मतदार चिठ्ठी.

(ड) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना १७-बी मधील प्रदत्त मतपत्रिकांची यादी.

(ई) न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका.

(फ) आक्षेपित मतांची यादी.

(ग) असल्यास, न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरा.

(ह) मतदान प्रतिनिधींची नियुक्ती पत्रे ; आणि

(आय) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मोहोरबंद पाकिटात ठेवण्याचा निदेश दिला आहे अशी अन्य कोणतीही कागदपत्रे.

७.५.२ **" सांविधिक लिफाफे " (Statutory) आणि " असांविधिक लिफाफे " (Non-Statutory) आणि निवडणूक सामग्री यांची बांधाबांध (जोडपत्र-२२).**

(एक) मोहोरबंद मतदान यंत्रे, व्हिव्हिपीएटी निवडणुकविषयक कागदपत्रे व इतर सर्व सामग्री जमा करण्याच्या ठिकाणी थांबावे

लागल्याने होणारा विलंब व गैरसोय टाळण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे तुम्ही लिफाफे व इतर सामग्री सहा निरनिराळ्या पाकिटांमध्ये बांधून ठेवावी आणि ती स्वीकारण्यासाठी जी जागा (संकलन केंद्र) निश्चित केली असेल त्या जागी नेऊन पोहोचवावी.

(दोन) वर उल्लेख केलेल्या सांविधिक लिफाफे किंवा असांविधिक लिफाफ्यामध्ये कोणतेही विवरणपत्र किंवा अभिलेख काही नाही असा असला तरीसुद्धा त्या लिफाफ्यामध्ये चिठ्ठी घालावी व त्या चिठ्ठीवर " काही नाही " असे लिहून लिफाफे मोहोरबंद करून मोठ्या लिफाफे तयार करावेत. म्हणजे संकलन केंद्रावर लिफाफे स्वीकारणाऱ्या कर्मचाऱ्यांना तुमच्याकडून स्वीकारावयाच्या मोहोरबंद लिफाफ्यापैकी अमूक एक मोहोरबंद लिफाफा का मिळाला नाही याची चौकशी करावी लागणार नाही.

(तीन) **पहिल्या पाकिटात (पांढऱ्या रंगाचे) खाली नमूद केलेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कागद व त्यावर " इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे आवरण " (EVM Paper Covers) असे लिहावे :—**

(अ) मतदारांनी नोंदवलेल्या मतांचा हिशेब (नमुना-१७सी) असलेला लिफाफा.

(ब) मतदान केंद्राध्यक्षांचा अहवाल (एक) (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) दोन व तीन असलेला लिफाफा.

(क) व्हिव्हिपीएटीद्वारे छपाई केलेल्या अभिरूप मतदानाच्या असलेल्या कागदी चिठ्ठ्या काळ्या रंगाच्या लिफाफ्यात ठेवाव्यात.

**टीप.—**वरील सर्व निवडणुकी संदर्भातील कागदपत्र पांढऱ्या रंगाच्या मोठ्या (मुख्य) लिफाफ्यामध्ये मोहोरबंद न करून ठेवावेत (लिफाफा क्र. १/१) आणि मतदान केलेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सुरक्षित कक्षात ठेवले पाहिजे.

विधानसभा आणि लोकसभेची एकाचवेळी निवडणूक झाल्यास, विधानसभा निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील कागदासाठी एक अतिरिक्त गुलाबी लिफाफा आणि मतदारांनी नोंदलेल्या मतांच्या (नमुना-१७सी) हिशेबासाठी एक अतिरिक्त गुलाबी लिफाफा तसेच मतदान केंद्राध्यक्षांचा अहवाल (अभिरूप मतदान प्रमाणपत्र) दोन व तीन ठेवण्यासठा एक अतिरिक्त गुलाबी लिफाफा आणि विधानसभा निवडणुकीच्या इव्हीएमसाठी अभिरूप मतदानाच्या व्हिव्हिपीएटी च्या कागदी चिठ्ठ्या काळ्या रंगाच्या अतिरिक्त लिफाफ्यात ठेवाव्यात.

(चार) दुसऱ्या पाकीटामध्ये (पांढऱ्या रंगाचे) खालीलप्रमाणे नमूद केलेले मोहोरबंद न केलेले/मोहोरबंद केलेले लिफाफे आणि 'छाननी केलेले पाकीट' असे लिहावे.

(अ) मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी ठेवलेला मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(ब) मतदारांची नोंदवही (नमुना-१७ए) असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(क) मतदान केंद्राला भेट दिलेल्या अधिकाऱ्यांची यादी असणारा मोहोरबंद न केलेला लिफाफा.

(ड) अंध व अपंग मतदारांची नमुना-१४ए मधील यादी मतदारांच्या सोबत्यांची प्रतिज्ञापत्रे ठेवलेले मोहोरबंद न केलेले लिफाफे.

**टीप.—**वर नमूद केलेले सर्व निवडणूकविषयक कागदपत्रे मोहोरबंद न केलेल्या पांढऱ्या रंगाच्या मुख्य पाकिटात ठेवावेत. (लिफाफा क्रमांक २/१) आणि छाननीसाठी आवश्यक असलेला लिफाफा मतदान केंद्रानिहाय छाननी लिफाफ्यात ज्यामध्ये मतदान झालेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हिव्हिपॅट ठेवले असतील, त्या मतदान केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रा व्यतिरिक्त सुरक्षित कक्षामध्ये स्वतंत्रपणे ठेवावेत.

(पाच) तिसऱ्या पाकीटामध्ये (पांढऱ्या रंगाचे) खालील प्रमाणे नमूद केलेले मोहोरबंद लिफाफे ठेवलेले असावेत आणि त्यापाकीटावर **"सांविधानिक लिफाफे"** असे लिहावे.

(अ) मतदारयादीची चिन्हांकित प्रत आणि वर्गीकृत सेवा मतदाराची यादी (कोणत्याही असल्यास) असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(ब) मतदार चिठ्ठ्या असलेला मोहोरबंद केलेला लिफाफा.

(क) न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका कागद असलेला मोहोरबंद लिफाफा.

(ड) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका कागद आणि नमुना १७-बी मधील यादी असलेला मोहोरबंद लिफाफा.

(ई) नमुना १४ मधील आक्षेपित मतदान असलेला मोहोरबंद लिफाफा.

**टीप.**—एकाचवेळी विधानसभा व लोकसभा निवडणुका झाल्यास, विधानसभा निवडणुकीसाठी मतदार चिठ्ठीसाठी एक अतिरिक्त लिफाफा **(गुलाबी रंगाचा)** क्रमांक-०१.

(सहा) **चौथ्या पाकिटामध्ये (पिवळ्या रंगाचे) पुढीलप्रमाणे लिफाफे असले पाहिजेत आणि त्या पाकिटावर " असांविधिक लिफाफे " (Non-Statutory Covers) असे लिहावे.**

(क) मतदार यादीची प्रत किंवा प्रती (चिन्हांकित प्रतीव्यतिरिक्त) ठेवलेला लिफाफा.

(ख) नमुना १० मधील मतदान प्रतिनिधींची नेमणूकपत्रे ठेवलेला लिफाफा.

(ग) नमुना १२-ब मधील " निवडणूक कार्य प्रमाणपत्रे " ठेवलेला लिफाफा.

(घ) मतदान केंद्राध्यक्षाद्वारे प्रतिज्ञापत्रे असलेला लिफाफा.

(ङ) आक्षेपित मतांच्या संदर्भातील पावती पुस्तक व रोख रक्कम ठेवलेला लिफाफा.

(च) मतदारांकडून त्यांच्या वयाबद्दल घेतलेली प्रतिज्ञापत्रे आणि ज्यांनी त्यांच्या वयासंबंधी प्रतिज्ञापन करण्यास नकार दिला आहे अशा मतदारांची यादी ठेवलेला लिफाफा.

(ज) न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहोरा आणि विशेष खूणचिठ्ठी ठेवलेला लिफाफा.

(ण) न वापरलेल्या मतदारचिठठ्या ठेवलेला लिफाफा.

(प) न वापरलेल्या व खराब झालेल्या विशेष खूणचिठठ्या ठेवलेला लिफाफा ; आणि

(झ) ४९ एम ए (चाचणी मत) अन्वये मतदारांच्या प्रतिज्ञापत्रांचा नमुना ठेवलेला लिफाफा.

(ञ) ज्या मतदारांची नावे अनुपस्थित स्थलांतरित व मृत यादीत असतील, त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्राचा नमुना घेऊन ठेवलेला लिफाफा.

**टीप.**—एकाचवेळी निवडणुका असल्यास, मतदान केंद्राध्यक्षासाठी विधानसभा मतदानाकरिता गुलाबी रंगाचा एक अतिरिक्त लिफाफा दिला आहे.

(सात) **पाचव्या पाकिटामध्ये (खाकी रंगाचे) पुढील बाबी ठेवलेल्या असल्या पाहिजेत.—**

(क) मतदान केंद्राध्यक्षांसाठी निदेशपुस्तिका, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हिव्हिपीएटी सूचना पुस्तिका इ.

(ख) वापरलेल्या व उर्वरित पक्क्या शाईचा संच (शाई गळू नये किंवा तिचे बाष्पीभवन होऊ नये यासाठी प्रत्येक कुपिकेवर वितळविलेल्या मेणबत्तीने किंवा लाखेने व्यवस्थितपणे बूच लावून).

(ग) वापरलेले शाईचे पॅड (ब्राउन रंगाचे).

(आठ) सहाव्या पाकिटामध्ये (निळ्या रंगाचे) खालील बाबी ठेवल्या पाहिजे :–

(क) उमेदवार माहिती पुस्तिका.

(ख) इतर न वापरलेले नमुने.

(ग) मतदान केंद्राध्यक्षाची धातूची मोहोर.

(घ) प्रदत्त मतपत्रिका कागदांवर चिन्हांकित करण्यासाठी वापरण्यात येणारा, बाण फुली असलेला रबरी शिक्का.

(ङ) पक्की शाई ठेवण्यासाठीचा कप.

(च) पाचव्या पाकिटामध्ये (निळ्या रंगाचे) सर्व इतर बाकी व अन्य कोणतेही साहित्य ठेवले पाहिजे.

### ७.५.३ लिफाफे मोहोरबंद करणे

**"सांविधिक लिफाफे"** म्हणून चिन्हांकित केलेल्या तिसऱ्या पुडक्यात समाविष्ट करावयाच्या चार लहान पाकिटांपैकी/पुडक्यांपैकी प्रत्येक पाकिट/पुडके मोहोरबंद करण्यात यावे **मतदार नोंदणी (नमुना-१७ए) चा दुसऱ्या पाकिटात समावेश करून त्यावर "छाननी पाकिट" असे मोहोरबंद करावे. "सांविधिक लिफाफे"** म्हणून चिन्हांकित केलेल्या दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या पुडक्यात समाविष्ट करावयाची निरनिराळी असांविधिक कागदपत्रे व निवडणूक सामग्रीच्या बाबी असलेली इतर लहान पाकिटे/पुडकी स्वतंत्रपणे तयार करण्यात यावीत, परंतु वेळ वाचविण्यासाठी ती नमुना १४ मधील आक्षेपित मतांची सूची असलेल्या पाकिटांव्यतिरिक्त, मोहोरबंद करण्याची आवश्यकता नाही. ही सर्व मोहोरबंद नसलेली पाकिटे व नमुना १४ मधील आक्षेपित मतांची सूची असलेले मोहोरबंद पाकीट, तुम्ही सही केलेल्या मोठ्या पाकीटाच्या वरच्या पृष्ठावर खूण केल्यावर संबंधित मोठ्या पाकिटामध्ये ठेवावीत. ही तीन मोठी पाकिटे मोहोरबंद करण्याची आवश्यकता नाही. परंतु ती टाचण्यांनी किंवा दोऱ्यांनी योग्य रितीने सुरक्षित करावी म्हणजे त्यातील वस्तू संकलन केंद्रामध्ये उघडून पाहता येतील. तथापि, " सांविधिक पाकिटे " म्हणून नाव असलेले तिसरे पाकीट तुम्ही संकलन केंद्रात आतील वस्तू पाहिल्यानंतर मोहोरबंद करावे.

## ७.६ दैनंदिनी तयार करणे आणि मतदान यंत्रे व्हीव्हीपॅट व निवडणुकविषयक कागदपत्रे संकलन केंद्रामध्ये जमा करणे

### ७.६.१ दैनंदिनी तयार करणे

७.६.१.१ मतदान केंद्रात मतदान घेण्याच्या संबंधातील कार्यवाहीसंबंधी त्या प्रयोजनासाठी असलेल्या दैनंदिनीत तुम्ही नोंद केली पाहिजे. या दैनंदिनीचा नमुना " जोडपत्र ७ " मध्ये दिला आहे. तथापि, तुम्हाला यथोचित अनुक्रमांक असलेला दैनंदिनीचा नमुना पुरविण्यात येईल आणि तुम्ही तो नमुनाच केवळ वापरावयाचा आहे.

७.६.१.२ संबंधित घटना जसजशा घडतील त्यांची नोंद तुम्ही दैनंदिनीत घेतली पाहिजे. सर्व महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख तुम्ही त्यात करणे आवश्यक आहे. दैनंदिनीमध्ये घटनांची नोंद घेताना तुम्ही दक्ष राहावयास पाहिजे. जर मतदान केंद्रावर एखादी घटना घडली असेल आणि तुम्ही ती कळविली नसेल, परंतु ती इतर माध्यमाद्वारे कळविण्यात आली तर, निवडणूक आयोग, या बाबतीत निश्चितपणे आवश्यक ती कार्यवाही करील. निवडणूक आयोग तुमच्याविरुध्द पूर्वनियोजित शिस्तभंगाची कार्यवाही देखील करू शकेल.

७.६.१.३ नियमित मध्यंतरामध्ये किंवा दृष्टीसमोर ठेवण्यात आल्याप्रमाणे दैनंदिनीच्या संबंधित स्तंभामध्ये आवश्यक त्या नोंदी करीत रहा. बऱ्याच वेळा असे आढळून आले आहे की, मतदान केंद्राध्यक्षांनी ज्या नोंदी ठरावीक कालांतराने किंवा वेळोवेळी करण्याचे अभिप्रेत आहे त्या नोंदी ते त्या त्या वेळी करत नाहीत; आणि मतदान समाप्त होताना ते सर्व नोंदी करतात, आणि ती दैनंदिनी पूर्ण करतात, ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे. मतदानाच्या प्रक्रियेमध्ये ज्या ज्या वेळी नोंदी करणे अपेक्षित असते त्या त्या वेळी तुमच्याकडून तशी नोंद करण्याची कृती घडली नाही तर आयोग त्या गोष्टीची गंभीर दखल घेईल याची नोंद घ्या.

### ७.६.२ मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट आणि निवडणुकविषयक कागदपत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पोहोचविणे

७.६.२.१ मतदान समाप्त झाल्यानंतर मतदान यंत्रे व व्हिव्हिपीएटी आणि सर्व निवडणुकविषयक कागदपत्रे तुम्ही मोहोरबंद करून आणि सुरक्षित केल्यानंतर ती सामग्री निवडणूक निर्णय अधिकारी निदेश देईल अशा ठिकाणी (संकलन केंद्रावर) आणि निवडणूक निर्णय अधिकारी करील अशा व्यवस्थेच्या अनुसार तुम्हाला सुपूर्द करावी लागेल किंवा सुपूर्द करण्याची व्यवस्था करावी लागेल. मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट आणि निवडणुकविषयक कागदपत्र संकलन केंद्रात विनाविलंब सुपूर्द करता यावेत किंवा सुपूर्द करण्याची व्यवस्था करण्यात यावी. या बाबतीत कोणताही विलंब झाला तर आयोग त्याची अत्यंत गंभीर दखल घेईल आणि सर्व संबंधितांवर शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल.

७.६.२.३ **तुम्ही पुढील बाबींसंबंधातील अभिलेख व सामग्री संकलन केंद्राच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या स्वाधीन करावी व त्याबद्दल पोचपावती घ्यावी.—**

(अ) यथोचितरित्या मोहोरबंद केलेले व त्या त्या वाहक पेट्यांमध्ये ठेवलेले व्हीव्हीपॅट पॉवर पॅकसह मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट आणि व्हीव्हीपॅट.

(ब) “इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र” असे लिहिलेले पहिले पाकिट (३ बाबी असलेले).

(क) “छाननी लिफाफा” असे लिहिलेले दुसरे पाकिट (४ बाबी असलेले).

(ड) “सांविधिक लिफाफे” असे लिहिलेले तिसरे पाकिट (५ बाबी असलेले).

(च) “असांविधिक लिफाफे” असे लिहिलेले चवथे पाकिट (११ बाबी असलेले).

(छ) “निदेशपुस्तिका/नियमपुस्तिका” असे लिहिलेले पाचवे पाकिट (३ पेक्षा अधिक बाबी असलेले).

(ज) “इतर साहित्य” असे लिहिलेले सहावे पाकिट (५ पेक्षा अधिक बाबी असलेले).

(झ) सर्व उर्वरित स्टेशनरी, संबंधित पारदर्शी पाकिटे/पिशवीमध्ये ठेवून संकलन केंद्रावर जमा करावे.

७.६.२.३ वरील सर्व बाबी संकलन केंद्रात त्याचा स्वीकार करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून (कर्मचाऱ्यांकडून) तपासण्यात येतील व त्यानंतर तुम्हाला कार्यमुक्त करण्यात येईल.

# प्रकरण आठ

## भ्रष्टाचारी प्रथा आणि निवडणूकविषयक अपराध

मतदानाच्या दिवशी, एखादी व्यक्ती किंवा व्यक्तिंचा समूह मतदान केंद्रात बेजबाबदारपणे वर्तन करत असल्यास, अशा प्रकारच्या घटना निवडणूक विषयक अपराधाखाली येतात. मतदानाच्या दिवशी निवडणूकविषयक अपराधाचे काही महत्त्वाचे मुद्दे आणि त्यासंबंधातील उपाययोजना या प्रकरणात नमूद केल्या आहेत.

### ८.१ प्रचार करण्यास मनाई

८.१.१. निवडणूक कायद्यानुसार मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामध्ये किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई आहे. मतदान केंद्राच्या आत, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या अंतराच्या आत कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी कोणत्याही व्यक्तीस खालीलपैकी कोणतीही कृती करता येणार नाही, त्या अशा :—

(अ) मतांसाठी प्रचार करणे ;

(ब) कोणत्याही मतदाराच्या मतासाठी आर्जव करणे ;

(क) कोणत्याही विशिष्ट उमेदवाराला मत न देण्यासाठी कोणत्याही मतदाराची मनवळवणी करणे ;

(ड) कोणत्याही मतदारास निवडणूकीत मतदान न करण्यास आग्रह करणे ;

(च) निवडणूकीशी संबंधित (अधिकृत सूचना व्यतिरिक्त) कोणतीही नोटीस किंवा निशाणी प्रदर्शित करणे ;

(छ) मतदान केंद्राच्या आत किंवा प्रवेशाजवळ किंवा त्याच्या शेजारी कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी मोठ्याने बोलणे किंवा आवाज करणे किंवा आवाज करण्यासाठी ध्वनिवर्धक (मेगाफोन) किंवा ध्वनिक्षेपक (लाऊडस्पीकर) यांसारखे मानवी आवाज वाढवणारी कोणतीही उपकरणे वापरणे किंवा चालवणे ; आणि

(ज) मतदान केंद्राच्या आत किंवा प्रवेशद्वाराजवळ किंवा शेजारच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी ओरडणे किंवा अन्य गैरशिस्त वर्तन करणे.

**टीप.—** किती अंतरावर लाऊडस्पीकर इ. वापरला जातो आहे हे महत्त्वाचे नाही. मतदानासाठी मतदान केंद्रावर येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्रास झाल्यास किंवा मतदान केंद्रावरील अधिकारी व तेथे कर्तव्यावर असलेल्या इतर व्यक्तींच्या कामात अडथळा निर्माण झाल्यास, १०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर त्याचा वापर होत असल्यावर देखील गुन्हा समजला जाईल.

### ८.२ मतदारांना मतदान करण्यास प्रतिबंध करणे.

८.२.१. कोणत्याही मतदाराला मतदान केंद्रावर किंवा इतर कोणत्याही ठिकाणी त्याच्या संमतीशिवाय किंवा मतदान केंद्राकडे जाण्याच्या मार्गात अडथळा निर्माण करणे किंवा त्याला कोणत्याही प्रकारे मतदान करण्यास रोखणे, हा दखलपात्र गुन्हा आहे. जर उमेदवाराला अशी माहिती मिळाली की, कोणत्याही व्यक्तीला अडथळा आणला आहे किंवा प्रतिबंधित केले आहे किंवा रोखून ठेवले आहे, तर त्याने/तिने या प्रकरणाची तक्रार मतदान केंद्राध्यक्ष किंवा जवळ पोलीस ठाण्यात किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे केली पाहिजे. एखाद्या व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेतले (डांबून ठेवणे) किंवा मतदानास येण्यास अडथळा आणणे किंवा त्याचा मताधिकार वापरण्यास प्रतिबंध करणे, असा प्रकार जरी खाजगी ठिकाणी केला असला तरीही, त्यावर प्रभावीपणे कारवाई करतील.

### ८.३ मतदारांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी बेकायदेशीरपणे वाहने भाड्याने घेणे.

८.३.१. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराच्या वतीने वाहतूक साधनांचा वापर करून मतदारांना त्यांच्या घरापासून मतदान केंद्रापर्यंत पोहचवल्याबद्दल तक्रारदाराने तुम्हाला माहिती दिल्यास, तुम्ही ती तक्रार तुमच्या क्षेत्रीय दंडाधिकारीमार्फत संबंधित उप विभागीय दंडाधिकाऱ्यांकडे पाठवावी.

## ८.४ मतदान यंत्र आणि/किंवा इतर मतदान साहित्य मतदान केंद्रातून बाहेर नेणे गुन्हा ठरेल

८.४.१ कोणत्याही निवडणुकीच्या वेळी एखाद्या व्यक्तीने मतदान केंद्रामधून मतदान यंत्र लबाडीने किंवा अनधिकृतपणे बाहेर नेले अथवा तसा प्रयत्न केला किंवा अशा कृत्यास जाणूनबुजून सहाय्य केले किंवा त्यासाठी उद्युक्त केले तर, ती व्यक्ती एका वर्षाच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत दंडास किंवा दोन्हीही शिक्षेस पात्र ठरेल. यासंबंधात, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ६१-अ च्या स्पष्टीकरणासह उक्त अधिनियमाचे कलम १३५ पहावे.

८.४.२ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) व्यतिरिक्त इतर मतदान साहित्य बाहेर काढल्यास किंवा बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्यास, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३५-अ अंतर्गत गुन्हा आहे.

८.४.३ वरील परिस्थितीत किंवा घटनेत, तुम्ही त्याला/तिला मतदान केंद्राच्या अधिकार क्षेत्रात असलेल्या स्थानिक पोलीस स्टेशनला संबंधित पोलीस स्टेशनच्या प्रभारींना लेखी माहितीसह ताब्यात द्यावे.

## ८.५ बेशिस्त व्यक्तींना हटवणे

८.५.१ मतदान चालू असताना, मतदान केंद्राध्यक्ष, गैरवर्तन करणाऱ्या किंवा तुमच्या कायदेशीर सूचनांचे पालन न करणाऱ्या व्यक्तीला, तुमच्या आदेशावरुन कोणताही पोलीस अधिकारी किंवा तुम्ही प्राधिकृत केलेल्या अन्य कोणतीही व्यक्ती मतदान केंद्रातून बाहेर हाकलून देऊ शकतील.

## ८.६ निवडणूक अधिकाऱ्यांकडून झालेला अधिकृत कर्तव्याचा भंग

८.६.१ आपले लक्ष लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १३४ कडे देखील वेधण्यात येत आहे. जे तरतूद करत आहे की, जेव्हा एखादा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी वाजवी कारणाशिवाय केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा कोणत्याही अकृतीमुळे दोषी ठरत असेल व त्याच्या हातून सरकारी कर्तव्याचा भंग होत असेल तर, तो त्याच्याकडून घडणारा दखलपात्र अपराध असेल.

## ८.७ मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ हत्यारे घेऊन जाण्यास प्रतिबंध

८.७.१ लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १३४-ख च्या तरतुदीनुसार, कोणतीही व्यक्ती (निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, कोणताही पोलीस अधिकारी आणि मतदान केंद्रावर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी अन्य कोणत्याही इतर व्यक्तीची नियुक्ती केली आहे, जी व्यक्ती त्या मतदान केंद्रावर कामावर आहे, अशा व्यक्तिव्यतिरिक्त) शस्त्रअधिनियम, १९५९ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, मतदानाच्या दिवशी, मतदान केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या शस्त्रांसह जाऊ शकणार नाही. जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे उल्लंघन केले तर, ती व्यक्ती दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या किंवा दंडाच्या किंवा दोन्हीही शिक्षांसाठी पात्र असेल.

## ८.८ तोतयागिरीच्या बाबतीत

८.८.१ आयोगाने आता मतदाराची कागदोपत्री ओळख अनिवार्य केलेली आहे. मतदारांनी आपली ओळख पटविण्याकरिता मतदार छायाचित्र, ओळखपत्र व आयोगाने परवानगी दिलेल्या ओळख पटवण्याच्या पर्यायी कागदपत्रांपैकी एखादे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. आयोग प्रत्येक निवडणुकीच्या वेळी यासंबंधात आदेश निर्गमित करील. आपण आयोगाने निर्गमित केलेले आदेश पाहिले पाहिजेत आणि अनुपालन करून ते अंमलात आणले पाहिजेत. ओळख पटविणाऱ्या मतदान अधिकाऱ्याने, मतदान छायाचित्र ओळखपत्र अथवा यथास्थिती, पर्यायी कागदपत्रे यांची तपासणी केल्यानंतर मतदाराच्या ओळखीविषयी स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे आणि याबाबतीत कोणतीही शंका असेल तर, मतदाराच्या ओळखीविषयी त्याची स्वतःची खात्री पटण्याकरिता आणखी जो काही पुरावा लागेल तो पुरावा मतदाराला आणण्यास सांगेल, ती व्यक्ती तोतया मतदार असल्याचे सिद्ध झाले तर, तुम्ही लेखी तक्रार करून त्या व्यक्तीस पोलिसांच्या हवाली करावे.

## ८.९ बूथ ताब्यात घेण्याचा अपराध

८.९.१ लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३५-अ अन्वये जो कोणी, बूथ ताब्यात घेण्याचा अपराध करील, तो एक वर्षापेक्षा कमी नसेल पण तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि शासकीय सेवेतील

व्यक्तीने जर असा अपराध केला तर, त्या बाबतीत ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल पण पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल. हा अपराध दखलपात्र आहे.

८.९.२ " बूथ ताब्यात घेणे " यात, इतर गोष्टींबरोबरच खालील सर्व किंवा त्यापैकी काही कृतींचा समावेश असेल त्या पुढीलप्रमाणे :—

८.९.२.१ कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, कोणत्याही मतदान केंद्राचे किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या कोणत्याही ठिकाणाचे अभिग्रहण करणे, मतपत्रिका किंवा मतदान यंत्रे आपल्या स्वाधीन करण्यास मतदान प्राधिकाऱ्यांना भाग पाडणे आणि जिचा सुरळीतपणे चाललेल्या निवडणुकीवर विपरीत परिणाम होईल, अशी कोणतीही कृती करणे.

८.९.२.२ कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, कोणत्याही मतदान केंद्राचा किंवा मतदान करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाचा ताबा घेणे आणि केवळ त्याच्या किंवा त्यांच्या समर्थकांनाच मतदानाचा अधिकार बजावू देणे आणि मतदान करण्याचा त्यांचा हक्क मुक्तपणे बजावण्यास इतरांना प्रतिबंध करणे.

८.९.२.३ कोणत्याही मतदाराला प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे जबरदस्ती करणे किंवा धाकदपटशा दाखविणे किंवा धमकी देणे व आपले मत देण्यासाठी मतदान केंद्रावर किंवा मतदान करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणी जाण्यास त्यास प्रतिबंध करणे.

८.९.२.४ कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, मतमोजणी करण्यात येणाऱ्या कोणत्याही ठिकाणाचे अभिग्रहण करणे, मतपत्रिका किंवा मतदान यंत्रे आपल्या स्वाधीन करण्यास मतमोजणी प्राधिकाऱ्यांना भाग पाडणे आणि सुरळीत चाललेल्या मतमोजणीवर विपरित परिणाम होईल, अशी कोणतीही कृती करणे.

८.९.२.५ शासकीय सेवेतील कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम व्हावा, यासाठी पूर्वोक्त सर्व किंवा कोणत्याही कृती करणे किंवा अशा कृती करण्यास सहाय्य करणे किंवा त्यांना मुकानुमती देणे.

## प्रकरण नऊ

## मतदान केंद्राध्यक्ष/मतदन अधिकारी यांनी पार पाडावयाच्या कामाच्या मुद्यांवर एक दृष्टीक्षेप

या प्रकरणामध्ये निदेशपुस्तिकेचा सारांश/दिला आहे, यामुळे तुम्हाला मतदान केंद्राध्यक्ष म्हणून पार पाडावयाच्या तुमच्या कर्तव्यांची पुन्हा थोडक्यात माहिती देईल. तुमच्या मतदान पथकातील सदस्यांशी निकट संबंध ठेवा. संघटितपणे केलेले काम, तुमचे काम सोपे आणि आनंददायी बनवते.—

**९.१ पुढील बाबींची खात्री करा :**

९.१.१ तुम्हाला व्हीव्हीपॅट मतदान यंत्रासोबतच आवश्यक अनुक्रमांकाच्या मतपत्रिका आणि सोबतच नियंत्रण युनिट पुरविलेले आहेत आणि तेच तुमच्याच मतदान केंद्राचे दिलेले आहेत आणि त्याचाच वापर करावयाचा आहे ; युनिटच्या मागील बाजूस धातुची पट्टी मॅटेलिक प्लेट वर बारकोड बरोबर खूणचिठ्ठीवर लिहिलेल्या युनिट आयडीशी जुळत आहे.

९.१.२ प्रत्येक मतदान युनिटवर योग्य ती मतपत्रिका, योग्यरीत्या चिटकवली आहे. आणि बरोबर त्याच ठिकाणी चिटकवलेली आहे.

९.१.३ प्रत्येक मतदान युनिटवरील अंगठ्याने दाबावयाचे गोल बटन, योग्य स्थितीत लावले गेले आहे.

९.१.४ नियंत्रण युनिटवरील ‘उमेदवाराचा भाग’ व्यवस्थित स्थित आहे आणि प्रत्येक मतदान युनिट योग्यरीत्या मोहोरबंद केले आहे आणि त्या प्रत्येकावर खूण चिठ्ठी लावली आहे.

९.१.५ व्हीव्हीपॅटचा पेपरगुंडाळी भाग, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या मोहोरेने योग्यप्रकारे मोहोरबंद केले आहे.

९.१.६ नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट, दोन्ही राजकीय पक्षाचे प्रतिनिधी/उमेदवार आणि युनिटच्या उत्पादक अभियंत्र्याच्या स्वाक्षरी असलेल्या गुलाबी कागदी मोहोरेने योगरीत्या मोहोरबंद केलेले आहेत.

९.१.७ तुम्हाला मतदानाचे सर्व साहित्य देण्यात आले आहे.

९.२ मतदार नोंदवही, पूर्व छापील मतदार चिठ्ठ्या, प्रदत्त मतांसाठी वापरल्या जाणाऱ्या कागदी मतपत्रिका, प्रदत्त मतांसाठी वापरला जाणारा बागफुलीचा चिन्ह असलेला रबरी शिक्का, हिरव्या कागदी मोहोरा, मोहोराबंद करावयाचे लाख, पक्की शाई, काळी पाकीटे, अर्धा इंची पारदर्शी (सेलो टेप), चिकट पट्टी इत्यादी साहित्य तपासून घेणे.

९.३ मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीसोबत इतर प्रतींची पडताळून पहा आणि सर्व प्रती एकसारख्या आहेत ते पहा. मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतिमध्ये निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र व्यतिरिक्त कोणतेही चिन्ह नाही.

**९.४ खात्री करा :—**

९४.१ मतदार यादीच्या प्रतीची सर्व कामकाजाची पृष्ठे अनुक्रमांकित आहेत.

९४.२ मतदारांचे छापील अनुक्रमांक शाईने दुरूस्त केलेले नाहीत आणि हाताने बदलून नवीन क्रमांक दिलेला नाही.

९.५ शक्य तितक्या आदर्श रचनेनुसार मतदान केंद्राची स्थापना करा.

९.६ शक्य झाल्यास, मतदान केंद्रात प्रवेश करण्यासाठी व बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग ठेवा.

९.७ मतदानाच्या दिवशी, तुमच्या मतदान केंद्राच्या बाहेर एक सूचनापत्रक आणि निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या यादीची प्रत यांसह एकूण ४ भीत्तीपत्रके लावा.

९.८ कोणत्याही अनपेक्षित परिस्थितीमुळे कोणताही मतदान अधिकारी गैरहजर राहिल्यास, स्थानिक पातळीवर मतदान अधिकारी नियुक्त करा.

९.९ मतदान सुरू करण्याच्या निश्‍चित वेळेच्या ९० मिनिटेआधी अभिरूप मतदानाच्या आयोजनासाठी व्हीव्हीपॅट आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM) सुरू करण्याची तयारी करा.

९.१० अभिरूप मतदानाच्या अगोदरच, मतदान युनिटे (MU) आणि व्हीव्हीपॅट मतदान कक्षामध्ये ठेवा. तुमच्या टेबलावर किंवा यथास्थिती ज्याला नियंत्रण युनिटचा प्रभार देण्यात आला आहे अशा तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याच्या टेबलावर नियंत्रण युनिट ठेवा.

९.११ मतदान युनिटे, व्हीव्हीपॅट आणि नियंत्रण युनिट यांची जोडणी करा. नियंत्रण युनिटच्या मागील भागात असलेले विजेचे बटन (पावर स्वीच) (NO) चालू ठेवा. मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅटच्या जोडणाऱ्या वायर टेबलाच्या पायाला अर्धा इंच रूंदीच्या 'पारदर्शक चिकट पट्टीने 'अशाप्रकारे चिकटवा की त्या वायर हवेत लटकणार नाहीत जेणेकरून टांगलेल्या वायरच्या भाराने नियंत्रण युनिट व व्हीव्हीपॅटशी जोडलेल्या गेलेल्या विजेच्या वटनावर परिणाम होणार नाही.

९.१२ नियंत्रण युनिटच्या मागील बाजूस एक पातळ वायर बांधून आणि सुतळी धाग्याच्या साहाय्याने काही फेरे देऊन घट्ट गाठ बांधून व्यवस्थितपणे सुरक्षित करा. **ते मेणाने (वॅक्स) मोहोरबंद करू नका.**

९.१३ मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट रिकामे शाई आणि त्यात आधीपासून कोणतेही मत नोंदवलेले नाही हे दाखवा.

९.१४ मतदान अधिकारी आणि निवडणूक लढविणारे उमेदवार/मतदान प्रतिनिधी यांच्या मदतीने अभिरूप मतदान करा ज्यामध्ये 'वरीलपैकी कोणीही नाही' (Nota) यांसह प्रत्येक उमेदवारास किमात ५० मते नोंदवा. अभिरूप मतदानानंतर नियंत्रण युनिटमधील निकाल तपासा, मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅटमधील पेपर चिठ्ठ्या मोजा आणि प्रत्येक उमेदवाराचा निकालाची ताडमेळ जुळत असल्याची खात्री करा.

९.१५ यंत्रावरील क्लिअर (CLEAR) बटन दाबून नियंत्रण युनिट मधील अभिरूप मतदान हिशोब नष्ट करा आणि व्हीव्हीपॅट मधील ड्रॉप बॉक्स मधून कागदी चिठ्ठ्या काढून यकाव्यात आणि रिकामा झालेला व्हीव्हीपॅटचा ड्रॉप बॉक्स मतदान प्रतिनिधींना दाखवा. व्हीव्हीपॅटच्या चिठ्ठ्यांच्या" मागील बाजू अभिरुप मतदन चिठ्ठ्यां असा रबरी शिक्याने ठसा उमटवून त्यानंतर अशा अभिरूप मतदान व्हीव्हीपॅट कागदी चिठ्ठ्या काळ्या लिफाफ्यात मोहेरबंद करण्यात येतील, त्यावर मतदानकेंद्राध्यक्षाने व मतदान प्रतिनिधींनी लिफाफ्यावर त्यांच्या स्वाक्षऱ्या कराव्यात. लिफाफ्यावर मतदान केंद्राचे नाव व क्रमांक, विधानसभा मतदार संघाचे नाव व क्रमांक, मतदानाचा दिनांक आणि "अभिरूप मतदानाच्या व्हीव्हीपॅटमधील कागदी चिठ्ठ्या" हा मजकूर लिहावा. तसेच गुलाबी कागदी मोहोरने अशा प्रकारे मोहोरबंद करा की पेटी उघडण्यास मोहोर तोडणे भाग पडेल. गुलाबी कागदाच्या मोहोरेवर तुमची आणि मतदान प्रतिनिधीची स्वाक्षरी करा आणि ते पाकीट निवडणुकांशी संबंधित असलेल्या अन्य कागदपत्रांसह पेटीत ठेवा.

९.१६ नियंत्रण युनिटच्या निकालाच्या भागातील आतील भागाच्या दरवाजाचा चौकटीवर हिरव्या कागदी मोहोर लावून बंद करा.

९.१७ निकाल विभागाच्या आलील बाजूची झडप अशा प्रकारे बंद करा की कागदी मोहोरेच्या पट्टीची दोन उघडे टोके आतील बाजूच्या भागांपासून बाहेरील बाजूस येतील.

९.१८ हिरव्या कागदी मोहोरवरील छापील अनुक्रमांकाच्या खाली तुमची पूर्व स्वाक्षरी करा.

९.१९ मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या आणि कागदी मोहोरांवर त्यांची स्वाक्षरी करावयास इच्छुक असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षरी घ्या. त्यांना कागदी मोहोरवरील अनुक्रमांक लिहून घेण्याची परवानगी द्या.

९.२० आता नियंत्रण युनिटच्या निकाल वाभागातील बाजूचा झापड विशेष सूवचिठ्ठीने (टॅगसह) मोहोरबंद करा.

९.२१ नियंत्रण युनीटच्या निकाल विभागाचे बाहेरील आवरण बंद करा आणि निकाल विभागातील बाहेरील आवरणामधून बाहेर आलेल्या हिरव्या कागदी मोहोरचे स्वयंचिकरनारे टोके पत्ता खूण चिठ्ठीसह मोहोरबंद करा.

९.२२ मतदान प्रतिनिधींना त्यांची मोहोर नियंत्रण युनिटच्या निकाल विभागाच्या बाहेरील आवरणावर चिकटवण्याची परवानगी द्या आणि सुरक्षित करा. व्हीव्हीपॅट चा ड्रॉप बॉक्स पत्ता खूण चिठ्ठीसह मोहोरबंद करा.

९.२३ वायरच्या आतील जोडणीची अद्याप्रकारे गुंडाळी केली पाहिजे की ती मतदान केंद्राच्या आतील भागात ये-जा करण्याचा मतदारांच्या हालचालीत अडचण आणणार नाही आणि ते त्यात अडकून पडणार नाहीत, त्याचप्रमाणे संपूर्ण वायर बाहेरून दिसेल अशा प्रकारे असावी, ती कोणत्याही परिस्थितीत कापड किंवा टेबलखाली लपवून ठेवू नये.

९.२४ मतदान केंद्रावर उपस्थित मतदान प्रतिनिधींना मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र व्यतिरिक्त इतर कोणत्याही नोंदी नाहीत, हे प्रत्यक्ष दाखवा.

९.२५ मतदार नोंदवहीमध्ये (नमुना १७-ए) आधीपासून कोणत्याही नोंदी केलेल्या नाही हे प्रत्यक्ष दाखवून द्या.

९.२६ मतदान सुरू होण्यापूर्वी घोषणापत्र वाचा आणि त्यावर स्वाक्षरी करा.

९.२७ मतदानासाठी नियोजित वेळेस सकारात्मक सुरुवात करा. नमुना १७-ए (मतदारांची नोंदवही) मध्ये प्रथम मतदार स्वाक्षरी करण्यापूर्वी, मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्षासह नोंदवही तपासून घेईल आणि नमुना १७-अ मध्ये 'नियंत्रण युनिट तपासणी केली आहे व एकूण **शून्य** असल्याचे आढळले आहे' अशी **शाईने** नोंद करेल.

९.२८ मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या प्रत्येकाला लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ चे कलम १२८ मोठ्याने वाचून मतदानाची पूर्णपणे गुप्तता राखण्यासाठी सूचना द्या.

९.२९ मतदान केंद्रात एका उमेदवाराच्या केवळ एकाच मतदान प्रतिनिधीस दिलेल्या कोणत्याही वेळी येण्याची परवानगी द्या.

९.३० मुक्त आणि निष्पक्ष मतदानाची सुनिश्चिती करा.

९.३१ आयोगाने नियुक्त केलेल्या निरीक्षकाप्रती उचित सौजन्य आणि आदर बाळगा आणि त्याला आवश्यक असलेली सर्व माहिती द्या. तसाच आदर आणि सौजन्य, तुमच्या मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या सूक्ष्म निरीक्षकांप्रतीही दाखवा.

९.३२ मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत प्रचार करणे हा अपराध आहे. मतदान केंद्रात भ्रमणध्वनी वापरण्यास मनाई आहे. तुम्ही मतदान केंद्राध्यक्ष या नात्याने किंवा तुमचा पहिला मतदान अधिकारी याचा वापर फक्त लघुसंदेश सेवा व्हाटसॅप प्रणाली मार्फत अहवाल पाठविण्यासाठीच करू शकतात.

९.३३ मतदान केंद्रात धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.

९.३४ कोणतीही विशेष मान्यवर व्यक्ती किंवा प्रसिद्ध व्यक्ती मतदान करण्यास आली असताना कोणत्याही प्रकारे विशेष वागणूक देऊ नये.

९.३५ मतदान अधिकाऱ्याची कर्तव्ये, जेथे एक मतदान केंद्राध्यक्ष आणि त्यांच्याअंतर्गत तीन मतदान अधिकारी असतील : पहिला मतदान अधिकारी मतदान यादीच्या चिन्हांकित प्रतीची प्रभारी असेल व मतदाराची ओळख पटवीण्याची जबाबदारी त्याची असेल व मतदाराची ओळख पटविण्याची जबाबदारी त्याची असेल यादीतील हस्तदोष आणि छपाईच्या चुकांकडे दुलर्क्ष करण्यात येईल. दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे पक्की शाई आणि मतदान नोंदवही असेल. तो मतदाराच्या तर्जनीवर पक्की शाई लावेल, नोंदवहीतील स्तंभ दोनच्या रकान्यात मतदाराचा अनुक्रमांक टाकेल आणि त्याने आणलेल्या ओळखी पटवणाऱ्या दस्तऐवजाचे नाव लिहील. त्यानंतर मतदाराला मतदानाची चिठ्ठी देण्यापूर्वी तो मतदाराला सही/अंगठ्याचा ठसा घेईल. तिसरा मतदान अधिकारी हा मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल. तो मतदाराकडून मतदानची चिठ्ठी घेईल, त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवरील पक्क्या शाईची खूण तपासेल आणि शेवटी नियंत्रण युनिटवरील मतदानाचे (बॅलेट) बटन दाबून, मतदान कक्षात ठेवलेले मतदान युनिट सुरू करेल आणि मतदारास आत जाण्यास परवानगी देईल. आणि मतदाराला मतदान युनिटवरील त्याच्या पसंतीचे निळ्या रंगाचे बटन दाबून मत देण्यास सांगेल.

९.३६ लोकसभा/विधानसभेच्या एकाच वेळी घेणाऱ्या निवडणुकांच्या वेळी निवडणुकीत मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्ये, जेव्हा मतदान पथकात एक मतदान केंद्राध्यक्ष आणि पाच मतदान अधिकारी असतात तेव्हा पहिला मतदान अधिकारी मतदारांची ओळख पटविण्यासाठी जबाबदार असेल आणि तो मतदारांच्या चिन्हांकित प्रतिचा प्रभारी असेल. दुसरा मतदान अधिकाऱ्याकडे पक्की शाई लावणे आणि मतदारांच्या नोंदवहीचा प्रभारी असेल. तिसरा मतदान अधिकारी मतदारपावती प्रभारी असेल. लोकसभा निवडणुकीसाठी चौथा मतदान अधिकारी नियंत्रण युनिटचा प्रभारी असेल. पाचवे मतदान अधिकारी हे राज्य विधानसभा निवडणुकीसाठी नियंत्रण युनिटचे प्रभारी असतील.

४.३७. मतदारांनी त्यांची मते ज्या क्रमाने मतदार नोंदवहीत नोंदवली असतील त्याच क्रमाने त्यांची मते नोंदवण्याची परवानगी द्या. मतदार नोंदवहीत त्यांनी स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा लावल्याशिवाय त्यांना मतदान करू देऊ नका.

९.३८. आक्षेपक रूपये दोन रोख आक्षेप फी भरल्याशिवाय मतदाराच्या ओळखीला आक्षेप घेऊ शकत नाही. अशा आक्षेपित मतांची नोंद नमुना १४ मध्ये ठेवा, जर आक्षेप सिध्द झाला, तर त्या व्यक्तीला लेखी तक्रार करून पोलिसांच्या स्वाधीन करा.

९.३९. अंध व्यक्ती आणि विकलांग मतदारांबाबत, अशा अंध आणि विकलांग मतदाराच्या साथीदाराकडून आवश्यक घोषणापत्र मिळवा. तसेच नमुना १४ ए मध्ये अशा मतदारांची नोंद ठेवा.

९.४०. जर तुम्हाला मतदाराचे वय मतदानाच्या वयापेक्षा उदा. १८ वर्षापेक्षा कमी वाटत असेल, परंतु तुम्ही त्याच्या ओळखपत्राबद्दल समाधानी असाल, तर त्याच्याकडून त्याच्या वयाबद्दल घोषणापत्र मिळवा. त्याच्या अपात्रतेवर शंका घेऊ नका.

९.४१. मतदार नोंदवहीमध्ये मतदाराचे तपशील नोंदविल्यानंतर मतदाराने मतदार न करण्याचा निर्णय घेतल्यास त्याला मतदान करण्यास भाग पाडू नका किंवा बळजबरी करू नका. नोंदवहीमध्ये त्या मतदाराशी संबंधीत नोंदीच्या पुढे ‘ शेरा ’ स्तंभामध्ये त्याबाबतची नोंद करा.

९.४२. मतदान न करण्याचा निर्णय घेणाऱ्या कोणत्याही मतदारामुळे नोंदीच्या स्तंभ-१ मधील कोणताही अनुक्रमांक बदलू नका.

९.४३. अमूक एक विशिष्ट मतदार म्हणून एखादी व्यक्ती अगोदरचे मतदान करून गेली असेल आणि आणखी एखादी व्यक्ती आपणच तोच अमूक एक मतदार आहोत म्हणून मतदान केंद्रात येऊन सांगू लागली व मी तोच असल्याचे सांगत असेल तर तुमची त्याच्या ओळखीबाबत खात्री पटली असेल तर संबंधित मतदारास केवळ प्रदत्त मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची परवानगी द्या. त्याला मतदान यंत्रावर आपले मत नोंदवू देऊ नका.

९.४४. ज्यांना प्रदत्त मतपत्रिका दिल्या आहेत अशा मतदारांची नोंद ठेवा. त्यांची नोंद नमूना १७ बी मध्ये ठेवली जाईल. प्रदत्त मतपत्रिका आणि नमूना १७ बी मधील यादी वेगवेगळ्या पाकीटात ठेवा.

९.४५. तुमच्या कडून सूचना दिल्यानंतरही मतदाराने मतदानाची गुप्तता राखण्यासाठीच्या विहित मतदान प्रक्रीयेचे पालन करण्यास नकार दिल्यास त्याला मतदान करू देऊ नका.

९.४६. मतदाराच्या नोंदवहीत त्याच्याशी संबंधित नोंदी समोर ‘ शेरा ’ स्तंभात त्याबाबतची एक नोंद करा, अशा मतदारामुळे त्या नोंदवहीच्या स्तंभ-१ मधील कोणतेही अनुक्रमांक बदलू नका.

९.४७. मतदान समाप्तीच्यावेळी नेमून दिलेल्या शेवटच्या तासात मतदान केद्रावर जे मतदान करण्यासाठी हजर असतील अशा सर्वांना मतदान करणे शक्य व्हावे म्हणून अशा सर्व मतदारांनी मतदानाच्या समाप्तीच्या काही मिनीटे अगोदर, मतदान करण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या शेवटच्या मतदारापासून चिठ्ठ्या देण्यास प्रारंभ करावा.

९.४८. ज्यांना अशा चिठ्ठ्या देण्यात आल्या आहेत अशा सर्व व्यक्तींना मतदान करण्याची परवानगी द्यावी, जरी मतदानासाठी ठरलेल्या वेळेच्या पुढे चालू राहिले तरी चालू ठेवावे लागेल.

९.४९. नमूना १७ ए (मतदार नोंदवही) मधील मतदारांच्या संस्थेसोबत नियंत्रण युनिटमधील नोंदवलेल्या मतांची संख्या Total बटन दाबून पडताळणी करा.

९.५०. शेवटच्या मतदाराने मतदान केल्यानंतर मतदान समाप्तीची औपचारिक घोषणा करा.

९.५१. **बंद (Close) बटनावरील रबरी आवरण काढून आणि नियंत्रण युनिटवरील बंद (Close) बटन दाबून मतदान यंत्र बंद करा. बंद बटन दाबल्यानंतर त्यावरील रबरी आवरण पुन्हा बंद करा. मतदान केंद्राचा अहवाल भाग-तीन (जोडपत्र-५) तयार करा.**

९.५२. मतदान समाप्तीनंतर, नियंत्रण युनिटच्या मागील भागातील वीज बटन (पावर स्वीच) बंद करा आणि मतदान युनिटे, व्हीव्हीपॅट आणि नियंत्रण युनिटची जोडणी काढून टाका.

९.५३. मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅट मधून बॅटरी संच (पॉवर पॅक) काढून टाकतील, केवळ व्हीव्हीपॅटची बॅटरी काढून टाकल्यानंतर, मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत व्हीव्हीपॅट वहनपेटी मोहोर बंद करतील.( दिनांक ९ एप्रिल २०१९च्या भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व्हीव्हीपॅट सबंधातील बॅटरीसंच ( पॉवर पॅक) वापराबाबत मार्गदर्शक सूचना).

९.५४. नियंत्रण युनिट, व्हीव्हीपॅट आणि मतदान यंत्रे त्यांच्या, संबंधित वहनपेटीच्यामध्ये ठेवा.

९.५५. प्रत्येक वहन पेटीला पत्ताखूणचिठ्ठी लावून दोन्ही टोकांना वहनपेटी मोहोरबंद करा.

९.५६. नमुना १७ सीमध्ये नोंदवलेल्या मतांच्या हिशेब तयार करा.

९.५७. प्रत्येक निवडणूक लढवण्याऱ्या उमेदवार/मतदान प्रतिनिधींना नोंदवलेल्या मतांच्या हिशोबाची प्रति द्या. विहित घोषणा नमुनांमध्ये त्याची प्रभावीपणे घोषणा करा.

९.५८. मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या आणि निवडणूक लढवणाऱ्या उमेदवार/मतदान प्रतिनिधींना इच्छूक असल्यास वहनपेट्यांवर त्यांची मोहोर चीटकवण्यास परवानगी द्या.

९.५९. सर्व निवडणूक कागदपत्रे आणि साहित्य स्वतंत्र लिफाफ्यामध्ये मोहोरबंद करा.

९.६०. १) मतदार यादींची चिन्हांकित प्रत २) मतदारांची नोंदवही ३) मतदारांच्या चिठ्ठ्या ४) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमूना १७ बीमधील यादी, आणि ५) न वापरलेले प्रदत्त मतपत्रिका एका लिफाफ्यात ठेवून त्यावर तुमची मोहोर लावा.

९.६१. सर्व निवडणूक लढविणारे उमेदवार/मतदान प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास त्या पाकीटावर त्यांची मोहोरदेखील चिटकवण्यास परवानगी द्या.

९.६२. निवडणूक कागदपत्रांचे सर्व लिफाफे आणि साहित्य संबंधित लिफाफ्यामध्ये ठेवा. साहित्य बांधणीसाठी संदर्भ म्हणून प्रकरण ७ पहा.

९.६३. तुम्हाला निवडणूकीशी संबंधित सर्व कागदपत्रे आणि साहित्य संकलन केंद्रावर जमा केल्याशिवाय कर्तव्यातून मुक्त केले जाणार नाही.

९.६४. व्हीव्हीपॅट सोबतच मतदान यंत्र आणि इतर सर्व निवडणूक साहित्य घेऊन मतदारानंतर लगेचच, कोणताही विलंब न करता संकलन केंद्रावर पोहोचवा.

९.६५. मतदान केंद्रावरील घटनांची संपूर्ण आणि अचूक माहिती ठेवण्यासाठी मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी सर्व द्रृष्टीने अद्ययावत ठेवावी. त्यातील नोंदी मतदानाच्या शेवटी न करता कोणतीही घटना घडल्यावर लगेच करा.

९.६६. मतदान केंद्रावर उघडउघड हिंसाचार किंवा दंगल घडल्यास मतदान स्थगित करा. संपुर्ण माहिती तात्काळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळवा.

९.६७. जर तुमच्याकडून कोणीही मतदान केंद्र ताब्यात घेतले किंवा कोणतेही मतदान यंत्र किंवा निवडणूक साहित्य जसे की मतदार नोंदवही, मतदार यादींची चिन्हांकित प्रत इत्यादी. अनधिकृत मार्गाने काढून घेतले किंवा तोडफोड केली किंवा छेडछाड केली तर मतदान बंद करा. संपूर्ण माहिती तात्काळ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला कळवा.

९.६८. **इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्र आणि व्हीव्हीपॅट बदलणे.**

(क) प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी कोणतेही युनिट योग्यरीतीने काम करत नसल्याचे आढळल्यास केवळ सदोष युनिट बदलले जाईल, मतदान केंद्राध्यक्षाचा अहवालाचा भाग-चार तयार केला जाईल आणि विभाग अधिकारी (S.O.) यांना पाठवला जाईल.

(ख) प्रत्येक अभिरूप मतदानानंतर मतदानकेंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-एक तयार केला जाईल.

(ग) प्रत्यक्ष मतदानादरम्यान नियंत्रण युनिट बदलल्यास, मतदान केंद्राध्यक्षाचा अहवालाचा भाग-दोन तयार केला जाईल, अशा वेळी कोणत्याही अभिरुप मतदानाची आवश्यकता नाही.

(घ) प्रत्यक्ष मतदानादरम्यान व्हीव्हीपॅट किंवा व्हीव्हीपॅट आणि बॅटरी संच (पॉवर पॅक) योग्यरीतीने काम करत नसल्याचे आढळल्यास फक्त व्हीव्हीपॅट किंवा व्हीव्हीपॅट बॅटरी (पॉवर पॅक) बदलले जातील, अशा वेळी कोणत्याही अभिरुप मतदानाची आवश्यकता नाही. मतदान केंद्राध्यक्षाच्या अहवालाचा भाग-पाच तयार केला जाईल आणि विभागीय अधिकाऱ्यास (S.O.) पाठवला जाईल.

(ङ) प्रत्यक्ष मतदाना दरम्यान मतदान युनिट किंवा नियंत्रण युनिट योग्यरीतीने काम करत नसल्याचे आढळल्यास, मतदान युनिट + नियंत्रण युनिट + व्हीव्हीपॅटचा संपूर्ण संच बदलला जाईल. वरील पैकी कोणीही नाही (NOTA) सर्व उमेदवारांना एक मत देऊन अभिरुप मतदान नवीन संचासह केले जाईल. मतदान केंद्राध्यक्षाचा अहवाल भाग-एक आणि भाग-पाच तयार केला जाईल आणि भाग-पाच विभागीय अधिकाऱ्याला पाठवला जाईल.

**९.क. सर्वसामान्य चुका.**

मतदान केंद्राध्यक्षांकडून घेणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (EVM)/व्हीव्हीपॅट वापरा व्यतिरिक्त इतर सर्वसाधारण चुका.

* अभिरूप मतदानानंतर, मतमोजणी व निकाल पुसून टाकणे (Close-Result-Clear) (CRC) या क्रिया केल्या नाही.

* अभिरूप मतदानाच्या चिठ्ठ्या काढल्या नाहीत.

* मतदान समाप्तीनंतर (Close) बंद स्वीच दाबायला विसरणे.

* केवळ व्हीव्हीपॅट बदलले असतानाही अभिरूप मतदान घेणे, ज्याला परवानगी नाही.

* नमुना-१७-सी जमा केला नाही काहींना अपूर्ण तपशिलासह जमा केला.

* मतदाराचा उपस्थितीचा अहवाल योग्य प्रकारे दिला गेला नाही, मतदान केलेल्या एकूण मतदाना ऐवजी मतदान केंद्रावरील नेमून दिलेल्या एकूण मतदारांचा उल्लेख केला गेला. पुरूष व महिला मतदारांची आकडेवारी देण्यात आली नाही.

* इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट अनावश्यकपणे बदलण्यात आले, उदा. जोडणी व्यवस्थित न केल्यामुळे, तरीही इलेक्ट्रोनिक मतदानयंत्र बदलण्यात आले.

* इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅटच्या वहनपेटीसाठी असलेले पत्ता खूण चिठ्ठी बांधले गेले नाहीत आणि मतदानाच्या शेवटी मोहोरबंद केले नाही.

**९.ख. काय करावे आणि काय करू नये.**

**९.ख.१. व्हीव्हीपॅट चा वापर करतेवेळी काय करावे आणि काय करू नये.**

| काय करावे | काय करू नये |
|---|---|
| व्हीव्हीपॅट यंत्राची वाहतूक करण्यापूर्वी (आडव्या स्थितीत) पेपर रोल मूठ (Knob) बंद स्थितीत केला पाहिजे. | |
| मतदान केंद्रामध्ये, नियंत्रण युनिट चालू करण्यापूर्वी पेपररोल मूठ (Knob) (उभ्या स्थितीत) चालू करा. | व्हीव्हीपॅट पेपर रोल मूठ (Knob) चालू करण्याच्या स्थितीत (उभ्या स्थितीत) करण्यापूर्वी नियंत्रण युनिट चालू करू नका. |

| | |
|---|---|
| मतदान कक्षामध्ये मतदान युनिट आणि व्हीव्हीपॅट ठेवा. मतदान अधिकाऱ्याच्या टेबलावर नियंत्रण युनिट ठेवा. | |
| रंगसंगतीनुसार खालीलप्रमाणे योग्य जोडणी झाल्याची खात्री करा. | व्हीव्हीपॅटवर थेट प्रकाश किंवा उच्च दाबाचा प्रकाश पडणार नाही ते पहा. |
| (कनेक्टर) जोडणी योग्य रीतीने झाली असण्याची खात्री करा. | (कनेक्टर) जोडणीवरील पट्टी दाबल्याशिवाय वायर काढू नका. |
| जेव्हा नियंत्रण युनिट चालू असेल तेंव्हा व्हीव्हीपॅटवरील हिरवा एल. इ. डी. तेंव्हा चालू होईल आणि व्हीव्हीपॅट सर्व ७ चिठ्ठ्या छपाई करेल. | सर्व ७ पेपर चिठ्ठ्या छपाई होऊन खाली पडेपर्यंत नियंत्रण युनिट बंद करू नका. |
| नियंत्रण युनिटवर “ERROR” असा कोणताही येत नसल्याचे संदेश तपासा. असा कोणताही “RROR” संदेश येत असल्यास विभागीय अधिकाऱ्यास माहिती द्या. | नियंत्रण युनिटवर “RINTER ERROR” हा संदेश आल्यावर मतदान सुरु करू नका. |
| बॅटरी बदलल्या सोबतच कोणतेही (जोडणी करणे) कनेक्शन किंवा जोडणी काढून टाकणे (डिसकनेक्शन) करण्यापूर्वी नियंत्रण युनिट नेहमी बंद करा. | मतदान समाप्तीपर्यंत पेपर रोल मूठ (Knob) हात लावू नका. |

**टीप :- नियंत्रण युनिटच्या दर्शनीभागावर व्हीव्हीपॅटशी सबंधित संदेश प्रदर्शित होतील.**

**९.ख.२. व्हीव्हीपॅट व्यतिरिक्त ‘काय करावे’ आणि ‘काय करू नये’**

| काय करावे | काय करू नये |
|---|---|
| सर्व प्रशिक्षकांनी उपस्थित रहा | मतदानाचे साहित्य पोलिस किंवा इतरांच्या ताब्यात देऊ नका. |
| दिलेले सर्व साहित्य पहा. | प्रतिनिधींना मतदान केंद्रावर भ्रमनध्वनी किंवा कॅमेरा किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण आणण्यास परवानगी देऊ नका. |
| इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर प्रत्यक्ष काम करण्याचे मूलभूत प्रशिक्षण घ्या. | मतदारांना मतदान केंद्रावर येताना सोबत भ्रमनध्वनी, कॅमेरे किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण आणण्यास परवानगी देऊ नका. |
| टपाली मतपत्रिका सुविधा/निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्राचा वापर करा. | मतदान कर्मचाऱ्यांसोबत वाद घालू देऊ नका. |

| | |
|---|---|
| वितरण केंद्रावर साहित्याची काळजीपूर्वक पडताळणी करा. | मतदान केंद्रावर कोणताही आगीचा वापर करू देऊ नका. |
| मतदानाच्या आदल्या रात्री मतदान केंद्रावर मुक्काम करा. | मतदान केंद्रावर कोणत्याही प्रतिनिधीला प्रचार करण्यास परवानगी देऊ नका. |
| मतदान केंद्रामधील राजकीय नेत्यांचे छायाचित्रांवर आवरण लावा किंवा काढून टाका. | मतदान केंद्रामध्ये कोणतेही प्रसिद्धीचे साहित्य किंवा साधनसामग्रीसह कोणालाही प्रवेश करू देऊ नका. |
| वेळापत्रकानुसार मतदान पूर्व तयारी सुरू करा आणि पूर्ण करा. | पत्रकार छायाचित्रकाराला छायाचित्र काढण्यास परवानगी देऊ नका. |
| एकसंघ म्हणून काम करा आणि एकमेकांना सहकार्य करा. | वादाविवादात पडू नका. |
| नि:पक्षपाती रहा आणि नि:पक्षपाती असल्याचे वर्तन करा. | निकाल किंवा मतदानाच्या पद्धतीबद्दल प्रतिनिधींशी चर्चा करू नका. |
| मतदान प्रतिनिधी मतदान केंद्रातील मतदार असल्याची पडताळणी करा. | उमेदवार किंवा निवडणूक प्रतिनिधींना बंदूकधारी किंवा समर्थकांसह प्रवेश करू देऊ नका. |
| उपस्थित मतदान प्रतिनिधींना मोहोरबंद केल्यावर सही करायची परवानगी द्या. | भेट देणाऱ्या उमेदवारांना किंवा निवडणूक प्रतिनिधींना निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणू देऊ नका. |
| नियंत्रण युनिट (C U) मोहोरबंद करण्यापूर्वी समाप्त-निकाल-नि:शेष (C R C) करा. | मतदान केंद्रात बोलवल्याशिवाय पोलिसांना प्रवेश करू देऊ नका. |
| अभ्यांगत नोंदवही ठेवा. | मतदान केंद्रात मंत्र्यांसह अनधिकृत व्यक्तींना प्रवेश करू देऊ नका. |
| सर्व मतदान प्रतिनिधींना नमुना-१७ सी ची प्रत द्या. | मतदार मतदान करत असताना कोणालाही मतदान कक्षात जाऊ देऊ नका. |
| मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी काळजीपूर्वक भरा. | प्रतिनिधींला सलगी करू देऊ नका |
| मतदान केंद्राध्यक्षाने अधिकृत अभ्यागतांच्या हजेरी आणि मतदान प्रक्रिया सुरू ठेवावी. | मतदान समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर कोणलाही रांगेत सामील होऊ देऊ नका. |
| नियोजित तासात (वेळेत) मतदान बंद करा आणि कार्यपद्धतीचे अनुसरण करा. | घाई करू नका, घाईघाईने केलेल्या कामामुळे चुका होतात. |

# जोडपत्र-१

## "लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१" यामधील उतारे

## (प्रकरण एक, परिच्छेद १.१)

**टीप :-** जोडपत्र-१ (लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यामधील उतारे) आणि जोडपत्र-२ (निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ यामधील उतारे यामध्ये नमूद केलेले सर्व मुद्दे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या व व्हीव्हीपॅट च्या समावेशामुळे कोणत्याही बदला संबंधात कलम ६१क मधील स्पष्टीकरणानुसार वाचावेत.

**२६. मतदान केंद्रासाठी मतदान केंद्राध्यक्षांची नियुक्ती**

(१) जिल्हा निवडणूक अधिकारी, प्रत्येक मतदान केंद्राकरिता, मतदान केंद्राध्यक्षाची आणि त्याला आवश्यक वाटेल अशा मतदान अधिकाऱ्याची किंवा अधिकाऱ्यांची नियुक्ती करील, पण जी व्यक्ती निवडणुकीमध्ये किंवा त्यासंबंधात, एखाद्या उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने नेमलेली असेल अथवा अन्यथा त्याच्याकरिता काम करत असेल अशा कोणाही व्यक्तीला तो नियुक्त करणार नाही;

परंतु, एखादा मतदान अधिकारी मतदान केंद्रावर अनुपस्थित असल्यास, मतदान केंद्राध्यक्ष, निवडणुकीमध्ये किंवा त्यासंबंधात उमेदवाराने किंवा त्याच्या वतीने नेमलेल्या किंवा अन्यथा त्याच्यासाठी काम करणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त मतदान केंद्रावर उपस्थित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची पूर्वीच्या अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती करील आणि तद्नुसार जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला कळवील:

परंतु आणखी असे की, या पोट-कलमातील कशामुळेही एकाच वास्तुतील एकाहून अधिक मतदान केंद्राकरिता मतदान केंद्राध्यक्ष म्हणून एकाच व्यक्तीची नियुक्ती करण्यास जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला प्रतिबंध होणार नाही.

(२) मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्षाने तसे निदेशित केले तर, हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा आदेश याखाली मतदान केंद्राध्यक्षाला करावी लागणारी सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कार्ये पार पाडील.

(३) मतदान केंद्राध्यक्षास प्रकृति-अस्वास्थामुळे किंवा अन्य अपरिहार्य कारणामुळे मतदान केंद्रावर अनुपस्थित राहणे भाग पडल्यास, अशा कोणत्याही अनुपस्थितीच्या प्रसंगी त्यांची कार्ये पार पाडण्यास जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने ज्याला आधीपासून प्राधिकृत केले असेल असा मतदान अधिकारी अशी कार्ये पार पाडील.

(४) या अधिनियमातील मतदान केंद्राध्यक्षाच्या उल्लेखांमध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, पोट-कलम *(२)* किंवा यथास्थिति, पोट-कलम *(३)* खाली कोणत्याही व्यक्तीला जे कोणतेही कार्य करण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल ते कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश असल्याचे मानले जाईल.

**२७. मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य**

मतदान केंद्रावर सुव्यवस्था राखणे आणि मतदान सुरळीतपणे होत आहे हे पाहणे, हे मतदान केंद्राध्यक्षाचे सर्वसाधारण कर्तव्य असेल.

**२८. मतदान अधिकाऱ्याची कर्तव्ये**

मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाला त्याची कार्ये पार पाडण्यात सहाय्य करणे, हे अशा केंद्रावरील मतदान अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

**२८ क. निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष इत्यादी यांनी निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे समजणे,**

कोणतीही निवडणूक घेण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि या भागान्वये नियुक्त केलेला अन्य कोणताही अधिकारी आणि राज्य शासनाने त्या त्या वेळी नियुक्त केलेला कोणताही पोलीस अधिकारी हे अशी निवडणूक घेण्याबाबतच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सुरू होणाऱ्या व त्या निवडणुकीचे निकाल घोषित

होण्याच्या दिनाकांस समाप्त होणाऱ्या कालावधीकरिता निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार ते अधिकारी, त्या कालावधीमध्ये निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाच्या, अधिक्षणाच्या व अनुशासनाच्या अधीन असतील.

## ४६. मतदान प्रतिनिधींची नियुक्ती

निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला कलम २५ खाली ज्याची व्यवस्था केली आहे त्या प्रत्येक मतदान केंद्रावर किंवा कलम २९ च्या पोट-कलम (१) खाली मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी अशा उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी म्हणून काम करण्यास विहित केले असतील तितके प्रतिनिधी आणि कार्यविमोचक प्रतिनिधी विहित केलेल्या पद्धतीने नियुक्त करता येतील.

## ४८. मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी यांची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्यांचा मृत्यू होणे.

(१) मतदान प्रतिनिधींची नियुक्ती प्रत्याहृत करण्याबाबतच्या लेखावर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी स्वाक्षरी करील आणि तो लेख, विहित केले जाईल अशा अधिकाऱ्याकडे ज्या दिनांकी दाखल करण्यात येईल त्या दिनांकापासून अंमलात येईल, आणि मतदान प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे या घटना मतदान समाप्त होण्यापूर्वी घडल्यास, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, मतदान बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळी विहित पद्धतीने दुसऱ्या मतदान प्रतिनिधीची नियुक्ती करू शकेल आणि अशा नियुक्तीची नोटीस, विहित केलेले असेल अशा अधिकाऱ्याला विहित पद्धतीने तात्काळ देईल.

(२) मतमोजणी प्रतिनिधींची नियुक्ती प्रत्याहृत करण्याबाबतच्या लेखावर उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी स्वाक्षरी करील आणि ही नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे ज्या दिनांकी दाखल केली जाईल त्या दिनांकापासून अंमलात येईल आणि मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती प्रत्याहृत करणे किंवा त्याचा मृत्यू होणे ह्या घटना मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी घडल्यास, उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी कोणत्याही वेळी विहित पद्धतीने दुसऱ्या मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती करू शकेल आणि अशी नियुक्तीची नोटीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित पद्धतीने तात्काळ देईल.

## ४९. मतदान प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी यांची कार्ये

(१) मतदान प्रतिनिधीला, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली निवडणूक प्रतिनिधीने पार पाडावयाची कार्ये म्हणून जी प्राधिकृत करण्यात आली असतील अशी मतदानाच्या संबंधातील कार्ये पार पाडता येतील.

(२) मतमोजणी प्रतिनिधीला, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मतमोजणी प्रतिनिधीने अधिकृत केलेली पार पाडावयाची कार्ये म्हणून जी प्राधिकृत करण्यात आली असतील अशी, मतमोजणीच्या संबंधातील कार्ये पार पाडता येतील.

## ५०. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने मतदान केंद्रावर उपस्थित राहणे आणि त्याने मतदान प्रतिनिधीची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची कामे पार पाडणे.

(१) जेथे मतदान घेतले जाते अशा प्रत्येक निवडणुकीच्या वेळी, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला आणि अशा निवडणुकीतील त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला, मतदान घेण्यासाठी कलम २५ खाली ज्यांची व्यवस्था केली आहे, अशा कोणत्याही मतदान केंद्रावर किंवा मतदानासाठी कलम २९ च्या पोट-कलम (१) खाली नियत केलेल्या ठिकाणी उपस्थित राहण्याचा अधिकार असेल.

(२) निवडणूक लढवणारा उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी, जर निवडणूक लढवणाऱ्या अशा उमेदवाराचा एखादा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त केला गेला असता तर, अशा प्रतिनिधीला जी कोणतीही कृती किंवा गोष्ट करण्यासाठी या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आले असते, ती कृती किंवा गोष्ट करू शकेल किंवा अशी कोणतीही गोष्ट किंवा कृती करण्यामध्ये निवडणूक लढवणाऱ्या अशा उमेदवाराला किंवा मतमोजणी प्रतिनिधीला साहाय्य करू शकेल.

## ५१. मतदान प्रतिनिधीची किंवा मतमोजणी प्रतिनिधीची अनुपस्थिती

जेव्हा एखादी कृती किंवा गोष्ट, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मतदान प्रतिनिधीच्या किंवा मतमोजणी प्रतिनिधीच्या उपस्थितीत करणे आवश्यक किंवा प्राधिकृत असेल तेव्हा, असा कोणताही किंवा असे कोणतेही प्रतिनिधी त्या प्रयोजनासाठी नियत केलेल्या वेळी आणि ठिकाणी अनुपस्थित राहिले असता, त्यामुळे ती कृती किंवा गोष्ट जर ती अन्यथा रितसर केलेली असेल तर, अवैध होणार नाही.

## ५७. आणीबाणीच्या प्रसंगी मतदान तहकूब करणे

(१) एखाद्या निवडणुकीच्या वेळी, कलम २५ खाली व्यवस्था केलेल्या कोणत्याही मतदान केंद्रावरील किंवा कलम २९ च्या पोट-कलम (१) खाली मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाच्या कामकाजात दंगलीमुळे किंवा उघड हिंसाचारामुळे खंड पडला किंवा अडथळा आला तर, अथवा एखाद्या निवडणुकीच्या वेळी एखाद्या मतदान केंद्रावर किंवा अशा ठिकाणी, काही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा अन्य कोणत्याही वाजवी कारणामुळे मतदान घेणे शक्य नसेल तर, अशा मतदान केंद्राचा केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिति अशा ठिकाणी केंद्राध्यक्ष म्हणून काम करणारा निवडणूक निर्णय अधिकारी, मागाहून अधिसूचित करावयाच्या दिनांकापर्यंत मतदान तहकूब केल्याचे घोषित करील आणि जेव्हा केंद्राध्यक्ष अशारीतीने मतदान तहकूब करील तेव्हा तो तात्काळ संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला ते कळवील.

(२) जेव्हा जेव्हा पोट-कलम (१) अन्वये मतदान तहकूब केले जाईल तेव्हा तेव्हा, निवडणूक निर्णय अधिकारी, समुचित प्राधिकरणाला आणि निवडणूक आयोगाला तात्काळ ती परिस्थिती कळवील आणि शक्य होईल तितक्या लवकर, मतदान पुन्हा केव्हा सुरू करणार तो दिवस, निवडणूक आयोगाच्या पूर्वमान्यतेने नियत करील आणि जेथे मतदान घेतले जाईल ते मतदान केंद्र किंवा ठिकाण आणि ज्या वेळेत मतदान घेतले जाईल त्या वेळा निश्चित करील, आणि अशा निवडणुकीत टाकली गेलेली मते असे तहकूब केलेले मतदान पूर्ण होईपर्यंत मोजणार नाही.

(३) पूर्वोक्त अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, निवडणूक आयोग निदेश देईल त्या पद्धतीने निवडणूक निर्णय अधिकारी, पोट-कलम (२) अन्वये निश्चित केलेला मतदानाचा दिनांक, ठिकाण व वेळा अधिसूचित करील.

## ६१ क. निवडणुकीत मतदान यंत्रे वापरणे

या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, विहित करण्यात येईल अशारीतीने मतदान यंत्राद्वारे मत देणे किंवा ते नोंदवणे या गोष्टीचा प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन निवडणूक आयोग विनिर्दिष्ट करील अशा मतदारसंघात किंवा मतदारसंघांमध्ये अंगीकार करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, " मतदान यंत्र " याचा अर्थ, मत देणे किंवा मत नोंदवणे याकरता इलेक्ट्रॉनिकच्या सहाय्याने चालविण्यात येणारे किंवा अन्यथा कोणतेही यंत्र किंवा उपकरण, असा आहे आणि या अधिनियमातील किंवा त्याखाली केलेल्या नियमातील मतपेटी किंवा मतपत्रिका यांच्या बाबतीतील कोणत्याही संदर्भाचा अर्थ, अन्यथा उपबंधातील केले असेल ते खेरीज करून, अशा मतदान यंत्राचा कोणत्याही निवडणुकीत जेथे जेथे वापर केला जात असेल तेथे तेथे अशा मतदान यंत्राच्या संदर्भासह समावेश असल्याप्रमाणे लावला जाईल.

## ६२. मतदानाचा अधिकार

(१) एखाद्या मतदारसंघाच्या मतदार यादीत ज्या व्यक्तीचे नाव त्या त्या काळी समाविष्ट केलेले नाही अशी कोणतीही व्यक्ती त्या मतदारसंघात मतदान करण्यास हक्कदार असणार नाही व या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे उपबंधित केले आहे तेवढे खेरीज करून इतर बाबतीत, जिचे नाव याप्रमाणे समाविष्ट केलेले आहे अशी प्रत्येक व्यक्ती तेथे मतदान करण्यास हक्कदार असेल.

(२) जी व्यक्ती " लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५०" (१९५० चा ४३) याच्या कलम १६ मध्ये निर्देशिल्यापैकी कोणत्याही निरर्हतेस पात्र असेल त्या व्यक्तीला कोणत्याही मतदारसंघांतील निवडणुकीत मतदान करता येणार नाही.

(३) कोणत्याही व्यक्तीला सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एकाच वर्गाच्या एकापेक्षा अधिक मतदारसंघात मतदान करता येणार नाही आणि एखाद्या व्यक्तीने अशा एकापेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये मतदान केल्यास अशा सर्व मतदारसंघातील त्या व्यक्तीची मते रद्दबातल होतील.

(४) एखाद्या मतदारसंघाच्या मतदार यादीत एखाद्या व्यक्तीचे नाव एकापेक्षा अधिक वेळा नोंदले गेले असले तरीही, कोणत्याही निवडणुकीमध्ये तिला त्याच मतदारसंघात एकापेक्षा अधिक वेळा मतदान करता येणार नाही आणि त्या व्यक्तीने याप्रमाणे मतदान केले तर त्या मतदारसंघातील तिची सर्व मते रद्दबातल होतील.

(५) एखाद्या व्यक्तीला कारागृहात बंदिस्त करण्यात आले असेल तर, मग ती शिक्षा कारावासाची असो किंवा जन्मठेपेची असो किंवा अन्य असो किंवा ती पोलिसांच्या कायदेशीर अभिरक्षेत असेल तर, त्या व्यक्तीला कोणत्याही निवडणुकीत मतदान करता येणार नाहीः

परंतु, त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली प्रतिबंधक स्थानबद्धतेत असणाऱ्या व्यक्तीला, या पोट-कलमातील काहीही लागू असणार नाहीः

परंतु आणखी असे की, या पोट-कलमान्वये मतदान करण्यास प्रतिबंध केल्याच्या कारणास्तव, ज्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत नोंदविण्यात आलेले आहे ती व्यक्ती मतदार असल्याचे समाप्त होणार नाही.

(६) जी व्यक्ती या अधिनियमान्वये एखाद्या मतदाराकरिता बदली व्यक्ती म्हणून मत देण्यास प्राधिकृत करण्यात आली आहे तिला जोपर्यंत अशा मतदारासाठी ती व्यक्ती बदली व्यक्ती म्हणून मत देईल त्यास पोट-कलम (३) आणि (४) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टी लागू होणार नाहीत.

**१२८. मतदान गुप्त राखणे**

(१) जो निवडणुकीच्या वेळी मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधात काही काम करतो असा प्रत्येक अधिकारी, लिपिक किंवा अन्य इसम याला मतदान गुप्त राखावे लागेल, तसेच ते राखण्यास मदत करावी लागेल आणि (कोणत्याही कायद्यानुसार किंवा त्या खाली काही प्रयोजनासाठी अधिकृत केले असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही), ज्यामुळे अशी गुप्तता भंग पावेल असे मानण्याजोगी कोणतीही माहिती, कोणत्याही व्यक्तीला सांगता येणार नाहीः

परंतु असा अधिकारी, लिपिक, एजंट किंवा इतर व्यक्ती जी राज्य विधानपरिषदेमध्ये एक किंवा अधिक जागा भरण्यासाठी निवडणुकीच्या ठिकाणी अशी कोणतीही कामगिरी बजावत असेल तर त्या व्यक्तीस या पोट-कलमाच्या तरतुदी लागू असणार नाहीत.

(२) जी व्यक्ती, पोट-कलम (१) मधील उपबंधाचे उल्लंघन करील ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**१२९. अधिकारी, इत्यादींनी निवडणुकीच्या वेळी उमेदवारासाठी काम करावयाचे नाही किंवा मतदानासंबंधात दडपण आणावयाचे नाही**

(१) जी कोणतीही व्यक्ती, जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल अथवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने किंवा मतदान केंद्राध्यक्षाने, निवडणुकीशी संबंधित असलेले कोणतेही काम करण्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी किंवा लिपिक असेल, त्या व्यक्तीला निवडणुकीचे सूत्रचालन करताना किंवा त्यासंबंधीची व्यवस्था पाहताना (मत देण्याव्यतिरिक्त) एखाद्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम होईल अशाप्रकारे कोणतीही कृती करता येणार नाही.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीला आणि पोलीस दलातील कोणत्याही सदस्याला–

(क) एखाद्या व्यक्तीने निवडणुकीत मतदान करावे यासाठी तिचे मन वळविण्याचा; किंवा

(ख) निवडणुकीत मतदान करण्यापासून एखाद्या व्यक्तीला परावृत करण्याचा; किंवा

(ग) निवडणुकीच्यावेळी कोणत्याही व्यक्तीच्या मतदानावर कोणत्याही प्रकारचे प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करता येणार नाही.

(३) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मधील उपबंधांचे उल्लंघन करील ती व्यक्ती, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(४) पोट-कलम (३) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

**१३०. मतदान केंद्रामध्ये किंवा त्याच्या जवळपास प्रचार करण्यास मनाई**

(१) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मतदान केंद्रावर ज्या दिनांकास मतदान घेतले जाणार आहे त्या दिनांकास किंवा दिनांकाना मतदान केंद्रामध्ये अथवा मतदान केंद्रापासून शंभर मीटर अंतराच्या आत असलेल्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी पुढीलपैकी कोणतीही कृती करता येणार नाही, त्या अशा –

(क) मतासाठी प्रचार करणे, किंवा

(ख) कोणत्याही मतदाराच्या मतासाठी आर्जव करणे, किंवा

(ग) एखाद्या विशिष्ट उमेदवाराला मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराची मनवळवणी करणे, किंवा

(घ) निवडणुकीत मत न देण्यासाठी कोणत्याही मतदाराची मनवळवणी करणे, किंवा

(ङ) निवडणुकीसंबंधीची (अधिकृत सूचनेहून अन्य) नोटीस किंवा निशाणी प्रदर्शित करणे.

(२) जी व्यक्ती पोट-कलम (१) मधील उपबंधांचे उल्लंघन करील ती व्यक्ती, अडीचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(३) या कलमाखाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

**१३१. मतदान केंद्रामध्ये किंवा त्याच्या जवळपास गैरशिस्त वर्तन केल्याबद्दल शिक्षा**

(१) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही मतदान केंद्रावर ज्या दिनांकाला किंवा दिनांकांना मतदान होणार असेल त्या दिवशी, ज्यायोगे मतदानासाठी मतदान केंद्रावर येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्रास होईल किंवा मतदान केंद्रावर काम करीत असलेल्या अधिकाऱ्यांच्या व अन्य व्यक्तींच्या कामात अडथळा येईल अशारितीने–

(क) मतदान केंद्रामध्ये किंवा त्याच्या प्रवेशद्वाराजवळ अथवा त्याच्या आसपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी, ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यासारखे मानवी आवाज वर्धित किंवा पुनरुच्चारित करण्याचे कोणतेही उपकरण वापरता किंवा चालवता येणार नाही ; किंवा

(ख) मतदान केंद्रामध्ये किंवा त्याच्या प्रवेशद्वाराजवळ अथवा त्याच्या आसपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी, ओरडता येणार नाही किंवा अन्यथा गैरशिस्त वर्तन करता येणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) मधील उपबंधांचे उल्लंघन करील अथवा उल्लंघन करण्यास बुद्धिपुरस्सर मदत करील किंवा अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) जर एखादी व्यक्ती, या कलमाखालील शिक्षापात्र अपराध करीत आहे किंवा तिने तो केला, असे मतदान केंद्राच्या मतदान केंद्राध्यक्षाला सकारण वाटत असेल तर, तो अशा व्यक्तीला अटक करण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला निदेश देऊ शकेल आणि त्यानंतर पोलीस अधिकारी तिला अटक करील.

(४) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला पोट-कलम (१) मधील कोणत्याही उपबंधांचे उल्लंघन होण्यास प्रतिबंध करण्यासाठी रास्तपणे आवश्यक वाटतील अशा उपाययोजना करता येतील आणि अशा बळाचा वापर करता येईल आणि अशा उल्लंघनासाठी वापरलेले कोणतेही उपकरण सक्तीने ताब्यात घेता येईल.

**१३२. मतदान केंद्रावरील गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा**

(१) कोणत्याही मतदान केंद्रावर मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या दरम्यान जी कोणतीही व्यक्ती गैरवर्तणूक करील किंवा मतदान केंद्राध्यक्षांच्या कायदेशीर निदेशांचे पालन करण्यास चुकेल त्या व्यक्तीला मतदान केंद्राध्यक्ष किंवा त्यावेळी कामावर असलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने या बाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती त्या मतदान केंद्रावरून हाकलून लावू शकेल.

(२) पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेले अधिकार जो मतदार एखाद्या मतदान केंद्रावर मतदान करण्यास एरव्ही हक्कदार असेल, त्याला त्या मतदान केंद्रावर मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशाप्रकारे वापरता येणार नाही.

(३) जर मतदान केंद्रातून हाकलून देण्यात आलेली व्यक्ती मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीशिवाय पुन्हा केंद्रावर आली तर, ती व्यक्ती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

(४) पोट-कलम (३) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

**१३२ क. मतदानासाठी विहित केलेली प्रक्रिया अनुसरण्यास कसूर केल्याबद्दल शिक्षा**

ज्या मतदाराला मतपत्रिका देण्यात आली आहे अशा एखाद्या मतदाराने जर, मतदानासाठी विहित करण्यात आलेली प्रक्रिया अनुसरण्यास नकार दिला तर, त्याला देण्यात आलेली मतपत्रिका रद्द केली जाण्यास पात्र असेल.

**१३३. निवडणुकीच्यावेळी वाहने अवैधपणे भाड्याने आणण्याबद्दल किंवा मिळवण्याबद्दल शिक्षा**

जर, एखादी व्यक्ती, निवडणुकीच्यावेळी किंवा निवडणुकीच्या संबंधात कलम १२३ च्या खंड (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा कोणत्याही भ्रष्टाचाराबद्दल दोषी असेल तर, ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**१३४. निवडणुकीसंबंधीच्या अधिकृत कर्तव्याचा भंग**

(१) ज्या व्यक्तीला हे कलम लागू होते, ती व्यक्ती, वाजवी कारणाशिवाय स्वतःच्या अधिकृत कर्तव्याचा भंग करून कोणतीही कृती किंवा अकृती करण्याबद्दल दोषी असेल तर, ती व्यक्ती पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(१-क) पोट-कलम (१) खाली दंडनीय असलेला गुन्हा दखलपात्र असेल.

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्याबाबत नुकसानी मिळण्यासाठी अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

(३) ज्या व्यक्तींना हे कलम लागू होते, त्या म्हणजे जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि नामनिर्देशने स्वीकारणे किंवा उमेदवारी मागे घेणे यांच्या संबंधीचे काम किंवा निवडणुकीच्या वेळी मत नोंदणीचे किंवा मतमोजणीचे काम करण्यासाठी नियुक्त केलेली अन्य कोणतीही व्यक्ती होत, आणि या कलमाच्या प्रयोजनार्थ, " अधिकृत कर्तव्य " ह्या संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावला जाईल, पण त्यामध्ये या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली नव्हे तर अन्यथा दिलेल्या कामांचा समावेश असणार नाही.

**१३४ क. शासकीय कर्मचाऱ्याने निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून काम करण्याबद्दल शिक्षा**

शासकीय सेवेतील एखाद्या व्यक्तीने, उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी या नात्याने निवडणुकीत काम केले तर, ती व्यक्ती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षास पात्र होईल.

**१३४ ख. शस्त्रे घेऊन मतदान केंद्रावर किंवा मतदान केंद्राजवळ जाण्यास मनाई**

(१) निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, एखादा पोलीस अधिकारी आणि मतदान केंद्रावर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी त्या मतदान केंद्रावर कर्तव्यार्थ नेमणूक झालेली अन्य कोणतीही व्यक्ती, याव्यतिरिक्त, कोणत्याही व्यक्तीला, शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या शस्त्रांनी सुसज्ज अशा स्थितीत मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या जवळपास जाता येणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीने, जर पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन केले तर ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(३) शस्त्र अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा एखादी व्यक्ती, या कलमान्वये अपराधाबद्दल सिद्धदोष ठरेल तेव्हा उक्त अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे तिच्याजवळ सापडलेली शस्त्रे जप्त होण्यास पात्र ठरतील आणि अशा शस्त्राबाबत देण्यात आलेले लायसन त्या अधिनियमाच्या कलम १७ अन्वये रद्द झाल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.

**१३५. मतदान केंद्रावरून मतपत्रिका पळविणे हा गुन्हा होय**

(१) जी व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, एखादी मतपत्रिका मतदान केंद्राबाहेर अनधिकृतरित्या नेईल किंवा नेण्याचा प्रयत्न करील किंवा अशी एखादी कृती करण्यास बुद्धीपुरस्सर मदत करील किंवा अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(२) एखादी व्यक्ती पोट-कलम (१) खालील शिक्षापात्र अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षाला सकारण वाटत असेल तर, अशी व्यक्ती मतदान केंद्रामधून बाहेर जाण्यापूर्वी असा अधिकारी तिला अटक करू शकेल किंवा तिला अटक करण्यासाठी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला निदेश देऊ शकेल आणि अशा व्यक्तीची झडती घेऊ शकेल किंवा पोलीस अधिकाऱ्याकरवी झडती करवू शकेल. परंतु जेव्हा एखाद्या महिलेची झडती घेणे आवश्यक असेल तेव्हा, सभ्यतेचे काटेकोरपणे पालन करून दुसऱ्या महिलेकरवी तिची झडती घेता येईल.

(३) अटक केलेल्या व्यक्तीकडे झडतीनंतर एखादी मतपत्रिका आढळल्यास, मतदान केंद्राध्यक्षाकडून ती मतपत्रिका सुरक्षित ठेवण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याच्या हवाली करण्यात येईल किंवा अशी झडती पोलीस अधिकाऱ्याने केली असेल तेव्हा, असा अधिकारी ती मतपत्रिका स्वतःच्या ताब्यात सुरक्षित ठेवून देईल.

(४) पोट-कलम (१) खाली दंडनीय असलेला अपराध दखलपात्र असेल.

**१३५ क. बूथ ताब्यात घेण्याचा अपराध**

(१) जो कोणी, बूथ ताब्यात घेण्याचा अपराध करील तो एक वर्षांपेक्षा कमी नसेल पण तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि शासकीय सेवेतील व्यक्तीने जर असा अपराध केला तर त्या बाबतीत ती तीन वर्षांपेक्षा कमी नसेल पण पाच वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या आणि द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या व कलम २०-ख च्या प्रयोजनासाठी बूथ ताब्यात घेणे यात, इतर गोष्टींबरोबरच खालील सर्व किंवा त्यापैकी काही कृतींचा समावेश असेल त्या पुढीलप्रमाणे :—

(क) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, कोणत्याही मतदान केंद्राचे किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या कोणत्याही ठिकाणाचे अभिग्रहण करणे, मतपत्रिका किंवा मतदान यंत्रे आपल्या स्वाधीन करण्यास मतदान प्राधिकाऱ्यांना भाग पाडणे आणि जिचा सुरळीतपणे चाललेल्या निवडणुकीवर विपरीत परिणाम होईल अशी कोणतीही कृती करणे.

(ख) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, कोणत्याही मतदान केंद्राचा किंवा मतदान करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणाचा ताबा घेणे आणि केवळ त्याच्या किंवा त्यांच्या समर्थकांनाच मतदानाचा अधिकार बजावू देणे आणि मतदान करण्याचा त्यांचा हक्क मुक्तपणे बजावण्यास इतरांना प्रतिबंध करणे.

(ग) कोणत्याही मतदाराला प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे जबरदस्ती करणे किंवा धाकदपटशा दाखविणे किंवा धमकी देणे व आपले मत देण्यासाठी मतदान केंद्रावर किंवा मतदान करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणी जाण्यास त्यास प्रतिबंध करणे.

(घ) कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तींनी, मतमोजणी करण्यात येणाऱ्या कोणत्याही ठिकाणाचे अभिग्रहण करणे, मतपत्रिका किंवा मतदान यंत्रे आपल्या स्वाधीन करण्यास मतमोजणी प्राधिकाऱ्यांना भाग पाडणे आणि सुरळीत चाललेल्या मतमोजणीवर विपरीत परिणाम होईल अशी कोणतीही कृती करणे.

(ङ) शासकीय सेवेतील कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम व्हावा यासाठी पूर्वोक्त सर्व किंवा कोणत्याही कृती करणे किंवा अशा कृती करण्यास सहाय्य करणे किंवा त्यांना मुकानुमती देणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.

**१३६. इतर अपराध आणि त्याबद्दलच्या शिक्षा**

(१) जर एखाद्या व्यक्तीने, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी,—

(क) कोणतेही नामनिर्देशनपत्र कपटपूर्वक विरूपित केले अथवा कपटपूर्वक नष्ट केले तर, किंवा

(ख) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अथवा त्याच्या प्राधिकारान्वये लावलेली एखादी यादी, सूचना अथवा अन्य कागदपत्र कपटपूर्वक विरूपित केले, नष्ट केले अथवा हलवले तर, किंवा

(ग) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत चिन्ह अथवा डाक मतपत्रिकेद्वारे करावयाच्या मतदानाच्या संबंधातील कोणतीही ओळखीबाबतचे अधिकथन किंवा त्या संबंधात वापरण्यात आलेला अधिकृत लिफाफा कपटपूर्वक विरूपित केला अथवा कपटपूर्वक नष्ट केला तर, किंवा

(घ) उचित प्राधिकाराशिवाय, कोणत्याही व्यक्तीला एखादी मतपत्रिका पुरवली अथवा कोणत्याही व्यक्तीकडून एखादी मतपत्रिका स्वीकारली अथवा एखादी मतपत्रिका जवळ बाळगली, किंवा

(ङ) मतपेटीत कायद्याने प्राधिकृत केलेल्या मतपत्रिके व्यतिरिक्त अन्य काहीही टाकल्यास,

(च) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्यावेळी वापरात असलेली कोणतीही मतपेटी किंवा मतपत्रिका उचित प्राधिकाराशिवाय नष्ट केली, घेतली किंवा त्याबाबत अन्यप्रकारे ढवळाढवळ केली तर, किंवा

(छ) पूर्वी उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही कृती कपटपूर्वक किंवा यथास्थिति, उचित प्राधिकाराशिवाय, करण्याचा प्रयत्न केला किंवा करण्यास मदत केली किंवा अपप्रेरणा दिली तर, ती व्यक्ती निवडणूकविषयक अपराध केल्याची दोषी होईल.

(२) या कलमाखाली निवडणूकविषयक अपराधाबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती ही,—

(क) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष अथवा निवडणुकीच्या संबंधात अधिकृत कर्तव्य करण्यासाठी नियुक्त केलेला अन्य कोणताही अधिकारी किंवा लिपिक असेल तर, ती दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(ख) अन्य कोणतीही व्यक्ती असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास शिक्षेस किंवा द्रव्यदंडास किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीचे काम हे, निवडणुकीतील मतमोजणीसह त्या निवडणुकीच्या किंवा निवडणुकीच्या भागाच्या चालनामध्ये सहभागी होणे किंवा निवडणुकीनंतर अशा निवडणुकीत वापरण्यात आलेल्या मतपत्रिका आणि अन्य दस्तऐवज यांस जबाबदार राहणे अशा स्वरूपाचे असेल तर, ती व्यक्ती पदीय कामावर असल्याचे समजण्यात येईल, पण "अधिकृत कर्तव्य" या संज्ञेमध्ये या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली अन्यथा सोपवलेल्या कोणत्याही कामाचा समावेश होणार नाही.

(४) पोट-कलम (२) खालील दंडनीय असलेला अपराध दखलपात्र असेल.

# जोडपत्र-२

## निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ यातील उतारे

## (प्रकरण १, परिच्छेद १.१)

**टीप :-** जोडपत्र-१ (लोक प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यामधील उतारे) आणि जोडपत्र-२ (निवडणूक घेण्याबाबत नियम, १९६१ यामधील उतारे) यांमध्ये नमूद केलेले सर्व मुद्दे, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या व व्हीव्हीपॅट च्या समावेशामुळे कोणत्याही बदला संबंधात कलम ६१क मधील स्पष्टीकरणानुसार वाचावेत.

**१३. मतदान प्रतिनिधींची नेमणूक**

(१) कलम ४६ अन्वये नेमल्या जाणाऱ्या मतदान प्रतिनिधींची संख्या एक प्रतिनिधी आणि दोन बदली प्रतिनिधी अशी राहील.

(२) अशी प्रत्येक नेमणूक नमुना १० मध्ये करण्यात येईल आणि तो नमुना मतदान केंद्रामध्ये किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी, सादर करण्यासाठी मतदान प्रतिनिधीला देण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये स्वतःच्या नेमणूकपत्रातील प्रतिज्ञालेख मतदान केंद्राध्यक्षासमक्ष यथायोग्य रितीने भरून आणि त्यावर सही करून ते नेमणूकपत्र मतदान केंद्राध्यक्षाला सादर केल्याशिवाय कोणत्याही मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रात किंवा मतदानासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही.

**१४. मतदान प्रतिनिधीची नेमणूक रद्द करणे**

(१) कलम ४८ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेली मतदान प्रतिनिधीची नेमणूक नमुना ११ मध्ये रद्द करण्यात येईल आणि तो नमुना मतदान केंद्राध्यक्षाकडे दाखल करण्यात येईल.

(२) अशाप्रकारे नेमणूक रद्द झालेल्या अशा कोणत्याही प्रसंगी उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी मतदान संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी नियम १३ मध्ये नमूद केलेल्या रीतीने नवीन नेमणूक करील आणि त्या नियमातील तरतुदी अशा प्रत्येक प्रतिनिधीला लागू असतील.

**१६. सामान्यतः प्रत्यक्ष जाऊन मतदान करणे**

यात यापुढे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, निवडणुकीत मतदान करणारे सर्व मतदार कलम २५ अन्वये यथास्थिति, त्यांच्यासाठी ठरवून दिलेल्या मतदान केंद्रावर किंवा कलम २९ अन्वये निश्चित केलेल्या मतदानाच्या ठिकाणी स्वतः जाऊन मतदान करतील.

### टपाली मतदान

**१७. व्याख्या :** ह्या भागात,—

(अ) "सरकारी सेवेतील मतदार" म्हणजे कलम ६० च्या खंड (क) किंवा खंड (ख) मधील कोणतीही विनिर्दिष्ट व्यक्ती, परंतु नियम २७ ड मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे "वर्गीकृत सरकारी सेवेतील मतदार" याचा समावेश नसेल;

(ब) "विशेष मतदार" म्हणजे लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० (१९५० चा ४३) च्या कलम २० मधील पोट-कलम (४) च्या तरतुदी ज्याला लागू असल्याचे जाहीर करण्यात आले आहे असे पद धारण करणारी कोणीही व्यक्ती किंवा अशा व्यक्तीची पत्नी, मात्र उक्त कलमामधील पोट-कलम (५) अन्वये केलेल्या कथनामुळे त्याचे किंवा तिचे नाव मतदार म्हणून नोंदले गेले असले पाहिजे ;

(क) "निवडणुकीचे काम करणारा मतदार" म्हणजे जो एखाद्या मतदारसंघातील मतदार असून आपल्या हक्काच्या मतदान केंद्रात जाऊन मतदान करता येत नाही असा कोणीही मतदान प्रतिनिधी, मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष किंवा इतर सरकारी कर्मचारी.

## १८. टपाली मतदानाचा हक्क असलेल्या व्यक्ती

पुढील व्यक्ती यापुढे नमूद केलेल्या आवश्यक गोष्टींची पूर्ण पूर्तता करण्यास अधीन राहून टपालाने मतदान करण्यास हक्कदार असतील :–

(अ) संसदेच्या किंवा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत,–

(एक) विशेष मतदार,

(दोन) सेनादलातील मतदार,

(तीन) निवडणुकीचे काम करणारे मतदार, आणि

(चार) प्रतिबंधक स्थानबद्धतेत असलेले मतदार.

(पाच) निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ जुलै, २०२० च्या निर्णयासह निवडणुका घेण्याबाबत (सुधारणा) नियम, २०१९, आणि निवडणुका घेण्याबाबत (सुधारणा) नियम, २०२० अनुसार, पुढील प्रवर्गातील अनुपस्थित मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे:

- वरिष्ठ नागरिक (वयाच्या ८० वर्षांवरील)
- मतदार यादीमध्ये दिव्यांग (विकलांग) म्हणून खूण केलेल्या व्यक्ती आणि
- कोविड १९ ने संशयित किंवा बाधित असलेल्या व्यक्ती.

(ब) विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकीत,–

(एक) निवडणुकीचे काम करणारे मतदार,

(दोन) प्रतिबंधक स्थानबद्धतेत असलेले मतदार, आणि

(तीन) नियम ६८ च्या खंड (ख) अन्वये निवडणूक आयोगाने या बाबतीत निर्देशिल्यास मतदारसंघातील संपूर्ण किंवा नमूद केलेल्या कोणत्याही भागातील मतदार.

(क) विधानसभा सदस्यांच्या निवडणुकीत :–

(एक) प्रतिबंधक स्थानबद्धतेत असलेले मतदार आणि

(दोन) नियम ६८ च्या खंड (क) अन्वये निवडणूक आयोगाने याबाबतीत निर्देशिल्यास सर्व मतदार.

## २०. निवडणुकीचे काम करणाऱ्या मतदारांकडून येणाऱ्या सूचना

(१) निवडणुकीचे काम करणाऱ्या ज्या मतदाराची निवडणुकीत टपालाने मतदान करावयाची इच्छा असेल, त्याने मतदान दिनांकाच्या आधी निदान सात दिवस किंवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने परवानगी दिल्यास त्यापेक्षा कमी दिवस आधी पोहोचेल या बेताने नमुना १२ मध्ये अर्ज पाठविला पाहिजे आणि अर्जदार हा निवडणुकीचे काम करणारा मतदार आहे अशी जर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटली तर तो त्याला टपालाने पाठवावयाची मतपत्रिका देईल.

(२) एखाद्या मतदारसंघात निवडणुकीचे काम करणारा मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष किंवा अन्य सरकारी कर्मचारी हा त्याच मतदार संघातील मतदार असल्यामुळे त्याची लोकसभा अथवा विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या वेळी टपालाने मतदान न करता जातीने मतदान करण्याची इच्छा असेल तर, मतदानाच्या निदान चार दिवस आधी किंवा अधिकाऱ्याने परवानगी दिल्यास त्यापेक्षा कमी दिवस आधी पोहोचेल अशा बेताने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे तो नमुना १२-अ मध्ये अर्ज पाठविल आणि जर तो अर्जदार अशा प्रकारचा सरकारी कर्मचारी आणि त्याच मतदारसंघातील निवडणुकीच्या कामावरील मतदार आहे अशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची खात्री पटली तर तो–

(अ) अर्जदाराला नमुना १२-ब मध्ये निवडणूक कार्य प्रमाणपत्र देईल.

(ब) निवडणुकीच्या कामावर असल्याबद्दलचे प्रमाणपत्र त्याला देण्यात आले आहे हे दर्शविण्यासाठी मतदारांच्या यादीच्या खूण केलेल्या प्रतीमध्ये त्याच्या नावापुढे "निकाप्र" असे लिहील.

(क) ज्या मतदान केंद्रावर तो मतदान करण्यास अन्यथा पात्र झाला असता अशा मतदान केंद्रावर त्याला मतदान करण्यास परवानगी दिली जात नाही त्याबद्दल खात्री करून घेईल.

**विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

**(विधि विभाग)**

**अधिसूचना**

**नवी दिल्ली, दिनांक २४ मार्च १९९२**

**स्थायी आदेश २३० (ई)** – लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ (१९५१ चा ४३) याच्या कलम १६९ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकार, निवडणूक आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर, निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहे :-

**१.** (एक) या नियमांना, निवडणुका घेण्याबाबतचे (सुधारणा) नियम, १९९२ असे म्हणावे.

(दोन) हे नियम ते **राजपत्रात** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

**२.** निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) या मधील,-
–

(क) भाग चारच्या शीर्षकानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :-

"प्रकरण एक मतपत्रिकेद्वारे मतदान";

(ख) नियम २८ मधील, "या भागामध्ये" या मजकुराऐवजी "या प्रकरणामध्ये व प्रकरण दोन मध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ग) नियम ४९ नंतर, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

**४९-ग. मतदान केंद्रावरील व्यवस्था**

(१) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर ठळकपणे दिसतील अशाप्रकारे खालील गोष्टी प्रदर्शित करण्यात येतील :–

(अ) त्या मतदान केंद्रामध्ये ज्या मतदान क्षेत्रातील मतदारांना मत देण्याचा अधिकार असेल त्या मतदान क्षेत्राचा तपशील आणि जेथे मतदान क्षेत्रात एकापेक्षा अधिक मतदान केंद्र असतील तेथे त्या त्या केंद्रात मत देण्याचा ज्यांना अधिकार असेल अशा मतदारांचा तपशील दर्शविणारी सूचना ;

आणि

(ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीची एक प्रत.

(२) प्रत्येक मतदान केंद्रावर ज्यात मतदार इतरांच्या दृष्टीआड राहून आपली मते नोंदवू शकतील असे दोन किंवा अधिक मतदान कक्ष उभारले जातील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावर एक मतदान यंत्र आणि आणि मतदार याद्यांच्या संबंधित भागाच्या प्रती आणि मतदान घेण्यासाठी आवश्यक असणारी अशी इतर निवडणूक सामग्री पुरवील.

(४) पोट-नियम (३) च्या तरतुदींस बाधा येऊ न देता, निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक आयोगाच्या पूर्वमान्यतेने, एकाच आवारात असलेल्या दोन किंवा अधिक मतदान केंद्रांसाठी एक सामाईक मतदान यंत्र पुरवील.

**४९-घ. मतदान केंद्रामध्ये प्रवेश देणे**

मतदान केंद्राध्यक्ष, कोणत्याही एका वेळी मतदान केंद्रामध्ये प्रवेश द्यावयाच्या मतदारांच्या संख्येवर नियंत्रण ठेवील आणि त्यात खालील व्यक्तीखेरीज इतर व्यक्तींना प्रवेश देण्यात येणार नाही :–

(अ) मतदान अधिकारी.

(ब) निवडणुकीच्या संबंधात कामावर हजर असलेले लोकसेवक.

(क) निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती.

(ड) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि नियम १३ च्या तरतुदीस अधीन राहून प्रत्येक उमेदवाराचा एक मतदान प्रतिनिधी.

(ई) मतदाराच्या कडेवर असलेले मूल.

(फ) ज्या व्यक्तीला मदतीशिवाय हालचाल करता येत नाही अशा अंध किंवा विकलांग मतदाराला सोबत करणारी व्यक्ती.

(ग) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष यांनी नियम ४९-छ च्या पोट-नियम (२) किंवा नियम ४९-ज च्या पोट-नियम (१) अन्वये नियुक्त केल्या असतील अशा इतर व्यक्ती.

**४९-ङ. मतदानासाठी मतदान यंत्रे तयार करणे**

मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटवर व मतदान युनिटवर आणि जेथे प्रिंटर पेपर ट्रेलसाठी प्रिंटर वापरण्यात आले असेल तेथे पुढील बाबींच्या खूणचिठ्ठ्या लावलेल्या असतील :–

(क) मतदारसंघाचे नाव व असल्यास त्याचा अनुक्रमांक.

(ख) मतदान केंद्राचे किंवा यथास्थिति मतदान केंद्रांचे नाव व अनुक्रमांक.

(ग) युनिटचा अनुक्रमांक, आणि

(घ) मतदानाचा दिनांक.

(२) मतदान सुरू होण्याच्या लगतपूर्वी मतदान केंद्राध्यक्ष मतदान यंत्रामध्ये कोणतेही मत नोंदवलेले नसल्याचे आणि त्यावर पोट-नियम (१) मध्ये निर्देशिलेली खूणचिठ्ठी लावलेली असल्याचे आणि जेथे पेपर ट्रेलसाठी प्रिंटर वापरला आहे तेथे प्रिंटरचा ड्रॉप बॉक्स रिकामा असल्याचे मतदान प्रतिनिधींना व तेथे उपस्थित असलेल्या इतर व्यक्तींना प्रत्यक्ष दाखवील.

(३) मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट सुरक्षित करण्यासाठी त्यावर कागदी मोहोर लावली जाईल व मतदान केंद्राध्यक्ष त्या कागदी मोहोरेवर स्वतःची सही करील आणि त्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधीपैकी जे इच्छूक असतील त्यांचीही सही घेईल.

(४) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर अशा प्रकारे स्वाक्षरित केलेली कागदी मोहोर मतदान यंत्राच्या नियंत्रण युनिटांवर त्यासाठी असलेल्या जागेवर लावून ते सुरक्षित व मोहोरबंद करील.

(५) नियंत्रण युनिट सुरक्षित करण्यासाठी वापरलेली मोहोर अशातऱ्हेने लावलेली असेल की युनिट मोहोरबंद केल्यानंतर, ती मोहोर फाडल्याशिवाय "रिझल्ट बटण" दाबणे शक्य होणार नाही.

(६) नियंत्रण युनिट बंद आणि सुरक्षित करून मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान प्रतिनिधी यांना पूर्णपणे दिसेल अशा प्रकारे ठेवले जाईल तसेच मतदान युनिट मतदान कक्षात ठेवले जाईल.

(७) जेथे पेपर ट्रेलसाठी प्रिंटर वापरला आहे तेथे मतदान कक्षातील मतदान युनिटसोबत प्रिंटरदेखील ठेवण्यात यावा आणि निवडणूक आयोग निदेश देईल अशा रीतीने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला जोडण्यात यावा.

**४९-च. मतदारयादीची चिन्हांकित प्रत**

मतदान सुरू होण्याच्या लगतपूर्वी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान प्रतिनिधी आणि उपस्थित असलेल्या इतरांना, मतदानाच्या वेळी वापरावयाच्या मतदार-यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये पुढील नोंदी केल्या नसल्याचे, प्रात्यक्षिकासह दाखवून देईल .—

(क) नियम २० च्या पोट-नियम (२) च्या खंड (ख) अनुसार करण्यात आलेल्या नोंदीव्यतिरिक्त इतर नोंद. (निकाप्र-निवडणूक कार्य प्रमाणपत्र)

(ख) नियम २३ च्या पोट-नियम (२) च्या खंड (ख) अनुसार करण्यात आलेल्या खुणेव्यतिरिक्त इतर खूण. (टम-टपाली मतपत्रिका)

**४९-छ. महिला मतदारांसाठी सुविधा**

(१) मतदान केंद्र हे महिला व पुरूष अशा दोन्ही मतदारांसाठी असेल तेव्हा मतदान केंद्राध्यक्ष, त्यांच्या वेगवेगळ्या गटांना मतदान केंद्रात आळीपाळीने प्रवेश देण्याचे निदेश देऊ शकेल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रात महिला मतदारांना मदत करण्यासाठी महिला मतदारांचे मत नोंदवून घेण्याबाबत मतदान केंद्राध्यक्षाला मदत करण्यासाठी आणि विशेषतः आवश्यकता भासल्यास कोणत्याही महिला मतदाराची झडती घेण्यासाठी, एखाद्या महिलेची सेविका म्हणून नियुक्ती करू शकतात.

**४९-ज. मतदारांची ओळख पटविणे**

(१) मतदान केंद्राध्यक्ष, कोणत्याही मतदान केंद्रावर त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तीची, मतदारांची ओळख पटवण्यासाठी किंवा अन्यथा मतदान घेण्यात मदत करण्यासाठी नियुक्ती करू शकतात.

(२) प्रत्येक मतदाराने मतदान केंद्रात प्रवेश केल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी, मतदाराचे नाव आणि इतर तपशील मतदार यादीमधील संबंधित नोंदींशी पडताळून पाहील आणि नंतर मतदाराचा अनुक्रमांक, नाव व इतर तपशील मोठ्याने वाचून दाखवील.

(३) मतदार नोंदणी नियमावली, १९६० च्या तरतुदींखाली जेथील मतदारांना ओळखपत्र दिलेले आहे अशा मतदारसंघात मतदान केंद्र असेल तेव्हा मतदान केंद्राध्यक्ष किंवा त्याने याबाबतीत प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी यांच्यासमोर मतदार ते ओळखपत्र सादर करील.

(४) एखाद्या व्यक्तीचा मतदानाचा अधिकार ठरवताना, मतदार हा मतदार यादीतील नोंदीशी संबंधित असलेली व्यक्तीच आहे याबाबत मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी यांची खात्री पटल्यास ते अशा नोंदीमधील लेखनप्रमाद आणि मुद्रणदोषांकडे दुर्लक्ष करतील.

**४९-झ. निवडणुकीच्या कामावर असलेल्या लोकसेवकांसाठी सुविधा**

(१) मतदान केंद्रावर नमुना १२-ब मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणाऱ्या आणि त्याला जेथे मतदानाचा हक्क आहे त्यापेक्षा वेगळे असले तरी त्याच मतदान केंद्रावर मतदान करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यक्तीला, नियम ४९-ज मधील तरतुदी लागू होणार नाहीत.

(२) असे प्रमाणपत्र सादर केल्यावर मतदान केंद्राध्यक्ष,—

(क) ते सादर करणाऱ्या व्यक्तीची त्यावर सही घेईल.

(ख) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीच्या शेवटी प्रमाणपत्रात उल्लेख केल्याप्रमाणे त्या व्यक्तीचे नाव आणि मतदार नोंदणी क्रमांक नोंदवून घेईल ; आणि

(ग) त्या मतदान केंद्रावर मतदान करण्याचा हक्क असलेला मतदार मत नोंदवील त्याच पद्धतीने त्याला त्याचे मत नोंदवण्याची परवानगी देईल.

**४९-ञ. ओळखीबाबत आक्षेप घेणे**

(१) कोणत्याही मतदान प्रतिनिधीला आपण एक विशिष्ट मतदार असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या ओळखीबाबत, मतदान केंद्राध्यक्षाकडे अशा प्रत्येक प्रकरणी रोख दोन रुपये जमा करून आक्षेप घेता येईल.

(२) अशारीतीने ते जमा केल्यावर मतदान केंद्राध्यक्ष,—

(क) आक्षेप घेतलेल्या व्यक्तीस, तोतयेगिरीसाठी होणाऱ्या शिक्षेबाबत ताकीद देईल.

(ख) मतदार यादीतील संबंधित नोंद मोठ्याने वाचून दाखवील आणि त्या नोंदीमध्ये निर्देशिलेली व्यक्ती तोच आहे काय म्हणून विचारील.

(ग) नमुना १४ मधील आक्षेपित मतांच्या यादीत त्याचे नाव आणि पत्ता नोंदवील.

(घ) उक्त यादीवर त्याला सही करण्यास भाग पाडील.

(३) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष आक्षेपाबाबत संक्षिप्त चौकशी करील आणि त्या प्रयोजनासाठी :-

(क) आक्षेपकाला, त्याचा आक्षेप सिद्ध करण्यासाठी, पुरावा सादर करण्यासाठी आणि आक्षेपित व्यक्तीला त्याची ओळख सिद्ध करण्यासाठी पुरावा सादर करण्यास भाग पाडील; आणि

(ख) आक्षेपित व्यक्तीला, त्याची ओळख सिद्ध करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले काही प्रश्न विचारील आणि शपथेवर त्याला उत्तरे देण्यास भाग पाडील.

(ग) आक्षेपित व्यक्तीला शपथ देईल आणि इतर कोणत्याही व्यक्तीला पुरावा देण्यास सांगील.

(४) चौकशी केल्यानंतर, आक्षेप सिद्ध झाला नाही असे जर मतदान केंद्राध्यक्षाला वाटले तर तो आक्षेपित व्यक्तीला मतदान करू देईल आणि आक्षेप सिद्ध झाला आहे असे जर त्याला वाटले तर तो त्या व्यक्तीला मतदान करण्यास मनाई करील.

(५) आक्षेप क्षुल्लक कारणासाठी घेण्यात आलेला आहे किंवा तो चांगल्या हेतूने घेतलेला नाही असे जर मतदान केंद्राध्यक्षाला वाटले असेल तर, तो पोट-नियम (१) खाली जमा करण्यात आलेली रक्कम शासनाकडे जमा करण्याचे आणि इतर कोणत्याही प्रकरणात चौकशीनंतर ती आक्षेपकाला परत करण्याचे निदेश देईल.

**४९-ट. तोतयेगिरीविरुद्ध प्रतिबंधक उपाय.—**

(१) मतदान केंदाध्यक्ष, किंवा, यथास्थिति मतदान अधिकारी ज्याच्या ओळखीबाबत निःशंक असतील असा कोणताही मतदार, मतदान केंद्राध्यक्षाला किंवा मतदान प्रतिनिधीला आपली डावी तर्जनी तपासण्यास तसेच तीवर पक्क्या शाईने खूण करण्यास मुभा देईल.

(२) जर कोणताही मतदार,—

(क) पोट-नियम (१) अनुसार आपली डावी तर्जनी तपासू देण्यास किंवा तीवर खूण करण्यास नकार देईल किंवा तिच्या डाव्या तर्जनीवर आधीपासूनच अशी खूण असेल किंवा शाईची खूण पुसून टाकण्याच्या उद्देशाने काही कृती करील, किंवा

(ख) नियम ४९-ज च्या पोट-नियम (३) खाली आवश्यक असल्याप्रमाणे त्याचे ओळखपत्र सादर करण्यास कसूर करील किंवा नकार देईल त्याला मतदान करू दिले जाणार नाही.

(३) जेव्हा एखाद्या संसदीय मतदारसंघात आणि एखाद्या विधानसभा मतदारसंघात एकाच वेळी मतदान चालू असेल तेव्हा ज्याच्या डाव्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण आहे किंवा ज्याने त्यापैकी एका निवडणुकीत ओळखपत्र सादर केले आहे अशा व्यक्तीला, वरील पोट-नियम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दुसऱ्या निवडणुकीत मतदान करण्याची परवानगी दिली जाईल.

(४) मतदाराच्या डाव्या तर्जनीबाबत या नियमामध्ये केलेला कोणताही निर्देश हा, उमेदवाराला डावी तर्जनी नसली तर त्याच्या डाव्या हाताच्या कोणत्याही बोटाला, आणि त्याच्या डाव्या हाताला बोटेच नसतील तर उजव्या हाताच्या तर्जनीपासून सुरू होणाऱ्या कोणत्याही बोटाला आणि त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताला अजिबात बोटेच नसतील तर डाव्या किंवा उजव्या हाताच्या दंडाचे जे टोक असेल त्याला केलेला निर्देश आहे असा त्याचा अन्वयार्थ लावला जाईल.

**४९-ठ. मतदान यंत्राद्वारे मते नोंदविण्याची पद्धती**

(१) मतदाराला मतदान करू देण्यापूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष,—

(क) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीवर नोंदवल्याप्रमाणे त्या मतदाराचा मतदार यादी क्रमांक नमुना १७-अ मधील मतदार नोंदवहीत नोंदवील.

(ख) उक्त मतदार नोंदवहीवर मतदारांच्या सह्या/अंगठ्याचे ठसे घेईल ;

(ग) मतदाराला मतदान करू देण्यात आले हे दर्शविण्यासाठी मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमधील मतदाराच्या नावासमोर खूण करील ; आणि

(घ) मतदाराने, त्याच्या/तिच्या ओळखीच्या पुराव्यादाखल सादर केलेल्या दस्तऐवजांचा तपशील देईल :

परंतु, मतदाराने नोंदवहीवर आपली सही/अंगठ्याचा ठसा दिल्याशिवाय कोणत्याही मतदारास मतदान करू दिले जाणार नाही.

(२) नियम २ च्या पोट-नियम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही मतदान केंद्राध्यक्षाला किंवा मतदान अधिकाऱ्याला किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याला, मतदान नोंदवहीवरील मतदाराच्या अंगठ्याचा ठसा साक्षांकित करणे आवश्यक असणार नाही.

**४९-ड मतदान केंद्रात मतदारांनी मतदानाची गुप्तता राखणे आणि मतदान पद्धतीचे अनुसरण करणे**

(१) नियम ४९-ठ खाली मतदान करू दिलेला प्रत्येक मतदार हा मतदान केंद्रात मतदानाविषयी गुप्तता राखील आणि त्यासाठी यापुढे देण्यात आलेल्या मतदानाच्या पद्धतीचा अवलंब करील.

(२) मतदान करण्यास परवानगी दिल्यानंतर मतदार थेट मतदान केंद्राध्यक्षाकडे किंवा मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट ज्याच्या ताब्यात असेल अशा मतदान अधिकाऱ्याकडे जाईल व तो मतदाराचे मत नोंदवण्यासाठी नियंत्रण कक्षातील योग्य बटण दाबून मतदान युनिट चालू करील.

(३) मतदार त्यानंतर ताबडतोब,—

(क) मतदान कक्षात जाईल.

(ख) मतदान युनिटमधील त्याच्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावासमोरील व चिन्हासमोरील बटन दाबून आपले मत नोंदवील, आणि

(ग) मतदान कक्षातून बाहेर पडून मतदान केंद्रातून निघून जाईल :

परंतु असे की, जेथे पेपर ट्रेलसाठी प्रिंटर वापरण्यात आले आहे तेथे खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे बटण दाबून मत दिल्यावर मतदार, मतदान कक्षामध्ये मतदान युनिटासोबत ठेवला. प्रिंटरच्या पारदर्शक खिडकी (विंडो) मधून, ज्याला त्याने त्याचे मत दिले त्या उमेदवाराचा अनुक्रमांक, नाव व चिन्ह दर्शविणारी छापील कागदी चिठ्ठी अशी कागदी चिठ्ठी कापून घेण्यापूर्वी आणि प्रिंटरच्या ड्रॉप बॉक्समध्ये टाकण्यापूर्वी, पाहणे शक्य होईल.

(४) प्रत्येक मतदार गैरवाजवी विलंब न लावता मतदान करील.

(५) एक मतदार मतदान कक्षात असताना दुसऱ्या कोणत्याही मतदारास तेथे प्रवेश दिला जाणार नाही.

(६) नियम ४९-ठ किंवा नियम ४९-त खाली मतदानाची परवानगी दिलेला मतदार, मतदान केंद्राध्यक्षाने ताकीद दिल्यानंतरही उक्त नियमांच्या पोट-नियम (३) मध्ये दिलेली कार्यपद्धती अनुसरण्यास नकार देईल तर, मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान केंद्राध्यक्षाच्या निदेशानुसार मतदान अधिकारी अशा मतदारास मतदान करण्यास परवानगी देणार नाही.

(७) मतदारास पोट-नियम (६) अन्वये मतदान करण्याची परवानगी देण्यात आली नसेल तेथे मतदान केंद्राध्यक्ष स्वतःच्या सहीने मतदान कार्यपद्धतीचा भंग झाला आहे अशा आशयाचा शेरा नमुना १७-ए मधील मतदान नोंदवहीत मतदाराच्या नावासमोर देईल.

**४९-ड क.   कागदी चिठ्ठीवर छापलेल्या तपशिलाविषयी तक्रार असल्यास त्याबाबतची कार्यपद्धती**

(१) जेथे विशिष्ट कागदी चिठ्ठी/पावतीसाठी प्रिंटर वापरण्यात आले असेल तेथे नियम ४९ङ अन्वये एखाद्या मतदाराने त्याचे मत नोंदविल्यानंतर प्रिंटरने मुद्रित केलेल्या कागदी चिठ्ठीवर त्याने मत दिलेल्या उमेदवारापेक्षा इतर उमेदवाराचे नाव किंवा चिन्ह दर्शविण्यात आले आहे असा आरोप केल्यास मतदान केंद्राध्यक्ष, त्याला खोटे प्रतिज्ञापत्र केल्याच्या परिणामांविषयी त्याला ताकिद दिल्यानंतर मतदाराकडून लेखी प्रतिज्ञापन घेईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले लेखी प्रतिज्ञापन मतदाराने दिल्यास, मतदान केंद्राध्यक्ष, नमुना १७ए मधील त्या मतदाराशी संबंधित नोंद/दुसऱ्यांदा  घेईल आणि त्याच्या उपस्थितीत आणि मतदान केंद्रात उपस्थित असतील अशा उमेदवारांच्या किंवा मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान यंत्रात चाचणी मत नोंदविण्याची मतदारास अनुमती देईल आणि प्रिंटरमधून मुद्रित झालेली कागदी चिठ्ठी पाहील.

(३) आरोप खरा असल्याचे दिसून आल्यास, मतदान केंद्राध्यक्ष ही वस्तुस्थिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला तात्काळ कळवील, त्या मतदान यंत्रातील पुढील मत नोंदणी थांबवील आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे देण्यात येईल अशा निदेशांनुसार कृती करील.

(४) तथापि, आरोप खोटा असल्याचे आढळून आल्यास आणि पोट-नियम (१) अन्वये अशा प्रकारे छापून आलेली कागदी चिठ्ठी पोट-नियम (२) अन्वये मतदाराने नोंदवलेल्या चाचणी मताशी जुळत असल्यास, त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष—

(एक) मतदाराने, ज्याच्यासाठी असे चाचणी मत नोंदविले आहे अशा उमेदवाराचा अनुक्रमांक व नाव नमूद करून नमूना १७ए मध्ये त्या मतदाराशी संबंधित दुसऱ्या नोंदीसमोर तशा आशयाचा शेरा देईल ;

(दोन) अशा शेऱ्यासमोर त्या मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा घेईल ; आणि

(तीन) नमुना १७सी च्या भाग एकमधील बाब ५ मधील अशा चाचणी मतासंबंधात आवश्यक त्या नोंदी घेईल.

**४९-ढ.   अंध किंवा विकलांग मतदारांच्या मतांची नोंदणी**

(१) जर अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक विकलांगतेमुळे मतदाराला मतदान यंत्राच्या मतदान युनिटवरील निशाण्या ओळखणे अशक्य आहे किंवा सहाय्याशिवाय तेथील योग्य बटण दाबून आपले मत नोंदवणे अशक्य आहे याविषयी मतदान केंद्राध्यक्षाची खात्री झाली तर, तो त्या मतदाराला, त्याच्या वतीने व त्याच्या इच्छेप्रमाणे मत नोंदवण्यासाठी ज्याचे वय अठरा वर्षांहून कमी नाही असा एखादा सोबती आपल्याबरोबर मतदान कक्षात नेण्याची परवानगी देईल :

परंतु, कोणत्याही, व्यक्तीला मतदान केंद्रावर त्याच दिवशी एकाहून अधिक मतदारांचे सोबती म्हणून काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, या नियमानुसार कोणत्याही दिवशी मतदाराचा सोबती म्हणून एखाद्या व्यक्तीस काम करण्यास परवानगी देण्यापूर्वी मतदाराच्या वतीने त्या व्यक्तीने नोंदलेले मत ती गुप्त ठेवील आणि यापूर्वी त्याच दिवशी कोणत्याही मतदाराचा सोबती म्हणून कोणत्याही मतदान केंद्रावर तिने काम केलेले नाही, अशा अर्थाचे प्रतिज्ञापन त्या व्यक्तीस करून द्यावे लागेल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष या नियमाखालील सर्व प्रकरणाची नोंद नमुना १४-अ मध्ये ठेवील.

**४९-ण.   मतदान न करण्याचे ठरवलेले मतदार**

एखाद्या मतदाराचा मतदार यादीतील नोंदणी क्रमांक नियम ४९-ठ च्या पोट-नियम (१) अन्वये नमुना १७-अ मधील मतदार नोंदवहीत यथोचितरीत्या नोंदवल्यानंतर व त्या नोंदवहीत त्याने आपली स्वाक्षरी केल्यानंतर अथवा अंगठ्याचा ठसा उमटविल्यानंतर त्या मतदाराने आपले मत नोंदवायचे नाही असे ठरविल्यास, मतदान केंद्राध्यक्षाकडून नमुना १७-अ मधील उक्त नोंदीसमोर तशा अर्थाचा शेरा मारण्यात येईल व त्या शेऱ्यासमोर त्या मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा घेण्यात येईल.

**४९-त. प्रदत्त मते**

(१) आपण अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे सांगून एखादी व्यक्ती मतदान करून गेल्यावर जर दुसरी व्यक्ती आपणच तो अमुक एक विशिष्ट मतदार आहोत असे सांगून मतदान करण्याची मागणी करू लागली आणि स्वतःची ओळख पटवून देण्यासाठी तिने जर मतदान केंद्राध्यक्षाने विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली तर, मतदान केंद्राध्यक्ष, त्या मतदारास मतदान युनिटमार्फत मत नोंदवण्याऐवजी, निवडणूक आयोगाने विनिर्दिष्ट केली असेल अशा रचनाकृती आणि अशा भाषेत किंवा तपशील असलेली प्रदत्त मतपत्रिका पुरवील.

(२) अशी प्रत्येक व्यक्ती प्रदत्त मतपत्रिका मिळण्यापूर्वी नमुना १७-ब मध्ये दिलेल्या यादीत केलेल्या तिच्या संबंधित नोंदीच्या पुढे स्वतःचे नाव लिहील.

(३) मतपत्रिका मिळाल्यावर तो मतदार ताबडतोब.—

(क) मतदान कक्षात जाईल.

(ख) ज्याला मत देण्याची इच्छा असेल अशा उमेदवाराच्या मतपत्रिकेवरील चिन्हावर किंवा चिन्हाजवळ, त्यासाठी पुरवण्यात आलेल्या साधनाने किंवा वस्तूने 'X' फुलीचा शिक्का मारून तो आपले मत नोंदवील.

(ग) त्याचे मत गुप्त राहावे म्हणून मतपत्रिकेची घडी करील.

(घ) आवश्यक वाटल्यास, मतदान केंद्राध्यक्षाला मतपत्रिकेवरील विभेदक चिन्ह दाखवील.

(ड़) तो मतदान केंद्राध्यक्षाला देईल आणि तो विशेषतः राखून ठेवलेल्या लिफाफ्यामध्ये ठेवील ; आणि

(च) मतदान केंद्रातून निघून जाईल.

(४) जर असा मतदार, अंधत्व किंवा विकलांगता यामुळे, मदतीशिवाय आपले मत नोंदवण्यास असमर्थ असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष नियम ४९-ढ मध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून व त्याच शर्तींच्या अधीन राहून त्या मतदारास आपल्या इच्छेनुसार मत नोंदवण्यासाठी आपल्याबरोबर एक सोबती नेण्याची परवानगी देईल.

**४९-थ. मतदान केंद्राध्यक्षाचा मतदान चालू असताना मतदान कक्षात प्रवेश**

(१) मतदान केंद्राध्यक्ष, त्याला आवश्यक वाटेल तेव्हा, मतदान चालू असताना मतदान कक्षात प्रवेश करील आणि मतदान युनिटात कुठल्याही प्रकारे गैरफेर केलेला नाही किंवा त्यात हस्तक्षेप केलेला नाही याची खात्री करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते उपाय योजील.

(२) एखादा मतदार मतदान कक्षातील मतदान युनिटात गैरफेर करीत आहे किंवा अन्य प्रकारे त्यात हस्तक्षेप करीत आहे किंवा मतदान कक्षात बराच वेळ विनाकारण थांबला आहे अशी शंका घेण्यास मतदान केंद्राध्यक्षाला वाव असेल तर तो मतदान कक्षात प्रवेश करील व मतदानाची पुढील प्रक्रिया सुरळीत व सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ते उपाय योजील.

(३) या नियमान्वये मतदान केंद्राध्यक्ष जेव्हा जेव्हा मतदान कक्षात प्रवेश करील तेव्हा तेव्हा तो उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधीची इच्छा असल्यास त्यांना स्वतःबरोबर येण्याची परवानगी देईल.

**४९-द. मतदान समाप्त करणे**

(१) कलम ५६ अन्वये निश्चित केलेल्या वेळी मतदान केंद्राध्यक्ष मतदान समाप्त करील आणि नंतर कोणाही मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही :

परंतु, मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी तेथे हजर असलेल्या सर्व मतदारांना मतदान करू दिले जाईल.

(२) मतदान केंद्र बंद होण्यापूर्वी, एखादा मतदार तेथे हजर होता किंवा कसे असा प्रश्न उद्भवल्यास त्याबाबतीत मतदान केंद्राध्यक्ष निर्णय घेईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

**४९-ध. नोंदवलेल्या मतांचा हिशेब**

(१) मतदान संपल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष नोंदवलेल्या मतांच्या हिशेबाची नोंद नमुना १७-क मध्ये करील आणि तो नमुना निरनिराळ्या लिफाफ्यात भरून त्यावर "नोंदवलेल्या मतांचा हिशोब" असे शब्द लिहील.

(२) मतदान संपल्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या प्रत्येक मतदान प्रतिनिधीला, मतदान केंद्राध्यक्ष नमुना १७-क मध्ये केलेल्या नोंदीची सत्यप्रत देईल आणि सत्यप्रत म्हणून ती साक्षांकित करील व त्याबद्दल त्या मतदान प्रतिनिधीकडून पावती घेईल.

**४९-न. मतदानानंतर मतदान यंत्र मोहोरबंद करणे**

